
अनिरुध्द
नक्षत्र दिवाळी
अंक
ज्योतिष, अंकशास्त्र, वास्तु व इतर विषयक
माहिती, मान्यवर ज्योतिर्विदांचे अभ्यासपूर्ण लेख,
वर्ष राशीफळ
दिवाळी अंक २०२४
संचालिका : डॉ. समिक्षा शिरीष दारवलीकर (ज्योतिष विद्या वाचस्पती)
अनिरूध्द नक्षत्र ज्योतिष संस्था रजि.नं. ८९०७३०५५१६
आर सी वॉर्ड कमर्शिअल ओमकार बिल्डिंग, बी १६०२, चिकुवाडी, शिंपोली रोड,
फिनेक्स हॉस्पिटल जवळ, मुंबई - ४०० ०९२.
संपर्क : ९८२१२५२५५६

# :: अर्पण पत्रिका ::



**माझे आई-बाबा**
**सौ. शुभांगी सुरेश देवरुखकर**
**व**
**श्री. सुरेश विनायक देवरुखकर**
**ह्यांना मी हा**
**अनिरुद्ध नक्षत्र दिवाळी अंक (२०२४)**
**अर्पण करीत आहे.**

## मनोगत

दिवाळी अंक दर वर्षी आपण आवडीने विकत घेतो आणि अधाश्या सारखें वाचून काढतो कारण जशी पोटाची भूक असते तशी ज्ञानाची भूक असते. ज्योतिष शास्त्रीय दिवाळी अंक म्हणजे ज्योतिष अभ्यासकांसाठी नानाविध ज्योतिषीय माहितीचे दालन उघडणारी एक पर्वणीच असते. मुख्य म्हणजे रोजच्या व्यग्रतेत गढून गेली असताना माझ्या ध्यानी मनी नसताना माझ्या एका whatsap वरील एका शिष्याने मला विचारले, समीक्षा ताई दिवाळीचे औचित्य साधून याही वर्षीच्या दिवाळी अंकाची आम्ही वात पाहतोय. त्यामुळे मी त्या दृष्टीने विचार करण्यास सुरवात केली आणि त्या दृष्टीने मी माझा लेखन प्रवास सुरू केला आणि व्हाटसप ॲप ज्योतिष मित्र मैत्रिणींना त्यांचे लेख देण्याबाबत विचारणा केली आणि समोरून सकारात्मक प्रतिसाद आला आणि माझे सर्व ज्योतिष मित्र- मैत्रीणी मिळून धडा धड लेख पाठवायला सुरवात केली. आमचे हितचिंतक सन्माननीय जाहिरातदारांनी जाहिराती देवून माझ्या या संकल्पाला मोलाचा हातभार लावून दिवाळी अंकाचा पाया रचला.

या वर्षीचे अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे आजच्या महागाईच्या काळात अंकाचा छपाईचा खर्च व अंक विकत घेताना वाचकांना त्याची मोजावी लागणारी अवाढव्य खर्च वाचवण्यासाठी या वर्षीचा दिवाळी अंक डिजिटल स्वरूपात आणि विनामुल्य जास्तीत जास्त ज्योतिष प्रेमींना उपलब्ध करून देण्याचे ठरले. तशी माझे सहकारी ज्योतिष मित्र श्री. हेमंत उपासनी आणि ज्योतिष मित्र मिलिंद यांचेशी झालेल्यां चर्चेत श्री. हेमंत उपासनी यांनी सर्व तांत्रिक व इतर सहकार्य व ज्योतिष मित्र मिलिंद यांनी अंकाची डिझायनिंग, अक्षर जुळणी व मांडणीची जबाबदारी उचलली. अशा प्रकारे या डिजिटल दिवाळी अंकाचे ज्ञान मंदिर पूर्णत्वास आले.

पुढे माझ्या आई वडिलांची, माझ्या सर्व ज्योतिष व सर्व सहकारी मंडळींची, सर्व लेखक ज्योतीर्विदांची, सन्माननीय जाहिरातदारांची ची मी कृतज्ञता व्यक्त करते. तसेच whatsap समूहातील प्रत्येक सदस्याचे मी वैयक्तिक आभार मानते, कारण त्यांच्या प्रतिसाद मुळे हा डिजिटल दिवाळी अंक सगळयांना वाचायला मिळत आहे याचा मला मनापासून आनंद होत आहे.

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)



## अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेचे कार्य व उपक्रम

अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेतर्फे प्रत्येक वर्षी विविध उपक्रम राबविले जातात. या संस्थेचा मुख्य उद्देश ज्योतिष प्रसार, प्रचार हा आहे. समाजात या शास्त्रा बद्दल जे गैरसमज पसरले आहेत, ते दूर करणे. तसेच नवीन अभ्यासकांसाठी हा एक उत्तम प्लॅटफॉर्म तयार झाला आहे. अनेक ज्योतिष शास्त्राचे तज्ञ, विद्वान, अनुभवी मंडळी या समूहामध्ये आहेत. ते सर्वजण आपल्या परीने ज्ञानदान करत असतात. तसेच इथे नवीन अभ्यासकाला वेगवेगळया कुंडल्या स्वत: सोडवण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेतर्फे प्रत्येक वर्षी अनेक ज्योतिषीय विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मागील वर्षांतील काही प्रमुख कार्यशाळा म्हणजे

अंक शास्त्र कार्यशाळा – श्री. दर्शन शुक्ल

अष्टक वर्ग कार्यशाळा – श्री. हेमंत उपासनी, सौ. समीक्षा ताई दारवलिकर

वैदिक, KP पद्धती कार्यशाळा – ज्योतिष मित्र मिलिंद

गोचर फलादेश कार्यशाळा – सौ. समीक्षा ताई दारवलिकर, श्री. ज्योतिष मित्र मिलिंद, श्री. अनिल महामुनी

हस्तमुद्रिका – श्री. हेमंत रणनवरे

K P पद्धतीचा फलादेश – श्री. सतीश नाईक

अशा प्रकारे विविध कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या.

अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेतर्फे वेळो वेळी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सौ. समीक्षा ताई दारवलिकर तसेच सौ. समीक्षा ताई दारवलिकर, श्री. हेमंत उपासनी, श्री. ज्योतिष मित्र मिलिंद, श्री. दर्शन शुक्ल, श्री. मनीष गोसावी, श्री. हेमंत रणनवरे आदि मान्यवरांचे विविध ज्योतिष विषयांवर अभ्यास व मार्गदर्शन सत्र झूम मीटिंग द्वारे आयोजित केली जातात.

या वर्षी गुरुपौर्णिमा झूम मीटिंग द्वारे आयोजित करण्यात आली. सौ. समीक्षा ताई दारवलिकर व बरेच जणांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेचा या वर्षीचा पदवी दान समारंभ व स्नेह संमेलन दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. भारताच्या अनेक राज्यातून यासाठी ज्योतिषी उपस्थित होते. महाराष्ट्र ज्योतिष परिषदेचे अध्यक्ष  श्री. अनिल चांदवडकर यांनी अध्यक्ष पद भूषविले.




डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

# ऋषी गुढशास्त्र संशोधन संस्था (रजि.) मुंबई

**(Guidance / Consultancy / Seminars / Workshops / Propagation)**
20, Gokul Niwas, B.B. Nakashe Marg, Tardeo Road, Mumbai - 400034.
Email: rushiastro23@gmail.com • Web: rishiastrology.com

## Degree Courses Offered:

1. **Astrology: 1) K.P. Astrology Pandit: Natal Chart Analysis and Horary Chart Basic Level and Advance level. (3 full days)**
2. **Lalkitab Jyotish Pandit: Lalkitab Jyotish, Samudrik and Vastu. (3 full days)**
3. **Hora Numerology Expert: Using 0 to 9 digits and name numerology.**
4. **Advance Course in Palmistry: Hasta-samudrik Alankar. (1 full day)**
5. **Tarot Card Expert: 20 sessions of 2 hrs.**
6. **Handwriting Expert: Handwriting and Signature analysis. (2 full days)**
7. **Shiva Swara Yogi: 3 days residential Course.**
8. **Spandan Mudra Yogi: 120 Hrs (2 Hrs in a week so one year)**
9. **Reiki Healing: 2 days for one level. Total 3 levels.**
10. **Swapna Analysis Expert: One full day**
11. **Shakun Analysis Expert: One full day**
12. **Remedy Expert: One full day**
13. **Cowerie Reading Expert: One full day**
14. **Rune's Reading Expert: One full day**
15. **Kautilya Arthashastra: One year**





## ~ Contacts ~

| | |
|---|---|
| **Santosh Ambavale (Founder)** | **9967 303 985** |
| | **8591 151 715** |
| **Babasaheb Deshmukh (President)** | **8805 636 999** |
| **Rishi Sir (Treasurer)** | **9137 224 571** |
| **Kshamika Lanjval (Secretary)** | **9773 382 421** |
| **Harshali Veer (Vice-Secretary)** | **9819 235 104** |


Karuya BhramanTea Tours
@bhramantea
स्पिती व्हॅली
16 - 23 सप्टेंबर
भूतान
21 - 28 सप्टेंबर
श्रीलंका
जानेवारी
पन्ना-खजुराहो - झासी - ग्वाल्हेर
26 नोव्हेंबर ते 3 डिसेंबर
अयोध्या - वाराणसी
10 - 15 डिसेंबर
UnSeen अंदमान
नोव्हेंबर, डिसेंबर
दत्तधाम
ऑक्टोबर - डिसेंबर
हंपी - बदामी
8 ते 12 जानेवारी
ताडोबा 1-3 ऑक्टोबर
17-20 ऑक्टोबर,
29 नोव्हेंबर-1 डिसेंबर
30 डिसेंबर - 1 जानेवारी
पेंच
15 - 17 नोव्हेंबर,
6 - 8 डिसेंबर
बांधवगड - भेडाघाट
30 डिसेंबर - 3 जानेवारी
कान्हा
21 - 24 नोव्हेंबर
देशांतर्गत: अयोध्या, वाराणसी, अष्टविनायक यात्रा, आसाम-मेघालय, कोस्टल कर्नाटक, हैद्राबाद दर्शन, श्रीशैलम, जगन्नाथ पुरी,उत्तराखंड, राजस्थान, सौराष्ट्र (गिरनार, सोमनाथ, द्वारका, गिर जंगल), स्टॅच्यू ऑफ युनिटी,
आंतरराष्ट्रीय: मालदीव, श्रीलंका, दुबई, मलेशिया, थायलँड, सिंगापूर, कंबोडिया, व्हिएतनाम, मॉरिशस, इ.
Karuya BhramanTea Tours
Reg.office: 5, Matrukrupa, Vrundavan Nagar,
Ashoka Marg, Nashik, Maharashtra, BHARAT
Mrs. Uma Deshpande : 9920801281 (Pune)
Rajendra Deshpande : 9220829392 (Nashik)
Mandar Khedekar : 9372501323 (Andheri)
Sapna Bendre : 9137280670 (Thane)
www.karuyabhramantea.com
bhramantea@gmail.com




# अध्यात्मिक आणि ज्योतिष पुस्तके घरपोच मिळण्यासाठी

संपर्क : सुहास समुद्र (8779387375)


Astro Guide Research Center
ज्योतिष , वास्तू विषयक
सल्ला आणि वर्ग.
रत्न क्रिस्टल रूद्राक्ष मिळतील.
संपर्क
9307974070


Aadya Exim
ज्योतिष आणि अरोमाथेरपीचा संगम
आम्ही आपली ऊर्जा संतुलित करण्यासाठी आणि आध्यात्मिक कल्याण मिळवण्यासाठी विशेष तयार केलेल्या सुगंधी अगरबत्ती देतो.
प्रत्येक राशीच्या विशिष्ट गुणधर्मांनुसार तयार केलेली आमचे उत्पादने, आपल्या जीवनात शांती आणि समाधान आणण्याचे उद्दिष्ट ठेवतात.
अरोमाथेरपी मिश्रण: नैसर्गिक सुगंध, जे मन:शांती, एकाग्रता आणि ऊर्जेला चालना देतात.
आमची खास उत्पादने :
आपल्या राशी स्वभावानुसार खास तयार केलेल्या सुगंधी अगरबत्ती
ग्रहदोषांवर उपाय करण्यासाठी खास तयार दोष निवारक अगरबत्ती
अरोमाथेरपी मिश्रण : नैसर्गिक सुगंध, जे मन:शांती, एकाग्रता आणि ऊर्जेला चालना देतात.
सेवा:
वैयक्तिकृत ज्योतिष सल्ला आणि अरोमाथेरपी उपचार, कार्यशाळा आणि वेबिनार
आद्य एक्झिमच्या उत्पादनांद्वारे – ज्योतिष आणि सुगंधाच्या शक्तीने मन:शांती, समाधान, एकाग्रता साधा, ऊर्जेला चालना द्या आणि आपल्या जीवनात संतुलन आणा !
RED SANDAL
Rs. 180/- Only
BURNING 1 HOUR
Lavender incense stick is a Natural Air Freshener
Aadya Exim
7798136101 / 8010176526
हीना
स्वामींची लाडकी
आंतरराष्ट्रीय वितरण उपलब्ध !
संपर्क : [8010176526 / 7798136101]
वेबसाइट: [www.aadyaex.com]

अनुक्रमणिका

| लेख क्र. | लेखाचे नाव | लेखक / संकलक | पान क्र. |
|---|---|---|---|
| | अर्पण पत्रिका | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| | मनोगत | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| | ऋणनिर्देश | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| | अनिरुद्ध नक्षत्र ज्योतिष संस्थेचे कार्य व उपक्रम | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| | जाहिरातीचे पान | | |
| १ | अंकशास्त्र | श्री. सतीश नाईक | |
| २ | चोरी वा हरवणे | श्री. सतीश नाईक | |
| ३ | संधिवात | श्री. सतीश नाईक | |
| ४ | नोकरी | श्री. सतीश नाईक | |
| ५ | हरवलेले दागिने | श्री. सतीश नाईक | |
| ६ | पैसा | श्री. सतीश नाईक | |
| ७ | आडमुठा स्वभाव | श्री. सतीश नाईक | |
| ८ | नियती चा खेळ | श्री. सतीश नाईक | |
| ९ | लहान मुलांचे शिक्षण आणि त्यांचे करिअर, त्यांचे तळहात | श्री. हेमंत रणनवरे | |
| १० | विद्यार्थी – ज्योतिष | श्री. हेमंत रणनवरे | |
| ११ | गायत्री मंत्राची उपासना | श्री. हेमंत रणनवरे | |
| १२ | चंद्र ग्रह | श्री. हेमंत उपासनी | |
| १३ | वैदिक ज्योतिष शास्त्र व अष्टक वर्ग | श्री. हेमंत उपासनी | |
| १४ | अष्टक वर्ग अभ्यास कुंडली | श्री. हेमंत उपासनी | |
| १५ | भाकूट दोष विचार | ज्योतिष मित्र मिलिंद | |
| १६ | ऋषी पराशर आणि स्थान विचार | ज्योतिष मित्र मिलिंद | |
| १७ | भृगु नंदी नाडी रहस्य | ज्योतिष मित्र मिलिंद | |
| १८ | स्त्री-पुरुष आणि शुक्र-मंगळ | ज्योतिष मित्र मिलिंद | |
| १९ | १२ वर्षाच्या हट्टी व भांडखोर मुलीची कुंडली | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| २० | समीक्षा ताईंचे भविष्य कथनासंबंधी अनुभवी सल्ले | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| २१ | शुभ कर्तरी योग आणि पाप कर्तरी योग | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| २२ | लोकमान्य टिळकांची कुंडली | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| २३ | अनुभविक ग्रह तोडगे | सौ. समीक्षा दारवलिकर | |
| २४ | दशग्रंथ कोणते? आणि दशग्रंथी ब्राह्मण म्हणजे काय? | श्री. सुहास समुद्र | |
| २५ | विष्णुसहस्त्रनामा मधील श्लोक आणि आपल्या जन्मनक्षत्र चरण यांचा संबंध | श्री. रविंद्र प्र देशपांडे | |
| २६ | इझी मनी अर्थात कमी श्रमामध्ये मिळणारा पैसा व कुंडलिमधील ग्रह योग | श्री. रविंद्र प्र. देशपांडे | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | गुरु व संतती सौख्य | श्री. रविंद्र प्र. देशपांडे | |
| २८ | कर्मभोग (प्रारब्ध) भोगूनच संपवणे गरजेचे आहे का? | श्री. दर्शन अ शुक्ल | |
| २९ | दररोजचा अनुभव | श्री. दर्शन अ शुक्ल | |
| ३० | पत्रिकेतील दोष व त्यावरील उपाय | श्री. अनिल दिगंबर महामुनी | |
| ३१ | राहू प्रभाव आणि उपाय. | श्री. गजानन परब | |
| ३२ | शनी | श्री. गजानन परब | |
| ३३ | बुधाचे महत्व | श्री. गजानन परब | |
| ३४ | नक्षत्रांचा नात्यातील प्रवास | श्री. अमोल साकोरकर | |
| ३५ | श्री स्वामी समर्थ यांना अक्कलकोट निवासी का म्हणत असत | सौ. मेधा महेश भंडारकवठेकर | |
| ३६ | चिदानंद रूपम् शिवोहम् शिवोहम् | सौ. मेधा महेश भंडारकवठेकर | |
| ३७ | मंगळ आणि मूलधारा चक्र | अस्ट्रो वास्तू मनीषा | |
| ३८ | वास्तुशास्त्रानुसार घरातील आग्नेय दिशा | अस्ट्रो वास्तू मनीषा | |
| ३९ | विवाह योग | डॉ. भारती मधुकर खटावकर | |
| ४० | "श्रीयंत्र" | डॉ. भारती मधुकर खटावकर | |
| ४१ | षडबल रहस्य | श्री. अजय भास्करराव पाठक | |
| ४२ | प्रश्न मंजुषा | श्री. अजय भास्करराव पाठक | |
| ४३ | स्वत:ची आणि वास्तुची उर्जा कशी वाढवावी | श्री. प्रशांत सुधाकर चौधरी | |
| ४४ | वैधव्ययोग / विधुरयोग "मेड फॉर इच अदर" | ज्यो. वीणा महेश लवाटे | |
| ४५ | विवाह : कुंडली दोष | श्री. दीपक नाईक | |
| ४६ | संतती योग आणि पंचमस्थान | श्री. शैलेश दत्तात्रय पुरोहित | |
| ४७ | केसांचे आरोग्य | गुरुशरण | |
| ४८ | धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष त्रिकोण | डॉ. अमित भालिंगे | |
| ४९ | षोडश वर्ग कुंडली | डॉ. अमित भालिंगे | |
| ५० | लाल किताब नुसार ग्रहांचे उपाय | श्री. संतोष अंबावले | |
| ५१ | ज्योतिष आणि अरोमा थेरपी यांचे सहजीवन | ज्यो. सोनल पंडित | |
| ५२ | कलियुगातील राहू आणि केतूचा प्रभाव | श्री. श्रीधर कुलकर्णी | |
| ५३ | शुक्र | श्री. मनीष गोसावी | |
| | वार्षिक राशी भविष्य २०२५ | श्री. संजय कुलकर्णी | |

**लेख क्र. १ : अंकशास्त्र**

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)**

मनुष्यप्राणी जेव्हा जन्म घेतो तेव्हाच तो काळाच्या चक्रात गुरफटत जातो. आणि मग आयुष्यभर त्यातच फिरत राहतो, शारीरिक आणि वैचारिक दृष्ट्या परिपक्व होत जातो. या कालचक्राची गती मोजण्यासाठी विधात्याने अंकाची सोय करून दिलेली आहे. या अंकाचे बोट धरूनच तुम्ही आयुष्यभर वावरत असता. शून्यापासून करोडो पर्यंतची प्रगती हेच अंक विशद करत असतात.

एक ते नऊ या प्रत्येक अंकावर एकेका ग्रहाचे प्राबल्य असते. त्या ग्रहाचे सकारात्मक वा नकारात्मक गुण या अंकांमध्ये उतरतात. त्यामुळे जेव्हा मूल जन्मास येते तेव्हा त्याच्या जन्मतारखेच्या एकल अंकाप्रमाणे त्याचे व्यक्तिमत्व ठरते आणि ते योग्य असल्याचे दृष्टीस येते. या एकल अंकालाच मुलांक असे म्हणतात.

या मुलांकाची आणि आपल्या नावातील अक्षरांना दिलेल्या अंकांची बेरीज यात फेरफार करून आपण चांगली नैसर्गिक स्पंदने मिळवू शकतो. आयुष्य सुखकर आणि प्रगतीपथावर नेऊ शकतो. तसेच जन्मतारखेच्या दिवशी केलेली महत्त्वाची कामे यशदायी ठरताना आढळतात.

पुढे एक ते नऊ याबद्दल माहिती दिलेली आहे.

जन्मांक किंवा मूलांक १

ज्या व्यक्तींचा जन्म १,१०,१९ किंवा २८ तारखेला होतो त्यांचा मूलांक १ समजावा. हा अंक रवी ग्रहाच्या अधिपत्याखाली येतो. रवी म्हणजे जीवन,तेज, धडाडी, सामर्थ्य,उत्साह होय.

या व्यक्ती खूप मानी असतात, निश्चयी असतात. विचारात प्रगल्भता आणि ठामपणा असतो. दुसऱ्याच्या सांगण्यावरून आपले विचार बदलत नाहीत. पण कुंडलीत जर रवी बिघडलेला असेल, तर अश्या व्यक्ती गर्विष्ठ, हट्टी, बढाई मारणाऱ्या, भपकेबाज, मत्सरी अश्या आढळतात. त्यामुळे लोकही यांच्या पासून दोन हात दूरच राहणे पसंत करतात.

स्वयंभू पणा असल्याने नव निर्मिती, संशोधन यांची आवड असते. अधिकार, मानसन्मान, समाजात प्रतिष्ठा याबाबतीत सजग असतात. बोलण्यात सडेतोड असतात, कोणाचीच भीडभाड ठेवत नाहीत. कोणत्याही क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवतात. सरकारी नोकऱ्या, ग्रामपंचायत, नगरपालिका, न्यायालय अश्या ठिकाणी यांचा वावर असतो. वीज, प्रिंटिंग, फोटोग्राफी, प्रकाश यांचा कारक ग्रह रवी असल्यामुळे इथेही या व्यक्ती दिसतात. लीडरशिप अधिकार किंवा राजकारण त्यांना आवडते.

१ मुलांकाच्या व्यक्ती आरोग्याच्या दृष्टीने कणखर असतात. पण म्हातारपणात हृदय, पाठीचा कणा, डोळे या संबंधित आजार होतात. हट्टी पणामुळे डॉक्टर आणि घरातील बाकीच्या मंडळींचे ही ऐकत नाहीत आणि स्वतः चा तोटा करून घेतात.कुठे थांबावे, हे अश्या मंडळींना कळत नाही आणि मग अती श्रमामुळे त्रास करून घेतात.

या लोकांची पत्नी किंवा महिलेसाठी पती जर असेच महत्वाकांक्षी असतील, तर संसार सुखाचा होतो, नाहीतर दुसऱ्या व्यक्तीची उगाच फरफट होते. १ मूलांक वाल्या व्यक्तीशी जुळवून घेणे लाईफ पार्टनर ला जमले नाही तर संसाराची वाट लागते.

१९ मूलांक असणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी १ म्हणजे रवी आणि ९ म्हणजे मंगळ या दोन्ही उष्ण ग्रहांची जोड आढळते. प्रचंड महत्वाकांक्षा, धडाडी, खंबीरपणा, जिद्द हे गुण आढळतात. पण वेळप्रसंगी अरेरावी आणि मी म्हणेन तेच खरे या भावनेतून समोरच्यावर अन्याय, अत्याचार ही करतात.

२८ तारखेमध्ये २ हा चंद्र आणि ८ हा शनीचा अंक येतो. दोघेही शत्रू अंक असल्याने अश्या व्यक्तींचे आयुष्य खडतर असते. यांच्या कडे खूप चिकाटी असते. प्रयत्न करून सुद्धा त्यामानाने यश येताना आढळत नाही. पण या व्यक्ती हार मानत नाहीत.

१ मूलांक वाल्या प्रसिद्ध व्यक्ती

वीर सावरकर, इंदिरा गांधी, लता मंगेशकर, दुर्गा भागवत, सई परांजपे, सुनील गावसकर, अजित वाडेकर

मूलांक २

ज्या व्यक्तींचा जन्म २,११,२० किंवा २९ तारखेला झाला आहे त्यांचा मुलांक २ असतो. हा अंक चंद्राच्या अधिपत्याखाली येतो.

या व्यक्ती त्यांचा चंद्र कुंडलीत सुस्थितीत असता नम्र, सौम्य आणि संवेदनशील आढळतात. आकलन क्षमता चांगली असते. शांतताप्रिय असतात, धार्मिक असतात. मन तरल असते. कोणावर तरी प्रेम करावे किंवा कोणीतरी आपल्यावर प्रेम करावे अशी सुप्त भावना असते, पण त्यात शारीरिक संबंधाचा विकार नसतो.

अश्या व्यक्ती कलासक्त असतात. मुळात चंद्र आणि कला यांचा घनिष्ठ संबंध आहेच. यांना प्रवास करणे आवडते, वेगवेगळ्या स्थळांना भेटी देतात. निसर्ग, निर्झर, धबधबे, पानेफुले, शेतीवाडी इत्यादी गोष्टीमध्ये रमून जातात. परोपकारी वृत्ती मूळे सामाजिक कार्यात उतरतात. वेळ प्रसंगी स्वतःच्या खिशाला खार लावून ही दुसऱ्याला मदत करतात.

पण....चंद्र हा परप्रकाशी आहे, स्वयंप्रकाशी नाही. त्यामुळे बऱ्याच वेळा अश्या व्यक्ती दुसऱ्यावर अवलंबून राहतात. त्यामुळे समोरील व्यक्ती यांचा फायदा उठवू शकते. फसवणुकीची शक्यता खूप निर्माण होते. बऱ्याच वेळा आपला जोडीदार किंवा मुले ही त्यांना राबवून घेतात. आपल्या घरातील मंडळींनी आपल्या सोबत राहावे, आपली कदर करावी अशी यांची अपेक्षा असते. स्त्रीयांच्या बाबतीत त्यांच्या मुळातील हळव्या स्वभावामुळे हे जास्त आढळते. आणि जेव्हा या अपेक्षा पूर्ण होत नाहीत त्यावेळी त्या कोमेजून जातात.वैवाहिक सौख्य पूर्णतः बिघडते.

कुंडलीत चंद्र बिघडला असेल, तर या व्यक्ती मनाने खूप कमकुवत आढळतात. मुख दुर्बलता असते म्हणून व्यक्त होत नाहीत, आतल्या आत कुढत बसतात. आत्मविश्वास कमी होतो. साध्या साध्या गोष्टीही मनाला लावून घेतात. प्रत्येक जण आपल्या बद्दलच बोलत आहे अशी भावना करून घेतात. एकदा मन बिघडले की शरीर बिघडते. डोळे आणि वाणी चे विकार, घसादुखी, सर्दी, कफ, पोटाचे आणि स्त्रियांच्या बाबतीत स्तनांचे आजार इत्यादी गोष्टी आढळून येतात. रोग प्रतिकार शक्ती कमी होते. हे आपल्या आजाराला ही कवटाळून बसतात. त्यातून बाहेर पडण्याची इच्छा ही गमावून बसतात. मग मनोविकारांची शक्यता खुप वाढते.

या लोकांनी स्वतः ला कशात तरी गुंतवून घ्यावे, कसला तरी छंद, कला जोपासावी. जग सुंदर आहे. आपण डोळे प्रयत्न पूर्वक उघडे ठेवावे.

२ मुलांकाच्या व्यक्तींनी आपली महत्वाची कामे २,११,२० किंवा २९ तारखेला करावी. पांढरा किंवा मोतीया रंगाचा वापर करावा. ते जास्त फलदायी ठरतील.

या अंका वरील सुप्रसिद्ध व्यक्ती

महात्मा गांधी, अमिताभ बच्चन, दिलीप कुमार, मोरारजी देसाई, ज्योत्स्ना भोळे, नवज्योत सिंग सिद्धू

मूलांक ३

ज्या व्यक्तींचा जन्म ३,१२,२१ आणि ३० या तारखांना होतो त्या व्यक्तीचा मुलांक ३ हा असतो. या अंकाचा स्वामी गुरु ग्रह आहे. १,२ आणि ९ मूलांक असलेल्या व्यक्तींशी यांची चांगली मैत्री होऊ शकते. पण ५ आणि ६ वाल्या लोकांशी यांचे पटत नाही.

गुरु च्या अधिपत्याखाली येत असल्याने ३ अंक वाल्या व्यक्ती सात्विक असतात. प्रामाणिक आणि विश्वासाला पात्र असतात. सद्सद विवेकबुद्धी जागृत असते. आदर्श आणि संस्कार हा यांचा पाया असतो. देवावर श्रद्धा असते. या मुलांका वरील मुले संस्कारी असतात, सहसा चुकीचे वागत नाहीत. हे लोक दुसऱ्याला मदत करायला सदैव तत्पर असतात. दूरदृष्टी, नियोजन आणि कामावरील निष्ठा, सातत्य हे गुण आढळून येतात. संयमी असतात. उच्च पद प्राप्तीसाठी कठोर मेहनत करतात.

पण कुंडलीत गुरु बिघडलेला असेल तर मात्र या व्यक्ती ढोंगी असतात. वरकरणी फार अध्यात्मिक दाखवून फसवणूक करतात. नियम आणि सच्चेपणा यांच्या अतिरेकाने दुसऱ्यावर आपली मते लादू पाहतात. एकतंत्री कारभार करू पाहतात आणि शत्रू वाढवून बसतात. यांचे वैवाहिक आयुष्य तसे बरे असते, कारण यांना जोडीदाराशी वाद घालता येत नाही, संसारात शांती आणि समाधान हा यांचा मूलमंत्र असतो. फक्त आपलीच मुले नव्हे, तर कुटुंबातील सर्वांना सांभाळून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. यांना आपल्या घरातील सर्व गोष्टी मोठ्या आणि चांगल्या सुशोभित असाव्यात असेही वाटत असते. पण तरीही टोकाचा आग्रह नसतो. संयम आणि दूरदृष्टी या गुणांच्या आधारावर त्या संसार चालवतात.

गुरूच्या अध्यात्मिक, शैक्षणिक,आर्थिक नियोजन आणि सर्वसमावेशक वृत्ती मुळे या व्यक्ती असाच व्यवसाय निवडतात. बँकामध्ये अधिकारी, आर्थिक संस्थांमध्ये आकडेमोड करणारे कारकून,शिक्षक,कीर्तन कार वगैरे क्षेत्रात या व्यक्ती आढळतात.कोणालाही शिकवण्याची वा सल्ला देण्याची आवड असते.

मंदिर,पूजा विधी यासाठी सढळ हाताने दान करतात, गरजू व्यक्तीला मदत करतात. पुस्तके खरेदी करून वाचतात.

अश्या व्यक्ती एका बाबतीत मात्र थोड्या कमनशिबी असतात. गुरु चे काम कोणत्याही बाबीत वृद्धी करण्याचे असल्याने चरबी वाढणे, रक्तात कॉलेस्ट्रॉल अथवा साखर वाढणे, स्थुलते मुळे मांड्या आणि पाय दुखणे वगैरे गोष्टी आढळतात. शरीरातील पोकळया आणि नलिका यांवर गुरूचा अधिकार असल्याने अपेंडिक्स, जलोदर, पोट फुगणे, गॅस वाढणे अश्याही गोष्टी दिसतात. काही वेळेस कॅन्सरच्या गाठी ही दिसतात. म्हणून चरबी आणि वजन वाढू न देणे ही ३ नंबर वाल्यांची प्राथमिकता असली पाहिजे.

एकंदरीत ३ मूलांक असणाऱ्या व्यक्ती बऱ्यापैकी सद्गुणी आणि विवेकी असतात.

या अंकावरील काही प्रसिद्ध व्यक्ती.

अब्राहम लिंकन, माधव ज्युलियन, रमेश देव, अशोक कुमार, जगदीश चन्द्र बोस, भालजी पेंढारकर, स्वामी विवेकानंद

मूलांक ४

ज्या व्यक्तींचा जन्म ४,१३,२२ किंवा ३१ तारखेला झाला आहे त्यांचा मुलांक ४ असतो. या व्यक्ती हर्षल या ग्रहाच्या अधिपत्याखाली असतात.१,२,७,८ या मुलांकाच्या व्यक्तींशी यांची चांगली मैत्री होऊ शकते.

४ मुलांकाच्या व्यक्तींचा स्वभाव इतरांपेक्षा काहीसा वेगळा असतो.त्या हरहुन्नरी असतात.वेगवेगळया विषयात रुची असते.सतत काहीतरी नवीन करण्याची उर्मी यांच्यात असते.तहानभूक विसरून काम करतात.या व्यक्ती संशोधक आणि मुत्सद्दी असतात.  बऱ्यापैकी चोखंदळ आणि रसिक असतात.सामान्य लोकांपेक्षा एखादी वेगळी वाट चालण्याची यांची तयारी असते.

या मुलांकावरील व्यक्तींना त्यांच्या आवडत्या चांगल्या गोष्टीसाठी उत्तेजना देऊन त्या मार्गावर वळवणे जरुरीचे असते.एक तर यांचा कामाचा आवाका प्रचंड असतो.मग हे झोकून देऊन काम करतात, मानसन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त करतात. अधिकारी,विचारवंत बनतात. उच्च अभिरुचीने समाजात स्थान निर्माण करतात.

अश्या लोकांचा दृष्टिकोन सहसा वैज्ञानिक असतो. धार्मिक संकल्पना, पूजापाठ यात खूप रुची नसते. बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर अशी वृत्ती असते. मग हे समाजात विक्षिप्त या सदराखाली मोडल्या जातात. घरी किंवा बाहेर काही सामाजिक बंधने आहेत नीतीनियम आहेत त्यांची ते परवा करत बसत नाहीत आणि नियम मोडत राहतात. काही वेळा टोकाच्या भूमिका घेतात. जनसामान्यांच्या विरोधात गेल्यामुळे यांची हेटाळणी होते, गुप्तशत्रू वाढतात. पण यांना त्याची फिकर नसते.

वैवाहिक आयुष्यात हे जोडीदाराच्या मतांना तितकीशी किंमत देत नाहीत. जोडीदार ही असाच रसिक आणि हरहुन्नरी असेल तरच यांना वैवाहिक सुख मिळते. नाहीतर यांच्या एकांगी स्वभावाने संसाराचा विस्कोट होतो. जोडीदाराला खूप तडजोड करावी लागते.

अती विचार आणि मेंदूचा अती वापर यामुळे हे लोक काही वेळा मानसिक रित्या खूप थकून जातात. त्यांना त्यांच्या आवडीचे काम मिळाले नाही की विमनस्क अवस्था, हिस्टेरिया असे प्रकार उद्भवू शकतात. विक्षिप्त या सदरात ते मोडले जातात. लोक यांच्यापासून दूर राहणे पसंत करतात.

चार मुलांकाच्या प्रसिद्ध व्यक्ती

आचार्य अत्रे, जयवंत दळवी, जॉर्ज वॉशिंग्टन, ना.सी.फडके, बाबुराव पटेल, भीमसेन जोशी

मुलांक पाच

ज्या व्यक्तींचा जन्म 5, 14 किंवा 23 तारखेला झालेला असतो त्यांचा मुलांक 5 असतो. हा अंक बुध या ग्रहाच्या अधिपत्याखाली येतो. या अंकावरील व्यक्तींचे तसें तर सर्वांशीच चांगले जमते. पण एक दोन आणि सहा अंक वाल्यांशी जास्त पटते.

पाच अंक वाले माणूसवेडे असतात. लोकांमध्ये,समाजामध्ये राहायची यांना आवड असते. यांची कोणाशीही पटकन मैत्री होते. यांना बोलायला फार आवडते. बोलण्यात एक प्रकारचा लवचिकपणा असतो. काही वेळा अघळ पघळ बोलणे बालिशपणाकडे झुकते.

बुध हा बुद्धीचा कारक ग्रह आहे. तसेच तो विविधता दर्शविणारा ग्रह आहे. त्यामुळे या पाच मुलांकाच्या व्यक्तींना गणित, ज्योतिष्य, गुढ शास्त्र, कला अशा वेगवेगळ्या गोष्टींची एकत्रित आवडही दिसून येते. आणि मग आपल्यालाही कौतुक वाटते कि हा किती गोष्टींमध्ये पारंगत आहे.

निवेदक, पत्रकार, समालोचक, साहित्यिक, सूत्रसंचालक म्हणूनही हे आढळतात. बुद्धिबळ, तंतुवादन, व्यंग चित्रकला अशा गोष्टींची ही आवड असते. गणिती स्वभावामुळे कॉम्प्युटर, शेअर्स, सीए, कंपनी सेक्रेटरी, एमबीए वगैरे क्षेत्रामध्ये नाव कमावतात. व्यवहार चातुर्य, व्यापारी कौशल यामध्ये 5 मुलांक वाल्या व्यक्ती पारंगत असतात.पण.....

यांच्यात एक खूप मोठा अवगुण असू शकतो. घरसोड वृत्ती. काही जणांना एका ठिकाणी पाय रोवून राहता येत नाही. मग हे निरनिराळे मार्ग चोखाळत बसतात. आणि मग एक ना धड भाराभर चिंध्या अशी यांची हालत होऊन जाते. त्यात कुंडलीत बुध ग्रह बिघडलेला असेल, तर या व्यक्ती खोटं बोलतात, फसवणूक करतात. कागदपत्रांमध्ये फेरफार करतात. झटपट पैसेवाला बनण्याच्या हव्यासापोटी सट्टा, जुगार, लॉटरी यात आपले नशीब आजमाऊ पाहतात. ठोकर बसली तरी नव्या उमेदीने भिंतीला धडका मारत बसतात.मग आपण म्हणतो कि इतका हुशार माणूस पण वाया गेला.

आजारपणाच्या बाबतीत 5 मुलांक वरील व्यक्तींना बधिरता, हातापायास मुंग्या येणे, भूक मंदावणे  अतिसार, गॅसेस,विस्मरण वगैरे गोष्टी होताना आढळतात.

14 तारखेच्या व्यक्ती म्हणजे एक आणि चार यांची जोडी. चार अंकावरील हरहुन्नरी हर्षलला एक अंकाचा रवी आत्मविश्वासाची जोड देतो. मग या व्यक्ती खंबीरपणे मार्ग काढून यशस्वी होतात. तर 23 तारखेची व्यक्ती  2 म्हणजे चंद्र आणि 3 म्हणजे गुरु यांच्या जोडीने समाजामध्ये प्रतिष्ठा,मान आणि किर्ती मिळवतात.

वरील अंकावर जन्मलेल्या ही व्यक्ती खालील प्रमाणे

पंडित जवाहरलाल नेहरू, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, अल्बर्ट आईन्स्टाईन, सुभाषचंद्र बोस,  द. मा. मिरासदार

मूलांक सहा

ज्या व्यक्तींचा जन्म 6, 15 किंवा 24 या तारखेला झालेला असेल तर त्यांचा मूलांक किंवा जन्मांक 6 असतो. अशा व्यक्ती शुक्राच्या अधिपत्याखाली येतात. 5 ,7 आणि 8 मूलांक वाल्या व्यक्तींशी यांचे चांगले जमते.

सहा मुलांकावरील व्यक्तीचे वर्णन करायचे असेल तर या व्यक्ती रसिक,कलाप्रेमी,शौकीन आणि विलासप्रिय असतात. यांना उपजत सौंदर्य दृष्टी असते. निसर्ग, प्रवास,फळे फुले यांची आवड असते. शुक्र हा सौंदर्याचा कारक ग्रह, त्यामुळे सुंदर वस्तू कलाकुसर,सजावट, सुशोभित घर या गोष्टींकडे ते आकृष्ट होतात.

6 मुलांकाच्या व्यक्ती  एखादी तरी कला शिकावी या करता धडपड करत असतात. चित्रकला,पेंटिंग विणकाम, भरतकाम, नृत्य, अभिनय वगैरे क्षेत्रांमध्ये काहीतरी करू इच्छितात. चांगल्या कलाकारीची यांना जाणीव असते. भौतिक सुखाची ही ओढ असते. त्यामुळे हे जीवनाकडे आनंदी वृत्तीने पाहू शकतात. वेळेबाबत या व्यक्ती अतिशय काटेकोर असतात. निश्चयीपणा

हा यांचा खास गुण असतो. हाती घेतलेले काम योजनाबद्ध रीतीने पार पाडतात. पण इतरांकडूनही तशीच अपेक्षा केल्याने काही वेळा रोशास पात्र होतात.

यांच्यातील खास बाब म्हणजे यांच्यात आकर्षण शक्ती तीव्र असते. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातून या जनमान्यता मिळवतात. यांच्या वाणीत ममत्व आणि मार्दवता असते. स्वप्नाळूपणा आणि उत्साह यांच्या संयोगाने यांचे जीवन विविधतेने नटलेले असते. मैत्री करण्याची कला यांना अवगत असते.म्हणून समाजात या व्यक्तींकडे आदराने पाहिले जाते.

पण 6 मुलांकवरील व्यक्तीच्या कुंडलित शुक्र बिघडला असेल तर प्रेमात अपयश येऊ शकते.अशा व्यक्ती व्यसनी आणि वैफल्यग्रस्त बनतात. मग सूड उगवण्याच्या नादात  काहीजण व्यभिचारी बनतात, भिन्नलिंगी व्यक्तीला आकृष्ट करून तिचा गैरफायदा घेतात.  चैन,मनोरंजन,मोठेपणा आणि  भपकेबाजी याच्या अति हव्यासापाई कर्जाच्या खाईत बुडतात.सट्टा,जुगार फसवा फसवी यामुळे यांच्या जीवनाची गाडी घसरणीला लागते.

आजारपणाच्या बाबतीत पाहता यांना डोळ्याचे,मूत्राशयाचे, महिलांना पाळीचे विकार, गुप्तरोग, लैंगिक विकार वगैरे संभवतात.

शुक्र स्वामी असल्याने या व्यक्ती नाट्य,चित्रपट संगीत, गायन या क्षेत्रात वावरताना आढळतात. सौंदर्य प्रसाधने करमणुकीची साधने हॉटेल व्यवसाय,ट्रॅव्हल टुरिझम, कापड, सोने-चांदीचा व्यापार वगैरे धंदा करतात. फळे फुले,अत्तर,अगरबत्ती मिठाई,कोल्ड्रिंक्स अशा क्षेत्रात काम करतात.

6 मुलांकाच्या व्यक्तीचे वैवाहिक जीवन साधारणतः चांगले असते. ते आपल्या जोडीदारावर प्रेम करतात, पण शुक्र बिघडलेला असल्यास विवाहबाह्य संबंध ही आढळून येतो.

15 तारखेच्या व्यक्तींमध्ये एक म्हणजे रवी आणि पाच म्हणजे बुध यांचा मिलाप आढळतो. या व्यक्तींचे वकृत्व आणि व्यासंग दांडगे असते. वाचन,पुस्तके, कागदपत्रांच्या नोंदी आणि त्याची हाताळणी खूप चांगल्या रीतीने करतात. 24 तारखेच्या व्यक्तींमध्ये दोन म्हणजे चंद्र आणि चार म्हणजे हर्षल यांचा मिलाप असतो. हरहुन्नरी प्रवृत्तीने आणि प्रेमाने त्या सर्वांना जिंकून घेतात.

6 या मुलांकावरील सुप्रसिद्ध व्यक्ती

कपिल देव, सुरैया, सचिन तेंडुलकर, नारायण सुर्वे, सुरेश भट, वसंत सबनीस

मुलांक सात

ज्या व्यक्तींची जन्मतारीख सात 7,16  किंवा 25 आहे त्या व्यक्तींचा जन्मांक किंवा मुलांक हा 7 असतो. हा अंक नेपच्यून या ग्रहाच्या अधिपत्याखाली येतो. एक तीन चार आणि पाच या मुलांकाच्या व्यक्तीशी यांचे चांगले जमते.

या व्यक्तींचा स्वभाव अस्थिर, संवेदनशील आणि भावनाप्रधान असतो. विचारात स्वतंत्र वृत्ती आणि उत्स्फूर्तता असते. गुढ शास्त्र, संमोहन विद्या,दैवी चमत्कार यात रुची असते. उपासना व साधना केल्यास यांची अध्यात्मात खूप प्रगती होऊ शकते.

या व्यक्तींना सूचक स्वप्ने पडतात. पुढे घडणाऱ्या गोष्टींची आधीच कल्पना मिळते. कुंडली मध्ये लग्नात नेपच्यून असता काही व्यक्ती स्वप्नात बडबडतात, बिछान्यावर उठून बसतात तर काही झोपेत चालतात ही.

नाविन्यपूर्ण कल्पना आणि योजनाबद्ध काम ही यांची जमेची बाजू असते. लेखन, कला परदेशी वस्तू संबंधित व्यवहार, रसायने, औषधी साधने अशा ठिकाणी सात मुलांकावरील व्यक्ती कार्यरत झालेल्या आढळतात.

या व्यक्तींना मनावर ताबा ठेवणे तितकेसे जमत नाही. त्यामुळे एखाद्या चांगल्या व वाईट गोष्टीला ते पटकन प्रतिसाद देतात. मनाविरुद्ध काही घडले की खचून जातात. चिडचिड करत बसतात. मानसिक दुर्बलतेमुळे काही वेळा मेंदूचे विकार होणे,वेड लागणे,फिट्स येणे असे प्रकार संभवतात.

या व्यक्तींच्या कुंडलीत जर नेपच्यून चा शुक्राशी अशुभ योग होत असेल तर वैवाहिक जीवनात काही घोटाळे होतात, अनपेक्षित घटनांचा सामना करावा लागतो.फसवणूक होणे,पूर्ण माहिती न मिळणे अशा गोष्टी घडू शकतात.

अस्थिर मनोवृत्ती आणि निर्णय क्षमतेची कमी यामुळे या व्यक्तींची आर्थिक फसवणूक ही होऊ शकते. म्हणून त्यांनी कोणालाही जामीन राहणे टाळावे.

16 तारीख म्हणजे रवी आणि शुक्राची जोडी. शुक्राच्या युतीत रवीचा तेजोभंग होतो. म्हणून कलेच्या क्षेत्रात किंवा विवाहाच्या बाबतीत या व्यक्ती चर्चेचा विषय बनतात.25 तारीख म्हणजे चंद्र आणि बुध यांचा मिलाप. बुद्धी चातुर्य आणि प्रभावित करणारे व्यक्तिमत्व,वाणी यांच्या बळावर या व्यक्ती समोरच्यावर छाप पाडतात.

7 मुलांकावरील काही सुप्रसिद्ध व्यक्ति

अटल बिहारी वाजपयी, कवी केशवसुत, श्रीराम लागू, माणिक वर्मा, व.पू.काळे, चार्ली चापलीन.

मुलांक आठ

मुलांक ८ हा शनीच्या अधिपत्याखाली येतो.ज्यांचा जन्म ८,१७ आणि २६ या दिवशी झाला आहे त्यांचा मुलांक ८ असतो.

शनी चे सर्व गुण,अवगुण इथे एकवटलेले दिसतात.या अंकातील माणसे खूप कष्टाळू,चिवट,सहनशील असतात.आपले काम करत राहणे यात त्यांची इतिकर्तव्यता असते.कष्ट करूनही हवा तसा पैसा हाती येत नाही, त्यामुळे यांच्याकडे दूरदृष्टी आणि काटकसर असते. आर्थिक नियोजन फार चांगले करतात. म्हणून ते समाजात कंजूस म्हणून प्रसिद्ध होतात.

पण यांना म्हणावे तसे यश लाभत नाही आणि आयुष्याच्या उतरणीला हे थोडे स्थिरस्थावर होतात. शनी म्हटल्यावर उशीर हा होणारच. खूप धीर धरल्याने काही वेळा यांना निर्णय घेण्यात उशीर होतो आणि संधी हातातून निसटून जाते. वैवाहिक जीवन ही यथातथा असते. कारण हे सुखाच्या क्षणांचा आनंद ही भरभरून घेऊ शकत नाहीत.

पण एकंदरीत ८ भाग्यांकाच्या या व्यक्ती राजकारणी असतात,आपल्या मनातील कधीच उघड पणे बोलत नाहीत.धूर्तपणे वागून कोणतीच गोष्ट आपल्या पर्यंत पोहोचू देत नाहीत.इतरांशी थोडे दूर राहून वा फटकून वागतात.यांचे लक्ष मात्र चौफेर असते.

कोणत्याही प्रकारचे काम करायला यांची तयारी असते. त्यामुळे हे कामगार म्हणून किंवा कनिष्ठ दर्जाची कामे करताना ही आढळतात.उधार उसनवार न करता "ठेविले अनंते तैसेचि रहावे "असे तत्व अंगी बाळगतात.

यांना शनीचे आजार संभवतात. सांधेदुखी, हाडांचे विकार, केस गळणे, चर्मरोग, थंडी पासून होणारे कफ खोकला वगैरे. काही वेळा हे आजार दीर्घकालीन ही असतात, पण सदर व्यक्ती त्याला न घाबरता चिवट पणे सामोरी जाते.

शनी हा मृत्युकारक ग्रह आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाचे श्वास तो निर्धारित करतो. त्यामुळे मोठ्या संख्येने होणारे काही विध्वंस आणि प्राणहानी ८ मुलांकावर होताना आढळतात. मुंबईचा पुर, गुजरात मधील भूकंप ही काही ठळक उदाहरणे.

या मुलांकच्या काही व्यक्ती

पू.ल.देशपांडे, गो. नी. दांडेकर, रत्नाकर मतकरी, आशा भोसले, बालगंधर्व, देव आनंद

मूलांक ९

जन्म तारखेची बेरीज जर ९ येत असेल तर अश्या व्यक्ती मंगळ या ग्रहाच्या प्रभावाखाली असतात. म्हणजे ९,१८,२७ इ.

मंगळाचे सर्व गुण यांच्यात ओतप्रोत भरलेले असतात. घाई, उताविळपणा, चंचलपणा, रागीट वृत्ती, साहस इत्यादी गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. महत्वाकांक्षा हा यांचा मोठा गुण वा अवगुण असतो. अगदी लहानपणा पासूनच मस्ती, मारामाऱ्या,धडपड आढळते. पालक हैराण होऊन जातात.

पण एखादे काम करण्यात अशी व्यक्ती खूप तत्पर असते. घेतलेले काम पूर्णत्वास नेतेच. त्यांना दुसऱ्याने चुका दाखविलेल्या आवडत नाहीत. राग पटकन येतो. कामाच्या बाबतीत यांची दुसऱ्याकडून ही तशीच अपेक्षा असते आणि तसे न घडल्यास त्याला सोडत नाहीत.

यांचा खंबीरपणा आणि निर्णय क्षमता या दोन गोष्टी यांना आयुष्यात पुढे घेऊन जातात. दुसऱ्या कडून काम करवून घेण्यात हे वाकबगार असतात. म्हणून पुढारी, कामगार नेते म्हणून हे नावारूपास येतात. पोलीस डिपार्टमेंट, सैन्य, इंजिनिअरिंग विशेषतः केमिकल्स आणि मेकॅनिकल अश्या ठिकाणी नोकऱ्या करतात. स्वतःहुन जबाबदारी उचलण्याची तयारी असल्याने हे कुठेही आघाडीवर असतात.

पण....ही माणसे तोंडाने फाटकी असतात. आपल्या बोलण्यामुळे समोरचा दुखावला जातोय हे यांच्या गावी नसते. त्यामुळे समाजात अशी माणसे बदनाम होतात. विशेषतः नवरा आणि बायको या संबंधाने तर हे खूप जाणवते. प्रेमात झटपट निर्णय घेऊन लग्न करून अशी व्यक्ती मोकळी होते आणि कदाचित निर्णय चुकला तर मात्र समोरच्याची उणीदुणी काढत बसते, कारण स्वतः ची चूक यांना मान्य नसते आणि मग मी रागावलो ते योग्यच होते याचे समर्थन देत बसते. त्यामुळे वैवाहिक सौख्य बिघडू शकते. पण वैवाहिक जोडीदार ही यांना अनुरूप असेल तर मात्र एकमेकांचे खूप लाड पुरवतात, हौसमौज करतात. ९ मूलांक असलेली पत्नीही काही वेळा नवऱ्याला धारेवर धरते. तो तिच्या अंकित राहतो. सर्व कामे झटपट उरकायच्या वृत्तीने हे दुसऱ्याला खुश ठेवत नाही. प्रेम कमी असते असे नाही, पण ते व्यक्त करणे यांना जमत नाही. नवरा बायकोचे लाड ही करील आणि त्याच वेळी सर्वादेखत तिच्यावर खेकसेल ही. त्यामुळे काही वेळा वैवाहिक जीवनाचा विचका ही होऊ शकतो.

या मुलांकवरील प्रसिद्ध व्यक्ती :धोंडो केशव कर्वे, गुरुदत्त, व्ही. शांताराम, सेतू माधव पगडी, ज्योत्स्ना देवधर, विनोद कांबळी

शुभम भवतू...... श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. २ : चोरी वा हरवणे

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)**

एखादी वस्तू हरवली किंवा चोरीला गेली तर होणारा ताण, मानसिक घालमेल हा अनुभव ज्याची वस्तू गेली आहे तोच जाणतो. काय करावे हे सुचत नाही. आपण ती वस्तू नक्की कुठे ठेवली होती, चोरीला गेली असेल तर कोणी आणि कशी चोरलीअसेल अश्या विचारांनी त्याचे डोके फिरून जाते.प्रसंगी तो पोलिसात तक्रार करतो वा आपल्या नशिबाला दोष देत बसून राहतो.

पूर्वी नक्षत्रा वरून वा तात्कालिक कुंडली वरुन ती वस्तू मिळेल वा नाही याचे उत्तर दिले जाई. आता कृष्णमूर्ती पद्धतीत यासाठी एकच नियम आहे.

लाभ स्थानाचा सब म्हणजेच उप नक्षत्र स्वामी जर हरविलेल्या वा चोरीस गेलेल्या वस्तू संबंधित भावांचा कार्येश असेल किंवा त्या वस्तू संबंधित भावाचा सब जर लाभ स्थानाचा कार्येश असेल तर ती वस्तू सापडते.

अश्या वस्तू संबंधित भाव खालील प्रमाणे पाहिले जातात.

१) पैसे, सोनंनाणं, दाग दागिने. - द्वितीय भाव. २) पुस्तक, कागदपत्रे, दस्तावेज- तृतीय भाव. ३) वाहन - चतुर्थ भाव वगैरे.

वरील प्रश्न हे प्रश्न कुंडली मांडून सोडवायचे असतात.विदशा स्वामी चा काल निर्णयासाठी उपयोग होतो. हरवलेल्या वस्तूच्या भावाचा सब वक्री ग्रहाच्या नक्षत्रात असेल, तर ती वस्तू सापडत नाही. तसेच तो ज्या भावांचा बलवान कार्येश असेल, त्या ते भाव जी जागा निर्देशित करतील तिथे ती वस्तू सापडते. वस्तू जर चोरीला गेली असेल, तर सप्तम भावाचा सब आपल्याला चोरा बद्दल माहिती देतो. तो कोण असावा स्त्री की पुरुष, त्याचे ठिकाण, साधारण पेहराव, रंगरूप याचा अंदाज येवू शकतो.

हरवलेल्या वस्तू संबंधित स्थान वा लाभाचा सब जर आठव्या भावाचा कार्येश असेल, तर एखादी वस्तू सापडली किंवा पोलिसांनी पकडून दिली तरी त्यात काही तरी न्यूनता आढळते. काहीतरी नुकसान झालेले असते. दागिने,सोनं वगैरे गोष्टी वितळले जातात, वाहन असेल तर मोडतोड करून काही पार्टस काढलेले असतात. गुरु किंवा भाग्येशाची त्या वस्तूच्या स्थानावर दृष्टी असता मात्र बऱ्याच वेळी ती वस्तू शाबूत असल्याचे आढळून येते.

धन्यवाद !

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. ३ : संधिवात

## लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९९१५१७५०)

म्हणजेच इंग्रजी भाषेत Arthrities. हा शब्द सध्या घरोघरी उच्चारला जातो. खूप जण आणि त्यातही बहुतांशी स्त्रिया या आजाराने त्रस्त आहेत. कितीही औषधोपचार केले, तरी यातून बाहेर पडणे कठीण जाते. control होऊ शकतो, पण cure नाही अशी या आजाराची स्थिती असते. डॉक्टरांची बहुतेक औषधे ही वेदनाशामक असतात, त्यामुळे त्यांचा किडनी वर ही परिणाम होतच असतो. त्यातच जेव्हा एखादी गोष्ट सहन करणे अवघड होते त्यावेळी पित्त, डोकेदुखी, चिडचिड असे प्रकार वाढीस लागतात. जिणे बेजार होते.

मुळात संधिवात म्हणजे संधी आणि वात अशी शब्दांची जुळणी आहे. संधी म्हणजे हाडांमध्ये असलेले जोड आणि वात म्हणजे वायू इतकी सरळ साधी संकल्पना आहे. जोड अर्थात जॉइंट मुख्यत्वे  गुढगा, घोटा, मान, कंबर, हाताचे कोपर येथे आढळतात. वर्षानुवर्षे वापराने आणि त्यांच्या एकमेकांवरील घर्षणाने त्यांच्या मधील वंगण हळूहळू कमी होत जाते आणि तिथे एक प्रकारची मोकळी जागा किंवा गॅप तयार होते.अश्या या मोकळया जागेत अंगात असलेला वात राहायला येतो आणि या हाडांची हालचाल मुश्किल करतो.चालण्यासाठी पायांची हालचाल तर करावीच लागणार, त्यामुळे पूर्ण शरीराचा भार ज्या गुडघा आणि घोट्या वर आहे त्यांना जास्त त्रास होतो.मरणप्राय वेदना होतात, काहीच करावेसे वाटत नाही, फक्त झोपून रहावे अशी स्थिती पैदा होते.

माणूस ज्यावेळी जन्माला येतो त्यावेळीच मृत्यूचा कारक ग्रह शनी त्याचे श्वास निर्धारित करतो. शनीचा अंमल केस, दात, त्वचा आणि हाडांवर आहे. ग्रह आपले काम व्यवस्थित करतात. ज्याच्य कुंडलीत शनी खराब स्थितीत आहे, त्याला वरील गोष्टींचे त्रास जास्त होतात. माणूस वृद्ध होत जातो तसा शनी कार्यरत होतो. आजकाल तर तरुण लोकांवर ही तो काहीवेळा लवकर मेहेरबान होतोय. वरील सर्व गोष्टीवरील परिणाम दृगोच्चर होतात. त्यातही हाडे ठिसूळ होणे, संधिवात हे जास्त प्रमाणात आढळते. आणि ते खूप वेदनादायी असते. केस गळणे, त्वचा शुष्क होणे किंवा दात पडणे यात तितक्या वेदना नाहीत.

आता हा शरीरात वात किंवा वायू येतो कुठून? आपल्या शरीरात एकूण पाच प्रकारचे वायू तयार होत असतात. पान, अपान, व्यान, उदान आणि समान. यापैकी अपान वायू हा आपण खाल्लेल्या अन्नापैकी जो भाग पचत नाही ते अन्न आतड्यात कुजून त्यापासून तयार होतो. तो सर्व प्रातर्विधी द्वारे बाहेर पडेलच याची शाश्वती नाही, त्यामुळे उरलेला शरीरात राहण्यासाठी जागा शोधतो आणि त्याला अशी जागा वर सांगितलेल्या जॉइंटस् मध्ये मिळते. हाडांची वा सांध्यांची झीज तर आपण थांबवू शकत नाहीच. आता यावर उपाय काय? तर शरीरात असा अपान वायू साठू न देणे.

'पेट साफ तो तब्येत साफ' असे म्हटले जाते. ते अगदी तंतोतंत खरे आहे. पोटात गॅस अथवा वायू साठू नये याची काळजी घ्यावी. ठराविक दिवशी रेचक घ्यावे. त्यातही एरंडेल तेल चांगले. अगदी तरुणपणात घेतले तरी चालेल. आमच्या बालपणी आमची आई दमदाटी करून, वेळप्रसंगी मारझोड करूनही आम्हाला एरंडेल प्यायला लावीत असे. काही जणांना असा अनुभव असेल ही. जुने लोक नक्कीच हुशार आणि सुबुद्ध होते. शिक्षण कमी असले तरी व्यवहारज्ञान होते, परंपरा जपून होते.

एरंडेल तेलाच्या चवीमुळे लोक त्याच्या वाटेला जास्त जात नाहीत. पण ते नैसर्गिक असून त्याने आतड्यांना ही वंगण होते हा त्याचा प्लस पॉइंट आहे. त्यातही ते आपल्या शरीराला जसे मानवेल तसेच रात्री झोपताना कोमट पाणी, कोरा चहा वगैरे मधून घ्यावे. एखाद्याला एक चमचा चालतो म्हणून मलाही चालेल असे नाही. अगदी अर्ध्या चमच्या पासून सुरुवात केली तरी चालेल.

एक लक्षात ठेवा संधिवात हे विकतचे दुखणे आहे. त्याला सुरुवाती पासूनच रोखणे इष्ट.

शुभम भवतू

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

**लेख क्र. ४ : नोकरी.**

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)**

नोकरी हा शब्दच तुम्हाला सांगतो कि तुम्ही कोणाचे तरी नोकर आहात,कोणाला तरी बांधील आहात,तुमचे स्वतःचे रागलोभ,इच्छा तुम्हाला बाजूला ठेवायला हव्या.स्वतःला न पटणारे काम ही बऱ्याच वेळा करावे लागते.आणि त्यात बॉस इज ओल्वेज राईट या न्यायाने त्याचे तर ऐकायचे आहेच.त्यात आजूबाजूचे सहकारी नीट असतील तर ठीक नाहीतर अजून तोंड दाबून बुक्क्यांचा मार.

अश्याच नोकरीत कंटाळलेल्या व्यक्तीने माझ्याशी संपर्क साधला.खाजगी नोकरी असून ५८ व्या वर्षी निवृत्ती होती.प्रश्न होता सध्याची नोकरी सुटून दुसरी चांगली नोकरी मिळेल का?

११/०३/१९७० १०-१२ सकाळी. साखरपा, रत्नागिरी.

मी ही कुंडली ३०/०७/२०२२ ला दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी पाहिली. त्यावेळी रुलींग प्लॅनेट मंगळ, केतू, रवी, शनी असे होते.

नोकरी, व्यवसायासाठी दशम भावाचा सब पाहिला जातो. इथे तो शनी आहे. शनी चे भाव पाहू.

शनी -१२

केतू-(५)

केतूचा नक्षत्र स्वामी शुक्र - (११)/(२)/(७)

केतूचा राशी स्वामी रवी - (११)/५

रवीचा नक्षत्र स्वामी गुरु - (६)/(९)/१२

शनी स्वतः चर राशीत असून त्याचा सब केतू सिंह या स्थीर राशीत आहे. जरी सप्तम स्थान लागत असेल तरी यांनी नोकरी च करावी.

सध्या राहू ची महादशा २५/०५/२०३१ पर्यंत आहे.

राहू - (११)/(१२)/१०/११

राहू - (११)/(१२)/१०/११

चंद्र - (१२)/(४)

केतू - (५)/(११)/५

दशमाचा सब आणि महादशेची सांगड घालता फक्त ५ आणि ११ हे दोनच भाव सामाईक आहेत.

आता जर अंतर्दशा स्वामी ५ आणि ९ या नोकरी सोडविण्यासाठी जबाबदार असलेल्या भावांसोबत २/६/१०/११ पैकी भावांचे बलवान कार्येश असतील तर सध्याची नोकरी सुटून नवीन नोकरी लागेल.

बुधाची अंतर्दशा २३/११/२०२३ पर्यंत आहे.

बुध - (१०)/(३)/६

बुधाची दृष्टी ५

राहू - (११)/(१२)/१०/११

शुक्र - ११/२/७

शनी - (१२)/१०/११

बुध एक दृष्टी सोडली तर कोणत्याही प्रकारे पंचम वा नवम भावाचा बलवान कार्येश नाही.

पुढील केतू ची अंतर्दशा ही ५ आणि ९ बलवान दाखवत नाहीत. त्यामुळे नोकरीत बदल संभवत नाही.

मुळात या व्यक्तीच्या लग्नस्थानी शनी, चंद्र आणि मंगळ आहे. शनी नीच आहे, चंद्राबरोबर पूर्ण युतीत आहे. नकारात्मकता खूप आहेच. त्यात सोबत मंगळ. आक्रस्ताळेपणा, चिडचिड, दुसऱ्यावर राग काढणे इत्यादी प्रकार असणार. अश्या व्यक्तीचे नोकरीत कसे काय इतरांशी पटणार?

मी त्यांना समजावले की मला तुमची सध्याची नोकरी चेंज होताना दिसत नाही. अजून पाच वर्षे शिल्लक आहेत. आहे त्यात गोड मानून चालू ठेवा, पगार मिळतोय यात समाधान माना. हेही दिवस निघून जातील.

शुभम भवतू.

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. ५ : हरविलेले दागिने

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)**

एका परिचयातील ठाण्याला राहणाऱ्या गृहिणींचा फोन आला.त्याच दिवशी सकाळी त्या तपोवन एक्स्प्रेस ने नाशिक ला मुलीकडे जाणार होत्या. आधल्या संध्याकाळी त्यांनी दोन बांगड्या, कुड्या आणि एक चेन अश्या वस्तू गोदरेज च्या लॉकर मधून बाहेर काढल्या होत्या,तितक्यात पाहुणे आल्याने त्यांनी त्या वस्तू कुठेतरी ठेवल्या,पूर्णपणे विसरल्या आणि आता जायच्या वेळेस सापडत नव्हत्या. त्यांनी मुलीकडे जाणे रहित केले.खूप शोधाशोध करून ही काही उपयोग होईना त्यावेळी त्यांनी मला फोन केला होता.

मी त्यांच्या कडून प्रश्न कुंडली मांडण्यासाठी नंबर घेतला, त्यांनी २५ हा नंबर दिला.ही कुंडली मी २५ एप्रिल,२०२३ ला संध्याकाळी ७ वाजता पाहिली.

चंद्र द्वितीय स्थानात मंगळा बरोबर मिथुन राशीत आहे. द्वितीय स्थान हे पैसाअडका, दागिने यांचे स्थान आहे.प्रश्न योग्य होता.धनस्थान आणि

लाभस्थान यांचे अधिपती अनुक्रमे बुध आणि गुरु व्यय स्थानात एकत्र आहेत.त्यामुळे दागिने मिळतील.वस्तू चोरीला गेली असेल तरी शष्ठ भावाचा अधिपती जर वरील ग्रहांशी शुभयोग करीत असेल तरी वस्तू ताब्यात मिळते.शश्ठ भावाचा अधिपती शुक्र असून तो लग्नातून बुध आणि गुरुशी एक राश्यांतर योग करतोय.पण हे झाले ठोकताळे.यावर अवलंबून राहता येणार नाही.

कृष्णमूर्ती पद्धती प्रमाणे लाभ स्थानाचा उप नक्षत्र स्वामी जर वक्री ग्रहाच्या नक्षत्रात नसून द्वितीय भावाचा बलवान कार्येश असेल तर वस्तू सापडते.लाभ भावाचा सब शनी आहे.शनी चे भाव पाहू.

शनी - (१०)/१०/(११)

शनीची दृष्टी १२,४,७

शनीचा सब

राहू - (१२)

राहू चा सब

केतू - (६)/(१)/२

राहूचा राशी स्वामी

मंगळ - (२)/(७)/(८)

मंगळाचा सब

गुरु - (१२)/(९)/१२

शनी द्वितीय भावाचा मंगळाच्या माध्यमातून बलवान कार्येश आहे.दागिने सापडणार.पण केव्हा?जेव्हा द्वितीय भावाच्या बलवान कार्येश ग्रहाच्या नक्षत्रा मधून चंद्राचे भ्रमण होईल तेव्हा.मुळात चंद्रच द्वितीय भावाचा बलवान कार्येश आहे.त्यामुळे चंद्र मिथुन राशीत असतानाच आज,उध्याकडे दागिने मिळायला हवेत.

दागिन्यांचा कारक ग्रह म्हणून मी शुक्राकडे लक्ष वळविले. शुक्राची च अंतर्दशा,विदशा,

सूक्ष्मदशा सुरू आहे.

शुक्र - १/१/२

चंद्र - (२)/(४)

दोन्हीही स्त्रीग्रह आहेत. दागिन्यांचे कारक आहेत.

शुक्र बेडरूम,तेथील कपड्यांचे कपाट,ड्रेसिंग टेबल वगैरे गोष्टी तर चंद्र स्वयंपाक घर,तेथील भांडीकुंडी,कपाटे, फ्रीज वगैरे गोष्टी सुचवितो.दोन्ही ग्रह सफेद रंग आणि पूर्व,ईशान्य दिशा ही सुचवितात.मी त्यांना अश्या जागी शोध घेण्यास सांगितले.

तासाभरातच त्यांचा फोन आला.स्वयंपाक घरातील कपाटावर आच्छादिलेल्या सफेद कव्हर खाली त्यांना दागिने सापडले......पाहुणे आल्याच्या घाईघाईत त्यांनी ते तिथे ठेवले होते आणि बिचाऱ्या विसरून गेल्या.शेवट गोड झाला.

शुभम भवतू.

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

**लेख क्र. ६ : पैसा**

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)**

पैसा म्हणजेच लक्ष्मी.आपण लहान पणापासून ऐकत आलोय की लक्ष्मी ही चंचल आहे,तिचा माज करू नये नाहीतर ती निघून जाते.पण हे तंतोतंत खरे आहे का? काही उद्योगपती, राजकारणी यांच्या घरी ती पिढ्यानपिढ्या पाणी भरते हेही दृष्टोत्पत्तीस येते.काही कामधंदा न करता ही या लोकांची चैन सुरू असते. फॉरेन टूर्स,शॉपिंग सर्रास सुरू असते.मुले मोठमोठ्या शाळा कॉलेजात शिक्षण घेत असतात,किंवा परदेशी असतात.बँक बॅलन्स ही खूप मोठा असतो.मग आपण विचार करतो यांच्याकडे पैशाचा ओघ येतो कुठून.

काही ठिकाणी लोक आपल्या श्रमाने कष्टाने मोठे होतात आणि मग " आमच्या बापाने काही ठेवले नव्हते आमच्यासाठी,मी स्वतः शून्यातून विश्व निर्माण केलेय.हे सर्व माझ्या कष्टातून उभे राहिले आहे.लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशी माणसाची इर्षा हवी." वगैरे दर्पोक्ती ते समोरच्या व्यक्तीच्या तोंडावर फेकत असतात.हा आत्मविश्वास योग्य आहे का?

तसे असेल तर आपला शेतकरी,मजूर,रात्रंदिवस काम करणारा खाजगी कारखान्यातील कर्मचारी यांना पण पैसा मिळायला हवा,मग त्यांच्यावर का लक्ष्मी सदा रुसलेली असते. त्यांचे कष्ट कुठे कमी पडतात?बिचाऱ्यांना काही वेळा संध्याकाळच्या जेवणाची ही भ्रांत असते.मुंबईत कैक लोकांचे वडापाव हे जेवण  आहे.

एक उदाहरण देतो.रस्त्यावर खडी फोडणारा मजूर अगदी जवळून पाहा. एका मोठ्या दगडाचे बारीक तुकडे करताना हातातील घण किती जोरात मारायचा,कोणत्या बाजूने मारायचा,किती ताकत लावायची याचा ही त्याला विचार करावा लागतो.म्हणजे तीही एक कलाच आहे.अगदी स्किल्ड वर्कर असे मी म्हणणार नाही.पण आपल्या हातात घण दिल्यास आपण त्या दगडाचा चुरा करून ठेवू. पावसापाण्यात, उन्हातान्हात दिवसभर काम करून त्याला काय मिळते हो?

तान्ह्या बाळाला झोळीत ठेवून त्याची कारभारीन ही कधीकधी त्याला मदत करत असते.रात्री रस्त्याच्या कडेला कुठेतरी अंग टाकून दिले की दिवस संपतो.अश्या वेळी लक्ष्मी कुठे असते?

एकूणच काय तर पैसा तुमच्या नशिबातच असावा लागतो,अर्थात त्यासाठी श्रम ,कष्ट हवेतच.काही वेळा माणसाची उभी हयात कष्ट करण्यात जाते,पण शेवटी हातात काहीच शिल्लक नसते.एक घर,कपडालत्ता आणि दोन वेळचे जेवण ही सुद्धा चैन बनते.अशांनी काय करावे? लक्ष्मी देवीची कठोर आराधना करून ही ती वश होत नाही.

मार्केट मध्ये पैशाची किंमत एकच असते.तो कुठून आणला हे कोणी विचारत नाही.त्यामुळे येनकेन प्रकारेण तो मिळवायचा ही प्रवृत्ती आता बोकाळली आहे.पैशासाठी नातेवाईकांचा खून केल्याच्या घटना ही आता आपण वाचतो.माणूस खूप भल्या बुऱ्या मार्गांचा अवलंब करू लागला आहे.प्रत्येकाची सहन शक्ती ही कमी होतेय.जो अश्या परिस्थितीत गरिबीने पीचतो त्याच्या तोंडावर "ठेविले अनंते तैसेचि रहावे,चित्ती असू द्यावे समाधान" वगैरे वचने फेकून बाकीचे मोकळे होतात. सट्टा,जुगार,रेस,लॉटरी,वगैरे गोष्टींना ही बरे दिवस आले आहेत.

२/६/८/११ ही कुंडली मधील निसर्गदत्त पैशाची स्थाने आहेत.ती तुमच्या कुंडलीत बलवान असतील आणि त्यावेळच्या दशाही तशाच असतील तर पैशाचा ओघ चालू राहतो.

शुभम भवतू.

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. ७ : आडमुठा स्वभाव

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९९१५१७५०)**

अलीकडे कित्येक मुलामुलींनी विवाहसंदर्भात आपल्या अपेक्षा खूप वाढवून ठेवल्या आहेत.त्यातही मुली

अंमळ पुढे आहेत.आपला लाईफ पार्टनर राजबिंडा हवा त्याचे स्वतःचे घर,गाडी हवी,बँक बॅलन्स असावा. एकुलता असल्यास चांगलेच आणि सासू सासर्यांची सोय दुसरी कडे असावी.अपेक्षा असणे गैर नाही पण त्या वरीलप्रमाणे अवाजवी नसाव्या.

अशीच एक लग्न न झालेली व अश्याच अपेक्षा असलेली मुलगी माझ्या संपर्कात आली.२०१९ साल असावे.लग्न तर करायचं होतच.दिसायला सुंदर, गलेलठ्ठ पगाराची नोकरी आणि वरील अपेक्षा.त्यामुळे आतापर्यंत कोणीच सापडला नव्हता.आणि इतके वय होऊन ही ती आपल्या मतांवर ठाम होती.

अनामिका १९/०४/१९८० १३-१२ दुपारी. इगतपुरी.

ही पत्रिका मी पाहिली त्यावेळी रूलींग प्लॅनेटस गुरु,गुरु,शनी,चंद्र असे होते.

जन्मलग्न कुंडलीत द्वितीय भावात गुरु चांडाळ योग आहे.

कृष्णमूर्ती पद्धती मध्ये विवाहासाठी सप्तम भावाचा सब २,७ किंवा ११ यापैकी भावांचा कार्येश असावा.

इथे सप्तम भावाचा सब शनी असून त्याचीच महादशा ०७/०८/२०३५ पर्यंत आहे.

शनीचे भाव पाहू. कंसामधील भाव बलवान आहेत.

शनी - २/७/८

रवी - (९)/२

रवी वर गुरूची दीप्तांश दृष्टी

गुरु - (१)/(६)/९

चंद्र - ११/१

मंगळ - (१)/(५)/(१०)

२/७/११ बलवान कार्येश नाहीत.उलट १ आणि ६ हे विवाहासाठी नकारात्मक भाव बलवान आहेत.पण विवाहासाठी बारा वाजले असताना ही पंचम हा पूरक भाव विवाह देऊ शकेल.आणि अश्या परिस्थितीत सुध्धा ही बया आपला हट्ट धरून बसली आहे.

जेव्हा महादशा स्वामी मुख्य भावांचा क्षीण कार्येश असतो त्यावेळी अंतर्दशा स्वामी त्या भावांचा बलवान कार्येश असावा.

बुधाची अंतर्दशा १९/०४/२०२२ पर्यंत आहे.

बुध - (९)/(३)/(१२)

शनी - (२)/७/(८)

राहू  - (१)/(९)/२

केतू - (७)/(२)/७/(८)

बुध ७ आणि २ भावाचा बलवान कार्येश आहे आणि तो सकारात्मक आहे.पुढील विदशा

अशी शोधावी जी ११ व्या भावाची बलवान कार्येश असेल.मी शुक्राच्या विदशेला निवडले जी ०५/०८/२०२० पर्यंत आहे.

शुक्र - (११)/(४)/११

चंद्र  - (११)/१

मी तिला सांगितले की बाई ग तू तुझ्या अपेक्षा थोड्या कमी कर,ग्रह जेव्हा देतात तेव्हा आपली झोळी पुढे करावी,पुन्हा त्यांचा दानाचा योग कधी येईल त्याचा भरोसा नाही.तुझ्या सर्व अपेक्षा तू आणि तुझ्या होणाऱ्या नवऱ्याच्या पगारात नक्कीच पुऱ्या होतील,त्यासाठी आतापासूनच आग्रही राहू नकोस.

अजून तिचा विवाह झालेला नाही.वय वाढते तसा माणूस अजूनच आडमुठेपणा करतो आणि आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतो......

कालाय तस्मै नमः!

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. ८ : नियती चा खेळ.

**लेखक : श्री. सतीश नाईक (९८१९९१५१७५०)**

एका जोतिष्य विषयक ग्रुप वर दोन दिवसापूर्वी एक प्रश्न विचारला गेला होता.साधे डोके दुखण्याचे निमित्त होऊन एका तरुण मुलाचा दोन दिवसातच ०३/०७/२०२३ रोजी सकाळी तडकाफडकी मृत्यू झाला होते.हवालदिल झालेल्या आई वडिलांना हे त्याच्या नशिबात होतेच का असा प्रश्न होता.

अनामिक

०७/०४/१९९९ २१-४५ रात्री कुसुंबी, महाराष्ट्र.

कृष्णमूर्ती पद्धती प्रमाणे जर लग्न भावाचा उप नक्षत्र स्वामी मारक आणि बाधक या दोन्ही भावांचा कार्येश असून निरोगी आयुष्य देणाऱ्या १/५/९/११ पैकी निदान दोन भावांचा कार्येश नसेल तर जातक अल्पायू असतो. १ आणि १२ ही दोन्ही स्थाने देहनाश करणारी आहेत. तसेच ६/८/१२ ही स्थाने अनारोग्य दर्शवितात आणि आयुष्य मर्यादा कमी करतात.

काल ०४/०८/२०२३ रोजी सकाळी ११-३० ला मुंबई मध्ये मी ही कुंडली पाहिली. त्यावेळी शासक ग्रह शुक्र, गुरु, शनी, शुक्र असे होते.

सदर कुंडलीत लग्न भावाचा सब शनी आहे.वृश्चिक हे स्थिर लग्न आहे त्यामुळे नवम स्थान बाधक आहे. शनी चे भाव पाहू.

शनी - (६)/३/४

शनी ची दृष्टी (८)/(१२)/(३)

शनी चा सब

केतू - (३)

केतूचा राशी स्वामी

शनी - (६)/३/४

केतू चा नक्षत्र स्वामी

मंगळ - (१२)/(१)/६/(७)

शनी ६/७/८/१२ हे पूर्ण नकारात्मक भाव देतोय. १ ला भाव एकटाच आहे. जातकाचे आयुष्य नक्कीच कमी आहे.

सध्या रवी ची महादशा २०/०४/२०२८ पर्यंत आहे.

रवी - ५/१०

बुध - (४)/(८)/(११)/(७)

मंगळ - १२/१/६/७

राहू - (९)/(२)/९

२,७ हे मारक तसेच ९ हे बाधक स्थान कार्यान्वित झाले आहे.

राहुची अंतर्दशा आणि विदशा सुरू आहे. राहू सुद्धा १/७/८/११/१२ हे भाव बलवान देतो आहे.

शनी ची सुक्ष्मदशा आपण वर पाहिली आहेच.३ जुलै ला चंद्राची प्राणदशा आहे.

चंद्र - (२)/९

चंद्राची दृष्टी (८)

केतू - (३)/(६)/३/४

राहू - ९/२/९

बुध - (४)/(८)/(११)/(७)

सर्व नकारात्मक भाव आहेत.

त्याच्या आयुष्याची दोरीच कमकुवत होती. कोण काय करणार?

एक गोष्ट मला प्रकर्षाने सांगावी असे वाटते.या मुलाची जन्मतः धनू राशी आणि मूळ नक्षत्र चतुर्थ चरण होते.आणि ज्यदिवशी, ज्यावेळी त्याचा मृत्यू झाला, त्यावेळी ही चंद्र षष्ठात धनू राशीत, चतुर्थ चरण मध्येच होता.

पुनर्जन्म?...... परमेश्वर मृतात्म्यास शांती देवो.

श्री. सतीश नाईक (९८१९१५१७५०)

## लेख क्र. ९. : लहान मुलांचे शिक्षण आणि त्यांचे करिअर, त्यांचे तळहात

लेखक : श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

लहान मुलांच्या हातावर दिसणाऱ्या रेषा व चिन्ह याचा अर्थ काय असू शकतो किंवा त्या मुलाचे जिवनावर काय परिणाम करू शकतात याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

लहान मूल जन्माला आल्याबरोबर त्या मुलाच्या हातावर काही रेषा व चिन्ह स्पष्टपणे उमटल्याचे आपणास दिसून येतात. त्या लहान मुलांमध्ये विचार शक्ती, महत्वकांक्षा, ममताळूपणा यासारखे विचार जे मोठ्या व्यक्तीत दिसून येतात ते विचार त्या लहान मुलाच्या मध्ये दिसून येतात का?. असा प्रश्न आपणास पडणे सहाजिकच आहे. बाबत विचार करता वरील प्रश्नाचे उत्तर देणे सहज शक्य आहे असे वाटते.

त्या लहान मुलाच्या तळहातावर जन्मतः दिसणाऱ्या रेषा व चिन्ह जसजशी या मुलाची वाढ होत जाईल तस तसे त्याच्या तळहातावरील रेषा व चिन्ह तसेच हातावरील पर्वत यामध्ये बदल होत जाईल म्हणजेच विकसित किंवा अविकसित पणा दिसून येईल हे खात्रीने नमूद करावेसे वाटते.

काही रेषा चिन्ह मध्ये होणारा बदल हा त्याच्या जिवाच्या मानसिक व शारीरिक उन्नती मुळे होत असणे अपरिहार्य आहेच, म्हणजेच त्या मुलाच्या भविष्यात काही बदल होणे अशक्य आहे असे म्हणणे अतिशय चुकीचे असू शकते.

आई, वडील, पालक व शाळेतील शिक्षक यांच्या खांद्यावर त्या मुलास किंवा विद्यार्थ्यास योग्य त्या विषयाचे किंवा व्यवसायाची शिक्षण देण्याच्या दृष्टीने फार मोठी जबाबदारी असते.

कारण त्या मुलाचा किंवा विद्यार्थ्यांचा मानसिक घटनेचे व त्याच्यात असलेल्या सुप्त शक्तीचे आकलन होणे आवश्यक आहे. त्यामुळे असे आकलन झाल्याने अशा मुलांना व विद्यार्थ्यांना योग्य ते शिक्षण देऊन त्यांच्यात असलेले सुप्त शक्ती वाढ करून म्हणजे चालना देऊन त्यांच्यातील दोषांचे निवारण करणे शक्य होईल. त्यानुसार त्यांच्या भावी आयुष्यात योग्य दिशा मिळून भावी आयुष्य कशी सुखकर होईल याचे मार्गदर्शन आपणास मिळू शकते.

प्रत्येक मुलाच्या त्याच्या वयाच्या 14 वा 18 वर्षाच्या दरम्यान त्या मुलाचा कल कोणत्या विषयाकडे, कोणत्या शाखेकडे आहे ही स्पष्टपणे दिसून येते व त्या दृष्टीने त्या विषयाच्या शिक्षणाची तयारी करून योग्य शिक्षण देणे सहजच शक्य होईल असे वाटते.

अशा मुलांच्या लहानपणीच त्यांच्या तळहाताचे परीक्षण करून योग्य ते मार्गदर्शन करणे अतिशय सुखकर व सोयीचे होईल तसेच त्या मुलास योग्य ते वळण योग्य ते मार्गदर्शन करणे आपणास सोयीचे होईल असे वाटते, त्यामुळे त्या मुलाच्या भावी जीवनास योग्य दिशा मिळून त्याची भावी जीवन उज्वल होईल.

प्रत्येक मुलांच्या वयाच्या 14 ते 18 यादरम्यान त्या मुलाचा कल कोणत्या विषयाकडे असू शकतो ही आपणास दिसून येते अनुसार त्या विषयाच्या शिक्षणाची त्याच्याकडून तयारी करून घेणे शक्य होईल असे वाटते. अशा लहान मुलांच्या लहानपणीच त्या मुलाच्या हातावरून तो कोणत्या विषयात शिक्षण घेईल किंवा कोणत्या विषयांमध्ये त्याला रोज असू शकतो हे बघणे सोयीस्कर होईल व त्यानुसार त्या विषयाचे शिक्षण देणे त्याच्या भावी जीवनात सुखकर होईल असे वाटते.

लहान मुलांचे हाताचे चार प्रकार असल्याचे दिसून येतात मी पुढील प्रमाणे आहेत.

* पुढे रुंद बोटे असलेला हात.

* चौकोनी असलेला हात.

* निमुळता असलेला हात.

* टोकदार बोटे असलेला हात.

ज्या मुलांचा रुंद हाताची बोटे टोकदार असल्याचे दिसून येत असता तर हा एक कला कुशलतेचा संकेत समजावा. अशा मुलांना लहानपणापासून योग्य ते कलेचे शिक्षण दिले गेल्यास त्यांच्यात असलेल्या उपजत गुणांना उत्तेजन दिल्यासारखे होईल त्यामुळे अशा मुलांच्या आई-वडिलांनी व पालकांनी तसेच शिक्षकांनी सुद्धा असे शिक्षण देणे योग्य होईल असे वाटते.

ज्या मुलांच्या हाताचा आकार चौकोन असतो अशा मुलांना शिक्षण देणे थोडे कठीण वाटते कारण अशा मुलांची प्रगतीही अतिशय मंद गतीने होत असते कारण अशा मुलांमध्ये सुखाची वृत्ती जास्त असते. पण तू हे जरे खरे असले तरी अशा मुलांची प्रगती ठामपणे होते असा विश्वास त्यांच्यात निर्माण करावा लागतो. त्यांच्या छंद वृत्तीने योग्य ते शिक्षण त्यांना दिल्यास त्यांची प्रगती हमखास होईल असे खात्रीने नमूद करावेसे वाटते. त्यामुळे अशा मुलांच्या आईवडिलांनी व पालकांनी तसेच शिक्षकांनी योग्य मार्गावर मुलांना लावून त्या ध्येयापासून जरासुद्धा विचलित होऊ देऊ नये हे मात्र कटाक्षाने लक्षात ठेवावे.

ज्या मुलांचा हाताचा आकार त्रिकोण असतो अशा मुलांना योग्य वळण लावणे व त्यांना नियंत्रणात ठेवणे हे एक कठिण काम आहे. कारण अशी सर्व मुले चंचल वृत्तीचा असून काही वेळेला लहरी वागू शकतात. अशा मुलांमध्ये सतत खोड्या करणे याकडे त्यांचा कल जास्त असतो. अशा मुलांना शांत पद्धतीने समजून सांगितल्यास व कौशल्याने समज दिल्यास अशा मुलांना वळण लावणे व योग्य ते शिक्षण देणे काही कठीण नाही अशा मुलांचे मन न दुखवता सर्व काही समजून सांगणे ही एक कलाच आहे ती कला आत्मसात केल्यास अशा मुलांना देत असलेले शिक्षण योग्य घेतील व आपले जीवन सुखकर करतील.

ज्या मुलांची हाताची बोटे टोकदार असल्याचे दिसत असतात अशी मुले अतिशय हुशार असून मनाने दिलखुलास असतात. अशी मुले हुशार माणसांच्या सहवासात गेल्यास त्यांच्यात असलेल्या सुप्त गुणांना चालना मिळून त्यांची हुशारी चांगली होऊन प्रगती कारक ठरते. या मुलांच्या हातातून चांगली कृती केल्यास त्याचे उत्तेजन दिल्यास अशा मुलांच्या बौद्धिक गुणांचे पोषण केल्यास त्यांचा विकास होईलच हे ठामपणे येथे नमूद करावेसे वाटते. अशा मुलांना योग्य ती अभ्यासाची दिशा व व्यवसायाची दिशा प्राथमिक अवस्थेत योग्य ती माहिती दिल्यास त्यांचे पुढील जीवन सुखी व सफल होईल असे वाटते.

श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

## लेख क्र. १० : विद्यार्थी – ज्योतिष

## लेखक : श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

आई वडिलांचे कर्तव्य पार पाडले ही गोष्ट सोपी नाही तसेच सध्याच्या युगात तर ते अधिक कठीण झाले आहे.

मुलांच्या पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी घरात आपले आज्जी व आजोबांची फळी अतिशय मजबूत असायची. आज काल आईबाप व वडीलधारी यांच्यातील स्नेह, गोडवा कमी होऊन त्या दोघांतली अंतर व दरी वाढल्याचे आपणास दिसून येते.त्यासाठी असलेली कौटुंबिक, सामाजिक, व आर्थिक परिस्थिती अतिशय कारणीभूत आहेच. तर आजच्या आईवडीलांनी काय करायचे? त्यांनी आपले कर्तव्य कसे पार पाडायची? या सारख्या प्रश्नाची उत्तरे शोधतांना असे लक्षात येते की या ठीकाणी ज्योतिषाचा आधार आपणास उपयोगी ठरू शकतो.याचा उपयोग मुलासांठी व त्याच्या पालकांसाठी होऊ शकतो.

ज्योतिषाचा आधार घेऊन मुलांच्या काही समस्या सोडविण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न आहे.

प्रथम सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या मुलांमध्ये आत्मविश्वास कसा वाठेल हे बघावे.मुलांनी त्याचे म्हणणे अतिशय ठामपणे मांडता यावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या मुलांना लहानपणापासून आत्मविश्वासाने वागण्याची व बोलण्याची सवय लावणे खुप गरजेचे आहे.तसेच त्याचे मनोबल कसे वाठेल या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

अनेक मुलां मध्ये आत्मविश्वास अभाव असतो, तसेच मनोबलाची कमतरता असते. ते बोलत असतांना त्याचा प्रभाव समोरच्या व्यक्तीवर पडत नाही. आपले म्हणणे ठामपणे मांडता येणे हे खुप महत्वाचे आहे. आपल्या मुलात नम्रता,विनयता,नसते हे जसे चुकीचे आहे तसेच अति विषयात,नम्रता असेन हे देखील त्या मुलांच्या प्रगतीस नुकसानकारक आहे.

आपले काय म्हणणे आहे हे समोरच्या व्यक्तीचे मन न दाखविता स्पष्ट शब्दात सांगणे ही एक कलाच आहे.अति नम्रतामुळे अनेकदा मुले आपल्या मनातील भावना व विचार नीट मांडू शकत नाहीत. त्यामुळे त्या मुलांच्या मानसिक स्थितीवर विपरीत परिणाम हो असतोच.

ज्या मुलांच्या पत्रिकेत रवि ग्रह,मंगळ ग्रह हे कमजोर असतील तर अशा मुलांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो.त्यामुळे अशी मुले इतरांचे वर्चस्व लवकर मान्य करतात व वर्चस्व करणारे मुलांना अशी मुले विरोध करू शकत नाहीत. सरळ स्वभावाची मुले आपली व्यथा आपल्या पालकांना सांगत नाहीत.

आपल्या मनातील भावना न बोलता आल्यामुळे अशी मुले सतत तणावाखाली असतात त्याची ही सवय कायम राहिली त, अशी मुले मोठेपणी त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

मुलांच्या पत्रिकेतील मुख्य ग्रह चागंला प्रबल असेल, चांगल्या भावात असेल, त्यावर पाप ग्रहाची दृष्टी नसेल,अशी मुले आपला चागंला विकास करतात व आपले जीवन चांगले व्यतीत करतात.

आत्मविश्वासाने अभाव अशा मुलांमध्ये कमी व्हावा यासाठी त्याच्या हाताच्या बोटा त तांब्याची किंवा सोन्याची अंगठी घालण्यास द्यावी. तसेच माणिक किंवा या रत्नास पर्यायी उप रत्न वापरावे त्यामुळे त्या मुलाला चागंला लाभ होतोच. मुलांच्या पत्रिकेत मंगळ या ग्रहाची स्थिती चांगली असेल तर, तो मारकेश नसेल तर,त्या मुलांस पिवळं हे रत्न घालता येईल

व उपयोगी पडेल.मंगळाचे रत्न वापरामुळे मुला मध्ये आक्रमकता वाट झाल्याचे आपणास दिसूनच येईल त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढून ती मुले आपले म्हणणे अतिशय ठामपणे मांडू शकतील.

आपण मुलांना सतत शिकवले जाते की नाही म्हणायला शिक. पण त्याबरोबर आपण त्यांनी  हो कधी म्हणायचे हे सुध्दा शिकविले पाहिजे, व ते त्यांना कळायला पाहिजे. आपण अनेक गोष्टींना प्रथम हो म्हणतो नंतर मग आपण विचार करतो की न पेलणारा गोष्टींना हो म्हंटल्यावर चितां व तणाव वाढत जातात.

आपल्या मुलांनी कोणत्या गोष्ट करू शकतात याचा प्रथम अंदाज घेणे अतिशय गरजेचे आहे. मुलांनी कोणत्याही प्रभावाखाली न दबता हो किंवा  नाही म्हणता येणे अतिशय महत्त्वाचे आहे.

आपल्या मुला मध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांना सुर्य उपासना करने खुप गरजेचे आहे, त्यासाठी सुर्य मंत्र, सुर्य कवचाचे पठण,आदित्यह्रदय स्तोत्राचे पठण, गायत्रीमंत्राचे पठण तसेच सुर्य नमस्कार अशा प्रकारची उपासना केल्यास त्याच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो.

आपल्या  मुलांना प्रथम खरे बोलण्याची सवय लावावी तसेच मुलांची अंगी असलेली क्षमता व कमतरता ओळखण्याची सवय ठेवणे खुप गरजेचे आहे. आपल्या मुलांचा विकास सोडण्यासाठी त्या मुलांनी स्वतःला ओळखणे खुप गरजेचे आहे, पण आई वडीलांनी आपल्या मुलांना ओळखणे,त्याच्या मुलाचा कल कसा आहे हे ओळखणे व मुलांना समजून घेणे हे त्या मुलांच्या प्रगतीच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहेच.

श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

## लेख क्र. ११ : गायत्री मंत्राची उपासना

## लेखक : श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

भाग 1....

आपले रोजचे दैनंदिन आयुष्य हे आज खुपच धावपळीचे आणि स्पर्धात्मक झाल्याच्ये निदर्शनास येत आहे. आपल्या भोवताली परिस्थितीत अतिशय बदल होत आहेत याची आपल्याला जाणीव होत आहे त्या बदलणारी परिस्थिती आपल्या जीवनावर परिणाम करत आहेच. आपण कोणताही व्यवसाय करत असताना किंवा नोकरी करत असताना कालची परिस्थिती आज राहत नाही,व तीच परिस्थिती उद्या असेलच याची शाश्वती कोणीही देत नाही.

त्यामुळे आपण आलेल्या परिस्थितीतून वाटचाल करत आपला संसाराचा गाडा पुढे नेत असतो आपल्या प्रपंचात सुख व समृध्दी होण्यासाठी आपल्या मनास स्थिरता व शांतता मिळणे खुप गरजेचे आहे. त्यासाठी दररोज गायत्री मंत्रांचा जप दररोज करणे खुप गरजेचे असून आपल्या रोजच्या जीवनात उपयुक्त आहे.

अनेकजण दररोज काहींना काही एखाद्या देवतेचे प्रधान मंत्र  म्हणत असतोच. परंतु या सर्व मंत्रामध्ये "गायत्री मंत्र " हा सर्व श्रेष्ठ असाच आहे. आपल्या संस्कृतीचा उगम व गंगोत्री असणारा हा गायत्री मंत्र हा आपल्या वेदांचे  उगम स्थान आहेच.

आपल्या धर्म ग्रथांत वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असाच असू शकतो. ज्ञान याचा अर्थ आपल्या इंद्रियाच्या व्दारे मिळणारे ज्ञान हे उच्च कोटींचे ज्ञान असू शकते. अशा या प्रचंड ज्ञानाची गंगोत्रीची जुनी गायत्री आहे, म्हणूनच आपल्या वेदश्रुषीनी या गायत्रीला वेदमाता असे म्हंटले आहे.

असा हा गायत्री मंत्र हा स्वयंप्रकाशमान वेदमंत्राची जुनी गायत्रीच आहे. गायत्री मंत्र  हा नुसता वर्णाचा समूह किंवा फक्त मंत्र नसून तो आपल्या विश्वातील निर्मितीस आवश्यक असलेल्या सर्व ध्वनीचे महाशक्तीशाली एक मोठे केंद्र असू शकते.त्यामुळे गायत्री मंत्रांच्या जपाने अशक्यप्राय अनेक गोष्टीवर सहजच मात करू शकतो. आपल्या अनेक ग्रथातून अनेक इतर मंत्र त्या त्या कामापुरते सफल होतात, परंतु गायत्री मंत्र हा कोणत्याही कामासाठी फलद्रुप होऊ शकतो.

आपल्याला अनेक प्रकारे सौख्य,समाधान, स्वास्थ मिळावे तसेच आपले आयुष्य मार्गक्रमण करत असताना अनेक प्रकारची संकटे आपल्या जवळ येऊ नयेत अशी सर्वाची इच्छा असतेच,म्हणूनच अशा परिस्थितीत आपला प्रपंच सुखी व समृध्दी होण्यासाठी व आपल्या मनास शांतता मिळण्यासाठी आपण दररोज गायत्री मंत्रांचा जप करणे अतिशय गरजेचे आहे.

गायत्री मंत्रांचा शास्त्रोक्त होम,हवन करने हे आपल्या सारख्या प्रापंचिक व्यक्तींना जमणे फार कठीण असू शकते परंतु शुध्द मनाने व नियमित आपण जर गायत्री मंत्रांचा जप करणे आपणास निश्चितच जमेल.

गायत्री मंत्र हा एक स्वयंसिध्द मंत्र आहे. त्याच्या जप करण्यासाठी कोणत्याही विषेश अनुष्ठानाची गरज भासत नाही, हा जप करण्यासाठी आपल्या मनाची एक्रागता झाली असता या जपाचा परिणाम अतिशय चांगला होतोच.या गायत्री मंत्रांचा जप आपण दररोज नियमितपणे खंड न पडता आपले आयुमान जो पर्यंत आहे तो पर्यंत आपले रोजचे व्यवहार साभांळून करू शकता.

गायत्री मंत्रास संपूट लावून मंत्रांचा पाठ केल्यास आपल्या जीवनात कसा सकारात्मक परिणाम होतो ते पुढील भागात आपण बघू.

भाग 2.....

* आई वडिलांची एक इच्छा असते की आपला मुलगा किंवा मुलगी हुशार असावी तसेच घेत असलेले शिक्षण योग्य घेऊन त्या शिक्षणात ती यशस्वी व्हावी अशी अपेक्षा असते त्यासाठी आपण गायत्री मंत्र  म्हणत असताना त्या गायत्री मंत्रांच्या आधी व मागे " ऐं " या अक्षराचे संपूट लावून  दररोज याचे पाठ केल्यास त्याच्या विद्या अभ्यासात चांगली प्रगती करू शकतो.तसेच परीक्षेच्या वेळी केलेला अभ्यास चांगला स्मरणात राहतो. त्यामुळे चांगल्या मार्कानि पास होतोच.

* आपण करत असलेली नोकरीत यश मिळविण्यासाठी, आपण करत असलेल्या व्यवसायात यश मिळविण्यासाठी गायत्री मंत्र म्हणत असताना त्या गायत्री मंत्रांच्या आधी व शेवटी

" ऐं ह्रीं श्रीं " या तीन शब्दाचे संपूट लावले असता करत असलेल्या नोकरीत व व्यवसायात काही अडथळा येत असतील तर त्या अडथळे ती व्यक्ती सहजच पार करून करत असलेल्या कार्यात यशस्वी होते.

गायत्रीमंत्राचे आपण सध्या नाही तर पाठ केले तर त्या पाठाचे आपल्या जीवनावर अतिशय सकारात्मक परिणाम होतात . गायत्री मंत्रस अजून काही शब्द संपुट लावून गायत्री मंत्र म्हणायचे आहेत ते पुढील भागात येईल.

भाग तीन.....

प्रत्येक मुलांच्या आई-वडिलांना वाटत असते की आपला मुलगा किंवा मुलगी ही त्याच्या भावी जीवनात व घेतलेल्या अभ्यासामध्ये हुशार असावा असे प्रत्येकाची इच्छा असते परंतु काही मुलांमध्ये एवढी स्मरणशक्ती नसल्याचे दिसून येते त्यामुळे अशी मुले अभ्यास करत असताना सतत गोंधळ करतात तसेच केलेला अभ्यास त्यांच्या स्मरणात राहत नाही त्यामुळे परीक्षेमध्ये अपयश येते. या अपयशावर मात करण्यासाठी आपल्या काही ऋषिमुनींनी व विद्वानांनी मंत्र रुपामध्ये आपल्यासमोर अमुल्य ठेवा हा सादर केलेला आहे त्यातली एक गायत्री मंत्र आहे. गायत्री मंत्र हा मंत्राचा राजा गणला जातो. या मंत्राला " ऐ "शब्द सम्पुट लावून जर संपूर्ण गायत्री मंत्र म्हणा त्या मुलाच्या डोक्यावर तांब्याच्या भांड्यात आंघोळ घालावी. सदर लहान मुलास आंघोळ घालताना मंत्र म्हणणाऱ्या व्यक्तीचे तोंड पूर्व किंवा पश्चिमेकडे असावे त्यामुळे मंत्रांनी त्याच्या बुद्धीमध्ये चांगला फरक पडल्याचे आपणास दिसून येईल.

श्री. हेमंत रणनवरे (७७२००६६६१८)

## लेख क्र. १२ : चंद्र ग्रह

## लेखक : श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)

वैदिक ज्योतिष शास्त्रामध्ये चंद्राला विशेष महत्व आणि स्थान आहे. ज्योतिषशास्त्रामध्ये व्यक्तीची चंद्र (Moon in Astrology) राशी जाणून घेण्यासाठी पत्रिकेतील चंद्राची स्थिती विचारात घेतली जाते. व्यक्तीच्या जन्माच्या वेळी चंद्र ज्या राशीत असतो, ती त्या व्यक्तीची चंद्र रास. चंद्र हा मनाचा कारक आहे. नवग्रहा मधे चंद्राचा वेग सर्वात जास्त आहे. चंद्र एका राशीतून दुसऱ्या राशीचा प्रवास सुमारे अडीच दिवसात पूर्ण करतो. मन खूप चंचल असते. घडकेत चांगले वाटते तर लगेच दुसऱ्या क्षणी मूड जातो.

ज्योतिषशास्त्रात चंद्र हा शुभ ग्रह मानला जातो. ज्योतिषशास्त्रात जिथे सूर्य पिता आहे आणि चंद्र हा स्त्री ग्रह मानला जातो. रोहिणी, हस्त आणि श्रवण नक्षत्रासह चंद्र कर्क राशीचा स्वामी आहे. वैदिक ज्योतिषात चंद्र हा मन, आई, मनोबल, डावा डोळा आणि छातीचे घटक आहेत.

चंद्र जर एखाद्या व्यक्तीच्या लग्न राशीत चांगला असेल, तर ती व्यक्ती अतिशय सुंदर, कल्पक, भावनिक, संवेदनशील आणि धैर्यवान असते. पत्रिकेत चंद्र बलवान असेल, तर व्यक्ती मानसिकदृष्ट्या मजबूत आणि आनंदी राहते. अशी व्यक्ती आपल्या आईच्या जवळ असते. दुसरीकडे, पत्रिकेत चंद्र कमजोर असेल तर तो मानसिकदृष्ट्या कमकुवत आणि विसराळू असतो.

एखाद्या व्यक्तीच्या पत्रिकेत चंद्र जर अशुभ ग्रहाने पीडित असेल, तर त्या व्यक्तीच्या आरोग्यावर नकारात्मक प्रभाव पडतो. व्यक्ती डिप्रेशन मधे जाते. खूप विचार करतात. मानसिक त्रास होतो.

चंद्रा संबंधी अष्टक वर्ग नुसार गमतीदार माहिती व सूत्र सांगतो.

प्रत्येकाला वाटते की माझा आजचा दिवस कसा जाईल. हे बघण्याचे एक छान सूत्र अष्टक वर्ग नुसार बघू शकतो.

चंद्राचे सर्वाष्टक व भिन्नष्टक बघा. चंद्रा ने कोणत्या राशीला सर्वात जास्त बिंदू दिले ते बघा म्हणजे 7 बिंदू किंवा 8 बिंदू दिले ते बघा. तो दिवस आपल्याला चांगला दिवस जाईल. त्या दिवशी महत्वाची कामे करा, तिथे यश मिळेल. उदा परीक्षा, मीटिंग, नविन खरेदी, फिरायला जाणे वगैरे.

तसेच ज्या राशीत सर्वात जास्त बिंदू आहेत, त्या राशींच्या लोकांशी आपले चांगले जमते. अशा व्यक्तीचा चेहरा सकाळी उठल्या वर बघितला तर आपला दिवस छान जातो. प्रसन्न वाटते. खूप उत्साह असतो.

प्रत्येक पती-पत्नीने हे बघा व अनुभव घ्या. कारण सकाळी उठल्या वर प्रथम आपल्या जोडीदाराचा चेहरा बघत असतो.

असे गमतीशीर सूत्र अष्टक वर्ग मधे दिले आहे.

आपला दिवस छान जावो.

लेखक : श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)

## लेख क्र. १३ : वैदिक ज्योतिष शास्त्र व अष्टकवर्ग

**लेखक : श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)**

जातकाच्या जन्मपत्रिकेचे विश्लेषण करण्यासाठी पराशर ऋषींनी लग्न कुंडली ,विविध वर्ग कुंडल्या ,सहम बिंदू ह्यांची निर्मिती केली .ग्रहांच्या नैसर्गिक गुणधर्मानुसार दोन ग्रहांमधील मित्रत्व /शत्रुत्व हे निकष ठरविण्यात आले .ग्रह बळ आजमाविण्यासाठी राशीपरत्वे उच्चराशी, नीचराशी , मुल त्रिकोण राशी ह्यांची निर्मिती झाली .त्यानंतर अनेक निकष वापरून ग्रहांचे षड्बल काढण्याची पद्धती तयार केली. .जातकाच्या जीवनाशी संबंधित विविध विषयाचा अधिक सूक्ष्मतेने अभ्यास करण्यासाठी षोडश वर्ग कुंडली आणि सहम बिंदूंची निर्मिती करण्यात आली.

या सर्व पद्धतीत वर्ग कुंडली आणि सहम बिंदूचे गणित खूप किचकट असल्याने महर्षी पराशर ऋषींचे प्रिय शिष्य मैत्रेय ह्यांनी हा गणित ज्योतिषाचा भाग खूपच क्लिष्ट असल्याने पत्रिका विश्लेषण करण्यासाठी ह्याहून कोणती सोपी पद्धती नाही का असा प्रश्न विचारला होता —- त्यातून अष्टक वर्ग पद्धतीची निर्मिती झाली. .

बृहत पाराशरी होरा शास्त्राच्या पाहिल्या खंडात पत्रिकेतील विविध ग्रहांचा विविध स्थानावर होणार्या एकत्रित परिणामां बद्दल उहापोह केला आहे. याच ग्रंथात उत्तर भागा मध्ये पराशर ऋषींनी विविध संस्कृत श्लोकांच्या माध्यमातून सूत्र रुपात अष्टक वर्ग पद्धतीची मांडणी केली आहे. .

वराह मिहीर (५०० इ.स.पूर्व ) ह्यांनी सुद्धा हि पद्धती पत्रिका विश्लेषणात नियमित वापरली जाते असे म्हटले आहे. काही जुन्या जाणत्या अभ्यासू ज्योतीष्कारांच्या मते अष्टक वर्ग पद्धतीचा उल्लेख “विष्णुपुराण” ह्या जुन्या वेदकालीन ग्रंथात आहे. .असे असले तरी प्रत्यक्षात ह्या पद्धती मध्ये ग्रहांचे भिनाष्टक वर्ग काढणे ह्या गणितीय पद्धती मध्ये खूप क्लिष्टता असल्याने हि पद्धती मागे पडत गेली आणि ह्या पद्धतीमध्ये संशोधन , विकास हा कालानुरूप झाला नाही असे वाटते. होरा मकरंद ह्या ज्योतिषीय ग्रंथात सुद्धा ह्या पद्धतीची माहिती देण्यात आली आहे .यवानाचार्य ह्या ज्योतीष्कारानी त्यांच्या “बालमुकुंददैवेद्न “ ह्या ग्रंथात अष्टक्वर्ग पद्धतीबद्दल लिहिताना असे म्हटले आहे कि “ज्योतिषातील सर्व पद्धतींचा कितीही अभ्यास केला तरी त्या अभ्यासाला अष्टकवर्ग पद्धती शिवाय पूर्णत्व येऊ शकत नाही किंबहुना अष्टकवर्ग पद्धती शिवाय सर्व ज्योतिषीय ज्ञान अपुरे आहे .” कोणत्याही पत्रिकेमध्ये त्या पत्रिकेच्या काही स्थानात एक ही ग्रह नसतो त्यावेळी प्रामुख्याने त्या स्थानच्या विचार करताना त्या स्थानाचा भावेश ग्रह आणि त्या स्थानाचा कारक ग्रह ह्याचा पत्रिकेतील स्थितीनुसार विचार केला जातो. पूर्वापार चालत आलेल्या ह्या पद्धतीत एखाद्या स्थानाच्या फलिताचा विचार करताना त्या स्थानाशी प्रत्यक्ष संबंधित ग्रहांचा फलितासाठी विचार केला जायचा. वास्तविक ज्या ग्रहांचा त्या स्थानाशी कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसला तरीसुद्धा त्या ग्रहांचा त्या स्थानावर एकत्रित परिणाम होत असतोच. ज्या काळात हि पद्धत विकसित झाली त्या काळात रवी ते शनी ह्या सात ग्रहांचाच भविष्य कथनासाठी वापर केला जात होता

लग्नबिंदू हा पत्रिकेतील सर्वात संवेदनशील बिंदू आहे त्यामुळे लग्न स्थान आणि इतर सात ग्रह ह्यांचा अष्टकवर्गपद्धती मध्ये विचार केला आहे. प्रत्येक ग्रह विचाराधीन पत्रिकेत ज्या स्थानात असेल तिथून काही ठराविक स्थान /राशीला एक एक शुभ बिंदू देत असतो .प्रत्येक ग्रहासाठी त्याच्या स्वस्थांनापासून आणि इतर ग्रहापासून मिळालेल्या शुभ बिंदूंची बेरीज करून त्या त्या ग्रहाचे भिन्नाष्टक वर्ग कोष्टक तयार केले जाते . प्रत्येक ग्रह स्वस्थांना पासून जास्तीत जास्त आठ आणि कमीत कमी शून्य बिंदू देतो. प्रदीर्घ कालावधी नंतर साधारण ६० वर्षापूर्वी १९५५ च्या सुमारास महर्षी पराशर ह्यांच्या अष्टकवर्ग पद्धती वरील मूळ संस्कृत श्लोकांचे सी.एस. पटेल ह्यानी इंग्लिशमध्ये भाषांतर केले. त्यानंतर १९९६ मध्ये इंग्रजीत ” Dots of Destiny ” ह्या ग्रंथाची निर्मिती श्री. विनय आदित्य ह्यां ज्योतिषांनी केली .हिंदीमध्ये अष्टकवर्ग से भविष्यकथन हे पंडित

अशोक दत्त लिखित पुस्तक उपलब्ध आहे .पत्रिका विश्लेषण करण्यासठी आणि विवाह ठरविताना पत्रिका तपासण्यासाठी ह्या पद्धतीचा खूप चांगला उपयोग होतो असे मला वाटते .

अष्टक वर्ग म्हणजे काय...

ज्योतिष शास्त्र शिकायचे म्हटले की प्रथम पारंपरिक वैदिक ज्योतिष शास्त्र आपण शिकतो. हा बेस पक्का झाला की आपण सोबत अष्टक वर्ग शिकावे म्हणजे आपल्याला अजून सटीक अंदाज वर्तवू शकतो. आपले prediction > 90% to 95%बरोबरअसते.

अष्टक वर्ग हे शास्त्र पाराशर ऋषींनी हे लिहून ठेवले आहे. कलियुगात जास्त कष्ट न घेता, सोप्या पद्धतीने भविष्य सांगण्याची पद्धत ही या ऋषींनी लिहून ठेवली आहे.

सात ग्रह व लग्न असे मिळून आठ ही बेरीज येते. म्हणून याला अष्टक वर्ग म्हणतात. या मधे राहू,  केतू यांना स्थान नाही. आपल्या ऋषीं मुनींनी राहू, केतू यांना कधीच भविष्य वर्तवताना स्थान दिले नाही. हे शास्त्र जुनेच आहे पण खूप किचकट असल्याने आजपर्यंत कुणी सहसा याचा अभ्यास केला नाही.

या मधे प्रत्येक ग्रह आपल्या व दुसऱ्या घरामध्ये/ भावामध्ये किती बिंदू, रेखा देतो ते काढले जाते याला त्या ग्रहाचे भिन्नष्टक म्हणतात. असे प्रत्येक ग्रहाचे भिन्नष्टक असते. सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी व लग्न.

सूर्य आपल्या भिन्नष्टक मधे स्वतः कुठल्या कुठल्या घराला बिंदू देतो ते लिहून ठेवले आहे त्यानुसार सूर्य व इतर ग्रह सूर्याच्या भिन्नाष्टकमधे कुठल्या घराला बिंदू देतो ते लिहून काढायचे, म्हणजे एका भिन्नष्टकसाठी ७ टेबलं तयार होतील. असे प्रत्येक ग्रहासाठी ७ टेबलं, एकूण ४९ टेबलं तयार करावे लागतात. असे झाल्यावर प्रत्येक ग्रहाचे सर्व भिन्नष्टकमधे बिंदूची बेरीज केली जाते व जे टेबलं तयार होते त्याला अष्टकवर्ग असे म्हणतात. ही पद्धत पूर्वीच्या काळी खूप किचकट होती व वेळ खूप लागत होता म्हणून मागे पडली.

आता software मुळे खूप सोपे झाले आहे व त्यामुळे आता हळूहळू याचा प्रसार होत आहे.

पाराशर ऋषींनी प्रत्येक ग्रह किती बिंदू देईल हे लिहून ठेवले आहे. जसे :

गुरु : 56 बिंदू, बुध : 54 बिंदू, शुक्र : 52 बिंदू, सूर्य : 48 बिंदू, चंद्र : 49 बिंदू, शनी : 39 बिंदू, मंगळ : 39 बिंदू. टोटलं 337 बिंदू. याला 12 भाव यांनी भागाकार केला की 28 बिंदू येते. व हेच average धरले आहे. तसेच प्रत्येक ग्रह 0 ते 8 बिंदू देतो. याचे average 4 आहे.

आता 28 पेक्षा कमी की जास्त हे बघावे व त्या मधील प्रत्येक ग्रहने किती बिंदू दिले तेच बघावे. प्रत्येक ग्रह max 8 बिंदू देतो. त्यामध्ये 4 हा बेसआहे. 4 पेक्षा कमी म्हणजे अपेक्षित फळ मिळणार नाही. व 4 पेक्षा जास्त असतील तर चांगले फळ मिळेल.

अष्टक वर्गात बिंदू किती आहेत त्याचा अभ्यास करायचा, कुठल्या भावात कोणत्या राशीला किती बिंदू दिले ते बघायचे.

प्रत्येक ग्रहाचे भिन्नष्टक असते व तेच टोटल करुन अष्टकवर्ग तयार होतो.

असे म्हटले जाते की त्रिक स्थान 6,8,12 यांना कमी बिंदू असतील तर चांगले असते. हे केस to केस बदलू शकते.

लग्न स्थानापेक्षा षष्ठस्थान, अष्टमस्थान, व व्ययस्थान यांना कमी बिंदू असतील तर चांगले असते. संघर्ष कमी. समजा षष्ठ व अष्टम स्थानाला लग्न स्थाना पेक्षा जास्त बिंदू असतील तर जास्त संघर्ष करावा लागतो. कर्ज आजार, प्रॉपर्टी, गुप्त शत्रू यापासून त्रास होतो.

पण अगदी हाच नियम 100 % नाही, कारण षष्ठ स्थान स्ट्रॉंग असेल तर बॉस, हाताखालील कामगार यांचे चांगले सहकार्य मिळते. शनी, मंगळ चांगले बिंदू असतील तर गुप्तशत्रूपासून संरक्षण करतो. गुरु, शुक्र चांगले बिंदू असतील तर कर्ज फिटते. बुधाला चांगले बिंदू असतील तर मावशी, मामा यांच्याशी चांगले संबंध असतात. पण आयुष्यात एकदा काही तरी मोठा आजार होतो, त्या वेळेस लग्नस्थानाला षष्ठ स्थानापेक्षा कमी बिंदू असतील तर बरे व्हायला वेळ लागतो. कुठल्या ग्रहाची महादशा, अंतरदशा सुरु आहे यावर ते अवलंबून राहील.

अष्टम स्थानाला चांगले बिंदू म्हणजे अचानक धन लाभ. प्रॉपर्टी पासून फायदा. असे होऊ शकते. सासुरवाडीकडून फायदा होऊ शकतो. जोडीदाराकडून फायदा होतो. नोकरीं करणारी पत्नी मिळते. अष्टम स्थान गूढविद्याचे स्थान. परिवर्तन होऊ शकते. रिसर्च, संशोधन करण्याचे स्थान. येथील ग्रह, हे स्थान जर ऍक्टिव्हेट झाले तर खूप चांगले परिणाम पण मिळतात.

व्ययस्थानाला जास्त बिंदू असतील तर खर्च जास्त. परदेश गमन योग. बंधनयोग. दवाखाना हे पण बघता येते. हे गुंतवणूक चे पण स्थान आहे. (Investment). त्यामुळे ही स्थाने नेहमीच वाईट फळे देतील असे नाही. कुठले ग्रह आहेत त्यावर ते अवलंबून आहे. राहू, शनि जर बलवान नसेल तर अडचणीत आणतो, बंधन योग म्हणजे तुरुंगात जाण्याची वेळ येते. बरेच जणांना बंधन योग झालेला आपण बघत आहोत.

असे प्रत्येक भावाविषयी आपण बघू शकतो व त्यावरून चांगले भाकीत करू शकतो.

आता बाकी स्थानाविषयी बघू या.

लग्नस्थानाला चांगले बिंदू असतील म्हणजे 30 पेक्षा जास्त, तर ती व्यक्ती निरोगी, आत्मविश्वास भरपूर अशी असते. ती व्यक्ती जे ठरवेल ते करते. लग्नस्थान स्ट्रॉंग असेल तर 50% प्रॉब्लेम तेथेच कमी होतात. जर लग्न स्थानाला 25 पेक्षा कमी बिंदू असतील तर जास्त संघर्ष करावा लागतो. नेहमी दुसऱ्याच्या मदतीशिवाय पुढे जाऊ शकत नाही. इच्छाशक्ती कमी असते.

द्वितीय स्थान/ कुटुंब स्थान– चांगले बिंदू असतील तर धन संचय चांगला असतो. बँक बॅलन्स चांगला. कौटुंबिक सुख चांगले. कुठल्या ग्रहने किती बिंदू दिले त्यावरून आपण सांगू शकतो. घरात धार्मिक वातावरण आहे का ते बघू शकतो. त्याची वाणी चांगली आहे का ते बघू शकतो. घरात मन रमते का ते सांगू शकतो.

तृतीय स्थान– पराक्रम स्थान: व्यक्तीचा पराक्रम म्हणजे मेहनत किती करतो, छोटे मोठे प्रवास हे बघू शकतो. भावंड, त्यांचे संबंध बघू शकतो. विसा, कागदपत्र, हे बघू शकतो.

चतुर्थस्थान– सुखस्थान. उत्तर आयुष्य कसे जाईल ते पाहू शकतो. मातृ स्थान, आईशी संबंध चांगले आहेत का ते बघू शकतो. मातृसुख. हे पाहतो. भौतिकसुख, स्वतःचे घर, वाहन ही सुख आहेत का, हे बघू शकतो. या स्थानावरून प्राथमिक शिक्षण पाहता येते.

पंचमस्थान– शिक्षण, प्रणय, संतती, पूर्वजन्म, लॉटरीसट्टा, शेयर बाजार याविषयी बघू शकतो. कुठल्या ग्रहने किती बिंदू दिले त्यावरून सांगू शकतो. हे चित्रकला, क्रीडा, आर्ट, डान्स, संगीत, स्थान पण आहे. व्यक्तीचा कल कुठे आहे हे सांगू शकतो. संतती सुख आहे का ते बघू शकतो.

सप्तमस्थान– विवाहस्थान, पार्टनरशिप. विवाहसुख, जोडीदार कसा असेल, वैवाहिक सुख आहे का. स्वतःचा व्यवसाय चालेल का. हे बघू शकतो. प्रत्येक ग्रहाने किती बिंदू दिले ते बघावे. सगळे ग्रह महत्वाचे.

नवमस्थान– भाग्य स्थान, वडिलांशी संबंध, परदेश गमन योग, तीर्थयात्रा, उच्च शिक्षण हे बघू शकतो. किती बिंदू आहेत. भाग्याची साथ आहे का ते बघू शकतो. लग्न स्थान व भाग्य स्थानाला चांगले बिंदू असतील तर व्यक्ती लवकर प्रगति करू शकतो.

दशमस्थान– कर्म स्थान. लोकप्रियता. उच्च पद. मेहनत. नौकरी की व्यवसाय हे बघू शकतो.

लाभस्थान– सर्व प्रकारचे लाभ, चांगला मित्र हे पाहू शकतो. इच्छापूर्ती होईल का ते बघू शकतो.

आता आपण अष्टकवर्गाची सूत्र बघू या. -

1) जर लाभ स्थानाला कर्म स्थाना पेक्षा जास्त बिंदू असतील तर चांगले. कर्म स्थानाला 30 बिंदू असतील व भाग्य स्थानाला 32,34,36 बिंदू असतील तर खूप छान. व्यय स्थानाला लाभस्थाना पेक्षा कमी बिंदू असतील तर चांगले.

2) द्वितीय स्थानाला व्यय स्थानापेक्षा जास्त बिंदू असतील तर चांगले.

3) थोडक्यात– दशमस्थान बिंदू<लाभस्थानबिंदू>व्ययस्थानबिंदू<द्वितीयस्थानबिंदू. उदा. दशमस्थान 30 बिंदू<लाभस्थान 36 बिंदू>व्ययस्थान 22 बिंदू<द्वितीयस्थान 30 बिंदू. व्यक्ती सुखमय आयुष्य जगू शकतो.

4) त्रिकोण:

1,5,9 धर्म त्रिकोण, याला बंधू पण म्हणतात.

2,6,10 अर्थ त्रिकोण, याला सेवक म्हणतात

3,7,11 काम त्रिकोण, इच्छापूर्ती, याला पोषक म्हणतात

4,8,12 मोक्ष त्रिकोण. याला घातक म्हणतात

सर्व ठिकाणी टोटल 84 असेल तर average. 84 पेक्षा जास्त असेल तर छान.

जर धर्म त्रिकोण बेरीज, अर्थ त्रिकोणापेक्षा जास्त असेल तर व्यक्ती स्वतःचा व्यवसाय करेल.

जर अर्थ त्रिकोण बेरीज, धर्म त्रिकोण पेक्षा जास्त असेल, तर व्यक्ती नोकरी करेल.

जर काम त्रिकोण बेरीज, मोक्ष त्रिकोण पेक्षा जास्त असेल तर व्यक्ती सर्व इच्छापूर्ती करेल. सुखी आयुष्य जाईल. पैसे सांभाळून असेल. Wealthy असेल.

जर मोक्ष त्रिकोण बेरीज काम त्रिकोण पेक्षा जास्त असेल तर व्यक्ती कर्जबाजारी असेल. आर्थिक स्थिती कमजोर असेल. मानसिक त्रास होईल.

अजून काही सूत्र बघू:

सर्वाष्टक बिंदुंच्या आधारे फलादेश करताना सर्व साधरण पणे पुढील निकषांचा विचार केला जातो

1. २६ ते 28 ह्या रेंजमध्ये सर्वाष्टक बिंदू असतील तर त्याचा फलादेश मिश्र असा मानला जातो. Average मानला जातो.

2. सर्वाष्टक बिंदू 28 पेक्ष्या जितके अधिक असतील तितके त्या स्थाना साठी शुभ फलदायी .

3. सर्वाष्टक बिंदू २५ पेक्षा जितके कमी असतील तितके त्या स्थानासाठी शुभ फळ कमी असेल. व्यक्तीला संघर्ष करावा लागतो. भिन्नष्टकमधे ग्रह बिंदू बघावे.

4. पत्रिकेचे १ ते ४ स्थान , ५ ते ८ स्थान , ९ ते १२ स्थान असे तीन भाग करावेत पहिला भाग आयुष्याचा पूर्वार्ध ,दुसरा भाग आयुष्यातील मध्य काल खंड , आणि तिसरा भाग म्हणजे आयुष्यातील उत्तरार्ध ,ज्या भागातील सर्वाशात्क गुणांची बेरीज सर्वाधिक असेल त्या प्रमाणे येणारा कालखंड सर्व दृष्टीने उत्तम असेल ,या उलट ज्या भागातील बेरीज कमी असेल तो कालखंड त्रासदायक असेल असे म्हणता येईल .

5. षष्ठ स्थानाला सप्तमस्थान व दशम स्थानापेक्षा जास्त बिंदू असतील, तर ती व्यक्ती नोकरी करते.

विवाह आणि भागीदारीतील व्यवसाय या बाबतीत लग्न नी सप्तम स्थान ह्यामधील सर्वाष्टक गुण विचारात घ्यावे .ज्या स्थाणात गुण जास्त असतील त्या व्यक्तीचे वर्चस्व राहील .लग्न आणि सप्तम स्थान किंवा जातक आणि त्याच्या जोडीदाराच्या पत्रीकेत लग्न आणि सप्तम स्थानातील गुणात ६ ते ७ पेक्षा जास्ती अंतर नसावे , ते असल्यास दोघांपैकी एक सतत दुसर्याच्या द्बावाखालील असेल त्यांचे मनोमिलन होण्यास असंख्य अडचणी येतील .

पती आणि पत्नीच्या चंद्र राशी २८ पेक्षा अधिक गुण असल्यास उत्तम .

अष्टकवर्ग पद्धत पूर्णपणे गोचरवर आधारित पद्धत आहे. या मधे बिंदू हे कायम तेच राहतात बदलत नाही.

सध्या इथेच थांबतो. पुढील भागात ग्रहाचे गोचर प्रमाणे फलित कसे करतात ते बघू. ग्रहाची कक्षा, त्याचे प्रत्येक कक्षेतून भ्रमण व फलादेश कसा करायचा ते बघू. अष्टक वर्ग वरून विवाह कधी होईल, वैवाहिक सुख कसे असेल, स्वतःचे घर कधी होईल, नोकरी की व्यवसाय, शिक्षण, नोकरीं बदल, भौतिक सुख. असे अनेक प्रश्न असतात, ते सर्व आपण अष्टक वर्गवरून

सांगू शकतो. तसेच साडेसाती कशी जाईल हे पण बघू शकतो. हे वर्ष कसे जाईल ते पण बघू शकतो. अगदी दिवस कसा जाईल मुलांना पेपर कसा जाईल, एखाद्याला मीटिंग साठी कुठली वेळ चांगली आहे हे सर्व बघू शकते. वैदिक ज्योतिष शास्त्राला अष्टकवर्ग याची जोड दिली तर फलादेश छान सांगता येतो. हा माझा स्वतःचा अनुभव आहे.

शुभम भवतु!!

श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)

**लेख क्र. १४ : अष्टकवर्ग अभ्यास कुंडली**

**लेखक : श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)**



|| अष्टवर्ग कोष्टक ||

| राशी क्रमांक | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सूर्य | 5 | 8 | 4 | 1 | 4 | 4 | 2 | 6 | 4 | 2 | 4 | 4 |
| चंद्र | 4 | 4 | 4 | 4 | 1 | 6 | 7 | 3 | 5 | 3 | 4 | 4 |
| मंगळ | 2 | 7 | 2 | 1 | 2 | 3 | 3 | 6 | 4 | 3 | 4 | 2 |
| बुध | 4 | 6 | 5 | 6 | 3 | 5 | 3 | 5 | 4 | 4 | 4 | 5 |
| गुरु | 5 | 4 | 5 | 5 | 5 | 4 | 7 | 5 | 3 | 2 | 5 | 6 |
| शुक्र | 5 | 2 | 4 | 6 | 4 | 5 | 5 | 2 | 5 | 4 | 4 | 6 |
| शनी | 4 | 7 | 3 | 3 | 1 | 2 | 4 | 4 | 3 | 1 | 4 | 3 |
| एकूण | 29 | 38 | 27 | 26 | 20 | 29 | 31 | 31 | 28 | 19 | 29 | 30 |



|| अष्टवर्ग कोष्टक ||

| राशी क्रमांक | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सूर्य | 6 | 4 | 3 | 4 | 4 | 3 | 4 | 3 | 4 | 4 | 4 | 5 |
| चंद्र | 5 | 3 | 1 | 1 | 8 | 5 | 2 | 6 | 5 | 5 | 2 | 6 |
| मंगळ | 6 | 2 | 2 | 2 | 5 | 1 | 4 | 4 | 3 | 4 | 2 | 4 |
| बुध | 6 | 4 | 5 | 5 | 4 | 4 | 4 | 3 | 4 | 6 | 4 | 5 |
| गुरु | 6 | 3 | 4 | 5 | 4 | 6 | 5 | 5 | 3 | 4 | 6 | 5 |
| शुक्र | 5 | 4 | 5 | 3 | 4 | 5 | 5 | 4 | 3 | 5 | 5 | 4 |
| शनी | 6 | 3 | 4 | 2 | 3 | 3 | 2 | 4 | 3 | 4 | 1 | 4 |
| एकूण | 40 | 23 | 24 | 22 | 32 | 27 | 26 | 29 | 25 | 32 | 24 | 33 |

**अष्टक वर्ग नुसार कुंडलीअभ्यास :**

जातक : चंद्र रास धनु, लग्न रास कुंभ

जातिका : चंद्र रास मीन, लग्न रास मिथुन

**वैवाहिक सुख :**

आधुनिक पद्धतीने गुण मिलन करतांना आपण लग्न स्थान, कुटुंब स्थान, पंचम स्थान, षष्ठ स्थान, सप्तम स्थान, अष्टम स्थान, लाभ स्थान, व्यय स्थान बघतो.

या दोघांची कुंडलीचे या प्रमाणे विश्लेषण करू.

हे करताना आपण दोघांचे या स्थानातले बिंदू लिहिणार आहोत व त्यांची बेरीज करुन, सरासरी काढणार आहोत. सर्व साधारणपणे 28 बिंदू हा बेस धरला आहे व त्यानुसार आपण बघू.

| House no | jatak | jatika | total | avg |
|---|---|---|---|---|
| 1 (लग्न) | 29 | 24 | 53 | 26.5 |
| 2 (कुटुंब) | 30 | 22 | 52 | 26 |
| 5 (पंचम) | 27 | 26 | 53 | 26.5 |
| 6 (षष्ठ) | 26 | 29 | 55 | 27.5 |
| 7 (सप्तम) | 20 | 25 | 45 | 22.5 |
| 8 (अष्टम) | 29 | 32 | 61 | 30.5 |
| 11(लाभ) | 28 | 40 | 68 | 34 |
| 12 (व्यय) | 19 | 23 | 42 | 21 |

या मधे दोन स्थान असे आहेत की 28 पेक्षा जास्त बिंदू आहेत. बाकी स्थानाना 28 पेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा नाही की हे शुभ फळ देणार नाही. आपण त्या स्थानात कुठल्या ग्रहाने किती बिंदू दिले ते पण बघायला पाहिजे.

जिथे 26, 26.5, 27 असे बिंदू आहेत, याचा अर्थ जातक, जातीकेला त्या स्थानांचे मिश्र फळ मिळेल.

सप्तम स्थानात सरासरी 21 बिंदू आहेत, 28 पेक्षा बरेच कमी आहेत. आता आपण या मध्ये कुठल्या ग्रहाने किती बिंदू दिले ते बघू.

जातकाच्या सप्तम स्थानाला शुक्र ने 4 बिंदू दिले आहेत. गुरुने 5 व रवीने 4 बिंदू दिले आहेत. चांगले बिंदू आहेत.

जातीकेच्या कुंडलीत सप्तम स्थानाला शुक्रने 3, मंगळाने 3, रविने 4, गुरुने 3 बिंदू दिले आहेत.

जातकाच्या व जातीकेच्या व्यय स्थानात शुक्रने 4 बिंदू दिले आहेत. या वरुन आपण सांगू शकतो की यांचे वैवाहिक सुख चांगले आहे. दोघांच्या शुक्रने या स्थानात चांगले बिंदू दिले आहेत. तसेच ज्या स्थानात बिंदू कमी आहेत तेथे दोघांनी एकमेकाला सपोर्ट केला आहे, समजावून घेतले आहे.

नुसतेच स्थानाला चांगले बिंदू असून उपयोग नाही, कुठल्या ग्रहाने किती बिंदू दिले हे महत्वाचे. तसेच ते लग्नेश, भाग्येश, कुटुंब स्थानाच्या स्वामीने दिले असतील तर अजून छान.

ह्यांच्या लग्नाला 26 वर्षे पूर्ण झाली आहेत.

**वास्तूसुख:-**

जातकाच्या चतुर्थ स्थानाला 38 असे घसघाशीत भरपूर बिंदू आहेत. सर्वात जास्त बिंदू याच स्थानाला आहे. मंगळाने 7, शनिने 7, रवीने 8, चंद्राने 4, बुधाने 6 असे भरभरून बिंदू दिले आहेत. यामुळे यांचे घर होणे स्वाभाविक आहे. घर, प्लॉट, शेती, स्थावर भरपूर केले आहे.

तसेच हे मातृस्थान आहे. आईशी चांगले बॉण्डिंग आहे. जातकाचे घरात मन रमते. या शिवाय भावंडांना मदत केली आहे.

**कर्म स्थान, लाभ स्थान, व्यय स्थान व कुटुंब स्थान**:

जातकाच्या कर्म स्थानाला (10) 31 बिंदू, लाभ स्थान 28 बिंदू, व्यय स्थान 19 बिंदू व धन स्थान (2) 30 बिंदू आहेत.

याचे विश्लेषण असे करू शकतो की लाभ स्थानाला कर्म स्थाना पेक्षा थोडे कमी बिंदू आहेत. जातक जेवढी मेहनत कष्ट करतो त्यापेक्षा थोडा कमी मोबदला लाभ त्याला मिळतो. पण जातकच्या व्यय स्थानाला फक्त 19 बिंदू आहेत. लाभ स्थाना पेक्षा खूप कमी, म्हणजे जातक वायफळ खर्च करत नाही. जेवढा जरुरी तेवढाच करतो व बचत करतो. त्यातून तो हे सर्व प्रॉपर्टी करतो आहे असे आपण म्हणू शकतो. तसेच धन स्थानाला व्यय स्थानापेक्षा जास्त बिंदू, लाभ स्थान इतकेच, थोडे जास्त बिंदू धन स्थानाला आहेत. म्हणजे जातक जवळ भरपूर बँक बॅलन्स, धन संचय आहे.

जातकाचा पारंपारिक विटांचा, बिल्डिंग मटेरियल सप्लायर याचा व्यवसाय आहे.

**भाग्य** स्थानाला 31 बिंदू आहेत. भाग्यवान आहे. भाग्याची साथ आहे. गुरुने 7 बिंदू दिले आहेत. धार्मिक, देव धर्म करणारा, तीर्थयात्रा करणारा आहे. पूजापाठ करणारा आहे. रविने फक्त 2 बिंदू दिले आहेत, रवि हा पित्याचा कारक आहे. इथे पित्याचे सुख खूप काळ मिळाले नाही.

**पंचम** स्थानाला 27 बिंदू आहेत. गुरु, बुधने प्रत्येकी 5, रविने 4 बिंदू दिले आहेत. संतती आहे. संतती सुख आहे. असे आपण सांगू शकतो.

कुंडलीत 28 व 28 पेक्षा जास्त बिंदू 8 ठिकाणी आहे. 27, 26 एक एक ठिकाणी आहे. खूप छान, चांगली कुंडली आहे असे म्हणू शकतो.

5 किंवा 5 पेक्षा जास्त बिंदू 35 ठिकाणी आहेत.

41%

4 बिंदू 28 ठिकाणी आहेत. 34%

टोटल (35+28) 63 येते. म्हणजे 75% कुंडली सरासरी व त्यापेक्षा जास्त अशी आहे. चांगली कुंडली आहे असे म्हणू शकतो.

एकंदरीत आपण अष्टक वर्गाप्रमाणे कमी वेळात कुंडलीचा अभ्यास करुन prediction करू शकतो.

शुभम भवतु !!

श्री. हेमंत उपासनी (८१२८६९६३८५)

## लेख क्र. १५ : भाकूट दोष विचार

**लेखक : श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (पुणे) (७०५८११५९४७)**

नमस्कार,
मुले हाता-तोंडाशी आली की, बहुतेक पालकांची लवकरात लवकर त्यांचे दोनाचे चार हात करायची लगबग सुरु होते. आणि सुरु होतो डोक्याला शीण आणणारा योग्य वधू/वर संशोधनाचा सारीपाट. आपल्याकडील हे संशोधन म्हणजे स्थळ जुळण्यापेक्षा नाकारण्यातच निम्म्याहून अधिक स्थळे खर्ची पडतात. कधी रंग रूप जुळत नाही, तर कधी सामाजिक परिस्थिती, मुळ गाव, शिक्षण, गोत्र, देवक अशा अनेक गोष्टी स्थळाचा खातमा करायला तलवार उपसून उभ्या असतात. त्यात अजून भर म्हणजे अष्टकुट गुणमेलन हा आपल्याकडील एक प्रकार. मंगळ दोषा इतकाच विवाह जमान्यात अडथळे निर्माण करणारा एक प्रभावी प्रकार. त्यातील भाकुट आणि नाडी दोष तर ३६ गुणांपैकी १५ गुण व्यापतात. म्हणजे साधारण ४० % स्थळे या दोन प्रकारात बळी पडू शकतात.
आज आपण त्यातीलच भाकुट या बद्दल माहिती घेणार आहोत.
जन्मकुंडलीत चंद्र ज्या स्थानामध्ये असतो, त्या घराला कुंडलीचा भाकू म्हणतात. भाकू म्हणजेच जन्म चंद्र राशी. विवाह मेलनात एकमेकांच्या कुंडलीत भाकू अनुकूल असणे या भाकुट मेलन म्हणतात. प्रतिकूल असेल तर दोष समजला जातो. पारंपारिक गुणमेलनात हा एक अतिशय गंभीर दोष मानला जातो आणि बहुतेक ज्योतिषी कुंडली जुळत नसल्यास लग्न न करण्याचा सल्ला देतात. कारण यावरून प्रेम, वैवाहिक सौख्य तपासले जाते, त्यासाठी अष्टकूटमध्ये भाकूट जुळणे देखील आवश्यक आहे, अन्यथा तो भकूट दोष बनतो व घटस्फोट आणि वैवाहिक जीवनात प्रेमाचा अभाव यासारख्या समस्या उद्भवू शकतात असे मानले जाते.

भकूट दोष :
१) जर वराची चंद्र रास वधूच्या राशि पासून २ री येत असता, त्यांचे वैवाहिक आयुष्य दीर्घ काळ टिकण्यात अडथळे येतात.
२) जर वधूच्या चंद्र राशी पासून वराची चंद्र रास ३ री येत असता, वैवाहिक आयुष्य सुखाचे होत नाही, आरोग्यात बिघाड, वैचारिक मतभेद ई. मुळे इतर गुण मेलन झाले, तरी वैवाहिक आयुष्यात ते दु:खी असतील.
३) जर वधूची जन्मराशि वरांच्या राशिपेक्षा ४ थी येत असता, विवाह सांपत्तिक स्थिती खालावण्यास कारणीभूत ठरेल आणि कठीण परिस्थिती निर्माण होईल.
४) जर वधूच्या जन्म राशी पासून वराची जन्म रास ५ वी येत असता, पती दीर्घायुषी असणार नाही व वधूस अल्पायु मधे दुर्दैव भोगावे लागेल.
अपवाद : जर वधूत्रा जन्म मेष व कर्क राशी मध्ये असेल व वराची तिच्या जन्म राशी पासून ५ वी रास येत असेल, तर अनिष्ट परिणाम समाप्त होऊन उत्तम मेलन होऊ शकते.
५) जर वराची जन्मराशि ६ वी येत असेल, तर संतती करता प्रतिकूल असते. थोडक्यात षडाष्टक योग तयार होतो. वर-वधूची चंद्रराशींमध्ये षडाष्टक असल्यास विचारधारा भिन्न राहून नेहमी वाद निर्माण होतील व दु:खी राहतील.
अपवाद : बारा राशिना दोन गटा भध्ये विभाजित केले आहे. मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु व कुंभ या विषम राशि, अथवा सकारात्मक राशि म्हटल्या जातात. वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, मीन यांना समराशि अथवा नकारात्मक राशि म्हटल्या जातात. हे सांगितले गेले आहे की, विषम अथवा सकारात्मक राशीत जन्मलेल्या मुली करिता षडाष्टक दोष नसतो. तसेच जर मुलीच्या कुंडतीमध्ये चंद्र राशीचा स्वामी वृषभ अथवा वृश्चिक मध्ये असेल, तर त्याचे सहावे स्थान वाहेत तूळ व मेष, वृषभ ई. येऊन त्यांचा अधिपति एक येत असल्याने हा दोष येत नाही.
वराचे चंद्र राशी सम राशी असता व जर ते वधूच्या जन्मराशी पासून २ री येत असता, अनिष्ट परिणाम समाप्त होतील व चांगला मेळ होऊन दीर्घायू जीवन व्यतीत करतील.
याशिवाय, दोन्ही तक्त्यामध्ये नाडी दोष तयार होत नसल्यास, भकुट दोष तयार झाल्यानंतरही त्याचा प्रभाव कमी मानला जातो.

वैदिक काळापासून विवाह वगैरे जुळवण्याची पद्धत प्रचलित आहे आणि बहुतेक आधुनिक ज्योतिषीही कुंडली जुळवण्याच्या अष्ट कुट पद्धतीला खूप महत्त्व देतात. परंतु दशा अंतर्दशा, नवमांश कुंडली, लग्न, पंचम, सप्तम, लाभ स्थान व त्यांचे स्वामी, ई. गोष्टी तपासणे देखील महत्वाचे आहे. या व्यतिरिक्त, दोन्ही कुंडलीतील शुभ अशुभ ग्रहांमुळे निर्माण झालेल्या योग-कुयोग किंवा दोषांचा विचार करणे आवश्यक आहे आणि बहुतेक प्रकरणांमध्ये, गुण मिलन किंवा अष्टकूट जुळण्यापेक्षा ते अधिक निर्णायक ठरतात असा माझा अनुभव आहे.

दोषांचे परिणाम :
भकुट दोषाच्या प्रस्थापित मान्यतेनुसार, वधू किंवा वर यांपैकी एकाचा षडाष्टक भाकुट दोष असल्यामुळे मृत्यू संभवतो,
नवव्या-पाचव्या भाकुट दोषामुळे, दोघांनाही मूल होणे कष्टप्रद होते.
द्वि-द्वादश दोष, लग्नानंतर वधू-वरांना गरिबीला सामोरे जावे लागते.

जन्मकुंडली जुळवणे किंवा मालमत्ता जुळवणे यासारख्या प्रक्रिया भारताव्यतिरिक्त जवळजवळ कोणत्याही देशात वापरल्या जात नाहीत. येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की जन्मकुंडली जुळण्याच्या वेळी निर्माण झालेल्या अनेक दोषांपैकी भकुट दोष हा फक्त एक दोष आहे आणि जन्मकुंडलीच्या जुळणीत तयार होणारे अनेक दोष जसे की नाडी दोष, गुण दोष, काल सर्प दोष, मांगलिक दोष इ. प्रत्येक दोष आहे. हे सर्व दोष लक्षात घेऊन, असे म्हणता येईल की जगातील जवळजवळ प्रत्येक विवाहाला घटस्फोट किंवा वैधता यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागेल कारण त्याच्या प्रचलित व्याख्येनुसार, यापैकी एक किंवा अधिक दोष जवळजवळ प्रत्येक कुंडलीशी जुळतात. ही वस्तुस्थिती वास्तवापासून खूप दूर असल्याने, असे गृहीत धरले पाहिजे की भकुट दोष आणि असे इतर दोष असा विवाह मोडण्यास एकेकटे सक्षम नसून आणि हे घडण्यासाठी ग्रहाने निर्माण केलेला दुसरा गंभीर दोष अथवा इतर अनिष्ट ग्रहस्थिती ई. सुद्धा अनिष्ट परिणाम सूचक असावी. केवळ भकुट दोषामुळे वैवाहिक जीवनात कोणतीही गंभीर समस्या उद्भवत नाही आणि मी अनेक विवाहित जोडप्यांना ओळखतो ज्यांना जुळण्याच्या वेळी भकुट दोष असतो, परंतु तरीही असे विवाह झाले आहेत. जवळपास प्रत्येक क्षेत्रात वर्षानुवर्षे यश मिळवले आहे, हेच कारण आहे की, या सर्व प्रकरणांमध्ये वधूच्या कुंडलीत असे काही योग आहेत जे लग्नाचे शुभ परिणाम सांगतात, ज्यामुळे या कुंडलींवर भकूट दोषाचा प्रभाव जवळजवळ नगण्य असतो. कोणत्याही कुंडलीत ग्रहामुळे निर्माण होणारे कोणतेही शुभ किंवा अशुभ योग हे अष्टकूट मुळे निर्माण झालेल्या दोषांपेक्षा जास्त बलवान असतात आणि दोघांमध्ये संघर्ष झाल्यास, अशा वेळी कुंडलीमध्ये तयार झालेले शुभ किंवा अशुभ योगच असतात.
मुळे कुंडलीतील विवाहसंबंधित योगासारखे कोणतेही शुभ योग भकुट दोष किंवा जुळणीतील इतर दोषानंतरही राशीला यशस्वी आणि आनंदी वैवाहिक जीवन देण्यास सक्षम ठरतात.
म्हणून, लग्नासाठी अस्तित्वात असलेल्या भावी वधू किंवा वराने केवळ भकुट दोष तयार झाल्यामुळे आशा सोडू नये आणि तिच्या जन्मकुंडली केवळ अष्टकूट जुळण्याव्यतिरिक्त इतर पद्धतींनी पूर्णपणे जुळल्या पाहिजेत कारण निर्माण झालेले इतर दोष अशा विवाहाला विशेष हानी पोहोचवू शकतात.

श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

## लेख क्र. १६ : ऋषी पराशर आणि स्थान विचार

**लेखक : श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)**

पराशर ऋषींनी "बृहत पराशर होरा शास्त्रम्" मध्ये नमूद केले आहे की, ग्रह जातकांस लग्न स्थानाच्या अधिपतीनुसार अनुकूल आणि अनिष्ट परिणाम देतात. त्यांच्या मतानुसार, ५ आणि ९ वे स्थान अनुकूल परिणाम दर्शवतात. तर ६, ८, १२ आणि ११ वे स्थान हानिकारक आहेत. बाकीची स्थाने परिस्थितीनुसार परिणाम देतील.

पण वेगवेगळ्या कुंडल्यांचा अभ्यास करताना असे आढळून येते की, ६, ८, १२ स्थान आजार, कोर्ट कचेरी, वाद, भांडणे, अडथळे, वासना, मृत्यू, दुर्भाग्य, गैरमार्ग, हानी, चिंता, अपघात इत्यादी वाईट परिणाम देतात.

परंतु ११ वे स्थान चांगले परिणाम देते. ११ वे स्थान अनुकूल असल्याशिवाय जातक काहीही सहज साध्य करू शकत नाही, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ११ वे स्थानास आपण लाभ स्थान असे मानतो. ६, ८, १२ देखील ११ वे स्थान संबधित असेल, तर काही चांगले परिणाम देतात. ५ आणि ९ वे स्थान कधीतरी प्रतिकूल परिणाम दर्शवतात.

मग पराशर ऋषींनी असा दृष्टिकोन का व्यक्त केला असावा ?

या गोष्टीवर विचार करताना माझ्या असे लक्षात आले की, ऋषी आणि विचारवंत यांचा ओढा आत्मिक, अध्यात्मिक उन्नती करण्याकडे असतो. त्यांना काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपू स्वत:ची असलेल्या सहा भावनांवर विजय मिळवून परमात्मा जो निर्गुण म्हणजेच सत्व, रज, तम रहित असतो, त्याचे प्राप्तीसाठी अवघे आयुष्य समर्पित केलेले असते. सांसारिक बाबींमध्ये रस उरलेला नसतो. हे षड्रिपू त्यांच्या उच्च ध्येयप्राप्ती मध्ये अडसर असतात, ज्या भावनांमुळे मन अशांत होते. व एकचित्त साधना होऊ शकत नाही.

विधात्याने मानवी जीवनाची रचना अशी केली आहे की, सर्वत्र समतोलत्वचा नियम आढळून ग्रेतो. त्याला जीवनात एक गोष्ट प्राप्त झाली तर, त्याला दुसऱ्याचा त्याग करावा लागतो. डोंगर आला म्हणजे त्याबरोबरोबर दरी देखील आलीच.

५ आणि ९ वे स्थान यांना अत्यंत प्रिय असते.

५ वे स्थान मंत्र, ग्रंथ, चिंतन उपासना, पूर्वजन्म, संस्कृती, ज्ञान, ई. दर्शवते.

९ वे स्थान भाग्य, उच्च ज्ञान, तत्वज्ञान, धर्म, धर्म श्रद्धा, तीर्थ यात्रा, मंदिर, पुरण, सत्संग, दृष्टांत, पुण्यकर्म, उपासना, गुरु, संशोधन, उपदेश, अध्यात्मवाद ई. दर्शवते.

११ वे स्थान सर्व भौतिक आकांक्षांची पूर्ती, जसे कि पैसा, नफा, अलंकार, सोने, मित्र, आयुष्याचा जोडीदार, संतती ई. प्रकारचे लाभ दर्शवते.

अशा प्रकारचा भौतिक सुखाचा लाभ हा त्यांच्या आध्यात्मिक कार्यात अडथळा असून निरुपयोगी आहे. आत्मिक प्रगती साधायची असेल तर भौतिक गोष्टीत मन रमून कसे चालेल. म्हणून ऋषींनी ते अपायकारक मानले असावे.

ग्रहांची शुभ अशुभता संबंधी ऋषींनी सांगितलेले नियम खालीलप्रमाणे आहेत:

१) त्रिकोन स्थानांचे अधिपती नेहमीच शुभ परिणाम देतात. त्यांची दुसरी रास जरी ६, ८, १२ स्थांनामध्ये जरी पडले तरीसुद्धा शुभ परिणाम प्रदान करतात. त्रिकोणातील ९ वे स्थानाचा स्वामी ५ वे स्थानापेक्षा बलवान असतो. ५ वे स्थानाचा स्वामी लग्न स्थानापेक्षा बलवान असतो.

२) जर त्रिकोन स्थानांचा अधिपती केंद्र स्थानाचा पण स्वामी असेल, तर तो ग्रह योगकारक ग्रह बनतो. योगकर्ता नेहमीच शुभ परिणाम देतो.

३) सर्व केंद्र स्थानांपैकी १० वे स्थानाचा स्वामी सर्व केंद्रस्थान स्वामी पेक्षा बलवान असतो. १० वे स्थानाचा स्वामी ७ वे स्थानाच्या स्वामी पेक्षा बलवान असतो. ७ वे स्थानाचा स्वामी ४ थे स्थान स्वामी पेक्षा बलवान असतो. आणि ४ थे स्थानाचा स्वामी लग्न स्थान स्वामी पेक्षा बलवान असतो. जर केंद्र स्थानाचा स्वामी नैसर्गिक पापग्रह असेल तर, तो शुभ परिणाम देईल. जर केंद्र स्थानाचा स्वामी नैसर्गिक शुभग्रह असेल तर, त्याला केंद्राधिपत्य दोष प्राप्त होतो.

४) ३, ६, ११ या उपचय स्थानांचे स्वामी अशुभ परिणाम देतात. ३ रे स्थान हे ६ व्या स्थानापेक्षा कमी अशुभ परिणाम देते. तर ११ वे स्थान हे ३, ६ व्या स्थानापेक्षा सर्वाधिक अशुभ परिणाम देते.

५) ६, ८, १२ घरांचा स्वामी अशुभ परिणाम देतो.

६) २, ७ वे स्थानाचे स्वामी हे मारक घरांचे स्वामी आहेत. याचा अर्थ असा होतो की, ते मृत्यूदर्शक आहेत.

७) जर चंद्र आणि सूर्य ८ व्या स्थानाचे स्वामी असतील, तर ते इतर ग्रहांप्रमाणे अशुभ नाहीत.

८) जर एखाद्या ग्रहाची मूळ त्रिकोन रास त्रिकोनातच असेल आणि दुसरी ६, ८, १२ स्थांनामध्ये असेल तरी ग्रह शुभ परिणाम देईल. या उलट जर एखाद्या ग्रहाची मूळ त्रिकोन रास ६, ८, १२ स्थांनामध्ये असेल आणि दुसरी त्रिकोनात असेल तरी ग्रह अशुभ परिणाम देईल.

९) लग्नेश त्रिकोण आणि केंद्र स्वामी असल्यामुळे, नेहमी शुभ परिणाम देतो. जर लग्नेश हाच ८ व्या स्थानाचा स्वामी असेल तर तो शुभ परिणाम देतो.

उदा. मेष लग्नास ८ वे स्थानी वृश्चिक रास येते, येथे त्यांचा स्वामी मंगळ शुभ परिणाम देईल.

तूळ लग्नास ८ वे स्थानी वृषभ रास येते, येथे त्यांचा स्वामी शुक्र शुभ परिणाम देईल.

१०) बाधक स्थानांचे स्वामी देखील मृत्यूदर्शक आहेत.

हे सर्व सांगायचे तात्पर्य एवढेच की, एखाद्या जातकाची कुंडली तपासताना तो ऐहिक प्रगती साधू इच्छितो की भौतिक प्रगती साधू इच्छितो हे जाणून घेऊन व कुंडलीत कोणत्या स्थानी कोणता त्रिकोण येत आहे (धर्म त्रिकोण, अर्थ त्रिकोण, काम त्रिकोण, मोक्ष त्रिकोण) त्यांचे स्वामी कोठे स्थित आहेत या सर्वाचे नीट अवलोकन करून त्यानुसार जातकास फळ सांगावे. कोणता नियम कोठे वापरायचा याचे आकलन सर्वात महत्वाचे आहे.

श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

**लेख क्र. १७ : भृगु नंदी नाडी रहस्य**
**लेखक : श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)**

नमस्कार,
आपल्याला नाडी ग्रंथ व त्यांच्या भविष्य कथन पद्धती याबद्दल कायमच उत्सुकता वाटत आली आहे. जसे भृगु, अगस्ती आदी अनेक नाडी ग्रंथ प्रचलित आहेत, तसे त्यातील रहस्य जाणून घेण्याच्या देखील अनेक पद्धती आहेत. हस्त सामुद्रिक, फेस रीडिंग, कुंडली ई.
आज आपण अशाच प्रकारातील भृगु नंदी नाडी तंत्राची थोडक्यात माहिती घेणार आहोत. या तंत्रात ज्योतिषाचार्य आर.जी. राव सरांनी अत्यंत भरीव आणि मोलाचे कार्य केले आहे.
या तंत्रात लग्न स्थानाचा उपयोग फक्त ग्रहांची ठराविक दिवसाची प्रत्यक्ष स्थिती ठरवण्यासाठी केला जातो, ग्रह कोणत्या स्थानात, भावात आहे हे महत्वाचे धरले जात नाही.
त्या ऐवजी प्रत्येक ग्रहास जे ठराविक कारकत्व दिले आहे व दोन ग्रहांमधील साधला जाणारा ठराविक कोनानुसार फलिताची दिशा ठरवली जाते.
भृगु नंदी नाडी तंत्रात खालील प्रमाणे प्रत्येक ग्रहांस कारकत्व दिलेले आहे.
(१) गुरु हा पुरुषांसाठी जीवकारक व शुक्र स्त्रीसाठी जीवकारक मानतात.
(२) शिक्षणासाठी बुधाला बुद्धीकारक मानतात
(३) व्यवसायासाठी शनीला कर्मकारक मानतात
(४) मोठ्या भावासाठी शनि ग्रहाचा विचार करा
(५) धाकट्या भावासाठी (२ नं. चा भाऊ) मंगळाचा विचार करा
(६) लहान भावासाठी (३ नं. चा भाऊ) बुधाचा विचार करा
(७) मोठ्या बहिणीसाठी चंद्र ग्रहाचा विचार करा
(८) धाकट्या बहिणीसाठी (२ नं. बहिण) शुक्राचा विचार करा
(९) धाकट्या बहिणीसाठी (३ नं. बहिण) बुध ग्रहाचा विचार करा
(१०) पत्नीसाठी शुक्राचा विचार करा
(११) पतीसाठी मंगळाचा विचार करा
(१२) वडिलांसाठी सूर्याचा विचार करा
(१३) आईसाठी चंद्राचा विचार करा
(१४) आजोबांसाठी राहुचा विचार करा
(१५) आजोबांसाठी केतूचा विचार करा
(१६) मामासाठी बुध ग्रहाचा विचार करा
(१७) मुलगी/मुलगा मित्रासाठी बुध ग्रहाचा विचार करा
(१८) सासूसाठी चंद्राचा विचार करा
(१९) सासरच्यांसाठी बुध ग्रहाचा विचार करा
(२०) पैशासाठी शुक्र ग्रहाचा विचार करा
(२१) वाहनासाठी शुक्राचा विचार करा

नाडी नियम
(१) बलहीन ग्रह तेव्हा मानले जातात, जेव्हा :
१) ग्रह शत्रूगृही आहे

२) ग्रह दोन शत्रू ग्रहांच्या मधोमध आहे
३) ग्रह राहू आणि केतू यांच्या युतीत आहे
४) ग्रह अस्तंगत आहे
५) ग्रह शत्रू ग्रहांच्या युतीत आहे
६) ग्रह शत्रू ग्रहांच्या दृष्टीत आहे.

(२) बलवान ग्रह तेव्हा मानले जातात, जेव्हा :
१) ग्रह मित्र गृही आहे
२) ग्रह दोन मित्र ग्रहांच्या मध्ये आहे
३) ग्रह स्वतःच्या राशीत आहे
४) ग्रह मित्र ग्रहांच्या युतीत आहे
५) ग्रह मित्र ग्रहांच्या दृष्टीत आहे.

(३) एक ग्रह नेहमी एकाच दिशेने मार्गक्रमण करत असलेल्या ग्रहांचे कारकत्व परिणाम देईल.

(४) एखादा ग्रह कोणत्या राशीत असला तरीही तो लाभदायक परिणाम देईल, जर अनुकूल ग्रह खालील ठिकाणांहून मित्र मानल्या गेलेल्या ग्रहाकडे पाहत आहेत.
१-५-९ (समान दिशा)
३-७-११ (विरुद्ध दिशा) (सप्तमापासून १-५-९)
२-१२ (पुढे आणि मागील).
शत्रू ग्रहाकडे पाहत असल्यास ते वाईट परिणाम देईल.

(५) जर एखादा ग्रह इतर कोणत्याही ग्रहाशी वरीलप्रमाणे जोडलेला नसेल किंवा त्याच्याशी संबंधित नसेल, तर राशीस्वामीचे कारकत्वप्रमाणे परिणाम देईल ज्यामध्ये तो ग्रह स्थित आहे.
(६) अनुकूल ग्रहाशी परिवर्तन योग असेल आणि अनुकूल ग्रहाशी जोडला गेला असेल, तर तो शुभ परिणाम देईल. शत्रू ग्रहाशी परिवर्तन योग करत असल्यास आणि शत्रू ग्रहाशी जोडल्यास किंवा अनिष्ट परिणाम देईल.
(७) एखादा ग्रह अस्तंगत असतो, तेव्हा तो ज्वलनात असतो असे म्हणतात. ग्रह फारसे फळ देणार नाही. जर अस्तंगत ग्रह अनुकूल ग्रहाशी वरीलप्रमाणे जोडला असेल तर फायदेशीर परिणाम देईल किंवा शत्रू ग्रहाशी जोडला असेल तर वाईट परिणाम देईल.
(८) वक्री ग्रहापासून १२ व्या राशीमध्ये अनुकूल ग्रह असल्यास फायदेशीर परिणाम देईल. शत्रू ग्रह वक्री ग्रहापासून १२ व्या राशीमध्ये असल्यास वाईट परिणाम देईल.
(९) जर राहु सोबत ग्रह युतीत असेल, तर तो ग्रह उच्च ग्रह असला तरीही आपली शक्ती गमावतो.
(१०) राहू आणि केतू एकाच दिशेने पडतील (१,५,९). ते उलट दिशेने पाहतील. राहू आणि केतू नेहमी वक्री असल्याने ते मागील (१२ वी रास) देखील पाहतील.
(११) कोणताही ग्रह १ ल्या दृष्टीने पहात असेल तर अनुकूल वा प्रतिकूल १००% परिणाम देतो.
(१२) कोणताही ग्रह २-५-९ दृष्टीने पहात असेल तर अनुकूल वा प्रतिकूल ७५% परिणाम देतो.
(१३) कोणताही ग्रह ३-७-११ दृष्टीने पहात असेल तर अनुकूल वा प्रतिकूल ५०% परिणाम देतो.
(१४) कोणताही ग्रह १२ व्या दृष्टीने पहात असेल तर अनुकूल वा प्रतिकूल २५% परिणाम देतो.
(१५) सूर्य चे मित्र ग्रह चंद्र मंगळ बुध गुरु आणि शत्रू ग्रह शुक्र शनि राहु केतू मानले जातात.

(१६) चंद्र चे मित्र ग्रह रवी, मंगळ, गुरु आणि शत्रू ग्रह बुध, शुक्र शनि राहु मानले जातात.
(१७) मंगळ चे मित्र ग्रह रवी, चंद्र, गुरु, शुक्र, केतू आणि शत्रू ग्रह बुध, शनि राहु मानले जातात.
(१८) बुध चे मित्र ग्रह शुक्र शनि राहु, रवी आणि शत्रू ग्रह चंद्र, मंगळ, गुरु, केतू मानले जातात.
(१९) गुरु चे मित्र ग्रह रवी, चंद्र, मंगळ, शनी, राहू, केतू आणि शत्रू ग्रह बुध, शुक्र मानले जातात.
(२०) शुक्र चे मित्र ग्रह बुध शनी, राहू, मंगळ, केतू आणि शत्रू ग्रह मानले जातात.
(२१) शनि चे मित्र ग्रह बुध, शुक्र, गुरु, राहू आणि शत्रू ग्रह रवी, चंद्र, मंगळ, केतू मानले जातात.
(२२) राहू चे मित्र ग्रह बुध, शुक्र, शनी, गुरु आणि शत्रू ग्रह रवी, चंद्र, मंगळ मानले जातात.
(२३) केतू चे मित्र ग्रह मंगळ, शुक्र, गुरु आणि शत्रू ग्रह रवी, चंद्र, बुध शनी मानले जातात.

श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

## लेख क्र. १८ : स्त्री-पुरुष आणि शुक्र-मंगळ
## लेखक : श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

नमस्कार,

कालपुरुषाचा रवी हा आत्मा, चंद्र हे मन, मंगळ हे बल, बुध म्हणजे वाणी- वक्तृत्व व बुद्धिमत्ता, गुरू म्हणजे ज्ञान व शुक्र हा सुखकर्ता आणि शनी दुःखकर्ता आहे असे सांगून आचार्य वराहमिहीर शुक्रास मदन असे संबोधतात व त्याला तो रजोगुणी व मंत्री आणि वसंतऋतूचा कारक मानतात. हा ग्रह सुखासक्त, देखणा व सुंदर नयन यांचा कारक आहे असेही प्रतिपादन करतात.

शुक्रास आंग्ल भाषेत 'व्हीनस' असे नामाभिधान आहे. शुक्र वा व्हीनस ही सौंदर्याची अधिदेवता आहे. मदनासारखे अगर रतीसारखे लावण्य असा शब्दप्रयोग नेहमी वापरला जातो. वराहमिहीर शुक्र हा कांतवपु म्हणजे तेजस्वी कांतिमान शरीर असलेला, सुलोचन म्हणजे सुंदर नयन असलेला, सित म्हणजे गौरवर्ण, सितश्च मदनः म्हणजे मदनासारखा सुंदर व मदनिका असे शुक्राचे वर्णन करतात, तर सवार्थ चिंतामणीकार मदन युवति, तारुण्याने मुसमुसलेली स्त्री, विचित्र कांति, सौंदर्य युवति असे शुक्राचे वर्णन करतात.

म्हणजे शरीरसौदर्य, उत्तम बांधा, गौरवर्ण, मोहकता, नाजुकपणा या गोष्टी शुक्र लग्नी असता अगर लग्नेश म्हणून बलवान असता जातकामध्ये पहावयास मिळतात. शुक्र वृषभ राशीचा (द्वितीय भावदर्शक) अधिपती असून तो व्यय भाव दर्शक मीन राशीमध्ये उच्च असतो. द्वितीय व द्वादश स्थाने ही नेत्रस्थाने आहेत. त्यावरून अनुक्रमे उजवा व डावा डोळा यांचा विचार होतो. शुक्र हा तेजस्वी ग्रह असल्याने जातकाचे डोळे तेजस्वी, पाणीदार असतात व शुक्र प्रबळ असल्यास मोहिनी घालू शकतात.

शुक्र हा तुळ राशीचाही अधिपती आहे. तुला रास समन्वय साधणारी आहे, म्हणून या जातकाचा बांधा प्रमाणबद्ध असतो, शरीर मांसल असून रेखीव असते, गाल फुगीर असतात; आवाज गोड व लाघवी असतो आणि एकूणच व्यक्तिमत्त्व मोहक असते.

तुळ रास व बलवान शुक्र लग्नी असलेल्या जातक व्यक्ती दिसण्यात सुंदर, मोहक, विनयशील व सौजन्यपूर्ण स्वभावाच्या असतात. जातक स्त्रिया जास्तच सुंदर असतात, पण पुरुष जातक ही काही कमी सुंदर नसतात.

शुक्र लग्नी असता जातक गौरवर्णी, विलासी आणि सौदर्य प्रसाधने वापरणारी आढळतो. तसेच हे जातक फॅशनेबल कपडे घालतात. त्यांना नटणे, मुरडणे व दागिन्यांची हौस असते. चेहरा हसतमुख व आकर्षक असतो

तनु आदि द्वादश भाव व मेषादि बारा राशी हे कालपुरुषाच्या कुंडलीत समानार्थी मांडले आहेत. वृषभ रास दुसरी आहे व त्याची फळे द्वितीय स्थानदर्शक आणि तुळ ही सातवी रास असल्याने त्याची फळे सप्तम स्थानदर्शक अहि स्थूलमानाने मानली जातात. मीन रास व्यय भाव दर्शक आहे. वृषभ व तुळ या राशी शुक्राच्या आधिपत्याखाली येत असून शुक्र मीन या शेवटच्या राशीत उच्च समजला जातो. भोगप्रवण, रजोगुणी गुणधर्मी शुक्र हा धन व वैवाहिक सौख्य (पत्नी) यांचा प्रामुख्याने कारक आहे. तसेच शय्यासुख देणारा ग्रह म्हणून व्यय भाव दर्शक मीन राशीत उच्च मानलेला आहे.

धन, पत्नी व विविध सुखोपभोग याकडे सामान्य माणसाचे विशेष आकर्षण असते. याचा अतिरेक झाल्यास वासनापूर्ती, द्रव्यलाभ व द्रव्यलालसा यामुळे तो खालच्या स्तरावर उतरतो व रसिक शुक्र रंगेल आणि विलासि होऊन तमोगुणी बनतो. उन्नत जीवात्मे यावर योग्य आत्मिक नियंत्रण ठेवून या विकारांवर मात करतात व त्यांचे उन्नतिकरण करतात. अशा व्यक्ती शुद्ध सत्त्वगुणी असतात.

सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून रजोगुणी शुक्राचे कार्य वा कारकत्व विवाह, स्त्री, रतिसुख, शुक्रधातू, कामवासना, सौंदर्य व लावण्य, उत्तम व उंची पोषाख, अत्तरे वगैरे सुगंधी पदार्थ, रतिक्रीडा व सर्वत-हेचे ऐषाराम, ऐश्वर्य आणि शयनागार, सुखोपभोगाची प्रकृती, देखणेपणा, उत्तम नेत्र, कुरळे केस, हिरे, माणके वगैरे रत्ने यांची प्राप्ती, सर्व त-हेच्या कला, काव्य,

संगीत, वाद्ये, नृत्य, अभिनय ई. असून आणि मोहिनी विद्या, जारण मारणादि विद्या, मंत्रशास्त्रही या शुक्राच्या अंमलाखाली सांगितलेल्या आहेत.
शुक्राच्या शुभाशुभ फलांचा विचार करताना त्याचे शुभ व अशुभ ग्रहांबरोबर होणारे शुभ, अशुभ योग आणि राशी व स्थान यांचे बलाबल लक्षात घ्यावे लागेल.
रवी, चंद्र व गुरू सत्त्वगुणी आहेत,

बुध व शुक्र रजोगुणी आहेत,

तर मंगळ व शनी हे तमोगुणी आहेत,

असे प्राचीन ग्रंथकारांनी सांगितले आहे.
ग्रह हे प्रामुख्याने मनुष्याचे मन व त्याची बुद्धी यावर परिणाम करणारे असल्याने कुंडलीमध्ये सत्त्व, रज, तम यापैकी कोणत्या गुणाचे प्राबल्य आहे, याचा विचार करून लोभ, मोहादि षड्रिपूंचा किती जोर आहे, याचाही अंदाज घ्यावा लागतो. काम, क्रोध हे मंगळाचे गुण आहेत. मंगळाची अनिष्टता शुक्राला बिघडवण्यास कारणीभूत ठरू शकते.

प्रथम भाव व मेषरास यांच्या साम्यावर आधारलेली कालपुरुषाची निर्सगकुंडली ही पुरुषप्रधान आहे. म्हणून शुक्र हा ग्रह प्रामुख्याने पुरुष कुंडलीत अभ्यासावा लागतो. जुन्या ग्रंथकारांनी त्यासच प्राधान्य देऊन शुक्राची फले सांगितली आहेत. संतति, विवाह, चारित्र्य वा तत्सम पंचम, सप्तम, व्ययस्थान व द्वितीय स्थान यांच्या विचारासाठी पूर्वाचार्यांनी त्यांने प्रत्येक ग्रंथात त्यांची फळे कशी घ्यावी याचे दिग्दर्शन केले आहे.
माझ्या मते स्त्रियांच्या कुंडल्यात मंगळाचा अभ्यास करणे जरूर आहे. याच दृष्टीने तुळ रास प्रथम भाव धरून, स्त्री जातकाची निसर्ग कुंडली मांडली असता, ती कुंडली स्त्री प्रधान निसर्ग कुंडली होईल. स्त्रियांचे चारित्र्य, त्यांचा विवाह, त्यांचे वैवाहिक जीवन, विषयसुख या गोष्टी स्त्रियांना पुरुषत्वापासून प्राप्त होतात आणि पुरुषत्वाचा कारक ग्रह मंगळ आहे, जो तूळ लग्नाच्या कुंडलीत सप्तमेश येईल. म्हणून स्त्री कुंडलीचा अभ्यास करताना मंगळाकडे लक्षपूर्वक पाहणे आवश्यक ठरते.
स्त्री जातक कुंडलीत मंगळ अशुभ असता, तो वक्री असता विवाहसुखात अडथळे निर्माण करतो अथवा विवाहसुख लाभू देत नाही. हाच अनुभव शुक्र वक्री असता पुरुष जातक कुंडलीत अनुभवास येतो. वैवाहिक जीवनातील असमाधान, दुरावा, घटस्फोट वा विवाहातील अडथळे यांचा विचार करताना शुक्र व मंगळ हे वक्री, मार्गी, स्तंभी ई. चा विचार करणे आवश्यक ठरेल.
स्त्रीयांच्या कुंडलीतील रवीचा शनीशी योग व पुरुष कुंडलीत चंद्राचा शनीशी योग हे सुद्धा विवाहाच्या बाबतीत निर्णय करताना विचारात घ्यावे लागतील. (विवाह न होणार्या वा अति विलंबाने विवाह होणाऱ्या स्त्रियांच्या कुंडलीत २ ५. ७. १० व १२ मधील शनी अथवा रवीवर शनीची दृष्टी, युती, वाहक असे योग आढळतात.)

शुक्र - मंगळ योग :
शुक्र मंगळाच्या शुभाशुभ ग्रहयोगांचा विचार करताना या दोन ग्रहांचे कारकत्व प्रामुख्याने विचारात घ्यावे लागते. शुक्राचे मंगळाशी असणारे नाते अन्य ग्रहांपेक्षा वेगळे आहे. निसर्गकुंडलीत मंगळ प्रथम स्थानाचा व मेष राशीचा मालक आहे, तर शुक्र सप्तम स्थानाचा व तुळ राशीचा अधिपती आहे. यामुळे या दोन ग्रहांचे परस्परांशी असणारे नाते पुरुष-स्त्री, पती-पत्नी या स्वरूपाचे आहे.
शुक्र हा प्रणयी, विलासी व निर्सगातः कामप्रधान ग्रह आहे.

तर मंगळ हा जबरदस्त शक्ती असलेला कामप्रधान पुरुष ग्रह आहे. त्यामुळे या दोन ग्रहांच्या कोणत्याही योगात विलासीपणा, कामुकता, भोगी वृत्ती, ऐहिक प्रवृत्ती वगैरेंचा भाग जास्तच असतो.

शुक्र- मंगळ शुभ योग :

सर्वसाधारणपणे शुक्र-मंगळांच्या शुभ योगात शुक्राच्या कारकत्वास, गुणधर्मास मंगळाच्या शक्तीने उत्तेजन व प्रोत्साहन मिळते. या योगातील प्रेमास लैंगिक अधिष्ठान असते. स्वार्थी, वस्तुनिष्ठ व अधिभौतिक गोष्टींवर आधारित असे हे प्रेम असते. सर्वच बाबतीतील अपेक्षा जास्त वाढवणारा हा ग्रहयोग आहे. हा ग्रहयोग असणाऱ्या व्यक्ती खऱ्याखुऱ्या अर्थाने शौकीन व हौशी आढळतात. त्यांच्यात बऱ्याच प्रमाणात रंगेलपणाही आढळतो. वागण्यात छानछोकीपणा, टापटीप व सर्व सुरेख वस्तूंचे आकर्षण आढळते. पुरुष पत्रिका पत्नी सुस्वरूप दर्शवते. या व्यक्तीची प्रवृत्ती खर्चिक असू शकते.
शुभ योग म्हणजे ६० अंशाचा लाभयोग व १२० अंशाचा त्रिकोण योग.

शुक्र- मंगळ युति योग :
बृहज्जातक मध्ये शुक्र- मंगळ युती योग असता जातक गोपालक, मल्ल, सतत दक्षता घेणारा व पत्नीखेरीज अन्य स्त्रियांशी संबंध ठेवणारा व जुगारी असतो असे वर्णन दिले आहे.
सारावली मध्ये शुक्र- मंगळ युती योग असता जातक आपल्या जातीत अथवा त्या भागातील लोकांचा मुख्य असतो, त्यास लोक मानतात. तो गणितज्ञ असतो; तसेच खोटे बोलणारा व जुगारी असतो असे वर्णन आले आहे.
जातक पारिजात मध्ये शुक्र- मंगळ युती योग असता जातक धातुशास्त्रात प्रवीण, धूर्त व जादूगार असतो असे वर्णिले आहे.
शुक्र-मंगळाच्या युति योगात भोग प्रधानता व पर युवति बरोबर रतत होण्याची लालसा जास्त आढळते. प्रसिद्ध ज्योतिषी बी. सूर्यनारायणन यांनी बृहज्जातकाच्या भाषांतरातील टीकेत पान २८५ वर त्यांचा अभ्यासलेल्या शुक्र-मंगळ युतीच्या कुंडल्यांमधील निष्कर्ष मांडताना म्हणतात, की या व्यक्ती पुरुष वा स्त्री यांचे वर्तन अनैतिक असून त्यांना गुप्त रोगाची बाधा झालेली आढळते.

राशिदृष्ट्या शुक्र- मंगळ युती
सर्वसाधारण पुरुषांच्या पत्रिकेत मेष, कर्क, वृश्चिक, मीन, वृषभ, तुला या राशीत ही युती कामुकता, प्रणय या दृष्टीने जास्त प्रबळ आढळते. तरुण वयात एखादे प्रेमप्रकरण घडण्याचा जास्त संभव असतो. युती एखाद्या ग्रहाच्या कुयोगात असता 'पर स्त्री संबंध' येण्याची शक्यता वाढते. वरील राशीतील युती हर्षल, नेपच्यूनच्या कुयोगात असता अथवा चंद्राच्या सप्तमात अगर लग्नाच्या सप्तमात पापग्रह असता प्रतारानेची शक्यता राहते. वरील राशीतील युती, गायन, वादन, नृत्य, अभिनय, फोटोषाची इत्यादी कोणत्याही कलेची आवड व प्रेम उत्पन्न करणारी व त्यात प्रावीण्य देणारी असते.
जल राशीत अथवा स्थानात राशिबली व योगबली अशी युती स्त्रियांच्या कुंडलीत असता, संसार सर्व आधुनिक सोयींनी व साधनांनी सज्ज करण्याकडे त्यांचा कल असतो व सतत तशी धडपड असते. अशा स्त्रियांना घरात उंची व भारी किमतीच्या वस्तू घेण्याचा छंद असतो. अशा गोष्टी त्यांना दैवयोगाने उपलब्ध होतात.

शुक्र- मंगळ अशुभ योग
अशुभ योग ४५ अंश, ९० अंश, १३५ अंश, १५० अंश व १८० अंश मध्ये होत असतात. अशुभ योग सर्वसाधारणपणे व्यक्तीला सुख लाभू देत नाहीत. त्यामध्ये केंद्रयोग व प्रतियोग हे जास्त महत्त्वाचे ठरतात. ते व्यक्तीला वैवाहिक सुख लाभू देत नाहीत. तसेच हे योग असमाधान व वैगुण्य निर्माण करणारे असतात. व्यक्तीला अपेक्षाभंगाचे दुःख होते, जोडीदाराची योग्य ती साथ न मिळाल्यास त्यास दूषणे दिली जातात. लोकांना व परिस्थितीला नावे ठेवण्याच्या मागे त्यांच्या अपेक्षाच जास्त आढळतात.
स्त्रियांच्या कुंडलीत असा योग असल्यास पतीचा स्वभाव मोठा अप्पलपोटी, आपमतलबी आढळतो. अगर पतीच्या आरोग्याचे दृष्टीने काही भास निर्माण करणारा असतो. पती-पत्नी प्रकृतीच्या दृष्टीने एकमेकांना अनुरूप राहत नाहीत. शुक्र निसर्गतः द्वितीय या कुटुंबस्थानाचा कारक असल्याने कुटुंबातील इतर व्यक्तीमुळे त्या जातकास त्रास भोगावे लागतात.
शुक्र- मंगळ अशुभ योगात शनी, हर्षल, नेपच्यून यांसारख्या एखाद्या ग्रहाचा कुयोग असता, भावनांच्या दृष्टीने मोठेच दुःख भोगावे लागते, अगर आपत्ती येतात, पती-पत्नीत वितुष्ट येते अगर बराच काळ एकमेकांपासून वेगळेही राहावे लागते.

शुक्र- मंगळ अशुभ योगामुळे जातक जास्त सुखासीन, उधळी, चैनी होण्याचा संभव असतो. जातकाच्या वागण्यात संयम कमीच आढळतो. याचा प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. कुंडलीत भावनांचा कोंडमारा करणारे इतर योग असता जातकाला मानसिक दुःख जास्त आढळते.

तात्पर्य हेच की, शुक्र-मंगळ योग अनेक कुंडल्यांत सापडतील. पण सर्वच जातक अनिर्बंध  वासनापूर्ती करतील असे नाही. काही जातक मनात मांडे खाऊन संयमाचा प्रयत्न करतील. त्यापैकी काही यशस्वी होतील, तर काही अयशस्वी होतील आणि ही गोष्ट ज्याच्या त्याच्या मानसिक व आत्मिक विकासाच्या पातळीवर, उन्नतीवर अवलंबून राहील. काही जातक योगविद्येचा आश्रय घेऊन जीवनात विषयवासनेवर मात करतील.
हे ग्रह कुंडलीत अनुकूल स्थितीत असतील, तर सौख्य, विलास व ऐहिक सुखाचा कारक ग्रह शुक्र असल्याने त्याला मंगळाची शक्ती फारच पोषक ठरते. व्यक्तीला आनंदी, विलासी व चैनी करण्याकडे या युतीचा कल असतो. ऐहिक इच्छा व आकांक्षा वाढवणारे असे हे दोन ग्रह आहेत.
या युतीत प्रेमळपणा, आनंदी वृत्ती, समजूतदारपणाही जास्त आढळतो. ही युती एकमेकांचा आनंद जपण्यासाठी खर्च करू शकतात.
ही युती उत्तम शरीरसौष्ठव व सौदर्य देणारी आहे स्त्रियांच्या पत्रिकेत काही राशीत ही युती चांगली व आकर्षक व्यक्तिमत्त्व देते. कोणत्याही कलेस ही युती पोषक असते.

(टीप : कोणत्याही निर्णयावर येण्यापूर्वी कुंडलीतील सर्व ग्रह स्थिती, युती, दृष्टी, नक्षत्रे, रास दशा अंतर्दशा, इतर ग्रह योग ई. घटक जाणकार ज्योतिषाकडून तपासून घ्यावेत.)

श्री. ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

## लेख क्र. १९ : १२ वर्षाच्या हट्टी व भांडखोर मुलीची कुंडली

## लेखिका : डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

जन्म तारीख : २७ १० २०१२ १८.३२ वा. दहिसर

लग्न कुंडली




विमशोत्तरी दशा

| शनि –19 वर्ष 27/10/12 पासून 21/ 1/15 | |
|---|---|
| शनि | 00/00/00 |
| बुध | 00/00/00 |
| केतु | 00/00/00 |
| शुक्र | 00/00/00 |
| सूर्य | 00/00/00 |
| चंद्र | 00/00/00 |
| मंगल | 00/00/00 |
| राहु | 9/7/12 |
| गुरू | 21/1/15 |

| बुध –17 वर्ष 21/ 1/15 पासून 21/ 1/32 | |
|---|---|
| बुध | 18/6/17 |
| केतु | 15/6/18 |
| शुक्र | 15/4/21 |
| सूर्य | 21/2/22 |
| चंद्र | 21/7/23 |
| मंगल | 18/7/24 |
| राहु | 6/2/27 |
| गुरू | 12/5/29 |
| शनि | 21/1/32 |

| केतु –7 वर्ष 21/ 1/32 पासून 21/ 1/39 | |
|---|---|
| केतु | 18/6/32 |
| शुक्र | 18/8/33 |
| सूर्य | 24/12/33 |
| चंद्र | 24/7/34 |
| मंगल | 21/12/34 |
| राहु | 9/1/36 |
| गुरू | 15/12/36 |
| शनि | 24/1/38 |
| बुध | 21/1/39 |

| शुक्र –20 वर्ष 1/ 1/39 पासून 21/ 1/59 | |
|---|---|
| शुक्र | 21/5/42 |
| सूर्य | 21/5/43 |
| चंद्र | 21/1/45 |
| मंगल | 21/3/46 |
| राहु | 21/3/49 |
| गुरू | 21/11/51 |
| शनि | 21/1/55 |
| बुध | 21/11/57 |
| केतु | 21/1/59 |

| सूर्य –6 वर्ष 21/ 1/59 पासून 21/ 1/65 | |
|---|---|
| सूर्य | 9/5/59 |
| चंद्र | 9/11/59 |
| मंगल | 15/3/60 |
| राहु | 9/2/61 |
| गुरू | 27/11/61 |
| शनि | 9/11/62 |
| बुध | 15/9/63 |
| केतु | 21/1/64 |
| शुक्र | 21/1/65 |

| चंद्र –10 वर्ष 21/ 1/65 पासून 21/ 1/75 | |
|---|---|
| चंद्र | 21/11/65 |
| मंगल | 21/6/66 |
| राहु | 21/12/67 |
| गुरू | 21/4/69 |
| शनि | 21/11/70 |
| बुध | 21/4/72 |
| केतु | 21/11/72 |
| शुक्र | 21/7/74 |
| सूर्य | 21/1/75 |

| मंगल –7 वर्ष 1/ 1/75 पासून 21/ 1/82 | |
|---|---|
| मंगल | 18/6/75 |
| राहु | 6/7/76 |

| राहु –18 वर्ष 21/ 1/82 पासून 21/ 1/00 | |
|---|---|
| राहु | 3/10/84 |
| गुरू | 27/2/87 |

| गुरू –16 वर्ष 21/ 1/00 पासून 21/ 1/16 | |
|---|---|
| गुरू | 9/3/02 |
| शनि | 21/9/04 |

ही मुलगी हट्टी आहे. १२ वर्षाची असून सर्वांशी भांडते मारामारी करते कुणाचेच ऐकत नाही

लग्न व अष्टमेश मंगळ असून तो अष्टम भावात बुधाच्या युतीत व राहू सोबत आहे. मनाचा कारक चंद्र , द्वादश स्थानात हर्षलच्या युतीत आहे. त्यावर शुक्राची दृष्टी आहे. राशी स्वामी गुरु असून तो धन स्थानात की केतू सोबत आहे. त्याची दृष्टी लग्नेश मंगळ ,बुध व राहू वर आहे.

लग्नेश मंगळ असून तो अष्टमात बुध आणि राहू सोबत आहे म्हणजे ती दंगामस्ती, वितंडवाद, भांडण ,करणारी हा तीचा स्वभाव आहे. तसेच चंद्र द्वादशात हर्षलच्या युतीत मिन राशीत आहे. या ग्रहस्थितीत तीचे मन ही चंचल असून. ती परिवारातील सदस्यांचे ऐकून घेत नाही .

षष्ठ स्थानात शुक्र आहे. शुक्र प्रेमाचा कारक आहे. त्याची दृष्टी व्यय स्थानातील चंद्र व हर्षल यावर आहे. चंद्र मनाचा कारक आहे. तसेच गुरुची दृष्टी लग्नेश मंगळावर असल्याने जातिका संस्काराच्या विरुद्ध काही करणार नाही तथापि त्या दृष्टीने पालकाने काळजी घेणे आवश्यक आहे.

असे असले तरी मुलगी अतिशय हुशार आहे. तिचे व्यक्तिमत्व प्रभावी आहे. तिने मशीन, खनिज, उर्जा या विषया संबंधी ब्रांच मध्ये इंजिनिअरिंग केल्यास त्यात प्रगती होऊ शकते.

सध्या बुधाच्या महा दशेतील मंगळाची अंतर्दशा सुरू आहे. 18 जुलैला मंगळाची अंर्तदशा संपते. त्यानंतर ऑगस्ट पासून स्वभावात बदल होईल. राहु ची अंर्तदशा फेब्रुवारी 2027 ला संपते. मार्च 27 पासून तीची प्रगती अत्यंत चांगली होईल.

गोचरीने शनी चे भ्रमण लाभातून सुरू आहे त्यांची दृष्टी लग्नस्थानावर आहे त्यामुळे जास्त त्रास होत आहे. शनि बदलल्यावर मार्च 25 नंतर बऱ्याच प्रमाणात फरक पडेल.

अष्टमात लग्नेश मंगळ राहु  सोबत असल्याने जातक कदाचित आपल्या कुटुंबातील नावकरी असेल त्याच्या जन्माच्या पुर्वी कुटुंबातील कोणाचा मृत्यू झाला असल्यास त्या व्यक्तीच्या नावानुसार त्याला संबोधावे .

ही पत्रिका पितृदोषाची आहे. पितृ दोषाचा उपाय करावा

दररोज गणपती अथर्वशीर्ष व मारुती स्तोत्र म्हणण्यास सांगावे.

'श्री स्वामी समर्थ,' हा जप दररोज ११ माळी करावा.

भाग्येश गुरु वर मंगळ व राहू ची दृष्टी आहे.

गुरु चरित्र ग्रंथाचे तीन पारायणे करावी.

पत्रिका पितृ दोषाची आहे, तसेच पुनर्जन्माची सुद्धा आहे. नाशिकला जाऊन नारायण नागबली आणि त्रिपिंडी करून घ्यावी.

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

## लेख क्र. २० : समीक्षा ताईंचे भविष्य कथनासंबंधी अनुभवी सल्ले

लेखिका : डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

**लग्न कुंडली**




**विमशोत्तरी दशा**

| गुरू –16 वर्ष 9/12/95 पासून 14/10/08 | |
|---|---|
| गुरू | 2/12/94 |
| शनि | 14/6/97 |
| बुध | 20/9/99 |
| केतु | 26/8/00 |
| शुक्र | 26/4/03 |
| सूर्य | 14/2/04 |
| चंद्र | 14/6/05 |
| मंगल | 20/5/06 |
| राहु | 14/10/08 |

| शनि –19 वर्ष 14/10/08 पासून 14/10/27 | |
|---|---|
| शनि | 17/10/11 |
| बुध | 26/6/14 |
| केतु | 5/8/15 |
| शुक्र | 5/10/18 |
| सूर्य | 17/9/19 |
| चंद्र | 17/4/21 |
| मंगल | 26/5/22 |
| राहु | 2/4/25 |
| गुरू | 14/10/27 |

| बुध –17 वर्ष 14/10/27 पासून 14/10/44 | |
|---|---|
| बुध | 11/3/30 |
| केतु | 8/3/31 |
| शुक्र | 8/1/34 |
| सूर्य | 14/11/34 |
| चंद्र | 14/4/36 |
| मंगल | 11/4/37 |
| राहु | 29/10/39 |
| गुरू | 5/2/42 |
| शनि | 14/10/44 |

| केतु –7 वर्ष 14/10/44 पासून 14/10/51 | |
|---|---|
| केतु | 11/3/45 |
| शुक्र | 11/5/46 |
| सूर्य | 17/9/46 |
| चंद्र | 17/4/47 |
| मंगल | 14/9/47 |
| राहु | 2/10/48 |
| गुरू | 8/9/49 |
| शनि | 17/10/50 |
| बुध | 14/10/51 |

| शुक्र –20 वर्ष 14/10/51 पासून 14/10/71 | |
|---|---|
| शुक्र | 14/2/55 |
| सूर्य | 14/2/56 |
| चंद्र | 14/10/57 |
| मंगल | 14/12/58 |
| राहु | 14/12/61 |
| गुरू | 14/8/64 |
| शनि | 14/10/67 |
| बुध | 14/8/70 |
| केतु | 14/10/71 |

| सूर्य –6 वर्ष 14/10/71 पासून 14/10/77 | |
|---|---|
| सूर्य | 2/2/72 |
| चंद्र | 2/8/72 |
| मंगल | 8/12/72 |
| राहु | 2/11/73 |
| गुरू | 20/8/74 |
| शनि | 2/8/75 |
| बुध | 8/6/76 |
| केतु | 14/10/76 |
| शुक्र | 14/10/77 |

| चंद्र –10 वर्ष 14/10/77 पासून 14/10/87 | |
|---|---|
| चंद्र | 14/8/78 |
| मंगल | 14/3/79 |
| राहु | 14/9/80 |
| गुरू | 14/1/82 |
| शनि | 14/8/83 |
| बुध | 14/1/85 |
| केतु | 14/8/85 |
| शुक्र | 14/4/87 |
| सूर्य | 14/10/87 |

| मंगल –7 वर्ष 14/10/87 पासून 14/10/94 | |
|---|---|
| मंगल | 11/3/88 |
| राहु | 29/3/89 |
| गुरू | 5/3/90 |
| शनि | 14/4/91 |
| बुध | 11/4/92 |
| केतु | 8/9/92 |
| शुक्र | 8/11/93 |
| सूर्य | 14/3/94 |
| चंद्र | 14/10/94 |

| राहु –18 वर्ष 14/10/94 पासून 14/10/12 | |
|---|---|
| राहु | 26/6/97 |
| गुरू | 20/11/99 |
| शनि | 26/9/02 |
| बुध | 14/4/05 |
| केतु | 2/5/06 |
| शुक्र | 2/5/09 |
| सूर्य | 26/3/10 |
| चंद्र | 26/9/11 |
| मंगल | 14/10/12 |

एका जातीकेचे प्रेम संबंध होते आणि तिचा विवाह त्याच्याशी होईल का असा प्रश्न होता तिचा प्रेम त्याच्यावर होता तो विवाहित होता आणि घटस्फोटासाठी सुद्धा त्यांनी केस फाईल केली नव्हती अशावेळी जातीकेची पत्रिका पाहिली. प्रमोशन संबंधी सुद्धा प्रश्न होता

हे सर्व प्रश्न 20 जुलैला मी बघितले. लाभेश सप्टेंबर मध्ये लाभात जाणार होता. तसेच दशमेश लाभात सप्टेंबर मध्ये जाणार होता आणि म्हणूनच मी तिला सांगितले की, तुला प्रमोशन सप्टेंबर मध्ये मिळेल तुला जर जॉब स्विच ओवर करायचा असेल तरी तुला सप्टेंबर नंतर संधी आहे.

सूक्ष्मदशा व गोचर पाहून जातकाचा मृत्यूची तारीख शोधा आपल्याला ओळखता येते त्याचे काही मी उदाहरण पुढे देत आहे

जातक आजारी आहे कधी बरा होईल प्रश्न कुंडली मांडून उत्तर शोधा,

जुलै 17 तारखेला भीती आहे. 17 जुलैला व्ययेशाचे सूक्ष्मदशा आहे. मंगळ फार कमी डिग्रीवर आहे त्यामुळे वाईट घटना घडण्याची शक्यता आहे. आणि जातकाचा 17 जुलै 2024 ला मी सांगितलेल्या तारखेत मृत्यू झाला.

ज्यावेळी जातकाचा प्रश्न मृत्यू संबंधी किंवा खूप सिरीयस असेल आणि आपल्याला असा प्रश्न विचारण्यात येतो त्यावेळी जातकाची सूक्ष्मदशा पहा. तसेच अष्टक वर्गात अष्टमस्थाने ज्या ग्रहाने बिंदू अधिक दिले आहेत, त्या ग्रह चे सूक्ष्मदर्शक प्राण दशा असेल, तर त्या काळातील तुम्ही तारीख देऊ शकता. अजून पर्यंतच्या बारा कुंडल्यांना मी लावलेले नियम यात

सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्या तारखप्रमाणे 12 मृत्यू झाले आहेत सूक्ष्म दशा, गोचर, आणि अश्टं स्थानातील ह्या ग्रहाचे अधिक बिंदू आहेत त्या ग्रहाची सूक्ष्म दशा पहा. उत्तर परफेक्ट येते.

जातक : ०४.१२.१९६६ वेळ दुपारी ४.५६ ठिकाण वेंगुर्ला सिंधुदुर्ग




गोचरने चंद्राचा राशी स्वामी शुक्र अष्टमात आहे तसेच अष्टमेश व्ययात त्यामुळे बिकट आहे दहा तारखेपर्यंत धोका आहे त्यानंतर यश मिळाले तर मिरॅकल होऊ शकते.

अष्टमेश गुरु व्ययात ही परिस्थिती त्रासदायक आहे. आताच्या प्रश्नाला आणि 12 फेब्रुवारी 2024 मध्ये जातकाचा मृत्यू झाला. आणि 10 फेब्रुवारीला जातकाचा मृत्यू झाला. मी सूक्ष्म दशा व गोचर वरून सांगितलेले भाकीत खरे ठरले.

हे पहा लग्न स्थान बिघडले तर माणसाची प्रगती होत नाही तसेच धन स्थान बिघडले तर पैशाची अडचण येते धन स्थान हे कुटुंब स्थान आहे त्या मुळे कुटुंबात कलह होतो. तसेच द्वितीय स्थान म्हणजे तोंड ,माणसाला कोणत्या प्रकारचा आहार आवडतो ते त्या स्थान वरून समजते त्या मुळे ते बिघडल्यास तोंडाला चव नसते, तोंडाचे, डोळ्याचे विकार सुद्धा होऊ शकतात. असे आपण ढोबळ मानाने गोचर कुंडली व सूक्ष्म दशा पाहून निरीक्षण करावे. हे मी उसुफुर्त पणे लिहीत आहे.

तृतीय स्थान म्हणजे आपली भावंडे आपले मित्र आणि आपले कान असतात. त्यामुळे इथे दूषित ग्रह किंवा दूषित ग्रहांची दृष्टी आल्यास मैत्री तुटते, कानाचे विकार होतात किंवा ऑफिस मध्ये मित्रच शत्रू बनून आपला पत्ता कट करतात. हे सूक्ष्म दशा व गोचर पाहून काल निर्णय करा.

चतुर्थ स्थान म्हणजे आई, घर, सुख स्थान, वाहन स्थान सुद्धा आपण बघतो. हे बिघडल्यास कुटुंबात दुफळी माजते. पती पत्नी मुले यांच्यात कलह, तसेच निद्रा नाश सुद्धा होतो. पाहायला आलेली स्थळे पुढे नकार देतात. चतुर्थात राहू, केतू, शनी, गुरू

असेल, तरी ते स्थान बिघडते. गुरूला सुद्धा चतुर्थ स्थान मानवत नाही. शनी चतुर्थात आला तरी घरात वादावादी होते. त्याला शनी पनौती असे म्हणतात. चतुर्थात राहू आला तर दशमात केतू येतो किंवा चतुर्थात केतू आला तरी सुख स्थान बिघडते.

जातकाला सल्ला देताना सकारात्मक द्यावा कारण आधीच जातक गोंधळला असतो आणि त्यात नकारात्मक बाजू सांगून जातकाला घाबरून न सोडता योग्य व साकार आत्मक बोला त्याने आधी अर्धे प्रश्न सुटून जातात. आणि जातकाला धीर द्या. कारण ज्योतिषाने नुसता सल्ला द्यायचा नसतो, तसेच  गरज असल्यास रत्नांचे उपाय द्या. कधी कधी मंत्र काम करतात. ग्रहांचे मंत्र लिहून द्यावेत. तसेच नवग्रह स्तोत्र बोलण्यास सांगावे व पाप ग्रहांचे उपाय मात्र आवर्जून द्यावेत. जातकाला फीड बॅक मागवा.

कर्ज पाहण्यासाठी षष्ठी स्थान पहावे व कर्ज कधी फिटेल हे पाहण्यासाठी तुम्ही व्यय स्थान पाहायचे हे तुम्ही जातकाच्या गोचर कुंडली वरुन पाहायचे आणि उत्तर शोधायचे.

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

## लेख क्र. २१ : शुभ कर्तरी योग आणि पाप कर्तरी योग

**लेखिका : डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)**

कर्तरी म्हणजे कात्री. याची दोन्ही फळे मिळतील. शुभ असता शुभ. अशुभ असता अशुभ फळे.

ज्योतिष शास्त्रानुसार काही योग शुभ फळे देताना दिसतात. जसे की शुभ कर्तरी योग आणि अशुभ फळे देताना दिसतात जसा की पाप कर्तरी योग.

जेव्हा एखादा ग्रह दोन शुभ ग्रहांच्या मध्ये असतो त्यावेळी तो शुभ कर्तरी योग समजला जातो आणि जेव्हा एखादा ग्रह पापग्रहांच्या मध्ये असतो तेव्हा तो पाप कर्तरी योग समजला जातो

या योगामध्ये दोन पाप ग्रहांच्या मध्ये एखादा शुभ ग्रह असेल तर त्याची अशुभ फळे मिळताना दिसतात आणि तो ग्रह ज्या भावांचा कारक आहे त्या भावाशी संबंधित फळे कमी मिळताना दिसतात.

पापा कर्तरी योगामध्ये दोन नैसर्गिक पापग्रह द्वितीय आणि द्वादशस्थानी असता, त्या योगाला पाप कर्तरी योग असे म्हटले गेले आहे. जातकाला याची अशुभ फळे मिळताना दिसतात

जन्मपत्रिकेमध्ये बारा भावांमध्ये दोन पेक्षा जास्त अशुभ ग्रह असतात, तेव्हा पाप कर्तरी योग बनतो जसे की सूर्य मंगळ शनी राहू हे पापग्रह समजलेले आहेत.

चंद्र गुरु हे शुभ ग्रह समजले गेलेले आहेत हे ग्रह जर या पाप कर्तरी ग्रहांमध्ये पडले असता त्यासंबंधी अशुभ फळे मिळताना दिसतात.

जन्मपत्रिकेमध्ये लग्न स्थान आणि व्ययस्थान यामध्ये पापकर्तरी योग असेल, तर आरोग्याच्या संबंधित त्रास जातकाला मिळताना दिसतो. याशिवाय आयुष्यामध्ये येणारी प्रसिद्धी कमी मिळताना दिसते.

जर लग्न स्थानी आणि धन भावामध्ये पाप कर्तरी योग असेल, तर धनसंग्रह कमी होताना दिसतो. अशी व्यक्ती धनसंग्रह करण्यात कमी पडते

असा हा पाप कर्तरी योग फक्त भावाशी संबंधित प्रभावित फळे देतो असे नाही, तर ग्रहांशी संबंधित फळांची कमतरता देखील देताना दिसतो.

उदाहरणार्थ जन्मपत्रिकेमध्ये धन समृद्धी आणि विवाह यांचा कार्यक्रम शुक्र दोन पाप ग्रहांच्या युतीमध्ये असेल, तर वैवाहिक जीवनाच्या दृष्टीने त्रास होताना दिसतो. याशिवाय आर्थिक परिस्थिती खराब होताना दिसते.

आईचा मनाचा कारक चंद्र दोन पाप ग्रहांच्या युतीमध्ये असेल, तर आईशी संबंध बिघडताना दिसतात किंवा मानसिक दोलायमान दिसून येते किंवा मातृ सुख कमी दिसून येते.

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

**लेख क्र. २२ : लोकमान्य टिळकांची कुंडली**

**लेखिका : डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)**

लोकमान्य टिळक हे महा राष्ट्राचे आराध्य प्रत्येकाच्या रुदयात स्थान निर्माण करणे युग पुरुष आहेत. लोकमान्य टिळकांचा जन्म 23 जुलै 1856 रोजी रत्नागिरी जिल्हा येथील चिखल दरा येथे झाला.लोकमान्य टिळक यांचे पीता हे रत्नागिरीतील शाळेत शिक्षक होते.लोकमान्य टिळक यांनी ए ल ए ल बी ची पदवी घेतली होती आता आपण ह्या असामान्य व्यक्तीची पत्रिका पाहून त्याचे विश्लेषण करूया

लोकमान्य टिळक हे देश प्रेमाने ओत प्रोट भरून गेले होते त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून देश सेवेचे धडे नवीन पिढीला दिले.केसरी व मराठा ह्या वृत्त पत्रातून लोकांना देश सेवा व धर्म शिक्षण देऊन जन जागृती करण्याचे महान कार्य केले ते जहाल मतवादी होते . त्यांचे विचार हे बेधडक कृती करून समाजाला योग्य पद्धतीने मार्गदर्शन करून एक चळवळ निर्माण केली

लोकमान्य टिळकांचा पत्रिकेत चतुर्थात मंगल आहे. तुळेचा त्या मुळे बेधडक निर्णय घेऊन सामान्य पर्यंत योग्य पद्धतीने चळवळ पोहोचविणे साठी शिव जयंती व गणेश चतुर्थी सारखे धार्मिक उत्सव लोकांनी एकत्र येऊन देश सेवेचे धडे देण्यासाठी समनी जनतेला संगठित करून इंग्रजांचे राज्य उलथून टाकण्यासाठी अमूल्य कार्य केले.

है मंगळाची आपण आता दृष्टी पाहूया. मंगळाला तीन दृष्टी असतात त्या प्रमाणे मंगळाची प्रथम दृष्टी ही सप्तम स्थानावर पडत आहे जे प्रतिस्प्रध्याचे स्थान आहे कारण मंगळ चतुर्थात आहे सप्तमात मकर रास असून मकेरेत उच्चीच मंगळ होतो ह्या नियम प्रमाणे मंगळाची दृष्ठ्य सुद्धा उच्चाच येते . त्यामुळे इंग्रज हे जर आपण प्रतिस्पर्धी म्हणून समजुया तर टिळकांच्या चतुर्थातील मंगळ नी इंग्रजांना सलो की पळो करून सोडले.

टिळकांच्या लग्न स्थानी कारक राशीत रवी शुक्र युती ही सुद्धा उत्तम धडाडी दर्शविते रवी ल आवडते स्थान हे प्रथम स्थान रविसारखा राजा ग्रह लग्नी विराजमान झाल्यामुळे उत्तम नेतृत्व व संघ स्थापन करणे टिळकांना सहज शक्य झाले.टिळकांच्या oatriketvyasthani बुध ग्रह मिथूनेचा शनी सोबत आहे. मिथुन राशीतील बुध हा एक उच्छीचा ग्रह लेखन सामर्थ्य वाणी ओजस्वी परंतु शनी सोबत असल्या मुले स्पष्ट विखारी वजहाल विचार त्यांच्या वाणीतून व लेखणीतून जनमानस पर्यंत वृत्तपत्राच्या माध्यमातून पोहोचले. इंग्रजांविरुद्ध प्रचंड लेखन लोकमान्यांनी केले. जन जागृती व चळवळ पोहोचविणे हे त्या सुलभ झाले घरा घरात त्यांचे वृत्त पात्र लोक वाचायचे चर्चा करायचे समण्य लोकं पर्यंत इंग्रजांच्या जुलमी rajvaticha पाढाच लोकांचा पाठ झाला आणि लोक त्यांच्या पेपरची चक्का वात पाहायचे.स्वराज्य हा माझा जन्म सिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंह गर्जना करणारे आपके लाडके लोकमान्य टिळक ह्यांचा जन्म दिवस म्हणजे जसे शिव जयंती राम नवमी आपण करतो ना तशी घरा घरात आपण साजरी करण्याची गरज आहे.

लोकमान्य टिळकांना आया धर्माचा व उपनिषद वेड ह्याचा अभिमान होता साने गुरुजी हे सुद्धा टिळकांचे अनुकरण करून त्यांनी देश सेवेला समर्पित झाले आपणास चाफेकर बंधू माहिती आहेत ना ते सुध्धा क्रांतिकारक होते लोकमान्यांना अगणित क्रांतिकारकांची फौज निर्माण केली घरा घरात समन्य स्त्रिया सुद्धा आपल्या पाल्याला टिळकांच्या शाळेत दाखल करीत असत. इंग्रजां विरुद्धच्या लढ्यात सामान्य जनतेचा पाठिंबा लोकमान्यांना अगणित होता त्यामुळेच इंग्रजांचे धाबे दणाणले होते.आवतुअली त्यांचा स्पष्ट वक्ते पना मुळेच स्वातंत्र्याची दिशा लोकांना मिळाली होती. त्यांनी. लॉ

केले होते तरीही त्यांनी त्या पदवीचा त्याग करून लोकांना स्वातंत्र्याचे धडे देण्याचे अनमोल करू केले. लोकमान्य टिळकांच्या पत्रिकेत शनी बुध युती बंधन योग दर्शविते आहे .

टिळकांच्या भाग्य स्थानात मीन राशीतील चंद्र गुरू व राहू ह्यांची युती आहे. पत्रिकेतील स्थानांचा नियम प्रमाणे भाग्य स्थान हे केंद्र कोण स्थान आहे. आणि राहू सारखा ग्रा गुरू व चंद्र सोबत आहे येथे चंद्र गुरू उती गाज केसरी योग कारण गुरू स्वराशित आहे.

हंस योग हा स्वराशितील भाग्य स्थानात गुरू मुळे होतो गुरू हा ज्ञानाचा कारक ग्रह आहे त्यामुळे लेखन व भाषण करून लोकमान्यांनी शरम शिखन स्वातंत्र्याची क्रांती होतो जनमानसात  अखंड तेवत ठेवली.

इंग्रजांचे डोके ठिकाणावर आहे काय?असे खुले आम वृत्त पत्रातून विचारणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या दशमश्यानी मेष रास असून चतुर्थातील मंगळाची सप्तम दृष्टी आली आहे. दशम स्थान हे कर्म स्थान असून तेथे मेष आल्या मुळे व मंगळाचा दृष्टी संबंध आल्या मुळे. सहकाऱ्यांना सुद्धा ते सडेतोड बोलत असत तसेच कार्य खेत्रा लेखन संपादन जरी निवडले होते तरी इंग्रज सत्ता उलथून पाडणे हाच मुख्य हेतू होता आणि मेषेचा  म्हणजे दशमेश मंग चतुर्थात  त्याने हे कार्य केले.भाग्य स्थान हे दशामाचे व्यय स्थान असून राहू गुरू चंद्र ॲक्कुत युती म्हणजेच आपण म्हणू शकतो की चांडाळ योगाची सुद्धा येथे निर्मिती झाली आहे

लाभात हर्षल आल्या मुळे बेधडक कृती करीत असतं. व्यायातील बंधन योग मुळे मांडले तुरुंगात टिळकांना काळया पाण्याची शिक्षा झाली आणि त्या वेळी सुद्धा गीता रहस्य हा अमूल्य ग्रंथ टिळकांनी लिहिला अशाह्या महान टिळकांना मी नत मस्तक होऊन माझे लेख. थांबवितो. जय महाराष्ट्र जय भारत जय ज्योतिष जयतू जयतू हिंदुराष्ट्र. आणि लोकमान्य टिळकांची दिव्य ज्योत घरा घरात अशीच तेवत राहूदे.

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२१२५२५५६)

## लेख क्र. २३ : अनुभविक ग्रह तोडगे

## लेखिका : डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२११२५२५५६)

काळा रंगावर राहूचा प्रभाव असतो शक्यतो काय रंगाचे कपडे घालू नका. काळा रंग वर्ज करण्याचा प्रयत्न करा. हल्ली मुला मुलींमध्ये ब्लॅक ब्युटी म्हणून फॅशन आली आहे काळे कपडे घालण्याची. पण हा काळा रंग म्हणजे राहू चा प्रभाव वाढतो. फसवण, चक्के पंजे करण, हे सर्व राहू चे लक्षण आहेत हे आपोआपच त्या मुलांमध्ये यायला लागतात. तसेच आपण जे मोबाईल वापरतो किंवा कम्प्युटर वापरतो, तो सुद्धा एक प्रकारे राहूच आहे. त्यामुळे लहान मुलांना खेळायला तुम्ही मोबाईल देऊ नका. त्याऐवजी त्यांना चांगली गाणी ऐकवा. चांगल्या गोष्टी सांगा.

लाल रंग परिधान केल्याने थोडे तमो गुण वाढतात. कारण लाल रंगावर मंगळाचा प्रभाव आहे. लाल रंग कपडे घालून एखादी स्त्री किंवा एखादा पुरुष सभागृहात गेला की, तो एखादा योध्या प्रमाणे बोलतो. त्यामुळे शांतता येण्यासाठी लाल रंगाचा सुद्धा वापर थोडा कमी करा. कारण लाल रंगामुळे अग्रेसिवपणा अधिक येतो, तमोगुण तसेच वाढतात.

पांढरा रंग हा शांततेचे प्रतीक आहे. त्यामुळे तुम्ही कितीही फॅशनेबल रहा, चांगले कपडे घाला. पण एक सफेद रुमाल तरी जवळ बाळगा, त्यामुळे तुमच्या मनाला थोडी तरी शांतता लागेल.

निळा रंग हा वायु तत्वाच्या शनी ग्रहाचा आहे. या रंगाचे कपडे घातल्याने जातक शांतता पूर्वक निर्णय घेतो. चुकीचे निर्णय त्याच्याकडून घेतले जात नाहीत, तसेच त्याचे मन नेहमी शांत असते.

हिरवा रंग हा बुधाचे प्रतीक आहे. हिरव्या रंगाचे कपडे घातल्याने जातक युवराज किंवा युवराजनी सारखे चिरतरुणी दिसते. परंतु प्रसंगाचे गांभीर्य या हिरव्या रंगाला कळत नाही आणि त्यांच्याकडून बालिश चुका होतात.

पिवळया रंगावर गुरुचा प्रभाव आहे. गुरु म्हणजे विचारे शांत आणि योग्य निर्णय घेणारा तो गुरु ग्रह. त्यामुळे तुम्ही कुठे इंटरव्यू ला जाणार असाल, तर महत्त्वाच्या कामाला जाणार असाल, तर नक्की पिवळया रंगाचा रुमाल स्वतः जवळ ठेवा बघा. तुमचा गुरु चांगला होईल आणि तुमचे काम नक्की होईल.

भगवा रंग किंवा केशरी रंगावर सूर्याचे प्रभुत्व आहे. त्यामुळे नक्की रविवारी तुम्ही ऑरेंज कलर चे कपडे परिधान करा. तुमचा रवी नक्की तुम्हाला साथ देईल तुम्ही हा वाराप्रमाणे जर असे कपडे घातलेत ना, तर त्या दिवशी त्या त्या ग्रहाचा होरा असतो आणि त्यामुळे नक्की तो ग्रह तुम्हाला साथ देईल.

हे मी उस्फूर्तपणे लिहीत आहे. कोणत्याही पुस्तकातले वगैरे नाही माझ्या अंतर्मनातून जे मला सुचत आहे ते मी लिहीत आहे.

तुम्ही नीटनेटके राहिलात व्यवस्थित राहिलात, चांगले कपडे घातलेत, तर तुमचा शुक्र हा नेहमी चांगलाच राहील आणि तुमच्याकडे लक्ष्मी स्थिर राहील तेच जर तुम्ही अजगlaसारखे राहिलात, तर तुमचा शुक्र बिघडेल आणि राहू आहे तो प्रभावित होईल. जुने मळलेले कपडे घातलेत, तर शनीचा प्रभाव वाढेल. त्यामुळे तुम्ही नेहमी व्यवस्थित रहा पण तुमच्यातील पापग्रहांचा प्रभाव कमी होऊन शुभ ग्रहांचा प्रभाव वाढेल

डॉ. सौ. समीक्षा दारवलिकर (९८२११२५२५५६)

## लेख क्र. २४ : दशग्रंथ कोणते? आणि दशग्रंथी ब्राह्मण म्हणजे काय?

**संकलक : श्री. सुहास समुद्र (८७७९३८७३७५)**

दशग्रंथी ब्राह्मण हे मुख्यत्वेकरून ऋग्वेद आणि इतर तीन वेदांच्या विविध अंगे आणि पाठ प्रकारांशी जोडले गेले आहेत आणि जे वेदांच्या सर्व अंगात पारंगत असत त्याना ही अतिशय मानाची पदवी पूर्वी काशीला अथवा पैठणला जाऊन अभ्यास करून आणि परीक्षा देऊन मिळत असे. आता ते दशग्रंथ आणि दशांगे कुठली ती बघू या.

रावण हा दशग्रंथी होता म्हणजे त्याला काय काय ज्ञात होते ते समजून घ्या.

१. ऋग्वेदसंहिता : त्यामध्ये ऋग्वेदसंहिता मंडल १ ते १० ज्यामध्ये ९८५३ ऋचा येतात, ही सगळी संहिता मुखोद्गत असावी लागते.

२. ब्राह्मणसंहिता : प्रत्येक वेदाबरोबर 'ब्राह्मण' संहिता असतात, ब्राह्मण संहिता ह्या त्या त्या वेदाबद्दल भाष्य करते आणि यज्ञ करताना काय काळजी घ्यावयाची ही माहिती देते. हे पुस्तकाचे नाव आहे आणि ज्याचा ब्राह्मण जातीशी काहीही संबंध नाही. ऋग्वेदाबरोबर दोन ब्राह्मण संहिता आहेत "ऐतेरीय " (५० अध्याय) आणि 'सांख्यायन' (४० अध्याय) ब्राह्मण संहिता. यापैकी ऐतेरीय ब्राह्मणसंहिता ही सोमरस, त्याची आहुती आणि उपयोग ही माहिती देते.

३. आरण्यक : प्रत्येक ब्राह्मणाबरोबर आरण्यक (अरण्यात जाउन गाण्याचे) पुस्तक असते. ऋग्वेदाबरोबर जे आरण्यक आहे त्याचे नाव एतेरीयारण्यक आहे. त्यात अरण्यात जाऊन करण्याची काही 'महाव्रते' दिली आहेत. यातच एतेरीय उपनिषद आहे जे काही तत्त्वज्ञान चर्चेत आणते. दुसरे ऋग्वेदी आरण्यक आहे. कौशितकी आरण्यक. यातील १५ अध्यायात कौशितकी उपनिषद आहे, तसेच काही थोडे तत्त्वज्ञान, अग्निहोत्र अशी माहिती आहे.

४. शिक्षा : वेदाबरोबर सहा वेदांगे आहेत त्यापैकी एक शिक्षा आहे. वेदांत उच्चार आणि उच्चारशास्त्र फार महत्वाचे आहे .कारण मंत्रांची शक्ती ही त्यांच्या योग्य उच्चारावर अवलंबून असते हा समज होता. प्रत्येक वेदाला अनुसरून त्याच्या उच्चाराचे पुस्तक मौखिक स्वरुपात आहे त्याला शिक्षा असे म्हणतात. त्यापैकी दशग्रंथी ब्राह्मणाला शिक्षेची ऋग्वेद शाखा ज्याचे नाव 'ऋग्वेद प्रतीशाख्य' आहे हे पाठ असावे लागते.

५. कल्प : हे सुध्दा ६ वेदांगापैकी एक आहे. यज्ञामध्ये आहुती आणि बळी देण्याची जी पध्दत होती त्यामुळे त्यासाठी अनुरूप ऋचा यात दिल्या आहेत.

कल्पसुत्रे ही दोन प्रकारची आहेत.

एक वेदासाठी: ज्याला श्रुतीसुत्रे म्हणतात.

दुसरी स्मृतीवर आधारलेल्या समारंभासाठी : ज्यांना स्मार्तसूत्रे म्हणतात.

स्मार्तसूत्रात पुन्हा दोन उप प्रकार आहेत.

एक गृह्यसुत्रे : ज्यात घरगुती समारंभ जसे जन्म, नामकरण, लाग इ.वेळेस लागणारे मंत्र.

दोन धर्मसूत्रे ; ज्यात सामाजिक व्यवहार, वाळीत टाकणे, सामाजिक जबाबदाऱ्या इ. गोष्टींची सूत्रे आहेत.

प्राचीन भारतातील बहुतेक कायदे या सूत्रातून आले. या शिवाय यजुर्वेदात यज्ञाचा मंडप, वेदी इ. गोष्टींच्या बांधकामाचे गणिती नियम आणि सूत्रे आहते ज्याचे नाव शुल्ब सूत्रे आहे. दशग्रंथी ब्राह्मणाला ऋग्वेदाशी सलग्न अशी श्रुतसूत्रे पाठ करणे अनिवार्य असे, जसे आश्वलायन आणि सांख्यायानाची सूत्रे.

६. व्याकरण : ऋग्वेद हा मौखिक असल्याने त्याचे उच्चार , ऱ्हस्व-दीर्घ, शब्द कसे झाले. त्याचा व्याकरण दृष्ट्या विचार इ. शास्त्राला व्याकरण म्हणतात. यात रूढीला फार महत्व आहे. दुर्दैवाने ऋग्वेदकालचे बहुतेक सर्व ग्रंथ नष्ट झाले आहेत. ऋग्वेदाचे व्याकरण (ज्याला पदपथ अर्थात पायवाट हा मोठा गोड शब्द आहे) ते आहे, साकल्यमुनींचे ऋग्वेद पदपथ. याशिवाय संपूर्ण पाणिनी पाठ असणे जरुरी होते.

७. निघंटु : हा जगातला कदाचित पहिला शब्दकोश (Dictionary and thesaurus) आहे. ज्यामध्ये शब्दाचे अर्थ जे रूढ कार्य, धर्मासाठी लागतात ते विस्ताराने दिले आहेत याचे ५ भाग आहेत. अर्थात याला शब्दकोश म्हणणे तितकेसे योग्य होणार नाही शब्दाच्या अर्थाबरोबर त्याची रूपे, धातू, संधी इ. सर्व दिले आहे. उदाहरण द्यावयाचे तर उदक या शब्दाची १०० रूपे दिली आहेत. अर्थात हे सगळे मौखिक असल्याने पुन्हा पदरुपात आहे. चौथ्या भागात एका शब्दाला समानार्थी शब्द दिले आहेत . या पुस्तकातील पद संख्या १७७० आहे.

८. निरुक्त : अर्थ: व्याख्या, व्युत्पत्तिसंबंधी व्याख्या, शब्दांची व्युत्पत्ती (Etomology) हे एक नवीन शास्त्र आपल्या लोकांनी तयार केले होते. निरुक्त पाच प्रकारचे असते.

एक : वर्णागम (अक्षर वाढविणे)

दोन : वर्णविपर्यय (शब्दातील अक्षरे मागेपुढे करणे)

तीन : वर्णाधिकार (अक्षरे बदलणे).

चार : नाश (अक्षर गाळणे)

पाच : धातुच्या अनेक अर्थापैकी एक अर्थ सिद्ध करणे.

निरुक्तावर यास्क या मुनीनी फार काम केले आणि त्यामुळे त्याना निरुक्तकार म्हणतात. यास्कांच्या पुस्तकात अर्थ काढण्यासाठी छोटी छोटी सूत्रे पद रुपात दिली आहेत, कारण हे सगळे मौखिक असल्याने लक्षात ठेवणे पदरुपात सोपे जाते. याशिवाय कठीण शब्दांचे अर्थ आणि वैदिक शब्दांचे अर्थ संदर्भासहित दिले आहेत.

९. छन्द : आपले हे सगळे ज्ञान हे पदरुपात मौखिक मोठ्याने घोकायचे असल्याने ज्ञान संपन्न ब्राह्मणाला कवितेचे नीरनिराळे प्रकार, ते ओळखणे, तालासुरात म्हणणे आणि तशी पदे रचणे हे सगळे माहित असणे आवश्यक आहे .एकट्या ऋग्वेदात जगती, त्रिष्टुभ, गायत्री, विराज आणि अनुष्टुभ हे छन्द आहेत. त्यामुळे हे सगळे शास्त्र हे छन्द या नावाखाली येते. छन्दामध्ये अक्षरसंख्या, मात्रा, गती, यति (Pause) ह्या कसौट्या असतात आणि त्यामुळे हे खूप कठीण शास्त्र आहे. ऋग्वेदात याची चर्चा आहे. दशग्रंथी ब्राह्मण हे पदे रचण्यात वाकबगार असत.

१०. ज्योतिषशास्त्र : हेही वेदान्गापैकी एक आहे आणि याला शास्त्र हे त्याच्या खालील उपविभागामुळे म्हणतात पण आपल्याकडे अज्ञ धार्मिक फक्त फलज्योतिष हेच ज्योतिष समजतात.

ज्योतिषशास्त्रचे प्रकार आहेत,

अ. खगोलशास्त्र (Astronomy)

ब. सिद्धान्तज्योतिष अथवा गणित ज्योतिष (Theoretical Astronomy) कधी ग्रहण होईल हे ठरविणे.

क. फलितज्योतिष (Astrology)

ड. अंकज्योतिष (Numerology)

आता आपल्या सगळयांच्या लक्षात आले असेल की, दशग्रंथी ब्राम्हण होणे हे का महाकठीण काम आहे, कारण हे सगळे समजून घेणे आवश्यक होते. त्याशिवाय ही सगळी अफाट पदसंख्या पाठ करणे आणि धर्मपीठापुढे त्याची परीक्षा देणे आवश्यक असे. इतके काही करून हे सगळे ज्ञान मौखिक स्वरूपात आपल्या पूर्वजांनी जतन केले म्हणजे ते काय तैलबुद्धीचे असतील याचा विचार तर करा.

श्री. सुहास समुद्र (८७७९३८७३७५)

**लेख क्र. २५ : विष्णुसहस्त्रनामा मधील श्लोक आणि आपल्या जन्मनक्षत्र चरण यांचा संबंध**

**मराठी अनुवाद : श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)**

खरंतर ही पोस्ट मी इंग्रजी भाषेमध्ये वाचली होती त्यात त्यांनी एक ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यास सांगितले होते म्हणजे आपणास आपल्या जन्म नक्षत्र चरणा नुसार विष्णू सहस्त्रनाम मधील कोणती ऋचा किंवा श्लोक आपल्यासाठी आहे हे कळेल परंतु ती सर्वांना समजण्यासाठी सोयीची व्हावी या इच्छेने मी ही मराठीमध्ये भाषांतरित केली आहे.

विष्णुसहस्त्रनामाची महती अनेक संत महंत यांनी गायलेली आहे नित्यपठनामध्ये विष्णुसहस्त्रनाम असावे असा सर्वांनी आग्रह धरलेला आहे परंतु काही जणांना ते शक्य होत नाही अशावेळी त्यांनी कमीत कमी त्यांच्या जन्मनक्षत्राशी संबंधित ऋचा तरी अकरा वेळेस म्हणावी

असे सांगितले जाते.

विष्णुसहस्त्रनामा मध्ये एकूण 108 श्लोक आहेत व त्यामध्ये विष्णूची 1000 नावे आहेत

आपल्या ज्योतिष शास्त्रा प्रमाणे एकूण 27 नक्षत्र आहेत व प्रत्येक नक्षत्राचे चार भाग केले आहेत त्या प्रत्येक भागा ला चरण असे संबोधले जाते.

13 डिग्री 20 मिनिट ही एका नक्षत्राची व्याप्ती असते आता या 13 अंश 20 मिनिटाचे जर आपण समान असे चार भाग केले तर पहिला भाग 3 डिग्री 20 मिनिट दुसरा भाग 3 डिग्री वीस मिनिट ते सहा डिग्री 40 मिनिट तिसरा भाग आहे सहा डिग्री 40 मिनिट ते दहा डिग्रीपर्यंत आणि चौथा भाग आहे दहा डिग्री ते तेरा डिग्री 20 मिनिट पर्यंत.

समजा एखाद्याचा जन्म अनुराधा नक्षत्राच्या 7 डिग्री 50 मिनिट वर झाला असेल तर याचा अर्थ त्याचा जन्म अनुराधा नक्षत्राच्या तृतीय किंवा तिसऱ्या चरणावरती झालेला आहे. (वृश्चिक रास)

कारण 7 अंश 50 मिनिट हे अनुराधा 6 40 ते 10 या तिसऱ्या प्रभागा मध्ये येतात

27 नक्षत्र गुणिले चार चरण म्हणजे 108 चरण. या हिशोबाने आपल्या आयुष्यामध्ये उत्तम बदल व्हावेत आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी आपल्या उपासनेसाठी आपण विष्णुसहस्त्रनामा मधील आपल्या नक्षत्राच्या चरणाच्या क्रमांकाप्रमाणे आपल्याला कुठली ऋचा किंवा कुठला श्लोक येतो त्याचा जर आपण दिवसभरातून 11 वेळेस पाठ केला किंवा अकरा वेळेस तो श्लोक म्हणला तर साधारणतः सहा महिन्यांमध्ये आपल्याला आपल्या इच्छित फळाची प्राप्ती होण्यासाठी मदत होईल.

दोन प्रकाराने हे आपल्याला पाहता येईल .

एक तर सर्वप्रथम अश्विनी हे राशीचक्र मधील पहिले नक्षत्र. अश्विनी नक्षत्रामध्ये चार चरण येतात,

यानंतर भरणी नक्षत्र भरणी नक्षत्रामध्ये चार चरण येतात आणि कृतिका नक्षत्र याचे एक चरण अशी मिळून मेष राशी बनते म्हणजे एका राशीमध्ये एकूण नऊ चरण असतात. याप्रमाणे बारा राशी मिळून बारा गुणिले नऊ असे 108 आपल्याला एकूण चरण मिळतात.

एक तर राशी प्रकारात आपल्या राशीचा कितवा नंबर आहे ते पहा आणि आपल्या नक्षत्राचे कितवे चरण आहे ते माहिती असल्यास 1 ते 12 राशी नावे व त्या मध्ये आपले नक्षत्र चरणाप्रमाने कोणत्या राशीत येत आहे ते पहावे आणि त्याचे समोर मी त्या नक्षत्र चरणासाठी कोणता श्लोक म्हणावा हे दिले आहे

श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र मधील ओम विश्वं विश्नुर्व षटकारो हा पहिला श्लोक तर रथांगपाणि रक्षोभ्य सर्व प्रहरणायुध: हा १०८ वा श्लोक आहे. यात विष्णू ची १००० नावं आहेत. आपल्याला या प्रमाणे आपल्या नक्षत्र चरणा प्रमाणे कोणता श्लोक म्हणावयाचा आहे पहावे.

1 नंबर मेष राशी

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक १ ते ९

अश्विनी 4 चरण श्लोक क्रमांक १ ते ४

भरणी 4 चरण श्लोक क्रमांक ५ ते ८

आणि कृत्तीकेचे प्रथम चरण श्लोक क्रमांक ९

2 नंबर वृषभ राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक १० ते १८

कृत्तिकेचे 2, 3, 4 चरण श्लोक क्रमांक १० , ११,१२

रोहिणी चार चरण श्लोक क्रमांक १३ ते १६

मृग 1, 2 चरण श्लोक क्रमांक १७ ते १८

3 नंबर मिथुन राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक १९ ते २७

मृग 3 व 4 हे दोन चरण श्लोक क्रमांक १९ ते २०

आर्द्रा चार श्लोक क्रमांक २१ ते २४

पुनर्वसू 1,2,3 चरण श्लोक क्रमांक २५ ते २७

4 नंबर कर्क राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक २८ ते ३६

पुनर्वसू चतूर्थ चरण श्लोक क्रमांक २८

पुष्य चार श्लोक क्रमांक २९ ते ३२

आश्लेषा चार चरण श्लोक क्रमांक ३३ ते ३६

5 नंबर सिंह राशी

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ३७ ते ४५

मघा चार चरण श्लोक क्रमांक ३७ ते ४०

पूर्व फालगुनी चार चरण श्लोक क्रमांक ४१ ते ४४

आणि उत्तरा फाल्गुनी प्रथम चरण श्लोक क्रमांक ४५

6 नंबर कन्या राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ४६ ते ५४

उत्तरा फाल्गुनी 2, 3 आणि चौथे चरण श्लोक क्रमांक ४६ ते ४८

हस्त 4 चरण श्लोक क्रमांक ४९ ते ५२

चित्रा 1,2 चरण श्लोक क्रमांक ५३ ते ५४

7 नंबर तुळ राशी

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ५५ ते ६३

चित्रा 3 व 4 चरण श्लोक क्रमांक ५५ ते ५६

स्वाती चार चरण श्लोक क्रमांक ५७ ते ६०

विशाखा 1,2,3 चरण श्लोक क्रमांक ६१ ते ६३

8 नंबर वृश्चिक राशी

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ६४ ते ७२

विशाखा चौथे चरण श्लोक क्रमांक ६४

अनुराधा चार श्लोक क्रमांक ६५ ते ६८

ज्येष्ठा चार चरण श्लोक क्रमांक ६९ ते  ७२

9 नंबर धनु राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ७३ ते  ८१

मूळ नक्षत्र चार चरण श्लोक क्रमांक ७३ ते ७६

पूर्व शाढा चार चरण श्लोक क्रमांक ७७ ते ८०

आणि उत्तरा शाढा प्रथम चरण श्लोक क्रमांक ८१

10 नंबर मकर राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ८२ ते ९०

उत्तरा शाढा 2,3,4 चरण श्लोक क्रमांक ८२ ते ८४

श्रवण नक्षत्र चार चरण श्लोक क्रमांक ८५ ते ८८

धनिष्ठा नक्षत्र प्रथम व द्वितीय चरण श्लोक क्रमांक ८९ ते ९०

11 नंबर कुंभ राशी

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक ९१ ते ९९

धनिष्ठा नक्षत्र तीन व चार चरण श्लोक क्रमांक ९१ ते ९२

शततारका नक्षत्र 4 चरण श्लोक क्रमांक ९३ ते ९६

पूर्वा भाद्रपदा  प्रथम चरण द्वितीय व तृतीय चरण श्लोक क्रमांक ९७ ते ९९

12 नंबर मीन राशि

विष्णू सहस्त्रनाम श्लोक क्रमांक १०० ते १०८

पूर्वा भाद्रपदा चरण क्रमांक चार श्लोक क्रमांक १००

उत्तरा भाद्रपदा एक दोन तीन चार श्लोक क्रमांक १०१ ते १०४

आणि रेवती एक दोन तीन चार श्लोक क्रमांक १०५ ते १०८

विष्णुसहस्त्रनामा मधील पहिली ऋचा किंवा पहिला श्लोक हा अश्विनी नक्षत्राच्या पहिल्या चरणासाठी आहे. दुसऱ्या चरणासाठी दुसरा श्लोक तिसऱ्या चरणासाठी तिसरा आणि चौथ्यासाठी चौथा याप्रमाणे आपण कोणत्या राशीमध्ये कोणत्या नक्षत्रामध्ये व त्या नक्षत्राच्या कोणत्या चरणामध्ये आपला जन्म झालेला आहे हे पहावे आणि अश्विनीपासून म्हणजे पहिल्या नक्षत्रापासून आपल्या नक्षत्राचे चरण क्रमांक किती येत आहे ते मोजावे किंवा तो नंबर पहावा तो नंबर जर समजा 21 असेल म्हणजे अश्विनी चे चार चरण, भरणीचे चार चरण कृत्तिकेचे चार चरण, रोहिणीचे चार चरण मृगाचे चार चरण. इथे एकूण चार चरण गुणिले पाच नक्षत्र बरोबर 20 अंक झाले आहेत यानंतर आर्द्रा नक्षत्र येते. आर्द्रा नक्षत्रा मधील प्रथमचरण म्हणजे 21 क्रमांक येतो. राशी प्रमाणे मिथुन रास येते आपण जर विष्णुसहस्त्रनाम बघितले तर त्यामधील 21 सावा श्लोक

मरीचिर्दमनो हंस: सूपरणो भुजगोत्तमा:। हिरण्यनाभ सुतपा: पद्मनाभं प्रजापति:॥

हा श्लोक किंवा ही ऋचा आर्द्रा नक्षत्र प्रथम चरण या साठी हा श्लोक म्हणावा

वरती दिलेल्या माहितीप्रमाणे आपण आपल्या राशी प्रमाणे नक्षत्राचा अश्विनी नक्षत्र प्रथम चरणापासून

आपल्या नक्षत्राचा चरण क्रमांक किती येतो ते पहावे आणि त्या नंबरची विष्णुसहस्त्रनामा मधली ऋचा किंवा तो श्लोक नित्य पठणांमध्ये ठेवावा.

(संपूर्ण विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र हवे असल्यास प्रस्तुत लेखकास संपर्क करावा.)

राम कृष्ण हरी !!

श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)

## लेख क्र. २६ : इझी मनी अर्थात कमी श्रमामध्ये मिळणारा पैसा व कुंडलिमधील ग्रह योग

**लेखक : श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)**

नमस्कार,

जुन्या काळामध्ये ज्याला जुगार सट्टा लावणे वगैरे असे शब्द प्रयोग करून कमी श्रमामध्ये कसा पैसा मिळवावा या बाबत चर्चा होई त्या साठी आपल्या कुंडलीत काय योग असावे लागतात त्याबद्दल आपण आज इथे चर्चा करणार आहोत.

व्यक्ती कितीही श्रीमंत झाली तरी देखील त्याला सहज मिळणाऱ्या पैशाचा मोह सुटत नाही.

सध्या शेअर मार्केट किंवा तत्सम ठिकाणी पैसे लावून दहा हजार लावल्यानंतर त्याचे पन्नास हजार कसे होतील कधी होतील याबाबत सगळे विचारणा करतात.

यात कुणाला यश मिळेल कोणाला नाही याबाबत आज आपण जरा ग्रह योगातून समजून घेऊ यात.

यामध्ये आपण गुप्तधन अकल्पितद्रव्य, लाच लुचपतीने मिळालेले द्रव्य, स्त्री धन, वारसा याबाबत आज विचार करूया

वारसा हक्काने मिळणारे धन

म्हणजे कुटुंब प्रमुखाचे निधन झाल्यानंतर त्याने साठवून किंवा जमा करून ठेवलेली संपत्ती अचानकपणे त्याचे वारसदार मुले किंवा मुली यांच्या नावावर केल्या जाते अशा धनाला आपण वारसा हक्काने मिळणारी संपत्ती असे म्हणतो

यामध्ये तुमचे कर्तुत्व काहीच नाही तुम्ही फक्त त्या मोठ्या माणसाची मुलं आहात आणि निसर्ग नियमाप्रमाणे त्या व्यक्तीचे निधन झाल्यामुळे तुमच्याकडे त्याची सर्व प्रॉपर्टी येत आहे किंवा तुम्हाला मिळत आहे.तर हे केव्हा होईल कुंडली प्रमाणे काय योग असताना हे होते हे आपण आधी समजून घेऊ या.

एरवी अत्यंत अशुभ असे समजले जाणारे कुंडली मधील एकमेव स्थान आणि ते म्हणजे मृत्यूचे स्थान अष्टमस्थान, परंतु या स्थानाचा संबंध मात्र वारसा हक्काने आपल्याला पैसे मिळवून देण्याबाबत होतो, जन्म कुंडली मधील अष्टमस्थान हे व्यक्तीला वारसा हक्काने धन मिळेल की नाही याबाबत निर्देश करते. गुरु चंद्र आणि शुक्र हे तीन ग्रह गुप्तधन देणारे ग्रह आहेत जन्म कुंडली मध्ये अष्टमस्थानामध्ये गुरु चंद्र आणि शुक्र हे ग्रह जर असतील तर अशा मनुष्यास कमी श्रमाने पुष्कळ पैसा मिळतो एखाद्या नातेवाईकांच्या मृत्यूपासून किंवा मृत्युपत्राद्वारे किंवा सासऱ्याकडून पैसा मिळणे हे सगळे योग आपल्या कुंडली मधील अष्टमस्थानी असणारे गुरु चंद्र आणि शुक्र हे गुप्तधन देणारे ग्रह असताना आणि जन्म कुंडली मध्ये याच ग्रहांच्या महादशा आल्या असत्या अशी घटना घडून येते.

स्त्रीधन याचा अर्थ आपल्या पत्नीकडून आपल्याला धन मिळणे यामध्ये गुरु चंद्र आणि शुक्र हे तीन ग्रह अष्टमस्थानी असतील अथवा एखाद्याच्या कुंडली मधील सप्तमेश अष्टमस्थानी असेल किंवा अष्टमेश सप्तम स्थानी असेल किंवा सप्तमेश भाग्य स्थानी असेल तर त्या व्यक्तीला स्त्री धन मिळण्याची शक्यता असते.

जन्म कुंडली मधील सप्तम स्थान हे विवाह सौख्य दर्शवते या सप्तमस्थानी जी राशी असते त्या राशीचा अधिपती याला ज्योतिषाच्या भाषेमध्ये सप्तमेश असे म्हणतात हा ग्रह जर अष्टमस्थानामध्ये किंवा भाग्य स्थानांमध्ये असेल तर अशा वेळेस आपल्या धर्मपत्नीकडून तिच्या मृत्यूनंतर तिच्या नावावर असलेले धन तिच्या वडिलांकडून तुम्हाला मृत्युपत्राने प्राप्त होऊ शकते

आता अकल्पित धन म्हणजे काय?

कल्पित

म्हणजे आपल्याला कल्पना आहे आपण अमुक अमुक गुंतवणूक केलेल्या आहेत

त्याद्वारे आपल्याला एवढे तेवढे धन मिळणारे आहे हे माहिती असते परंतु अकल्पित म्हणजे आपण कधी विचार देखील केलेला नाही अशा वेळेस अचानक लॉटरी लागते अचानक कुणाच्यातरी नावाचा पैसा तुमच्या नावावरती होतो याला अकल्पित धन असे म्हणतात यासाठी देखील कुंडली मधील अष्टमस्थान आपल्याला पहावे लागते अष्टमीस्थानामध्ये गुरु आणि चंद्र या शुभ ग्रहांची युती किंवा शुक्र आणि चंद्र या दोन शुभ ग्रहांची होती असेल तर असा द्रव्य लाभ होण्याची शक्यता असतेच असा योग असून त्यावर कोणत्याही प्रकारच्या अशुभ ग्रहांची दृष्टी नसेल तर मात्र लॉटरीमध्ये मोठे बक्षीस मिळण्याचे संभाव असतो स्वग्रही चा किंवा उच्च राशीचा चंद्र आणि शुक्र हे दोन ग्रह अष्टमस्थाने लॉटरीच्या बाबतीत अतिशय अनुकूल असतात अकल्पित धन या दृष्टीने कुंडली मधील गुरु आणि चंद्र चंद्र आणि शुक्र यांचे अष्टमस्थानामधील युती अत्यंत महत्त्वाची

आता आपण पाहूया सट्टा जुगार किंवा शर्यती या बाबत चे योग

सध्याचे शेअर मार्केट आहे ते सट्टा प्रकारांमध्ये मोडते यामधून आपल्याला पैसे मिळतील की नाही याचा अंदाज आपल्या कुंडली मधील पंचम स्थानावरून व पंचमस्थानी जी रास आहे त्या राशीचा अधिपती म्हणजे पंचमेश कोण आहे व तो कोणत्या स्थानी आहे यावरून कळते

एरवी नेहमी ज्योतिष शास्त्रामध्ये संतती सौख्य विद्या कला यांचा विचार यासाठी फक्त पंचम स्थान पाहिले जाते परंतु आज आपण या पंचम स्थानावरून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे इझी मनी याबाबत विचार करणार आहोत.

माझ्या मित्राला शेअर मार्केट मधून इतके पैसे मिळत आहेत म्हणून मी देखील पैसे लावणार असा वेडेपणा करू नका अन्यथा आपण आपल्याकडे आहे नाही ती देखील संपत्ती गमावून बसाल.

आपल्या कुंडली मधील ग्रहयोग एखाद्या तज्ञ ज्योतिषाकडून पाहिल्याशिवाय असा उद्योग करू नका असा प्रामाणिक सल्ला मी तुम्हाला देऊ इच्छितो.

आपल्या कुंडली मधील पंचमेश

अर्थात पंचम स्थानाचा अधिपती हा पंचमेश पंचम स्थानामध्ये असेल हा पंचमेश नवस्थान अर्थात भाग्य स्थानी असेल हा पंचमेश एकादशस्थानी अर्थात लाभस्थानामध्ये असेल किंवा हा पंचमेश लग्नस्थानी अर्थात प्रथम स्थानामध्ये असेल" किंवा पंचमेश हा तृतीय स्थानी शुभद्रेष्टीमध्ये असेल तर अशा बाबतीत हा पैसा मिळण्याचा योग जास्त असतो त्यातल्या त्यात आपल्या कुंडली मधील पंचमेश रवी म्हणजे अर्थात पंचमस्थानी सिंह रास असेल आणि या सिंह राशीचे स्वामी स्वतः पंचमामध्ये सिंह राशीलाच असेल अशा वेळेस किंवा पंचमेश मंगळ असेल अर्थात पंचम स्थानामध्ये मेष किंवा वृश्चिक रास व त्याचा स्वामी मंगळ हा देखील पंचमातच आहे किंवा गुरु अर्थात पंचम स्थानांमध्ये धनु किंवा मीन रास असून त्या राशीचा स्वामी गुरु हा स्वतः धनु किंवा मीन राशीतच असेल तर अशा वेळेस या पंचमेशामुळे आपल्याला अशा प्रकारचे धन मिळण्यामध्ये यश मिळते

अशा प्रकारचे योग असताना ज्यावेळेस कुंडली मधील महादशा स्वामी हा पंचमस्थानाशी अष्टमस्थानाशी संबंधित असेल तर आपल्याला अशा प्रकारे धनप्राप्ती होण्याचे योग असतात.

गुप्तधन व अष्टमस्थान

कुंडली मधील अष्टमेशावरून वारसा व गुप्तधन इत्यादीचा विचार होतो आपल्या कुंडलीमध्ये अष्टमस्थानामध्ये कर्क रास आहे अर्थात आपली लग्न रास धनु आहे अशा वेळेस जर अष्टमेष चंद्र असून जर हा चंद्र अशुभ ग्रहांच्या युती प्रती किंवा

अशुभयोगामुळे बलिष्ठ नसेल तर वारसा किंवा लॉटरीमध्ये पैसा मिळण्याचा संभव येत नाही नोकरीत फार तर बक्षिसाच्या रूपाने थोडाफार पैसा मिळू शकेल

अष्टमस्थानामध्ये बुधाची रास अर्थात अष्टमेश बुध हा गुप्तधनाचा अनुकूल नाही स्त्री धन वगैरे देखील यामध्ये मिळत नाही अष्टमेश बुध असताना पैशासंबंधी नेहमी अडचणी येतात परंतु अष्टमेश बुध अष्टमस्थानी असल्यास मात्र प्राप्ती होऊ शकते.

अष्टमस्थानी शुक्राची रास अर्थात वृषभ किंवा तूळ असताना अशा व्यक्तीच्या कुंडली मधील अष्टमेश हा शुक्र असतो. असा शुक्र आयुष्यात केव्हातरी वारसा व द्रविला होण्याचा योग दर्शवतो स्त्रीचे नातेवाईकांकडून पैसा मिळेल तसेच मृत्युपत्राद्वारे अकल्पित धनलाभ देखील होऊ शकतो.अगदी एखादी इस्टेट्स देखील मिळू शकते लॉटरीमध्ये पैसा मिळतो उद्योग धंदा मध्ये कल्पनेबाहेर लाभ होतो व शेवटचे दिवस शांततेत जातात अपघात धोका वगैरे होण्याची भीती नसते वयाचे 16 24 32 40 48 वर्षे फार महत्त्वाची जातात.

अष्टमस्थानी मंगळाची रास अर्थात मेष किंवा वृश्चिक रास अशा व्यक्तींनी अष्टमेश मंगळ असल्यामुळे वारसा किंवा लॉटरी पैसा वगैरे मिळण्याचे आशा करू नये अष्टमेश मंगळ अग्नी राशीत असेल मेष सिंह धनु या राशीत तीन सहा आठ बारा या स्थानी असेल तर रेल्वे मोटार अगर सार्वजनिक वाहनासंबंधी अपघात होण्याचा धोका असतो अशा वेळेस यांनी काळजी घ्यावी.

अष्टमस्थानामध्ये सर्वोत्तम ग्रह म्हणजे गुरु सर्व बाबतीत फार उत्तम अष्टमस्थानी धनु रास किंवा अष्टमस्थाने मीन रास व या राशीचा स्वामी गुरु हा स्वतःने म्हणजे अष्टमेश अष्टमामध्ये गुरु सर्व बाबतीत फार उत्तम मृत्युपत्राद्वारे इस्टेट मिळते नातेवाईकांकडून फायदा होतोच या योगाने प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने फायदा होतोच ज्याला नशीब म्हणतात ते सदैव अनुकूल असते दुसऱ्याचे नुकसानीने स्वतःचा फायदा होणे हा या युगाचा मुख्य धर्म आहे शेवटचे दिवस अतिशय शांततेत जातात 24 36 48 साठ ही वर्षे महत्त्वाची

अष्टम स्थानी सिंह रास

अर्थात अष्टमेश रवी हा गुप्तधनाचे बाबतीत निराशा जनक असतो दुसऱ्याकडून पैसा मिळवण्याची केव्हाही आशा करणे स्त्रीनवर स्त्री धन वगैरे मिळणार नाही उलट स्त्री गरीब घराण्यातली मिळू शकते.

अष्टमस्थानामध्ये शनीची रास अर्थात मकर किंवा कुंभ आणि या राशीचा स्वामी शनी हा अशावेळी अष्टमेश होतो शनि अष्टमेश असता तर फक्त एकच फायदा होतो आणि तो म्हणजे आयुष्य भरपूर लाभते परंतु अशा व्यक्तींनी वारसा हक्काने संपत्ती चा विचार मात्र करू नये.

यानंतर पाहूयात अष्टमेश हर्षल किंवा अष्टमात हर्षल काहीजण हर्षल या ग्रहाला कुंभ राशीचे स्वामी म्हणतात अष्टमामध्ये कुंभ राशी असता ऑपरेशनचे प्रसंग शक्यतो टाळावेत त्या धोका होण्याचे शंख संभो असू शकतो अशा लोकांनी गर्दीमध्ये मात्र जाऊ नये.

यानंतर पाहूयात अष्टमा मधील राहू किंवा केतू अकल्पितद्रव्य लाभ या दृष्टिकोनातून हे दोन्ही ग्रह अत्यंत वाईट अष्टमामध्ये राहू असता स्त्रीधन मिळण्याचे मुळीच आशा नाही उलट स्त्रीचे नातेवाईकां पैकी काही लोकांस पोसण्याचा प्रसंग न आल्यास आपले भाग्य समजावे. अष्टमस्थानामधील केतू हा देखील अकल्पित धन किंवा द्रव्य लाभ या दृष्टिकोनातून अत्यंत अशुभ असा योग आहे

आपल्याकडे हल्ली कृष्णमूर्ती पद्धती भाव नवमांश पद्धती अश्टकवर्ग आणि वेगवेगळया पद्धतीने शेअर मार्केट मधून धन मिळेल की नाही या बाबत अचूक मार्गदर्शन करता येते परंतु आपल्याला त्याचे ज्ञान अवगत नसेल तर १९४० ते १९५० या

दशकामध्ये श्रीयुत द्वारकानाथ नारायण राजे या थोर विद्वान ज्योतिषाने त्या काळामध्ये लिहून ठेवलेले हे विचार आज देखील आपल्याला उपयुक्त ठरू शकतात. फक्त यामध्ये आपल्याला स्वतः अभ्यास करण्याची गरज आहे त्याशिवाय हे इतरांनी सांगून सहजगत्या कळत नाही.

या पध्दतीने केवळ कुंडली समोर आल्यानंतर त्यामध्ये भावचलित किंवा इतर कोणत्याही पद्धतीने कुठलेही प्रकारे काही नसताना केवळ ठोकळा कुंडली जरी समोर आली आणि त्यामधील ग्रहयोग पाहून त्यामधील अष्टमस्थानामधील ग्रह किंवा त्या कुंडली मधील अष्टमेश कोण आहे यावरून आपल्याला अकल्पित धन किंवा अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने संपत्ती किंवा शेअर मार्केट मधून मिळणारी संपत्ती किंवा लॉटरी योगाने मिळणारे पैसा याबाबत अगदी सहजगत्या आपण मार्गदर्शन करू मिळू शकते

राम कृष्ण हरी

श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)

## लेख क्र. २७ : गुरु व संतती सौख्य

**लेखक : श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)**

आज च्या या विशेष लेखा मध्ये गुरु या ग्रहाचे संतती सौख्य या विषयातील महत्त्व आपण जाणून घेऊ या. या मध्ये

1 संतती सुख याचा कारक हा गुरु ग्रहच आहे हे असे का?

2 गुरु ग्रह बिघडणे म्हणजे नेमके काय?

3 कृष्णमूर्ती व भाव नवमांश पद्धती या प्रमाणे कुंडली मध्ये कोणते योग असताना संतती होते किंवा होत नाही?

4 संतती सौख्य व गुरुची दृष्टी,तसेच एक नाड दोष परिणाम?

5 वृद्ध अवस्थेत आपणास संतती सांभाळेल का?

या बाबत जाणून घेणार आहोत.

संतती सुख व गुरु ग्रह

कास आयाम या पद्धती मध्ये यावर फार सुंदर विचारमंथन केले आहे

आदरणीय श्रीयुत जुगलकिशोर कृष्णा यांनी या त्यांच्या कृष्णाज अष्टकवर्ग सिस्टीम (KAS) या पद्धत्ती प्रमाणे ग्रहांचे कारकत्व काढण्यासाठी एक नियम सांगितला आहे

या पद्धती प्रमाणे आपल्याला ज्या स्थाना बाबत विचार करावयाचा आहे त्या पासून आठवे स्थान हे त्या स्थानाचे कारक स्थान आणि त्या स्थानाचा अधिपती हा त्या विचाराधीन स्थानाचा कारक ग्रह असे संबोधले जाते असा नियम मांडला आहे

या नियमा प्रमाणे आपण निसर्ग कुंडली किंवा काल पुरुषाच्या कुंडलीचे पंचम अर्थात संतती सौख्याचे स्थान जर विचारात घेतले असता आपल्या लक्षात येईल की काल पुरुषाच्या कुंडली मधील किंवा निसर्ग कुंडली मधील पंचम स्थाना पासून आठवे स्थान म्हणजे व्यय स्थान इथे मीन रास येते आणि मीन या राशीचा स्वामी गुरू आहे म्हणजे संतती सौख्याचा कारक हा गुरू ग्रह आहे,आता विवाह सौख्याचा कारक कोण आहे ते पाहू,विवाह सुख हे सप्तम स्थाना वरून पाहतात,आता या नियमा प्रमाणे सप्तम स्थानापासून आठवे स्थान म्हणजे निसर्ग कुंडली मधील धन स्थान इथे वृषभ रास येते हिचा स्वामी शुक्र म्हणून विवाह सौख्याचा कारक हा शुक्र ग्रह आहे.आता आपला मूळ मुद्दा म्हणजे संतती सौख्य कारक ग्रह गुरु आहे.म्हणजे एखाद्याला संतती होईल किंवा नाही हे आपल्याला कुंडली मधील गुरु ग्रहाच्या स्थिती वरून कळते*ज्यांचा गुरु पंचमात स्व ग्रही,नवमांश कुंडलीत पंचमात,गुरु सुस्थितीत किंवा उच्च राशीला त्यांना संतती सुख मिळणार पण जर गुरु बिघडला असेल तर? तर .....,उत्तर अगदी सोप्प आहे त्या व्यक्तीला संतती सौख्य मिळण्यास अडचण येते

यात गुरू बिघडणे म्हणजे काय हो?

आपण ज्यावेळी एखादया सात्विक विचारांच्या व्यक्तीच्या नेहमी सहवासात असता त्यावेळी आपले विचार देखील तसेच होऊ लागतात याला आपण सत्संगती असे म्हणू तेच जर एखाद्या गुंड, कुख्यात व्यक्ती सोबत आपण राहू लागतो त्यावेळी आपली विचारधारा बदलते ,होत काहीच नाही आपण तेच असतो पण आपल्या हातून सत्कर्म घडत नाही, आपल्या हातून धर्माला अनुसरून कार्य होत नाहीत अगदी तसेच.. गुरू सारखा सात्विक प्रवृत्तीचा ग्रह राहू सारख्या ग्रहाच्या सानिध्यात आला तर ज्योतिष शास्त्राच्या भाषेमध्ये याला चांडाळ योग असे म्हणतात

आता जर आपल्या कुंडलीत गुरू महाराज पंचम स्थानाचेच कार्येश असतील आणि तेच राहूच्या युती मध्ये असतील मग तर अगदी खात्रीपूर्वक संतती सौख्याला त्रास होणारचयात संतती होत नाही असे नव्हे तर पुत्र संतती ऐवजी कन्या संतती होते

आपण अगदी सहज जर निरीक्षण केले तर आपल्या लक्षात येईल ज्यांच्या कुंडलीत कर्केचा गुरू आहे त्यांची संतती आज्ञा धारक असते,मुलगा असो किंवा मुलगी अगदी आई वडिलांच्या मनाप्रमाणे वागतात, कारण अगदी सरळ आहे गुरू उच्च राशीत आहे म्हणून ; या कर्क राशीच्या गुरु असलेल्या व्यक्ती अहंकारी असतात बरे, मी मोठा किंवा मला इतरांनी मोठेपणा द्यायला पाहिजे अशा यांच्या अपेक्षा ,व्यक्ती या प्रकारातील जरी असतील तरी यांची संतती मात्र आज्ञाधारक असते, समर्थांच्या शब्दांत सांगायचं झालं तर जगी जाणिजे योग हा सुकृताचा

हे सर्वांच्या नशिबी नसतं हे देखील तेवढंच सत्य आहे

*एखाद्या व्यक्तीला संतती होईल कींवा नाही हे कृष्णमूर्ती पद्धती प्रमाणे आणि भाव नवमांश पद्धतीप्रमाणे कसे पाहतात

* संतती सौख्य मिळेल की नाही यासाठी

आपल्याला एक तर पंचमस्थानाचा उपनक्षत्र स्वामी पहावा लागतो किंवा नवमांश कुंडली मधील पंचम स्थानाचा अधिपती कोण आहे हे पाहावं लागतं. नुसतं हे पाहून जमत नाही तर हा अधिपती किंवा उपनक्षत्र स्वामी आपल्या मूळ कुंडलीमध्ये पंचमस्थान म्हणजे संतती सौख्य धनस्थान म्हणजे कुटुंबामधील वाढ किंवा लाभस्थान म्हणजे सर्व प्रकारचे लाभ या तीन स्थानाशी संबंधित आहे की नाही हे पाहावे लागते,आणि तसे असेल तर आणि तरच यांना संतती होईल असे या पद्धती सांगतात*

या उलट जर समजा असे नसेल तर अशा व्यक्तीला संतती सौख्य मिळण्याची शक्यता कमी असते किंवा संतती होण्याची शक्यता कमी असते.किंबहुना संतती होत नाही अशा वेळेस आपल्याला त्या कुंडलीतील गुरु या ग्रहाच्या उच्च किंवा नीच राशीत आहे या स्थितीवरून तसेच यांचा गुरु किंवा पंचमेश हा अष्टमस्थानी नाही किंवा व्यय स्थानी नाही या वरून हे भाकीत खरे ठरेल का नाही याचा अंदाज लावता येतो

अनेक वेळेस कुंडलीमध्ये संततीचे के पी प्रमाणे योग नसताना देखील केवळ गुरुची दृष्टी पंचम स्थानावर आहे यावरून संतती झालेल्या देखील कुंडल्या आहेत एक फार सुंदर ओवी अध्यात्मात वापरली जाते ते कासवाच्या पिल्लांबाबत कासवी फक्त आपल्या पिल्लांकडे मायेने पाहते आणि त्या पिल्लांची भूक भागते व ती मोठी होतात

कासवी जैसे आपले पिला पाजवी निजदृष्टीचा चारा तैसे आमचे गुरुची तऱ्हा दृष्टीने लेकरा सांभाळी

ज्यांनी अध्यात्मिक गुरु केले आहेत त्यांना हे सहज कळेल आपल्या सद्गुरूंनी आपल्याकडे नुसता दृष्टी क्षेप जरी टाकला तरीही आपल्या अंगात शुभ लहरींचा संचार होतो आणि आपण अनेक अडचणी मधून सही सलामत बाहेर पडतो असो हा विषय वेगळा आहे

संतती सौख्याचा विचार करताना विवाहाच्या कुंडली गुण मिलण करण्याच्या वेळेस दोघांची एक नाडी येत नाही किंवा दोघांच्या कुंडली मध्ये कालसर्प योग नाही किंवा दोघांच्या कुंडली मध्ये गुरु नीच राशी मध्ये नाही किंवा दोघांच्या कुंडलीमध्ये गुरु अस्तंगत नाही किंवा गुरु हा दोघांच्याही कुंडलीमध्ये राहू या ग्रहाने बिघडलेला नाही किंवा गुरु हा पंचमस्थानाचा अधिपती असून तो अष्टमामध्ये किंवा व्ययस्थानात नाही या सर्व बाबी निक्षून पहाव्या लागतात

आणि यानंतरच एखाद्याला कुंडली प्रमाणे संतती होईल किंवा नाही होईल यासाठी महादशास्वामी देखील पंचमस्थान धनस्थान किंवा लाभस्थान यांच्याशी संबंधित आहे किंवा नाही हे पाहून संतती होईल किंवा नाही याबद्दलचे निदान करणे सोपे जाते

आपण समाजात वावरताना ऐकतो अमुक एकाची मुलं बघा कशी एकदम आई बापाच्या धाकात आहेत, नाही तर हे बघा, आई बाप एवढे देव माणसं आणि ही यांची पोरं एकाने अमुक एकाशी लग्न तर दुसरा पळून जाऊन विवाह

अहो हे सगळं आपल्या कुंडली प्रमाणे घडतं, सहज गुरु व चंद्र या सात्विक ग्रहांच्या राशिं बद्दल पाहू ,गुरूची रास असलेल्या उदाहरणार्थ धनु  लग्नाच्या किंवा सात्विक प्रवृत्ती असलेल्या कर्क लग्नाच्या व्यक्तींच्या कुंडल्या पहा यांचा पंचमेश मेष व वृश्चिक राशीचा स्वामी मंगळ येतो , मंगळ हा धाडस देतो त्यामुळे हे जरी सात्विक असले तरी संतती मात्र डॅशिंग असते , अगदी कर्तृत्ववान, मग सगळंच कसं साध्य होईल, कर्तबगार व्यक्ती काय कुणाचं ऐकतात का?मग यात दोष कसला कुणाला देता?

या विरूध्द मंगळ या अतिशय संतापी व कर्तबगार ग्रहाचे पहा यांच्या वृश्चिक रास या राशींच्या पंचमस्थानामध्ये गुरु या सात्विक ग्रहाची मीन ही रास येते मीन राशीचा स्वामी गुरु त्यामुळे यांची संतती अतिशय आज्ञाधारक आणि मनासारखी वागणारी असते

हे आपल्या आई-वडिलांचे खऱ्या अर्थाने सुपुत्र असतात सर्व गोष्टी आई-वडील सांगेल तसेच करतात

आजूबाजूची परिस्थिती पाहून ठराविक निवृत्तीच्या वयाच्या आसपास प्रत्येक सुद्य व्यक्तीच्या मनांत हा विचार येतो, आपली संतती आपल्या वृद्धापकाळा त आपल्याला विचारेल ना?का सोडणार वाऱ्यावर?

यात एक बाब लक्षात घ्या तर हे मुलांवर अवलंबून  नाही तर आपल्या कुंडलीतिल महादशेवर  अवलंबून असते, आपल्या शेवटच्या काळात  उच्चीच्या गुरुची महादशा असेल तर मुलगा सून नातवंड सर्वांनी भरलेलं हे गोकुळ दृष्ट लागावं असं राहतं, परंतु शेवटच्या काळातील आपला दशास्वामी जर राहू असेल आणि तो शुभ स्थानाशी संबंधित नाही त्यातच साडेसाती म्हणजे आधीच मर्कट त्यात मद्य प्याला त्यात विंचू चावला अशी अवस्था होते, त्यात मुलांना काय दोष देणार?* अहो तुम्ही आपली कुंडली पहा ना?*

*आणि मग सहजच आठवतात ग दी मादगुळकर,

दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा*

किंवा समर्थ रामदास स्वामी दासबोध या ग्रंथात म्हणतात तसे

हे सकळ आपणाच पाशी येथे बोल नाही जनासी म्हणून शिकवावे आपल्या मनाशी क्षणक्षणा

कुंडली मधील चतुर्थ स्थान हे आपल्या आयुष्याचा शेवटचा काळ कसा जाईल हे दाखविते, यातील राहू शेवटचा काळ सुखाने जाऊ देत नाही, येथील शनी हा एकांत वास देतो यात सर्व नातेवाईक एकीकडे व आपण एकीकडे अशी दुर्धर अवस्था होते आणि कुंडली मधील चतुर्थ स्थान हे पंचम या संततीच्या स्थानाचे विरोधी स्थान आहे कारण ते पंचमाचे बारावे स्थान आहे त्यामुळे एखाद्याच्या कुंडली मधील पंचमस्थानाचा अधिपती चतुर्थस्थानामध्ये असेल तर अशा व्यक्तींना संतती होण्यामध्ये अडथळे येतात विशेषतः ही बाब स्त्रियांच्या कुंडलीवरून जास्त पाहता येते कारण अपत्याला जन्म ही फक्त स्त्रीच (*किंवा माताच असते) असू शकते त्यामुळे एखाद्याला संतती होईल की नाही हे पाहताना आधी त्या जोडप्या मधील स्त्रीच्या कुंडलीमध्ये संततीचा योग आहे की नाही हे पाहणे अत्यंत आवश्यक असते किंबहुना विवाह ठरवताना वधू आणि वर यांच्या पत्रिका पाहताना वधूच्या पत्रिकेमध्ये संतती बाबत दोष असतील तर अशा जोडप्याला संतती होण्यास अडचणी येतात त्यामुळे कुंडली मिलन करताना वधूच्या कुंडली मधील संतती सौख्याचे योग पाहणे अत्यंत आवश्यक असते नुसतेच 26 गुण जुळतात 32 गुण जुळतात म्हणून काहीही होणार नाही जर आपला महादशास्वामी देखील पंचमाला विरोध करणाऱ्या चतुर्थस्थानाचा कारक असेल तर अशावेळी संतती होण्यामध्ये अडथळे येतात*

त्यामुळेच आपलं लक्ष प्रथम गुरू कडे द्यावे असे म्हणले आहे

नीच राशीचा गुरू संतती योगाला त्रास दायक ठरतो

गुरू पाप ग्रहाच्या युती मध्ये संतती सौख्यास हानीकारक ठरतो

हे कुंडली समोर आली की सहज गत्या समजून येईल

यात जेवढं सांगावे तेव्हढे थोडे आहे

असो

आज आपण इथेच थांबुया

उद्या विवाह सौख्यातील गुरूमहाराजांचे काय महत्व आहे हे समजून घेऊया

राम कृष्ण हरि

श्री. रविंद्र प्र देशपांडे (९३७१२३५८६९)

## लेख क्र. २८ : कर्मभोग (प्रारब्ध) भोगूनच संपवणे गरजेचे आहे का?

संग्राहक व संकलक : श्री. दर्शन अ शुक्ल (९३१०००८९१४)

खूप छान वाटतं, जेव्हा आयुष्य समजू लागतं..

उकल होते, 'मी कोण आहे?' या प्रश्नाची.. प्रत्येक गुंता सुटू लागतो अलगद. आहे तो क्षण जगून पुन्हा विरक्त होणं यासाठी कुठलीही कसरत करावी लागत नाही.. मन सजग होत जाते, 'कर्मबंधन' नव्याने जन्म घेऊ नये यासाठी.

पूर्व कर्मबंधन नुसते प्रारब्धात कितीही कठीण, जटील असू देत, ते फक्त भोगल्यानेच संपतात असं नक्कीच नाही. कर्मबंधन ही कर्माने तयार होतात हे 'सर्वमान्य' आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी 'चांगले कर्म' (सुकर्म) करण्याची गरज असते. हे सुकर्म सुरू होतात ते, क्षमा या वरदानाने. हे वरदान प्रत्येक व्यक्तीला लाभलेलं आहे पण कोणी गंभीरतेने पाहत नाही याकडे.. क्षमा मागणं खूप सोपं आहे, पण कठीण आहे ते क्षमा करणं.. आणि या क्षमा न करण्यामुळेच आपल्या वर्तमानावर आपलाच 'भूतकाळ' अहोरात्र राज्य करत असतो कारण फक्त एक दिवस 'मनात येणाऱ्या विचारांकडे लक्ष दिल्यास कळते, 70% विचार जुनेच असतात आणि ते इतके खोल रूजलेले असतात की उरलेले 30% नवे विचार कधी येऊन निघून जातात कळतंच नाही.

सुकर्म म्हणजे 'दानधर्म' या व्याख्येपुरतेच मर्यादीत आहेत असं नाही. सुकर्म म्हणजे तुम्ही दुसऱ्यांबद्दल, स्वतःबद्दल काय विचार करता कारण 'जसा विचार तसा आचार' निसर्गाच्या नियमानुसार 'क्रियेस प्रतिक्रिया ठरलेली असतेच'. तुम्ही काय विचार करता, एखाद्या क्रियेमागील (वागण्यामागील) तुमचा हेतू चांगला की वाईट?यानुसार तुमचे 'कर्म बंधन' तयार होते.. हे कर्मबंधनाचे चक्र 'आवर्तनाच्या' खेळात फिरत असते.

सर्वांचा असा समज आहे की 'कर्मभोग' भोगूनच संपवावे लागतात.' पण हे पूर्णसत्य नाही.. जर क्षमाशील वृत्ती ठेवल्यास 'कर्म' भोगावे लागत नाहीत.. आणि त्यास सत्कर्माची जोड दिल्यास जगणे अजून सहज होते. जसे क्षमा करणे गरजेचे आहे तसेच नवे कर्मबंध निर्माण होऊ नये याची दक्षता घेणे ही महत्वाचे आहे.. कर्मबंध तयार होतात ते 'वासना, अहंकार, मद, मोह, मत्सर, लोभ' यामुळे.. मानवी स्वभावात या मूलतः असतात.. या गोष्टींवर ताबा फक्त मनाला सकारात्मकतेचे वळण लावल्यास मिळवता येतो.

' नेहमी तक्रार करणे' ही एक सवय 10 मधील 6 व्यक्तींना असते.. या सवयीमुळे 'आयुष्यात जे काही चांगले आहे, ते दृष्टीआड होऊन जे वाईट आहे तेच नजरेसमोर राहते.. आणि तक्रार करणे वाढत जाते.. 'काहीच चांगलं घडत नाही, सगळं नशिबावर सोडलं आहे, कर्माचे भोग आहेत, इत्यादी इत्यादी. सगळेच म्हणतो आपण, 'मी ही कधी काळी ही वाक्य म्हटली आहेत', यातूनही बाहेर निघण्याचा एक मार्ग आहे, आयुष्यात जे काही चांगले आहे, तुमच्यातले गुण, भेटलेली माणसं, घडलेल्या सुखद घटना, छोट्यातली छोटी गोष्ट जी तुम्हाला आनंद देऊन गेली.. त्याबद्दल 'आभार व्यक्त करणं तेही कृतज्ञतेने', Say 'Thank You' What U Have and Had With Gratitude'.. हे आभार मानणं म्हणजे 'आनंदाचे बीज मनाच्या जमिनीत रूजवून आनंदाची फळ प्राप्त करण्यासारखे आहे..

सर्वात महत्वाची गोष्ट तुम्ही काय आणि कसे बोलता.. जर तुमचा सूर नकारात्मक असेल तर तुम्ही तुमच्या जीवनात नकारात्मकता आकर्षित कराल त्याने पुन्हा 'नव कर्माचे चक्र तयार होईल. पण ते असह्य आयुष्याचे द्योतक असेल.. जर तुम्ही नेहमी सकारात्मक बोलाल, आयुष्यात बदल एका दिवसात कधीच घडत नाहीत. पण जे बदल होतील ते खूप सुंदर, स्वप्नांच्या जवळ जाणारे असतील..

' वेळ आली की गोष्टी घडून येतात' असंही आपण बोलतो.. काही अंशी ते खरं ही आहे पण काही अंशी कारण 'प्रयत्नांती परमेश्वर' अशी म्हण प्रचलित झालीच नसती. कारण वेळेचं गणित वेळेलाच माहीत पण 'वागायचं कसं हे आपल्या हातात आहे.' जर डॉक्टरने सांगितलं आहे, 'तुम्हाला कॅन्सर आहे, तुम्ही काही महिनेच जगणार..' यात तुम्ही ठरवायचं , 'हसायचं की घड्याळाच्या काट्याकडे पाहत रडायचं'..जर वागणं निसर्गनियमांनुसार योग्य असेल तर 'वेळेचं घड्याळही बदलतं'.. कारण 'कभी कभी वक्त आता नहीं उसे लाना पड़ता हैं..' हे काम फक्त 'माणूसच' करू शकतो कारण त्याला बुद्धीचं 'वरदान' आहे..

आयुष्य जगण्याचं तंत्र 'कर्मचक्रातच' दडलेलं आहे.. जन्म होतो तो नव्याने जगण्यासाठी.. स्वतःला जाणून घेण्यासाठी.. आम्ही मात्र गुंतत जातो.. कर्मबंधात अडकण्यासाठी..

संग्राहक व संकलक : श्री. दर्शन अ शुक्ल (९३१०००८९१४)

## लेख क्र. २९ : कर्क, सिंह, कन्या, धनु व मीन राशीच्या व्यक्तींना दररोज येणारा अनुभव

लेखक : श्री. दर्शन अ शुक्ल (९३१०००८९१४)



**लेख क्र. ३० : पत्रिकेतील दोष व त्यावरील उपाय**

**लेखक : श्री. अनिल दिगंबर महामुनी (९३७०२१५६७१)**

// श्री गणेश प्रसन्न // //श्री स्वामी समर्थ//

या पृथ्वीवर अनेक दिव्यशक्तींचा वावर आहे. की ज्यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो. त्या अनेक दिव्यशक्ती पैकी एक नवग्रह हे सुद्धा आहेत. अवकाशात फिरणाऱ्या या नवग्रहांचा आपल्या ऋषींनी व मुनींनी सखोल अभ्यास केला. त्याची गती, त्यांचा एकमेकाशी असलेला संबंध, त्यांचे मित्रत्वाचे किंवा शत्रुत्वाचे संबंध ,ते ग्रह ज्या राशीला आहेत त्या राशीनुसार त्यांची जातकाला मिळणारी फळे, याचा सखोल अभ्यास केला. त्यानुसार त्यांनी काही नियम व सिद्धांत तयार केले. तेच आपणासमोर ज्योतिष शास्त्र म्हणून ठेवण्यात आले आहे .त्या ऋषींचे आपल्या मानवावर अनंत उपकार आहेत.

पत्रिका पाहताना प्रथमतः त्या पत्रिकेमध्ये सर्वात प्रबळ ग्रह कोणता आहे हे शोधावे .कारण त्या प्रबळ ग्रहाच्या भ्रमणामुळे होणारे शुभ अशुभ परिणाम जातकावर होत असतात. उदाहरणार्थ मकर लग्नाच्या पत्रिकेत शनी प्रथम स्थानात आहे म्हणजेच द्वितीय स्थानात कुंभ राशी आहे. त्याचा स्वामी ही शनी आहे. म्हणजे ह्या पत्रिकेत शनि बलवान ग्रह होतो.

१) साडेसाती

दर 30 वर्षांनी प्रत्येक पत्रिकेत साडेसाती येते जर पत्रिकेमध्ये चार-आठ- बारा या स्थानात जन्म कालीचा शनी असेल. तर त्या पत्रिकेनुसार / राशी नुसार येणारी साडेसाती जातकाला भयंकर त्रासाची जाते. अन्यथा साडेसातीत सुद्धा शुभ फळे मिळतात

साडेसातीवर उपाय :

साडेसाती मध्ये मारुतीची सेवा करणे ही सर्वश्रेष्ठ उपाययोजना आहे कारण शनिला मारुतीचा जाब असतो.

* दररोज मारुती स्तोत्र वाचन पठण करावे. हनुमान चालीसा वाचावी .पंचमुखी हनुमान कवच म्हणावे.

* दर शनिवारी मारुतीच्या मंदिरात जाऊन तेथील दिव्यामध्ये तेल अर्पण करणे व मनोभावे नमस्कार करणे

* शनीला खोटेपणा बिलकुल आवडत नाही जी काही उपासना सेवा करायची असेल ती सरळ भावाने श्रद्धायुक्त अंतकरणाने व नम्रते ने करणे आवश्यक आहे. अन्यथा नीलमणी वापरणे अथवा शनी महात्म्य वाचणे हे स्वतःच स्वत:,ला विपरीत फळे घेण्यासारखे ठरते.

* कुमारिका मुलींनी तसेच विवाह इच्छुक मुलींनी मारुतीची उपासना ,सेवा करू नये त्याऐवजी त्यांनी रामरक्षा पठण करावे.

२) मंगळ दोष

लग्न जुळविताना पत्रिका मिलन पाहण्याची पद्धत समाजात प्रचलित आहे. त्यामध्ये दोघांच्या पत्रिकेतील मंगळ पाहण्याची पद्धत आहे. वधू व वरा च्या पत्रिकेत जर एक- चार- सात- आठ- बारा. या स्थानात मंगळ असेल तर पत्रिका मंगळी असल्याचे समजतात व त्यानुसार लग्न जुळत नाही म्हणून नकार देतात हे योग्य नाही.

वधूच्या व वरा च्या दोघांच्या ही पत्रिकेत मंगळ असल्यास विवाह करणे योग्य ठरते. तथापि फक्त दोन पैकी एकाच्या पत्रिकेत मंगळ असल्यास जोडीदाराच्या ही पत्रिकेत मंगळ असलाच पाहिजे ही धारणा चुकीची आहे.

उपाय

१ : मंगळ अनेक कारणांमुळे निर्बली होतो. शत्रु ग्रहात असेल, नीच राशीत असेल, अस्तंगत असेल, मंगळावर शुभ ग्रहाची दृष्टी असेल तर मंगळ निर्बली होतो व मंगळ दोष राहत नाही.

तसेच जोडीदाराच्या कुंडलित मंगळ असेल तरी खालील प्रमाणे पत्रिकेत ग्रहस्थिती असेल तर विवाह जमविण्यास हरकत नाही

* जर एक-चार-सात-आठ-बारा या स्थानात शनी असेल .

* शनीची पूर्ण दृष्टी वरील स्थानावर असल्यास

* प्रथम किंवा सप्तम स्थानात प्रबळ शुक्र किंवा गुरु असल्यास

* राहू केतू वरील स्थानात असल्यास विवाह जमण्यास हरकत नाही

३) पितृदोषाची पत्रिका

जो जन्माला येतो तो एक दिवस जाणारच असतो. हा निसर्गाचा नियम आहे. मोकळ्या मनाने जाणारे लोक हे अत्यंत कमी आहेत. जवळजवळ 90 टक्के लोक काही इच्छा, वासना मागे ठेवून जातात. त्यातूनच पितृदोष निर्माण होतो.

पत्रिकेतील पितृदोष आपणास पत्रिकेतील राहु च्या स्थितीनुसार समजतो.

पितृदोष पत्रिकेत असल्यास आर्थिक अडचणी येतात. विवाहयोग्य मुला मुलींचे विवाह होत नाहीत. संतती होत नाही. घरात शांतता राहत नाही .सतत वाद-विवाद होतात. शिजवलेले अन्न सुद्धा खाणे होत नाही. अशा अनेक पद्धतीने पित्तर जातकाला छळतात.

पितृदोषाची पत्रिका

* चार, पाच, सहा, आठ, बारा या स्थानात मंगळ राहू किंवा मंगळ केतू असल्यास.

* षष्ठेश नवमात असणे.

* नवमेश द्वादश स्थानात असणे

* गुरु राहू युती असणे

* रवी किंवा गुरु दुषित असणे

उपाय :

१ : शिवाला व गणपतीला शरण जाणे. त्यांची सेवा उपासना करणे

२ : महादेवाच्या पिंडीवर रुद्र अभिषेक करणे

३ : सोमवार व प्रदोष हा उपवास करणे

४ : "ॐ नमः शिवाय " व 'श्री स्वामी समर्थ" हा जप  करणे

५ : राहूची देवता गणपती आहे, त्यामुळे गणपतीची उपासना करणे

अंगारक चतुर्थी, संकष्टी चतुर्थी, मंगळवार हे उपवास करणे गणपती अथर्वशीर्ष म्हणणे.

४) गुरु राहू दोष

गुरु राहू दोषाला चांडाळ योग सुद्धा म्हणतात.

गुरु हा सदैव शुभ फळे देणारा महत्त्वाचा ग्रह आहे. मात्र हाच गुरु जर राहू किंवा केतू च्या संपर्कात, युतीत आला  तर जातकाला चांगली फळे मिळत नाहीत.

अपत्य न होणे, गर्भ न राहणे, पाच-सहा महिन्याचा गर्भ वाढून आपोआप गर्भपात होणे, मूल जन्मल्यानंतर एक किंवा दोन किंवा वर्षात मूल जाणे,अविकसित मूल होणे, अशा प्रकारचा त्रास हा वरील योगात होतो

हा दोष निर्माण होण्याची अध्यात्मिक दृष्ट्या कारणे म्हणजे जर आपल्या घराण्यात कोणी पूर्वजाने जानते अथवा अजानते पणे कोणावर मोठा अन्याय केला असेल. अन्यायग्रस्त व्यक्तीने तळतळाटाणे शाप दिला असेल तर हा दोष निर्माण होतो.

तसेच घरात अनितीचा पैसा आला असेल किंवा गरीब, अबला, विधवा, परित्यक्ता महिलेचा पैसा लुबाडून घेतला असल्यास वरील दोष निर्माण होतो

उपाय : हा दोष निवारण्यासाठी धार्मिक विधी करावा लागतो . त्र्यंबकेश्वर किंवा नरसिंहवाडी येथे जाऊन हुशार ज्ञानी ब्राह्मणाकडून त्रिपिंडी श्राद्ध हा विधी करून घ्यावा. विधी करून घरी आल्यावर उदक शांती करावी.

त्याच बरोबर महादेवाची व गणपतीची वर उल्लेख केल्याप्रमाणे सेवा, उपासना करावी .

५) शनी चंद्र दोष

पत्रिकेमध्ये शनी-चंद्र युती असणे किंवा समोरासमोर असणे, एकमेकांच्या दृष्टीत असणे या कारणामुळे हा दोष निर्माण होतो

या दोषामुळे वडील व मुलगा यात मतभेद निर्माण होतात, सतत अपयश येते. विवाह होत नाहीत. आजारपण येते. अपमृत्यू होतो.

उपाय

१ : मुलं मुली शिक्षणासाठी दूर ठेवणे.

२ : शंकराची ,मारुतीची व श्री रामाची उपासना सेवा करणे

शुभम् भवतु....... श्री. अनिल दिगंबर महामुनी (९३७०२१५६७१)

**लेख क्र. ३१ : राहू प्रभाव आणि उपाय.**

**लेखक : श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)**

जेथे सूर्याचा प्रकाश कधीही पोचूच शकत नाही तो आहे राहू, ज्योतिष मध्ये राहुला उत्पातीक ग्रह मानला आहे, सर्वकाम बिघडणारा हा छाया ग्रह आहे, सर्वाधिक पाप ग्रह आहे, सर्वाधिक विच्छेदात्मक ग्रह आहे, सर्वाधिक आकस्मित घटनांचा कारक आहे.

राहु पाप आणि पुण्याच्या बॉर्डर लाईन वर उभा असलेला ग्रह आहे, पाप ह्या साठी की हा स्वभावाने राक्षस आहे, राक्षस कुलात जन्मलेला आहे, पुण्य ह्या साठी की ह्याने अमृत प्राशन केले आहे म्हणून ह्याला नवग्रहात स्थान प्राप्त आहे. म्हणून पाप आणि पुण्याच्या रेषेवर वर उभा असलेला हा ग्रह आहे, आपण जसा ह्याचा व्यवहार कराल तसाच तो बनेल.

जर राहू आपल्याला बंधन मुक्त करेल तर जन्म-मृत्युच्या फेऱ्यातुन मुक्ति होऊ शकते, अन्यथा राहू सर्वात निकृष्ट दर्ज्याची मानसिकता देणारा ग्रह आहे, चोरी, धोका, अपराध, घनघोर अपराध, मोठ्यात मोठे फ्रॉड केसेस हे सर्व जास्त तर राहू प्रभावित लोकच करतात.

राहू कुंडलीत जर अतिशय खराब असेल तर व्यक्तिला दंड मिळतो, जेल मध्ये जाण्याचे योग घडतात. सरकारकडू खतरा असतो, धोका होतो.

या व्यतिरिक्त राहू अशुभ असल्याची आणखी काही लक्षणे आहेत. जर आपल्या पाठीत, आपल्या श्वासन-स्वासात अडचणी असतील, जर आपल्या दाता मध्ये त्रास असेल, तर निश्चितच आपला राहू वाईट रिझल्ट देत आहे, जर आपण नेहमी भ्रमाचे शिकार बनत असाल, नेहमी अंजान, अनावशक भीती वाटत असेल, फोबिया आहे, डिप्रेशन आहे, तर आपला राहू खराब असू शकतो, जर तुम्हाला नेहमीच धोका मिळत असेल, सरकारी कामात त्रास, अडचणी येत असतील हे पण खराब राहू असल्याची लक्षणे आहेत.

राहू ज्यावेळी खराब होतो त्यावेळी व्यक्तीच्या घरात अनाव्शक वस्तूंचा कचरा होऊ लागतो, इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रिकल सामान लवकर खराब होते, अशा घरात बंद असलेली घड्याळ मिळतील, राहूची जर महादशा, अंतर दशा चालू असेल, किंव्हा राहू गोचर मध्ये ज्या स्थानातून भ्रमण करत असेल, तर त्या स्थाना संबंधित त्रास निर्माण करेल.

अजून एक राहू खराब होण्याचे लक्षण म्हणजे जर लाल मुंग्या आपल्या घातरात वारंवार येत असतील तरी हे राहू खराब होत असल्याची लक्षणे आहेत,

राहू जीवनात नेहमी अनिच्छित, अनाकलनीय घटना घडवतो. अनिच्छित आजार देतो ज्यांचे रिपोर्ट डॉ. ना पण भेटतच नसतात. हे सर्व फोबिया आहेत जो राहू क्रिएट करत असतो. जीवनात स्थैरता लाभत नाही.

सप्तमाशी संबंध आल्यास वैवाहिक जीवनात संशय, धोका, मतभेद निर्माण होऊ शकतात. अशा सर्व लक्षणात आपण अंदाज करू शकतात की आपला राहू अशुभ फलित होत आहे.

(ही लक्षणे इतर ग्रहांच्या योगात पण सापडतात परंतु खास करून राहू ह्या गोष्टी खूप प्रभावित करत असतो) #उपाय-

जर आपला राहू अशुभ स्थितीत असेल तर आपण काय उपाय करू शकतात? ज्याने आपला राहू शांत होईल व शुभफळ देईल.

1) राहुचा सर्वात प्रार्थमिक उपाय म्हणजे आपल्या घारात व कामाच्या ठिकाणी कधीही घाण, कचरा अजिबात ठेऊनहे. कोळयांची घरे रोजच्या रोज साफ करावी, जेवढी साफसफाई कराल तेवढी उत्तम.

2) राहू जर बिघडेला असेल तर कधीही दारू, मांस सेवन करूच नहे,( कोणाची फूड ह्याबीट बदलण्याचा हा विषय नाही जे सत्य आहे.)

3) कुठल्याही प्रकारचे बंद इलेक्ट्रिकल सामान ठेऊ नये. बंद घड्याळ ठेऊ नका.

4) आपल्या टॉयलेटची साफसफाई नियमित ठेवा, त्याच बरोबर दक्षिण-पच्छिम भागाची आणि दक्षिण भागाची साफ-सफाई लक्ष पूर्वक करावी.

5) आपल्या घरात समुद्री मीठ (मोठे) वापरुन फर्शी, जागा क्लीन ठेवावी. ह्यामुळे राहूचा वाईट प्रभाव दूर होतो, व हा वास्तु दोषाचा उत्तम उपाय पण आहे.

6) मोर पंख आपल्या घरात आवश्य ठेवा, आपल्या बिझनेस किंवा आपल्या ऑफिस च्या ठिकाणी आवश्य ठेवावा.( याला पौराणिक कारणे आहेत)

7) राहू कारकतत्वात मासे पण येतात, आपण मास्याना खाध्य घाला, पालन पोषण करा.

8) काळया गाय ची सेवा करा, काळया कुत्र्यांना अन्न द्या, राहू प्रसन्न होतो.

9) शनिवारी एक कच्चा कोळसा, एक नारळ तिन्ही सांज वेळी वाहत्या पाण्यात सोडावा.

10) राहू बुद्धी बिघाडतो, तर बुद्धी शुद्ध ठेवा, मन स्वच्छ ठेवा आणि चांगल्या वातावरणात रहा. बुद्धी भ्रष्ट झाली तर सर्वच नष्ट होण्याच्या मार्गावर असते, बुद्धी शुद्ध कशी कराल, माता सरस्वतीची उपासना करावी. गीता अध्याय 2, श्लोक 62, 63 मध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात, बुद्धी च्या नाशाने सर्वच काही नष्ट होते, राहू बुद्धीलाच नष्ट करतो, राहू ज्यावेळी खराब होतो त्यावेळी सर्वात प्रथम आपले विचार घाणारडे बनतील, विचार उलटे होतील, कोणाचा चांगला सल्ला आपण स्वीकारणार नाही. अशा स्थितीत माता सरस्वती उपासना आवश्य करावी.

11) अजून एक महत्वाचा उपाय म्हणजे अश्या स्थितीत आपण हनुमान आणि भैरव यांची पुजा, उपासना करावी या मुळे राहुचे उत्पाद शांत राहतात. हनुमंतांच्या भीतीने राहू दबावात राहतो.

धन्यवाद.

श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)

## लेख क्र. ३२ : शनि

**लेखक : श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)**

शनि ला ज्योतिष मध्ये कर्म आणि लाभ वर अधिकार दिला आहे, त्याच बरोबर शनि न्याय देवता असल्याने कर्माचे फळ देण्याचा अधिकार दिला आहे, म्हणून त्यांना दंड नायक असेही म्हटले आहे, आणि ते काल पण आहेत, म्हणजे जे आपल्याला आपल्या कर्माचा परिणाम देतात. ज्योतिष मध्ये सांगिले आहे नवग्रहा मध्ये शनि शेवटच्या कक्षेत बसलेला ग्रह आहे, सूर्य पासून आधिक लांब, म्हणून आपल्यावर त्यांची bird Eye View आहे, म्हणजे गरुड ज्या प्रमाणे अत्यंत उंचीवरू पण जमिनी वरील प्रत्तेक गोष्ट लक्ष करते, त्या प्रमाणे शनिदेव सर्वात लांब अंतरात असून, शेवटच्या कक्षेत असून पण आपल्यावर, आपल्या कर्मावर लक्ष करतात.

शनि ना कर्म आणि लाभावर अधिकार दिल्याने कालपुरुष कुंडलीत दशम आणि एकादश स्थांनाचे स्वामी आहेत, जेते शनिच्या दोन मकर आणि कुंभ राशी येतात. ज्योतिषचा एक प्राचीन ग्रंथ आहे "जातक पारिज्यात" त्यात ग्रंथकार सांगतात की ज्योतिष मध्ये शनि पासून कोण कोणत्या गोष्टींचा विचार करा, शनि पासून आयुर्मानाचा विचार करा, आजिविकेचा विचार करा, आपल्या श्रमउपाजीत संपत्तीचा, आपल्या कर्माचा विचार करा, आपले नातेवाईकात काकाचा आणि गंभीर आजारांचा विचार करा. या वरुन आपल्या काय लक्षात येते की जेकाही कर्मभोग आपल्याला मिळणारे आहेत ते शनि महाराज देणार.

आपली पैतृक संपत्ती असो या आपल्या मेहनतीने मिळणारी संपत्ती असो, म्हणजे आपल्या प्रोफेशनची, आपल्या करिअरची जे काही देतील ते शनिच निर्धारित करतील, म्हणून आपल्या कुंडलीत शनिची शुभ स्थिती असणे कर्मांचे प्रोग्रेस होण्यासाठी खूप महत्वाचे आहे, कुंडलीत शनि जर कुठे अशुभ स्थितित असतील तर आपणास अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल.

महर्षि पाराशर सांगतात शनि दुख: देतो, दुख देण्यावर याचा अधिकार दिला आहे, दुख: देण्यात शनि सर्वात पुढे आहे, जसे सुख देण्यात गुरु सर्वात प्रथम आहे तसाच दुख देण्यात शनि प्रथम सांगितला आहे, त्यामुळेच जातक शनिला जास्त घाबरतात. दुख: कसे येते? दुख: येईल एकतर आजारपणाने, धनाच्या कमतरतेने किंवा मानसिक त्रासाने, तर शनि आपल्या जीवनात या तिन्ही गोष्टींना ट्रीगर करतो.

तर पाहूया शनि या आर्थिक, शारीरिक आणि मानसिक तिन्ही त्रासात कसा ढकलू शकतो.

शनि आर्थिक त्रास कसा देऊ शकतो-

शनि कुंडली मध्ये षष्ठ, अष्टम आणि द्वादश भावाचा कारक मानला आहे, आपल्याला माहीतीच असेल कुंडलीत 6, 8, 12 ही स्थाने अशुभ सांगितली आहे, सहाव्या भावातून आपण रोग, शत्रू आणि ऋण पाहतो, आठव्या भावापासून आपण अचानक होणारी समस्या पाहतो गंभीर आजार पाहतो, 12 वा भाव कुंडलीचा शेवटचा भाव जेथून आपण व्यय, खर्च, हानी शेवट पाहतो, म्हणजे कुंडलीची सुरुवात प्रथम भावा पासून होत असेल तर 12 व्या भावात समाप्ती होते, मृत्यू समाप्ती.

म्हणून शनिला काल म्हटले आहे. शनीला आजार आणि मृत्यू विषयावर अधिकार दिला आहे, जो 6,8,12 भावाचा कारक आहे. तर शनि ज्यावेळी आपला अशुभ होईल तर त्याची पहिले लक्षण असेल आजारपण येणे, एक आजारपण ठीक झालच नाही आणि दुसरे चालू झाले, जास्तच खराब होईल तर जातकाला बेड पकडावा लागतो. शनिला शरीरात 'वातावर' अधिकार दिला आहे, आयुर्वेद सांगते की शरीरात तीन प्रकारचे दोष असतात, कप, पित्त आणि वात. हेच Medical science सांगते हे तीन Element आहेत Humerus of body.

पण ह्यांना दोष का सांगितला आहे? कारण हे तीन्ही जर समान राहिले असते तर हे तत्व होतात, पण कोणाचे ही कप, पित्त आणि वात एकत्र बॅलेन्स होऊ शकत नाही म्हणून त्याना दोष असे म्हटले आहे. तर शनिला वात वर अधिकार दिला आहे, गुरु, शुक्र आणि चंद्र- कप वर अधिकार ठेवतात, सूर्य, मंगल आणि केतू पित्त वर आणि शनि, राहू, बुध वात वर अधिकार ठेवतात.

मग वायूचे जे काही आजार होतात जसे-गुडघ्यांचे आजार, हाडांचे आजार, हाडे ठिसूळ होणे मसल स्पेन्स हे सर्व शनीच्या अशुभ व निर्बल झाल्याने ही होत असतात. वाताचे आजार सर्वात जास्त वाईट मानले आहे, कराण शरीरात वात शरीरास 'ईजनरेट' करतो म्हणजे कमजोर करतो आणि हळू हळू शरीराचा क्षय करतो, म्हणून हे असे आजार शरीराला आतून कमजोर करतात त्या सर्वावर शनिचा अधिकार आहे.

वायु संपूर्ण शरीरात प्रसारित असते, वायु पाच प्रकारची असते प्राणवायु, उदानवायु, अपानवायु, समानवायु आणि व्यहानवायु. शनि पाच ही वायुवर नियंत्रण करतो. लक्षात घ्या शनिला शरीरात हाडांचा साफळा सांगिले आहे, आपले शरीर कसे उभे राहते, आपल्या शरीरात जो वायु असतो तो शरीराला उभा ठेवतो, म्हणजे शरीराचे चलन करते, म्हणूनच आपण म्हणत असतो प्राण गेला म्हणजेच प्राणवायु गेला, जेव्हा प्राण निघून जातो तेव्हा शरीरी मृत होते, असे शरीर पुन्हा उभे करता येत नाही.

या सर्व विषयातून लक्षात येते की शनिचा वायु वर अधिकार आहे म्हणजेच वात प्रकृतीवर अधिकार आहे, म्हणूनच शनि ला मृत्युची देवता सांगितली आहे, शरीरातून वायु घेऊन जातो तेव्हा शरीर मृत होते. तसे पहाल तर राहू, बुध पण वायुवर अधिकार ठेवतात पण राहू, बुध शरीराच्या वरील भागावर अधिकार ठेवतात, म्हणूनच यांच्या मुळेच व्यक्तिला मानसिक आजार जास्त होतात.

परंतु शनि महाराज शरीराचा खालच्या भागावर आणि खोल शरीरात अधिकार ठेवतो. म्हणून शरीरात जेवढे एलिमिनेशन चे काम असते जसे मल, मूत्र त्याग, हे अपान वायु नियंत्रित करते, जे वेस्ट मटेरियल बाहेर काढण्याचे काम हे शनीचे असते, किडणीचे आजार, इक्सकिट्री पार्ट, पवासिर हे सर्व आजार शनीच्या खराब स्थितीतवर संगितले आहेत, शरीरात च्या आपण अजून खालच्या भागावर जाल तर पाय, घुडगे या वर अधिकार असतो, ज्यावेळी घुड्ग्यांचे आजार होतात त्यावेळी काय होते, वात, म्हणजे वायु जर आपली बिघडेल तर आपल्याला आर्थथ्रायठिस होईल.

शनीला शरीरातील नसां वर पण अधिकार दिला आहे, नसां आहेत, नाडी आहेत शनि त्यांचा कारक आहे, म्हणून शनि जर अशुभ असेल तर आपल्याला नसांचे आजार पण उद्भ्वतील म्हणून नरवस सिस्टम वर पण शनिला अधिकार दिला आहे, वात

आजाराने ही पोटाचे आजार पण होतात, म्हणून पोटाच्या आजारावर पण शनि कंट्रोल करतो, मेडिकल सायन्स सांगते की जेव्हा आपल्या पोटाची नस खराब होतात त्यावेळी आपली पचन शक्ति, पचन क्रिया कमजोर होते. म्हणजेच नसां चा कारक कोण शनि.

पंचम भाव पोटाचा वरील भाग दर्शवतो तर षष्ठ भाव पोटाचा खालचा भाग दर्शवतो, म्हणून शनि षष्ठ भावचा कारक आहे, जर षष्ठ भाव कुयोगात असेल, शनि कुयोगात असेल तर पोटाचे आजार होतील, म्हणूनच म्हटले जाते सर्व आजार पोटातूनच निर्माण होतात, हे विचारपूर्वक म्हटले आहे, म्हणूनच महर्षि पाराशरनी षष्ठ भावालाच रोग स्थान म्हटले आहे, म्हणजे लक्षात येईल की रोगात शनीची काय भूमिका असते.

आपल्या मांसपेशी कमजोर होतात, त्यांचेही कारण शनि आहे, हाडांचे जेवढे आजार होतात त्याचे ही कारण शनि बनतो, कराण मेडिकल सायन्स सांगते की जर आपल्या पोटातून अनावशक गोष्टी व्यवस्थित रित्या बाहेर नाही पडलीत तर आपल्या हाडात मिनरल बनवण्याची क्षमता कमी कमी होत जाईल.

ज्योतिष मध्ये जेवढ्या काही गोष्टी सांगितल्या आहेत ते सर्व आज आपले चिकित्सा विज्ञान स्वीकार करत आहे, तर ज्योतिष मध्ये प्राचीन काळा पासूनच शनिला नरवस सिस्टम, नसां वर अधिकार दिला आहे, आणि संगितले शनि पासून कोण-कोणते आजार होतात. शनि प्रत्तेक असे आजार देतात जे आपल्या शरीरात हळू हळू उध्भवतात, बहुतेक वेळा ह्या आजारांचे कारण काय होते, आपण दुर्लक्ष करतो, डॉक्टरांचा सल्ला घेत नसतो कारण शनि ज्यांचा खराब असेल तो आळसी बनतो, दुर्लक्ष करतो, म्हणून लहान आजार हळू-हळू करून रुद्र रूप धारण करतात, आणि नंतर काही उपाय राहत नसतात.

नोकरी मध्ये अस्थिरता होईल, शनि षष्ठ भावाचा पण कारक आहे आणि दशम भावाचा, षष्ठ स्थानावरून आपण नोकरी पाहतो, दशम भावावरून आजीविका, कर्म, कर्माची स्ट्रेंज पाहतो म्हणजे शनि अशुभ स्थितीत असेल तर वारंवार नोकरी सुटेल, काम मिळणार नाही, कामाच्या ठिकाणी त्रास, अडचणी भरपूर होतील, मेहनत खूप करावी लागेल पण त्याप्रमाणे दाम मिळणार नाही, म्हणून जे लोक नोकर असतात, फॅक्टरी चे कामगार असतात, जे लोक शरीराने म्हणजे हातपायाने जास्त मेहनत करतात, लेबर इंटेन्सिव जॉब असेल ज्यांना जास्त काम करावं लागते, पण त्याचा फायदा मात्र अपेक्षित होत नसतो, अशांचा शनि कुठे ना कुठे अशुभ असतो, हे सर्व शनि खराब असल्याची लक्षणे आहेत.

अस का होत? शनि पीडा, त्रास का देतो? खर तर शनि कोणालाच त्रास देत नसतो, कारण पूर्वजन्माचे कर्मच निच्छित करते की या जन्मी आपल्या शनिची स्थिति कुंडलीत कशी असेल, चांगली असेल की वाईट. तर शनीला दोष देवू नका, दोष तर आपल्या पूर्वजन्मा मध्ये, पण जे पूर्व जन्म मध्ये झाले ते झाले, पण ह्या जन्मी आपण कशी सुधारणा कराल ह्यावर आपण विचार करू, परंतु तद पूर्वी आपण अजून अशुभ शनि काय काय परिणाम देऊ शकतो ते पाहूयात.

जर आपणास कुंडली समजत नसेल तरी आपण कसे लक्षात घ्याल की आपला शनि अशुभ प्रभाव देत आहे, जेव्हा आपला शनि अशुभ असेल तेव्हा शरीरात पिवळेपण वाढत जाईल, स्क्रीन पिवळी होईल, कारण पोटा मध्ये पित्त बनते आणि पोटावर शनिचा अधिकार आहे, म्हणजे शनि अशुभ होईल तर शरीरात पित्ताचे प्रमाण वाढेल, आपली नख पण वीक होतील, सफेद

दाग पडतील, पिवळी होतील तर समझा आपला शनि अशुभ होत आहे, शनिना नसां वर अधिकार असल्याने रक्त वाहिन्यांच्या पंपिंग वर पण परिणाम करतो म्हणजे हृदया संबंधित आजार पण देतो.

त्याच बरोबर शरीरात हिमोग्लोबिंची कमी, हिमोग्लोबिंन काय आहे? आयरल आहे, शनीला लोखंडावर अधिकार दिला आहे, म्हणून हिमोग्लोबिंन ची कमी असणे याचे कारण शनिच होतो, शनि जर अशुभ होत असेल तर आपली स्क्रीन ड्रायनेस होईल, खडबडीत होईल कारण शनि थंड आणि कोरडा ग्रह आहे जो आपल्या शरीरातून पाण्याचे प्रमाण कमी कमी करत जाईल. हे शनि अशुभ होत असल्याची लक्षणे आहेत.

त्याच बरोबर शनि अशुभ असल्याची अजून काय लक्षणे आहेत? जर आपण जास्त वेसना मध्ये गुंतत असाल, शनि- मंगळ योगात अस जास्त पहाला मिळेल की जातक जास्त नसेच्या आहारी जाईल आणि शेवट पर्यन्त सोडत नाही, ही सर्वात जास्त शनि अशुभ असल्याची लक्षणे आहेत.

तर शनि षष्ठ भावाचा कारक आहे, षष्टातून आपण पाहतो रोग, शत्रू, ऋण, नोकरांचा पण विचार षष्ठ स्थानावरून केला जातो, म्हणून षष्ठ स्थानावरून आपण नोकरी पाहतो, म्हणजे शनि कुंडलीत अशुभ स्थितीत असेल तर आजार वाढत जातील, कर्जावर कर्ज घ्यावं लागेल, शत्रूंची संख्या वाढत जाईल, कोर्ट केसेस वाढत जातील, नोकरी मिळणार नाही, बिझनेस असेल तर नोकर विश्वासनिय मिळणार नाहीत, धोका देतील, कामाच्या जागेत चोरी जास्त होत राहील.

शनि आठव्या घराचा पण कारक आहे, येथे काय होईल आपल्या पैतृक संपत्ति संबंधित विषयात वाद-विवाद होतील, खास करू कोणाशी होतात काका असतील, याचा कारक आहे शनि, येथे संबंध बिघडल्यास पैतृक संपत्ति विषयी अडचणी निर्माण होतील.

शनि बाराव्या घराचा पण कारक आहे कुंडली मध्ये या वरुन आपण काय पाहतो, खर्च, बंधन, शेवट म्हणजे जेल आणि हॉस्पिटल पाहतात, किंवा गंभीर आजार, आजार काय करतात आपल्याला बांधुन ठेवतात, आपण आपल्या इच्छेनुसार चालू-फिरू शकत नाही, कोणालाही कधी हॉस्पिटल मध्ये जाणे आवडत नसते, कारण पूर्ण पणे बंधनात राहावे लागते. मग अशुभ शनि साठी काय काय उपाय आहेत पाहूया.

उपाय-

ज्योतिष मध्ये 3 प्रकारचे उपाय संगितले आहेत, दान, रत्न आणि मंत्र.

1) सर्वात मोठा उपाय म्हणजे शनिदेवांचे आणि हनुमंतांचे पूजन अर्चन करावे, सुंदरकांड चा पाठ करावा.

2) प्राणायाम करा- खूप कमी लोक हा उपाय सांगतात. शनि प्राणायामने सुधारतो, शनि पूजापाठ, धर्म, साधना, समाधी या गोष्टी रिप्रेजंट करतो, अष्टांगयोग म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या अष्टांग योगात लागा, कारण शनि शरीरात प्राणाचा, वातचा, वायुचा कारक आहे, वायु कसा शुद्ध होईल ? प्राणायाम केल्याने शरीराची वायु शुद्ध होते, आपल्या शरीरात 72 हजार नाडी आहेत, नाडी कशी शुद्ध होतील प्राणायाम केल्याने. शरीराच्या नाडी

आणि नसांवर शनिचा अधिकार आहे आणि या दोन्ही गोष्टी प्राणायामणे शुद्ध होतात. तर हा उपाय केल्याने खास करून शारीरिक जे त्रास असतील त्यातून मुक्तता होत जाते.

3) सात्विक भोजन आणि शुद्ध विचार ठेवा, हे खूप महत्वाचे आहे.

4) आपल्या काकांशी संबंध चांगले ठेवा. होऊ शकते ते तुमच्याशी वाईट असतील पण तुम्ही वाईट बनु नका.

5) शिव शंकरांची भक्ति करा, शनि जर काल असेल तर शिव महाकाल आहेत, महादेवानीच शनीला ग्रहाचे पद प्रदान केले आहे, आणि आज्ञा दिली की सर्वांना त्यांच्या कर्मानुसार न्याय द्यावा, म्हणून शनि महाकालांच्या आज्ञेने चालतात.

6) जे लोक सूर्योदय, सूर्यास्त वेळी झोपतात त्यांचा शनि लवकर खराब होतो, अकाल मृत्यू समान दंड होतो.

7) शनि महाराज पिंपाळाचे(अश्वस्थ) पूजन केल्याने अति प्रसन्न होतात, गीता 10 अध्यायात 26 व श्लोक मध्ये भगवान सांगतात- वृक्षा मध्ये मी पिंपळ आहे, परमेश्वरांनी गीतेत दोन वेळा महत्व संगितले आहे. पिंपळा मध्ये सर्व देवतांचा निवास आहे, ब्रम्हा, विष्णु, महेश व सर्व देवी देवता.

+ वेदा मध्ये अथर्व वेद च्या तिसऱ्या मंडळात 6 व्या सूक्त मध्ये संगितले आहे की पिंपाळचे पाळ बांधल्याने शत्रूंचा नाश होतो. तो एक विशिष्ट मंत्र आणि मुहूर्त आहे पण हा विषय वेगळा आहे, तो इथे घेत नाही. पण शनिवारी पिंपळाच्या खोडात निरसर दूध अथवा जल अर्पण करावे. व संध्याकाळी 7 च्या अगोदर तुपाचा दिवा लावावा.

8) 7 मुखी रुद्राक्ष चा वापर करून शनिचा दाह कमी होतो.

धन्यवाद

श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)

## लेख क्र. ३३ : बुधा चे महत्व

**लेखक : श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)**

ज्योतिष शास्त्रामध्ये बुधाची खूप महत्वपूर्ण भूमिका आहे, बुध आपल्या जीवनातील पुष्कळ गोष्टी नियंत्रित करत असतो, बुधाचा रंग-हिरवा आहे, वर्ण- वैश्य आहे, बुध मिथुन आणि कन्या राशीचा स्वामी आहे. कन्या राशी ही बुधाची उच्च राशि ही आहे, मीन राशीत बुध नीचेचा होतो, शनि, शुक्र, राहू बुधाचे मित्र आहेत. गोचरवश बुध कोणत्याही राशीत जवळ-जवळ एक महिना राहतो.

बुध आपली वाणी आहे, बर्ताव, आपल्या बुद्धीचा आणि चालाकीचा कारक ग्रह आहे, कुंडली मधील बुधाची स्थिति निच्छित करते आपण किती स्मार्ट आहात, आपण कसे बोलता, आपला व्यवहार कसा आहे, आपले व्यक्तित्व आणि बुद्धी कशी आहे.

बुधाचे महत्व आणि वैशिष्ठे-

बुधला नवग्रहात सर्वात सुकुमार आणि सुंदर ग्रह मानले आहे, ज्योतिष मध्ये बुधला युवराज म्हटले आहे, कन्या आणि मिथुनेचा स्वामी असून बुधाचे तत्व पृथ्वी तत्व आहे. ज्योतिष मध्ये बुधला बुद्धी, तर्कशक्ती, निर्णय क्षमता, स्मरणशक्ती, मज्जासंस्था, विचार करण्याची आणि समजण्याची क्षमता, उच्चारण, व्यवहार कुशलता, सूचना, संचार, दळण-वळण, व्यापार, वाणिज्य, गणिती विषय, लेखन त्वच्या, सौंदर्य आणि सुगंध, कम्युनिकेशन, गहन अध्ययन, बंधु-मित्र, हास्य-विनोद, नपुंसकत्व, वैश्य या सर्वांचा चा कारक ग्रह मानला आहे. या मुळेच ज्योतिष विषयात बुध फार महत्वपूर्ण विषय आहे. बुधाच्या शुभ प्रभावा शिवाय ज्योतिषी तर्क आणि भविष्य कथन करू शकतच नाही.

या व्यतिरिक्त कान, नाक, गळा, आणि संचारशी सुद्धा बुधाचा संबंध आहे. बुध गणिती आणि आर्थिक विषयात सफलता देणारा ग्रह आहे, आणि हे सर्व विषय आपल्या जीवनात अत्यंत महत्वपूर्ण भूमिका निभावतात, विशेष करून बुद्धी क्षमते ची आजच्या काळात सर्वाधिक आणि प्रत्तेक ठिकाणी आवशकता आहे.

अशुभ बुधा मुळे बुद्धी, वाणी, आणि एकाग्रता विषयी समस्या-

जर कुंडलीत बुध नीच राशीत असेल आणि कुयोगात असेल, बुध सहा, आठ, बारा या स्थानात असेल, केतू किंवा मंगळाने पीडित असेल, बुध रवी बरोबर समान अंशात असुन अस्त असेल, षष्टेश, अष्टमेश पासून पीडित असेल, अन्य कूठच्याही कुयोगात असेल अश्या स्थितीत जातकास डोक्या संबधित समस्या निर्माण होतात. ह्या मुळे जातकाला आपली विचार करण्याची, समजण्याची शक्ति, स्मरण शक्ति कमजोर झाल्यासारखी वाटते, कोणताही निर्णय घेण्यासाठी भरपूर वेळ घ्यावा लागतो, निर्णय चुकीचा ठरतो, ध्यान विस्कळीत होते, बुद्धी भ्रष्ट होणे, फिट्स येणे. तर होऊ शकते आपला बुध कुयोगात आहे.

बुध कमजोर असेल तर व्यक्ति आपल्या बुद्धीचा योग्य प्रयोग करू शकत नाही.

अश्या व्यक्तीस कुठलाही विषय उशिराने समजतो आणि व्यक्ति नेहमी डिप्रेशन मध्ये राहतो.

बुध कमजोर असेल तर बुध व्यक्ति व्यवस्तीत आणि प्रभावी बोलू शकत नाही, त्याला अटकल्या सारखं होईल.

अशुभ बुधासाठी आणि बुद्धी, वाणी, आणि एकाग्रता प्राप्त करण्यासाठी उपाय-

प्रातकाळी रोज तुलसीच्या पानांचे सेवन करावे, त्या नंतर “ॐ ऐं सरस्वते नम: चा जप करावा.

दर बुधवारी महविष्णुना चंदना सहित तुलसी पत्र अर्पण करावे, विष्णु सहस्त्रनाम स्त्रोत्रचा पाठ करावा.

बुद्धीची देवता श्री गणेशाना दूर्वा अर्पण करून त्या दूर्वा आपल्या जवळ ठेवाव्या.

अशुभ बुधा मुळे त्वचा संबंधित समस्या-

अशुभ बुध मुळे त्वचा संबंधित समस्या जसे एलर्जी, शरीरावर पुळया, खाज निर्माण होतात. रवीपासून बुध पीडित असेल तर शरीरावर डाग-धब्बे पडतात, मंगळ, हर्षल ने पीडित असेल तर त्वच्या भाजण्या सारखे योग घडतात, राहुने पीडित असेल तर विचित्र प्रकारचे त्वच्या समस्या निर्माण होतात.

बुधा मुळे जर त्वचा समस्या असती तर उपाय-

प्रातकाळ नियमित सूर्यदेवांना जल अर्पण करावे, जास्तीत जास्त हिरव्या भाज्यांचे सेवन करावे.

ज्या जाग्यावर त्वच्या संबंधित त्रास होत असेल तेथे खोबरेल तेल लावावे.

अशुभ बुधामुळे कान, नाक, आणि गळया संबंधित समस्या-

बुध जर जर अत्यंत कमजोर असेल तर एकण्यात आणि बोलण्यात अडचणी येतात. काही वेळा गळा खराब होतो.

उपाय- रोज प्रातकाळी गायत्रीमंत्राचा जप करावा, जास्त करून हिरव्या कपड्यांचा वापर करावा, रोज स्नान केल्या नंतर चंदन डोक्याला, कंट, नाभीवर लावावा.

अशुभ बुधा मुळे गणित विषयक समस्या- काहीवेळा अभ्यासात खूप मेहनत करून पण गणित आणि त्या संबंधित विषयात लोक अपयशी ठरतात. ह्याच कारण जास्त करून अशुभ बुध असल्याचे पाहण्यात येते. आणि मग गणित संबंधित असलेल्या कार्यात समस्या निर्माण होतात जसे अकाउंट्स, इकॉनॉमिक्स किंवा संख्या शास्त्र संबंधित विषयात अडचणी येतात. जातकाला वारंवार अश्या विषयात अपयश्याचा सामना करावा लागतो.

• अशुभ बुधा मुळे गणित संबंधित विषयात येणाऱ्या समस्यांचा उपाय-

1) रोज सकाळ- संध्याकाळ “ॐ बुधाय नम:” मंत्राचा जप करावा, अभ्यास करण्याच्या जागेत हिरव्या रंगाची देवाची प्रतिमा लावा, खाण्यात हिरव्या रंगाच्या मीरचीचा वापर करावा.

(बुध कमजोर असेल तर बुधाचे पाचु रत्न, कुडंली परीक्षण तज्ञांच्या सल्ल्यानुसार वापरावा)

धन्यवाद.

श्री. गजानन परब (९४०३४३५८५३)

**लेख क्र. ३४ : नक्षत्रांचा नात्यातील प्रवास**

**लेखक : श्री. अमोल साकोरकर (८५५०९९०६५५)**

जीवनातील काही नाते हे काळानुरूप वाढत राहतात ग्रो होत राहतात फक्त प्रश्न हा आहे की त्या नात्याला आपण काय खत पाणी देतो  काहीं नाते ही #पूर्नवसू नक्षत्राच्या वेला प्रमाणे असतात आधार घेत घेत वाढणारी □ तर काहीं #मघा नक्षत्राच्या वट वृक्षा □ प्रमाणे #मूळ नक्षत्राप्रमाणे खोल वर जाणारी किंवा #पुष्य नक्षत्रातील पिंपळ □ वृक्षाच्या गुणधर्मप्रमाणे पुष्ट होत जाणारी ही असतात. काही नात्यात एखादा औषधी डोस लागतो त्या प्रमाणे #अश्विनी नक्षत्राप्रमाणे असतात हळुवार येऊन हील करून निघून जातात. #भरणी नक्षत्राचे नाते हे अतिशय मजबूत असते त्या नक्षत्राच्या गज म्हणजे हत्ती सारखे विशाल आणि तेवढेच आंबट ही असते आवळयाप्रमाणे □ पण एकदा आंबट डोस ही पित्त शांत करण्यासाठी गरजेचा असतो. #कृत्तिका तर नात्याबाबत आग ओकत असते पण जसे औदुंबर वृक्षात ही जल असते त्याप्रमाणे ह्यांचे नाते वरून जरी तापदायक वाटले तरी आतून थंडगारच असते. #रोहिणी बद्दल काय सांगावे ते समस्त ब्रम्हांडाचा आधार स्तंभातील शांत आणि विस्तीर्णपणें नाते वाढवत जातात पण थोडा सौंदर्याचा आणि प्रेमाचा प्रभाव दिसून येतो. #मृग नक्षत्राचे नाते हे थोडे चंचल असते पण घराला जसे खैराचा उंबरा बसवावा लागतो तेव्हा च घराचे रक्षण होते त्याप्रमाणे ह्यांना थोडे बंधनात ठेवल्याने नाते फुलत राहते. #आर्द्रा नक्षत्राचे नाते हे थोडे मायावी असते पण त्यात हो एक चंदनाच्या सुगंधाने मोहित करणारे नाते असते नात्यात कायम थोडासा ओलावा असतो च असतो. #पुनर्वसु #पुष्य #मघा वर सुरवातीला दिले आहे #आश्लेषा हे थोडे फटकळ असले बोलण्यात तरी नात्यातील संबंध भार एकाकी वाहून नेण्यास समर्थ असतात जसे त्या शेष नागाने ह्या वसुंधरेचा भार आपल्या फण्यावर धारण केला आहे. #पूर्वा चे काय सांगावे नाते अतिशय प्रेमळ आणि स्थिर शिस्त लागते ह्यांना अधिकार हि लागतो नात्यात राजा प्रमाणे. #उत्तरा नक्षत्राचे हि थोडे पूर्वा प्रमाणे फरक एवढा च की पूर्वा थोडे झुकते माप ठेवते पण उत्तरा नाही □ #हस्त नक्षत्राचे नाते हे जाई च्या वेला प्रमाणे बहर आला की संबंध परिसरच सुगंधाने दरवळून टाकतील. पाण्यातील ऊर्जा ही जास्त आवडते ह्यांना.

#चित्रा चे काय सांगावे कल्पना विश्वातील एक सुंदर नाते हे कॅनव्हास वर रंगत जाणारे नाते असते. बेलाच्या वृक्षाप्रमाणे पवित्र च म्हणावे लागेल. #स्वाती नक्षत्राबद्दल काय बोलावे शिंपल्यात जसा मोती जपला जातो त्याप्रमाणे हे नाते जपत असतात. अर्जुन वृक्षाप्रमाणे विशाल आणि वायू सारखे सतेज. #विशाखा चे नाते हे फारच वेगळे.सगळया शाखा आणि उपशाखेतून बहरत असते. अनेक शाखांचा एक वेगळा ऋणानुबंध नात्यात पहायला मिळतो. #अनुराधा चा अनुराग हा जरा वेगळा च असतो अतिशय सौम्य आणि प्रेमळ पण त्यात एकनिष्ठा जास्त असते. नागकेशरा सारखा तेजस्वी मित्रा प्रमाणे साथ देणार नात असते. #ज्येष्ठा चे श्रेष्ठत्व आणि जेष्ठत्व हे नात्याला घट्ट बांधून ठवणारे असते. इंद्रा प्रमाणे हे सुद्धा नात्यावर राज्य करताना दिसतात. #मूळ जितके खोलवर जाणार तितके हे नाते डौलदार पणे फुलत जाणार. पण हे जर कोणाच्या मुळावर उठले तर संपवून टाकतात सगळ काही.

#पूर्वाषाढा चे नाते हे उदका प्रमाणे म्हणजे पाण्याप्रमाणे स्वच्छ निर्मल आणि पवित्र असते. ह्यांना नाते प्रवाहित ठेवायला आवडते. #उत्तराषाढा नक्षत्राचे नाते हे थोडे संशयाच्या संघर्षात थोडे अडकलेले असते.पण नितीमत्ता चांगली असल्याने नाते टिकून राहते. #श्रवण नक्षत्राचे नाते हे चंद्रमौली प्रमाणे असते हे विष्णूप्रिय नक्षत्र असल्याने कमलासारखे नाते फुलत राहते.

#धनिष्ठा नक्षत्राचे नाते च आगळेवेगळे सगळयांना पराजित करुन धुरंधर विजयाचे प्रतीक असते. शमी शमयते पापम् शमी शत्रुविनाशिनी।

अर्जुनस्य धनुर्धारी रामस्य प्रियदर्शिनी॥

#शततारका चे नाते हे नावा प्रमाणेच 100 ताऱ्यांचा बेंच मार्कच होय. वरुणासारखे कलशात पवित्र जल भरून ठेवावे आणि त्या पवित्र जलाने अभिमंत्रित असे नाते शततारका चे होय. #पूर्वाभाद्रपदा चे नाते हे एकदमच रसाळ गोड आंब्यासारखे असते त्यातील गोडवा हा कधीही कमी होत नाही. #उत्तरा भाद्रपदा चे नाते गोमाते प्रमाणे वात्सल्य भावाने जपले जाते पण कडुलिंबाच्या कडू पणातूनही अमृता चा वर्षाव करणारे असते.

#रेवती बद्दल काय बोलावे मोहाच्या नशेतही एक वेगळे स्थान निर्माण करणारी ही रेवती नक्षत्राची गजाप्रमाणे शांत प्रेम करणारी व नाते संभळणारी असतात.

✍ वरील लेखात नक्षत्राचे देवता, आराध्यवृक्ष, योनी , तत्व ह्यांचे जमेल तितके समीकरण करुन स्वअनुभवातून आलेले विचार रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे इथे.

लेखक : श्री. अमोल साकोरकर (८५५०९९०६५५)

**लेख क्र. ३५ : श्री स्वामी समर्थ यांना लोक अक्कलकोट निवासी का म्हणत असत**

**लेखिका : सौ. मेधा महेश भंडारकवठेकर (८४२१४९५९५६)**

श्री स्वामी समर्थ

श्री स्वामी समर्थ यांना लोक अक्कलकोट निवासी का म्हणत असत,अक्कलकोट निवासी म्हणजे काय याचा अर्थ जाणण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे --

अक्कलकोट निवासी स्वामी महाराजांनी बराच काळ अक्कलकोट येथे घालवला ,त्यामुळे त्यांना आपण अक्कलकोट निवासी म्हणतो ,पण असे का म्हणतो ?महाराजांनी राहण्यासाठी अक्कलकोटचीच निवड का केली असेल? अक्कलकोट चा अर्थ काय असेल? तर वरवर बघता अक्कलकोट ला राहणारे म्हणजे अक्कलकोट निवासी आहेत असा अर्थ होतो ,पण हा शब्दशःअर्थ झाला ,त्यातील गर्भित अर्थ असा आहे की अक्कल म्हणजे ज्ञान ,बुद्धि ,प्रज्ञा असा आहे ,पूर्वी अक्कलकोट ला धीपुर ,प्रज्ञापुर असे नाव होते ,या दोन्हीचा अर्थ अक्कल असा होतो .आणि कोट म्हणजे तटबंदी किंवा संरक्षक कवच असणे होय. म्हणजे बुद्धिचे कवच असेही म्हणू शकतो. बुद्धि ही मानवाच्या मेंदू च्या मध्यभागी टाळू मध्ये असते ,त्यालाच आपण अक्कल म्हणतो ,मग जो माणूस कोणत्याही अंधश्रद्धेला न बळी पडता आपली सद्सद्विवेकबुद्धी वापरून पूर्ण श्रद्धेने उपासना करतो ,स्वामींचे विचार त्यांची शिकवण आपल्या जीवनात आणतो,त्याला आत्मज्ञान प्राप्त होते ,त्याचा सर्वतोपरी विकास होतो .उपासनेला बुद्धीची प्रेरणा मिळाली की सद्गुरूकृपेने आत्मज्ञान प्राप्त होते ,आणि स्वामींनी ज्याच्यावर कृपा केली त्याला त्यांच्या भक्तीचे मायेचे,प्रेमाचे संरक्षक कवच मिळते ,यालाच अक्कलकोट म्हणतात. पूर्वी जेंव्हा स्वामींच्या दरबारात लोक येत असत तेंव्हा तिथे राहणाऱ्या भक्तांना रोज नवनवे अनुभव ,चमत्कार बघायला मिळत होते ,ज्याचे भाग्य चांगले असेल ,ज्याचे प्रारब्ध व कर्म चांगले असेल त्याच व्यक्तीला ते बोलावून घेत होते केवळ तेच लोक तिथे येऊन अलौकीक अशा अत्मज्ञानाचा अनुभव करू शकत होते ,त्यामुळेच त्या ग्रामाला अक्कलकोट हे नाव दिले गेले असणार ,आणि तेथे स्वामी महाराजांनी कायमचे वास्तव्य केले ,निवास केला म्हणून त्यांना अक्कलकोट निवासी असे लोक म्हणू लागले .

सौ. मेधा महेश भंडारकवठेकर (८४२१४९५९५६)

## लेख क्र. ३६ : चिदानंद रूपम् शिवोहम् शिवोहम्

**लेखिका : सौ. मेधा महेश भंडारकवठेकर (८४२१४९५९५६)**

// श्री स्वामी समर्थ //

रोजच्या जीवनात आपण सर्वजण कोणत्या ना कोणत्या भूमिका पार पाडत असतो ,म्हणजे आई वडील, मुलगा,मुलगी,सून,काका,काकू,आजी आजोबा ,मित्र,मैत्रीण अशी अनेक नाती आपण वेगवेगळ्या प्रकारे निभावत असतो ,प्रपंचात अगदी गुरफटून जातो ,मन ,बुद्धी,अहंकार ,पैसा, गाडी,बंगला, श्रीमंत ,गरीब,असे अनेक भोग भोगत असतो, अनेक प्रत्यंतरे जीवनात घडत असतात त्यातून आपण जात असतो ,पण या सर्व अवस्था कधीही एका जागी थांबुन राहत नाहीत ,राजाचा रंक कधी होईल हे कोणी सांगू शकत नाही ,आयुष्यात ही सर्व प्रत्यंतरे घडत असतांना मी ही व्यक्ती मात्र एकच असते मग हे करत असतांना मी कोण आहे हे विसरूनच जाते .माझं असं एक अस्तित्व आहे ,पण मी कोण आहे?एक बालक,युवा,वृद्ध अश्या विभिन्न अवस्थेतुन जाताना त्याचा अनुभव घेणारा मी कोणीतरी वेगळाच आहे,जो दिसतो तो खरा मी नव्हे,मग मी कोण आहे?तर मी कोण आहे हे समजून घेण्यासाठी निर्वाण षटकम या स्तोत्राचा अर्थ अगदी मनापासून समजून घेता आला पाहिजे .

प्रपंचातील सर्व नाती ,भूमिका पार पाडत असतांना खरा मी या सर्व गोष्टींच्या पलीकडे आहे याची जाण निर्माण होते आणि ही जाण हे चिदानंद स्थिती कडे टाकलेले पहिले पाऊल आहे. चित आनंद हा माझ्या अंतर्मनात भरून उरला आहे हे कळायला हवे ,मी  जगातील सर्व नाती ,सुख,दुःख या पलीकडे जाऊन ,मी आणि माझे काढून टाकता तेंव्हा आपण किंवा मी म्हणजे निराकार ,निर्विकार अश्या ब्रम्हांडाचा एक भाग शिवस्वरूप एका आणू रेणू एवढा अंश ,सर्वत्र व्याप्त असा सत चित आनंद आहे शिव स्वरूप आहे हे समजते ,शिव हा एक अखंड शांत बिंदू आहे ,आणि मी जेंव्हा सर्व शाश्वत गोष्टींचा विचार सोडून या बिंदूशी एकरूप होईल ,या बिंदू च्या आत जाऊन मनन ,चिंतन ,ध्यान करत एक वेगळाच जगाच्या पलीकडील शांततेचा अनुभव घेईल त्या अनुभूती ला चिदानंद स्वरूप कळेल.चिदानंद स्वरूप म्हणजेच आत्मसाक्षात्कार आहे ,तो जेंव्हा होईल तेंव्हाच आपल्या आतील शिवस्वरूप समजून येईल .जन्म आणि मृत्यू च्या पलीकडे शिव आहे त्याच्यामध्ये एकरूप होऊन स्वतःला ओळखणे म्हणजेच शिवोहम् होणे आहे .

सौ. मेधा महेश भंडारकवठेकर (८४२१४९५९५६)

**लेख क्र. ३७ : मंगळ आणि मूलधारा चक्र**

**लेखिका : अस्ट्रो वास्तू मनीषा (७३५००४२३६९)**

मंगळ आणि मूलधारा चक्र यांचा संबंध हा पृथ्वी तत्वाशी पण येतो मूलधारा चक्र हे पृथ्वी तत्वाशी संबंधित आहे आणि यावर मंगल या ग्रहाचा प्रभाव आहे मूलधारा चक्राचा बीज मंत्र हा मेडिटेशन मध्ये फार उपयुक्त ठरतो जर शरीरात मूलधारा चक्र संतुलित असते तर व्यक्ती स्वतःच्या कार्यात नेहमी यशस्वी ठरते आणि जर मूलधारा चक्र बिघडलेले असतील तर व्यक्तीचे स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची इच्छा कमी होते कारण की मूलधारा चक्र हे शरीरात रीडची हड्डी मांस यावर प्रतिनिधित्व करते मूलधारा चक्र असंतुलन झाले तर व्यक्तीच्या कमरेपासून री ढ हड्डी मध्ये वेदना जाणून येतात आणि व्यक्तीला बॅक पेन्स चा  त्रास होतो याचे असंतलन खूपच झाले तर स्त्रियांना गर्भाशयासंबंधात सुद्धा त्रास होतो कधी कधी युट्रेस आणि प्रोस्टेटचा कॅन्सर होण्याची सुद्धा शक्यता असते त्यामुळे हे चक्र शरीरामध्ये बॅलन्सिंग असणे खूप गरजेचे असते मूलधारा चक्रानुसार विचार केला असता मूलधारा चक्राचा बीज मंत्र मेडिटेशन करताना खूप उपयुक्त ठरतो तसेच या चक्राची शासकदेवता गणेशा आहे त्यामुळे गणपतीची उपासना सुद्धा खूप उपयुक्त ठरते त्याचप्रमाणे गणपती अथर्वशीर्ष श्रद्धापूर्वक पाठ केले असता पृथ्वीतत्व बॅलेंसिंग व्हायला मदत मिळते मंगळ हा स्नायूची कणखरता आणि बळकटपणा दर्शवत असतो त्याचप्रमाणे आजारातून उभारी येण्यास सुद्धा मदत करत असतो मंगळ हा मज्जा धातूचा कारक आहे मज्जेमध्ये जर संसर्ग विरुद्ध लढणाऱ्या पांढऱ्या रक्तपेशी आणि प्राणवायून येणाऱ्या लाल रक्तपेशी बनतात त्यामुळे लाल रक्तपेशी हा मंगळ दर्शवतो त्यामुळे शरीरामध्ये जर मंगळ बिघडला तर हिमोग्लोबिन किंवा बोन मॅरो चा सुद्धा त्रास होताना दिसून येतो या मंगळ या ग्रहाचा प्रभाव हा जास्त करून मूलधारा चक्राशी निगडित असल्यामुळे मंगळाची रोग येथूनच समजून येतात त्यामुळे मूलधारा चक्र शारीरिक दृष्ट्या खूप महत्त्वाचे आहे मंगळाचे रोग अचानक उद्भवणारे आणि दहा देणारे असतात मूलधारा चक्र आपल्या अंतर्मनामध्ये आणि जीवनामध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण करत असते त्यामुळे या चक्राला संतुलित ठेवणे खूप गरजेचे असते आरोग्यदायी शरीरासाठी मूलधारा चक्राचा जरूर विचार करावा. वास्तूमध्ये ब्रह्म स्थानाकडून ते दक्षिण नैऋत्य या स्थानांचा विचार करावा लागतो.

अस्ट्रो वास्तू मनीषा (७३५००४२३६९)

## लेख क्र. ३८ : वास्तुशास्त्रानुसार घरातील आग्नेय दिशा

## लेखिका : अस्ट्रो वास्तू मनीषा (७३५००४२३६९)

नमस्कार मित्रांनो आज आपण वास्तुशास्त्रानुसार घरातील आग्नेय दिशा पाहूया आणि अग्नी दिशेचा आणि ज्योतिष शास्त्राचा म्हणजेच आपल्या पत्रिकेतील ग्रहांचा काय संबंध आहे ते पाहूया अग्नेय दिशा अग्नी या दिशे त म्हणजे सूर्य हा अग्नी स्वरूपात असतो साधारणपणे सकाळी नऊ ते 11 काळात हा सूर्य जाणवतो पंचमहाभूत तत्व देखील अग्नी तत्व येथे जाणवते अग्नि हा एक संवादाचा माध्यम आहे आणि या माध्यमातून आपली अनेक कामे चालतात अग्नीदोष निर्माण झाली तर विचित्र घटना पाहिला मिळतात आग्नेय दिषेस दोष वाढले तर मित्रांकडून नुकसान आर्थिक हानी, चोरी, कर्जबाजारीपणा ,मनुष्याला लागलेल्या चिंता कधी कधी समाजात कलंक लागणे, निष्कारण दोष निर्माण होत असतात ,हे सर्व कशामुळे घडते वास्तूमध्ये कुठले दोष निर्माण होतात आणि पत्रिकेतील कुठली दोष दिसून येतात ,आज आपण हे पाहूया काल पुरुषाच्या कुंडलीनुसार एकादस स्थान म्हणजे लाभस्थान व व्ययस्थानात आग्नेय दिशेचा अंमल असतो .येथे अग्नीचे स्वरूप दिसून येते ही दिशा बिघडली तर पत्रिकेतील या स्थानात सुद्धा बिघड झालेला असतो आणि वास्तू आणि ज्योतिष यांचे कॉम्बिनेशन केले असता पत्रिकेतील दशाअंतर्गशा या काळातच जो बदल होतो ,तेव्हाच या घटना मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. बऱ्याच प्रमाणात चोरी, कर्जबाजारीपणा, आर्थिक नुकसान जास्त प्रमाणात दिसून येते. व घरामध्ये अशी काय बिघाड असतात उदाहरणार्थ अग्नीयस विहीर असणे हे एक बाधित गोष्ट आहे .समजा पत्रिकेत अग्नि तत्व बाधा आल्यास पंचम स्थान हे एकादस स्थानाची सातवे स्थान असल्यामुळे येथे अचानक संततीनाश होताना दिसून येतो. अग्नि दिशा वाढीव असेल तर महादोष मानावा लागतो. त्यामुळे त्याचा तीव्रपणे परिणाम वास्तूतील कर्त्या पुरुषाला भोगाव लागतो .अग्नीस कट येणे किंवा आग्नेय कोपरा अधिक वाढलेला असणे किंवा घटलेला असणे ही सुद्धा दोष असतात. या सर्व गोष्टी खूप काळजीने पहाव्या लागतात आग्नेय दिशा म्हणजे पूर्व आणि दक्षिणचा मध्य होय. घरातील अग्नी तत्व बॅलन्सिंग असणे खूप गरजेचे असते अन्यथा हा एक प्रमुख दोष ठरून संतती दोष, संततीचे अपघात घरातील मोठे आजारपण खर्चावर नियंत्रण नसले आरोग्याची प्रश्न न सुटणे वाढत्या मुलांबाबत प्रश्न न सुटणे, ही सर्व दोष दिसून तर येतात परंतु विवाह विषयक मुलांच्या अडचणी सुद्धा निर्माण होतात . व्ययस्थानाचा विचार येथूनच करावा ज्या घरात अग्नी दिशा जपली जाते त्या घरात ऐश्वर्या नांदताना दिसून येते. त्यामुळे बांधकाम करत असताना किंवा वस्तूची निवड करत असताना अग्नेय दिशेला महत्त्व देऊनच निवड करावी या दिशेत अग्नी तत्व असल्यामुळे घरातील गृहस्वामीचा आत्मविश्वास आणि आरोग्य येथून समजते. अग्नि दिशेत दोष असेल तर व्यक्तीने स्वतःअध्यात्मिक उपाय करून प्रगती करावी अध्यात्मिक उपाय करत असताना गणपतीची उपासना ही खूप महत्त्वाची ठरते .स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देत असताना आहारात बदल करून संतुलित असा आहार घेताना आत्मविश्वास वाढतील अशा प्राणायाम चा वापर दैनंदिन जीवनात करावा. कारण की अग्नी दिशा ही उपदिशांमधील एक दिशा आहे. त्यामुळे तिचा उद्रेक होणे योग्य नाही ज्याच्या घरात अग्नी दिशेत दोष आहे अशा लोकांनी स्वतःच्या अति अहंकारात आणि वागण्यात लक्ष ठेवावे. वस्तूतील शौचालय सुद्धा या दिशेस असणे योग्य नाही तसेच खड्डा, उतार ,सुद्धा योग्य दिसून येत नाही .अग्निधी स्वयंपाक घर हे एक उत्तम प्रतिक आग्नेय दिशेत मानले जाते .अग्नी दिशेला योग्य ती उंची असणे म्हणजे आग्नेय दिशाही ऐश्वर्या सुद्धा प्राप्त करून देत असते. आग्नेय दिशेचा दार हा आग्नेय अग्नी दिशेतील इतर देवता बघूनच निवडावा लागतो. लक्ष्मी पैकी धान्य लक्ष्मी या दिशेमध्ये असते आणि या दिशेचा ग्रह अधिपती शुक्र असतो त्यामुळे अग्नी दिशेचा विचार आणि ऊर्जेचा विचार योग्य बॅलेन्स साधूनच उपाय करावे लागतात .अग्नि रंगसंगतीचा विचार खूप विचार करून करावा लागतो कारण अग्नी दिशेतील बळ हे रंगावर सुद्धा अवलंबून असते म्हणून प्रत्येकाने आपल्या घरातील आग्नेय दिशा बॅलन्स करून स्वतःची प्रगती साधावी अग्नी दिशेत स्त्रियांची वास्तव्य जास्त काळ असल्यास परिणामी त्यांच्या कार्यक्षेत्रावर सुद्धा परिणाम घडून येतो म्हणून आग्नेय दिशेतील किचन सुद्धा बॅलेंसिंग करून सूर्यकिरणांचा सुद्धा विचार करावा जेणेकरून स्वयंपाक घरातील अन्न शिजवताना निर्जं तुकी करण जाणवेल आग्नेय दिशेत उत्तम पद्धतीने किचन जर असेल तर उत्कृष्ट पाककृती तयार होतात

आणि आरोग्यदायी विकास होताना दिसून येतो कारण या दिशेमध्ये कारकता शुक्र ग्रहाची आहे त्यामुळे ही दिशा सांभाळणे फार गरजेचे आहे.

लेखिका : अस्ट्रो वास्तू मनीषा (७३५००४२३६९)

## लेख क्र. ३९ : विवाह योग

## लेखिका : डॉ. भारती मधुकर खटावकर (८९५६८०३४६६)

लग्नस्थानात किंवा सप्तम स्थानात जर शनी किंवा बुधाच्या राशी असतील म्हणजेच शनी च्या राशी मकर व कुंभ आणि बुधाच्या राशी म्हणजे मिथुन आणि कन्या असतील तर त्या जाताकाचा विवाह 30 ते 32 या वयात होतो.

2) जर लग्नस्थानात आणि सप्तम स्थानात राहू असेल तर 28 वयाच्या आधी विवाह होणार नाही असे जातकाला ठामपणे सांगू शकतो.

जर जातकाचा विवाह 28 वर्षाच्या आत झाला तर घटस्फोट होण्याची शक्यता आहे असे आपण सांगू शकतो.

3) सप्तम स्थानी जर गुरु असेल तर गुरु चे वय 16 ते 28 वर्ष आहे. सध्याच्या काळात सोळाव्या वर्षी विवाह होत नाही. आणि ते कायद्यानेही अमान्य आहे. म्हणून गुरुचे हे वय बाद झाले आहे. यावरून जातकाचा विवाह 28 व्या वयाच्या आधी करू नये असे सांगावे विवाह 28 व्या वर्षाच्या आधी झाला तर जातकाला वैवाहिक समस्यांना सामोरे जावे लागेल असेही आपल्याला ठामपणे सांगता येते. या सर्व विवेचनावरून व नियमावरून आपल्या लक्षात आलेच असेल की प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात वयाप्रमाणे घटना घडतात. ग्रहांच्या वयानुसार आणि जातकाच्या कुंडलीतील ग्रहांच्या वयानुसार आपण जातकाला त्याचे विवाहाचे योग कधी आहे हे अचूकपणे सांगू शकतो. विवाहाचे योग्य वय समजल्यामुळे जातक ही समाधानी होतो. योग्य वयात विवाह केल्यास वैवाहिक सुख उत्तम मिळते. पण जर विवाह योग्य वयाच्या आधी झाला तर मात्र जातकाच्या वैवाहिक सुखात अनेक प्रश्न निर्माण होताना दिसून येतात.

ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासातून आपण जातकाला विवाह योगाचे योग्य मार्गदर्शन करू शकतो

डॉ. भारती मधुकर खटावकर (८९५६८०३४६६)

**लेख क्र. ४० : "श्रीयंत्र"**

**लेखक : डॉ. भारती मधुकर खटावकर (८९५६८०३४६६)**

श्री स्वामी समर्थ

ऐश्वर्य, धन,समृद्धी,निरोगी आयुष्य आणि आरोग्य देणारे हे "श्रीयंत्र"आहे. हे श्री यंत्र श्रीकृष्णाच्या हृदयातून निघाले आहे. अष्टलक्ष्मी ची प्राप्ती करून देणारे हे श्रीयंत्र आहे कोल्हापूरची महालक्ष्मी व तिरुपती बालाजी हे श्रीमंत देव मानले जातात. या देवतांच्या मंदिरामध्ये हे श्रीयंत्र दगडावर कोरलेले आढळते. अशा या श्री यंत्राचे फायदे खालील प्रमाणे आहेत.-

1) श्री यंत्रावरील टोकदार बिंदूमधून आनंद,सुख,शांती, आणि समाधान मिळते.

2) जातकाच्या घराला संरक्षण प्राप्त होते.

3) घरातील रोग आणि आजारपण निघून जाते .

4) स्त्रियांचे सौभाग्य अखंड राहते.

5) हाती घेतलेल्या सर्व कार्यात यश प्राप्ती मिळते.

6) सर्व इच्छा,आशा, आकांक्षाची पूर्ती होते.

7) रंकाचा राव बनवण्याचे सामर्थ्य या श्री यंत्रात आहे.

8) या श्री यंत्रामुळे घरातील आर्थिक प्रश्न हळूहळू सुटू लागतात.

9) डोक्यावर कर्ज असेल तर ते फिटायला सुरुवात होते.

10) कोणाकडून पैसे येणे असतील तर ते पैसे हळूहळू येऊ लागतात.

11) घरातील सर्व प्रकारचे आर्थिक प्रश्न हळूहळू मार्गी लागतात.

12) घराची आर्थिक स्थिती मजबूत होते.

असे हे सर्व सिद्धी प्राप्त करून देणारे "श्रीयंत्र " महालक्ष्मीचे प्रिय यंत्र आहे. ज्या घरात श्रीयंत्र आहे त्या घरात लक्ष्मीचा वास अखंड राहतो.

असे हे ओरिजनल, सिद्ध केलेले श्रीयंत्र ज्यांनी घेतले आहे, त्या सर्वांनी अक्षय तृतीयेच्या दिवशी या श्री यंत्राची आपल्या देवघरात स्थापना करणे. 11वेळा श्री सूक्त,11 वेळा महालक्ष्मी अष्टक, 11 वेळा "ओम श्री महालक्ष्मी दैवे नमः " मंत्राचा जप करणे. महालक्ष्मीला मनोभावे प्रार्थना करणे.

जसे जमेल तसे अष्टमी, नवमी,दशमी एकादशी, द्वादशी आणि त्रयोदशी या तिथींवर या श्री यंत्राला अभिषेक करावा. असे हे लक्ष्मीदायक श्री यंत्र आपल्या सर्वांच्या घरात सुख, शांती, समाधान,समृद्धी, ऐश्वर्य प्रदान करो ही स्वामी समर्थ चरणी प्रार्थना □□

डॉ. भारती मधुकर खटावकर (८९५६८०३४६६)

**लेख क्र. ४१ : षडबल रहस्य**

**लेखक : श्री. अजय भास्करराव पाठक (९१११०२१७०९)**

श्री गणेशाय नमः

भृगू ऋषी, पराशर ऋषी आणि जैमिनी ऋषी या त्रिऋषींना नमस्कार.

षडबल पराशर ऋषी द्वारा दिलेल्या अमोघ शस्त्र आहे.

ग्रहाना सहा विविध पद्धतीने मिळणारे बळ प्राप्त होते त्यालाच षडबल म्हणतात.

जन्म कुंडली आणि षडबल असे एकूण सात फलादेश ला पुरक सप्त समुद्रआहेत यांची याप्ती आणि खोली खूप मोठी आहे, षडबल अभ्यास करताना तुम्हाला संपूर्ण ज्योतिष शास्त्राचा अभ्यास होऊ शकतो,

षडबल अभ्यासाशिवाय ज्योतिष्य पूर्ण होऊ शकत नाही आणि फलादेशही करू शकत नाही.

षडबल काढताना तुम्हाला सर्व ज्योतिष शास्त्राचा आपोआपच समजत जाते. कुंडलीचे षडबल अभ्यासले पाहिजे, विषय खूप मोठा आहे संक्षिप्त स्वरुपात माहिती घेऊ,

षडबल म्हणजे काय?

1. स्थान बल/ स्थानीय बल :
2. दिगबल :
3. काल बल :
4. चेष्टा बल :
5. नैसर्गिक बल :
6. दृष्टि बल :

1-स्थान बल/स्थानिक बल:

स्थान शक्ती, ज्याला आपण स्थानिक बल देखील म्हणतो, च्या मदतीने व्यक्तीला ग्रह शक्ती प्राप्त होते. सोप्या शब्दात सांगायचे तर, ही शक्ती एखाद्या व्यक्तीच्या जन्मपत्रिकेत विशेषत: शुभ स्थितीत कोणत्याही ग्रहाच्या उपस्थितीने प्राप्त होते. ज्योतिष शास्त्रात जेव्हा कुंडलीत मूल त्रिकोण, अनुकूल राशी, स्व राशी, उच्च राशी किंवा षडवर्गात ग्रह असतो तेव्हा ही शुभ स्थिती निर्माण होते. स्थानबल मध्ये खालील उपप्रकार आहेत उच्च बल , सप्तवर्गज बल , ओजयुग्मरस्यांश बल, केन्द्र बल, द्रेष्काण बल

2-दिग्बल:

दिग्बल म्हणजे त्या ग्रहाची शक्ती आणि ती शक्ती जी व्यक्तीच्या कुंडलीतील विशिष्ट स्थानावर त्या विशिष्ट ग्रहाला दिग्बली बनवते. ज्योतिषशास्त्रीय नियम समजून घेतल्यास, कुंडलीच्या दहाव्या घरात सूर्य आणि मंगळ शक्ती प्राप्त करतात. पण चंद्र आणि शुक्र सुखाच्या घरात म्हणजेच चौथ्या घरात बलवान आहेत. तर बृहस्पति आणि बुध हे ग्रह लग्नात असताना शक्ती प्राप्त करतात. याशिवाय कर्म देणारा शनि कुंडलीच्या सातव्या घरात दिग्बली बनतो.

3-काल बल :

आपण काल बल द्वारे ग्रहाची ताकद निश्चित करतो. या ग्रहांची शक्ती एका ठराविक वेळी वाढते किंवा कमी होते. ज्योतिषशास्त्राच्या नियमांनुसार प्रत्येक अशुभ ग्रह कृष्ण पक्षात बलवान असतो, तर शुक्ल पक्षात शुभ ग्रह बलवान असतो. विशेष ग्रहांबद्दल बोलायचे झाल्यास, चंद्र, मंगळ आणि शनि विशेषतः रात्रीच्या वेळी बलवान मानले जातात. यामुळे जर एखाद्या व्यक्तीचा जन्म रात्री झाला असेल तर त्याच्या कुंडलीत चंद्र, मंगळ आणि शनि बलवान असतात. आणि सूर्य, शुक्र आणि गुरु या ग्रहांना दिवसा बली मानले जाते. याशिवाय बुध ग्रहाला रात्र आणि दिवस दोन्ही वेळेत बली मानतात.

काल  बल चे उपप्रकार

नतोनंत बल , पक्ष बल ,त्रिभाग बल, मास बल, वार बल, होरा बल, अयन बल, युद्ध बल .

4-चेष्टा बल :

चेष्टा बाल सामान्यत: ज्योतिषशास्त्रातील एक गतिशील शक्ती आहे. मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि शनि यांना त्यांच्या वक्री अवस्थेतच शक्ती प्राप्त होते, असा नियम आहे. तर जेव्हा सूर्य मकर, कुंभ, मीन, मेष, वृषभ किंवा मिथुन म्हणजे उत्तरायणात असतो तेव्हा सूर्य आणि चंद्र बल प्राप्त करतात.

5-नैसर्गिक शक्ती:

नैसर्गिक शक्ती, एक प्रकारे, ग्रहांना नैसर्गिक शक्ती प्रदान करण्यात मदत करते. वैदिक ज्योतिषशास्त्राच्या नियमांनुसार, सर्व ग्रहांमध्ये, सूर्यदेवाला सर्वात जास्त शक्ती मिळते, तर शनिला सर्वात कमी शक्ती मिळते. याशिवाय राहू-केतू वगळता सात ग्रह: सूर्य, चंद्र, शुक्र, गुरु, बुध, मंगळ आणि शनि त्यांच्या क्रमानुसार सर्वात जास्त आणि कमी बलवान आहेत असाही नियम आहे.

6-दृष्टि बल :

दृष्टी बल ही अशी शक्ती आहे जी कोणत्याही शुभ ग्रहाच्या पैलूमुळे वाढते, परंतु अशुभ ग्रहाच्या पैलूमुळे कमी होत

षडबल  रूपा मध्ये मोजतात

1रूपा = 60 षष्ठांश

1. स्थान बल:   480 षष्ठांश
2. दिगबल :      60 षष्ठांश
3. काल बल :   390 षष्ठांश
4. चेष्टा बल :    60 षष्ठांश
5. नैसर्गिक बल : 60 षष्ठांश
6. दृष्टि बल :   60 षष्ठांश

------------------------------------------------------------------------------------

1110 षष्ठांश रूपा 18.5

ग्रहाला सर्वात जास्त षडबल 1110 षष्ठांश किवां 18.5 रूपा मिळतात.

षडबल मध्ये सर्वात जास्त बल स्थान बल: नंतर काल बल : आहे.

मोबाईल ॲप मध्ये आपणास षडबल व ग्राफ आपणास तयार मिळतो

उदाहरण






**षडबल कोष्टक**

| | सूर्य | चंद्र | मंगळ | मेर | जूप | वेन | सेट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उच्च बल | 29.56 | 52.61 | 25.75 | 47.42 | 44.82 | 20.34 | 18.48 |
| सप्तवर्गज बल | 114.38 | 135 | 105 | 138.75 | 120 | 99.38 | 90 |
| ओजयुग्मरस्यांश बल | 15 | 15 | 15 | 30 | 15 | 15 | 15 |
| केंद्र बल | 15 | 15 | 60 | 60 | 60 | 15 | 60 |
| द्रेष्काण बल | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| एकूण स्थान बल | 173.94 | 217.61 | 205.75 | 276.17 | 239.82 | 164.72 | 183.48 |
| एकूण दिग बल | 36.89 | 7.04 | 57.07 | 58.22 | 35.84 | 28 | 52.46 |
| नतोनंत बल | 35.33 | 24.67 | 24.67 | 60 | 35.33 | 35.33 | 24.67 |
| पक्ष बल | 29.84 | 60.31 | 29.84 | 30.16 | 30.16 | 30.16 | 29.84 |
| त्रिभाग बल | 0 | 0 | 0 | 60 | 60 | 0 | 0 |
| अब्द बल | 0 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| मास बल | 0 | 0 | 0 | 30 | 0 | 0 | 0 |
| वार बल | 45 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| होरा बल | 60 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अयन बल | 107.97 | 13.26 | 56.83 | 43.95 | 58.64 | 48.73 | 35.64 |
| युद्ध बल | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण काल बल | 278.14 | 113.24 | 111.34 | 224.11 | 184.13 | 114.22 | 90.16 |
| एकूण चेष्टा बल | 48.16 | 30.16 | 31.95 | 43.06 | 19.14 | 11.16 | 45.54 |
| एकूण नैसर्गिक बल | 60 | 51.42 | 17.16 | 25.74 | 34.26 | 42.84 | 8.58 |
| एकूण द्रिक् बल | -15.66 | 6.85 | -13.9 | -16.47 | -19.26 | -12.23 | 15.76 |
| एकूण षड्बल | 581.47 | 426.33 | 409.37 | 610.83 | 493.93 | 348.7 | 395.97 |
| षड्बल (रुपस) | 9.69 | 7.11 | 6.82 | 10.18 | 8.23 | 5.81 | 6.6 |
| न्यूनतम आवश्यकता | 5 | 6 | 5 | 7 | 6.5 | 5.5 | 5 |
| अनुपात | 1.94 | 1.18 | 1.36 | 1.45 | 1.27 | 1.06 | 1.32 |
| तुलनात्मक क्रम | 1 | 6 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |

इथे कुंडली अॅप मध्ये दिलेला हा एक ग्राफ आहे

यात 1 ते 7 असे गुण मिळतात

1 म्हणजे सर्वात उत्तम षडबल

7 म्हणजे सर्वात कनिष्ठ षडबल

वरील चार्ट मध्ये सूर्य ग्रह समोर 1 लिहिलेला आहे म्हणजे कुंडली मध्ये सूर्याचे षडबल सर्वात जास्त आहे

चंद्र ग्रह समोर 6 लिहिलेला आहे म्हणजे कुंडली मध्ये चंद्रा चे षडबल कमी आहे

शुक्र ग्रह समोर 7 लिहिलेला आहे म्हणजे कुंडली मध्ये शुक्रा चे षडबल अत्यंत कमी आहे

याप्रमाणे इतर ग्रह समजावे

यात 1 ते 7 असे गुण कसे मिळतात हे पाहू

वरील कुंडलीत सूर्य या ग्रहाला एकूण षडबल 581.47 षष्ठांश आहेत ,

581.47 षष्ठांश म्हणजे 581.47 /60 = 9.69 रूपा . सूर्य या ग्रहाची न्यूनतम आवश्यकता 5 रूपा आहे ,

अनुपात काढण्यासाठी रूपा/ न्यूनतम आवश्यकता

अनुपात = 9.69 रूपा / 5 रूपा = 1.94

याप्रमाणे सर्व (सात) ग्रहाचे अनुपात काढवेत,

| ग्रह | अनुपात | गुण |
|---|---|---|
| सूर्य | 1.94 | 1 |
| चंद्र | 1.18 | 6 |
| मंगल | 1.36 | 3 |
| बुध | 1.45 | 2 |
| गुरु | 1.27 | 5 |
| शुक्र | 1.06 | 7 |
| शनी | 1.32 | 4 |

अनुपात गुण याचे जास्त ते कमी या प्रमाणात वर्गीकरण करावे

सर्वात जास्त अनुपात गुण या ग्रहाला 1 गुण ,

सर्वात कमी अनुपात गुण या ग्रहाला 7 गुण द्यावे

या नुसार ग्राफ मध्ये गुण मिळतात, षडबल मध्ये एक म्हणजे उत्तम षडबल सात म्हणजे अति अल्प षडबल .

1 ते 3 उत्तम षडबल 4 ते 5 मध्यम षडबल 6 ते 7 अल्प षडबल

षडबल फलादेश क्रमश--------

श्री. अजय भास्करराव पाठक (९१११०२१७०९)

**लेख क्र. ४२ : प्रश्न मंजुषा**

**लेखक : श्री. अजय भास्करराव पाठक (९१११०२१७०९)**

**प्रश्नमंजुषा** ज्यो.अजय पाठक नांदेड

**1)वेदाची सहा अंगे कोणती?**

वेदाचे सहा अंग म्हणजे षडंग (षड् + अंग) अशी ओळखली जातात. ही सहा अंगे वेदाच्या अभ्यासासाठी आणि समजण्यासाठी महत्त्वाची मानली जातात. ती पुढीलप्रमाणे आहेत:

**छंदशास्त्र, कल्पसूत्रे,ज्योतिष, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण ही सहा शास्त्रे**

ही षडंग वेदांच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक, आणि वैज्ञानिक बाजूंचे स्पष्टीकरण आणि अभ्यास करण्यासाठी उपयुक्त आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या वेदांना व्यक्ती मानून सहा उपयुक्त शास्त्रे ही त्या व्यक्तीची अंगे म्हणजेच अवयव आहेत अशी कल्पना केली आहे. हीच सहा शास्त्रे म्हणजे वेदांगे होत. छंदशास्त्र, कल्पसूत्रे,ज्योतिष, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण ही सहा शास्त्रे वेदवाङ्मयाचे अनुक्रमे पाय, हात, डोळे, कान, नाक आणि मुख आहे अशी कल्पना केली आहे

**१) शिक्षा (Shiksha): उच्चारण, स्वर, उच्चाराचे नियम इत्यादींचे शिक्षण.**

शिक्षा - ॐ शीक्षां व्याख्यास्यामः ।वर्णः स्वरः । मात्रा बलम् ।साम सन्तानः । इत्युक्तः शिक्षाध्यायः ॥ १ ॥

म्हणजेच स्वर-व्यंजनांची संख्या, स्वरांचे संतुलन आणि परस्परसंबंध यांचा अभ्यास म्हणजे शिक्षा होय.

**२) कल्प (Kalpa): यज्ञकर्मकांड आणि धार्मिक विधींचे नियम.**

कल्पसूत्रे:श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, शुल्बसूत्रे आणि धर्मसूत्रे अशा चार प्रकारच्या ग्रंथांना कल्पसूत्रे असे म्हणतात.

यज्ञवेदी कशी असवी तसेच जन्म पासून मर्तुकीचे पर्यंत संस्कार मनुष्य ने कसं वागावं या संदर्भात सुत्रे

**३) व्याकरण (Vyakarana): भाषाशास्त्र, व्याकरणाचे नियम.**

निरुक्त:वैदिक मंत्रांचा अर्थ समजण्यासाठी निरुक्ताचा उपयोग होतो. निरुक्त म्हणजे शब्दाची व्युत्पत्ती. वैदिक शब्दांचा अर्थ दुर्बोध होऊ लागल्यावर एक समानार्थी शब्दांचा कोश तयार करण्यात आला होता त्याला निघण्टु असे म्हणत

**४) निरुक्त (Nirukta): शब्दांचे व्युत्पत्तीशास्त्र आणि व्याख्या.**

व्याकरण:वैदिक मंत्रांचे अर्थ समजण्यासाठी निरुक्ताच्या जोडीला व्याकरणाचीही आवश्यकता असते. व्याकरणामुळे शब्दाची नेमकी जात आणि रूप ओळखता येते. पाणिनी ऋषींनी लिहिलेला अष्टाध्यायी हा ग्रंथ व्याकरणावरील सर्वोत्कृष्ट ग्रंथ समजला जातो.

**५) छन्द (Chhanda): छंदशास्त्र, पद्यांचे नियम आणि छंदांचे प्रकार.**

छन्दःशास्त्र:वैदिक पद्यमंत्र विशिष्ट छंदांमध्ये रचलेले होते. यज्ञात ते त्या छंदात म्हटले जात. छंदाची शास्त्रीय माहिती छन्दःशास्त्र या ग्रंथात दिलेली आहे. सध्या उपलब्ध असलेले छन्दःशास्त्र पिंगलाचार्यांनी रचलेले आहे. संस्कृत भाषेमध्ये ७ प्रमुख छंद सांगितले आहेत.गायत्री, अनुष्टुप्, त्रिष्टुभ, जगती,उष्णिह, बृहति,पङ्क्ती हे ते सात छंद आहेत.

**६) ज्योतिष (Jyotisha): खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र, समयमान आणि ग्रहणाचे अध्ययन.**

ज्योतिष:ज्योतिः म्हणजे चमकणारे, प्रकाशणारे म्हणजेच आकाशातले ग्रहगोल. त्यांचे शास्त्र म्हणजे ज्योतिषशास्त्र ! कोणताही विधी करण्यासाठी योग्य वेळ, योग्य ऋतू कोणता हे ज्योतिषशास्त्र सांगते. लगधाचा वेदाङ्गज्योतिष हा या शास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ आहे.

**2) भारतीय ज्योतिष शास्त्राची तीन स्कंद कोणते?**

भारतीय ज्योतिष शास्त्रातील तीन मुख्य स्कंधे (शाखा) आहेत: **सिद्धान्त' संहिता होरा**

१. सिद्धान्त''सिद्धान्त' या विभागात प्रामुख्याने ग्रहगणित आहे. ग्रहांची स्थिती संवत्सर, अयन, मास, व कालनिर्णय या विषयांचा सिद्धान्तामध्ये समावेश केला आहे सिद्धान्त (Siddhanta): या शाखेत खगोलशास्त्र (Astronomy) आणि गणिताचे (Mathematics) अध्ययन केले जाते. सिद्धान्त ज्योतिष शास्त्रात ग्रह, तारे, सूर्य, चंद्र यांची गती, स्थिती आणि त्यांचे भौतिक गुणधर्म विचारात घेतले जातात. त्यामध्ये कालगणना, ग्रहण, राशींचे स्वामी, आणि ग्रहांची दिशा इत्यादींचा समावेश होतो.

२. 'संहिता' या विभागात प्रामुख्याने नक्षत्र मालेतील ग्रहांची भ्रमणे, ग्रहणे वैगरे गोष्टींचा विचार केला जातो. तसेच यागोष्टींवरून शुभाशुभ फले व मुहूर्त विचार हे विषय यात सामावलेले आहेत संहिता (Samhita): या शाखेत ज्योतिष

शास्त्राचा सामान्य जनजीवनावर कसा प्रभाव पडतो हे अभ्यासले जाते. संहिता ज्योतिष शास्त्रात देश, समाज, निसर्ग आपत्ती, आणि वातावरणावर ग्रहांचा कसा प्रभाव असतो, याचा विचार केला जातो. नाडी ज्योतिष, वास्तुशास्त्र, आणि मुहूर्तशास्त्र यांचा यामध्ये समावेश होतो.
३.'होरा' या विभागात प्रामुख्याने मनुष्याच्या जन्मकालच्या ग्रहस्थितीवरून शुभाशुभ फले याचा विचार केला जातो. याला 'जातक विभाग' असेही म्हणतात, होरा (Hora): या शाखेत व्यक्तीच्या जीवनावर ग्रहांचा प्रभाव कसा असतो, हे अभ्यासले जाते. होरा ज्योतिष शास्त्रात जन्मपत्रिका (कुंडली) तयार करणे, राशी फल, ग्रहयोग, दशा, आणि योग इत्यादींचा अभ्यास केला जातो.ही तीन स्कंधे ज्योतिष शास्त्राच्या विविध पैलूंचा समग्र आकलन देतात.

**3) जन्म कुंडलीत प्रजापतीचे स्थान कोणते?**

प्रजापती येथे पती याचा अर्थ मालक जो प्रजेची निर्मिती करतो तो उत्पत्ती, स्थिती,लय यांचे कारकत्व अनुक्रमे ब्रह्मा विष्णु महेश यांच्याकडे आहे म्हणून येथे प्रजापती अर्थात ब्रह्मदेव होय. मग आपल्या जन्म लग्न कुंडलीत लग्न स्थान प्रथम कारण आपण स्वतः असतो मग त्यानंतर कुंडलीतील स्थानाप्रमाणे इतर निर्मिती होत असते. प्रजापती अर्थात हर्षल ग्रह होय हर्षल ग्रहाकडे मंगळासारखा स्फोटकपणा आहे तर बुधासारखी बुध्दी आहे हर्षल संशोधनाचा कारक ग्रह आहे लग्न स्थान म्हणजे आपले डोके कोणताही सारासार विचार करताना बुध्दीचा वापर करतो आपण म्हणून हर्षल अर्थात प्रजापती ग्रहाचे स्थान हे लग्न स्थान असावे

**4) क्षितिज म्हणजे काय?**

क्षितिज म्हणजे आकाश आणि पृथ्वी किंवा पाण्याचा सपाट भाग जिथे एकमेकांना भेटतात तो दृश्य रेखा. क्षितिज हा आपल्याला दिसणाऱ्या नजरेच्या कक्षेतला आकाशाचा आणि पृथ्वीचा (किंवा पाण्याचा) संयोगबिंदू आहे. या ठिकाणी आकाश जमिनीला (किंवा समुद्राला) भेटते असे दिसते, परंतु खरेतर ते एक ऑप्टिकल भ्रम आहे.
**क्षितिजाचे दोन प्रकार आहेत:**
**वास्तविक क्षितिज (True Horizon):** हे समुद्रसपाटीच्या किंवा पृथ्वीच्या सपाट क्षेत्राच्या पातळीवरून पाहिलेल्या क्षितिजाला म्हणतात. हे आपल्या नजरेत असलेल्या सर्वात दूरच्या बिंदूपर्यंत विस्तारलेले असते.
**दृश्य क्षितिज (Apparent Horizon):** हे वास्तविक क्षितिजाचे एक दृश्यरुप आहे, जेव्हा आपल्याला आकाशाच्या आणि पृथ्वीच्या संयोगाचा भास होतो. वास्तविक क्षितिज आणि दृश्य क्षितिज यांच्यात फरक असू शकतो, कारण दृश्य क्षितिज पाहणाऱ्याच्या उंचीवर अवलंबून असते.
**क्षितिज :** एखाद्या विस्तीर्ण व सपाट माळावर किंवा समुद्रावर उभे राहून सभोवार पाहिले असता, आकाश पृथ्वीला वर्तुळाकार रेषेत चिकटलेले दिसते, या वर्तुळाला क्षितिज म्हणतात. हे दृश्य क्षितिज होय. घरे, डोंगर, झाडे, समुद्रावरच्या लाटा इ. अडथळ्यांमुळे सपाट व विस्तीर्ण भाग सापडणे कठीण आहे परंतु जेवढा असा भाग दिसेल त्यावरून पूर्ण क्षितिजाची कल्पना येते. पृथ्वीच्या गोलपणामुळेच क्षितिज वर्तुळाकार दिसते. दृश्य क्षितिज हा पृथ्वीचा भाग आहे. पृथ्वीच्या गोलाची कड मधे आल्यामुळे या वर्तुळाच्या पलीकडील पृथ्वीचा भाग आपणास दिसत नाही. दृश्य क्षितिज हे अमर्याद नाही

**5) सौर मालिकेतील ग्रहांचा क्रम विशद करा?**
सौरमालेतील ग्रहांचा क्रम सूर्यापासून त्यांच्याअंतरानुसार - **बुध, शुक्र, पृथ्वी, मंगल, बृहस्पति, शनि, अरुण, वरुण**
**बुध (Mercury):** सूर्याच्या सर्वात जवळचा ग्रह.
**शुक्र (Venus):** आकाराने आणि रचनांने पृथ्वीसारखा असणारा, परंतु अत्यंत उष्ण व विषाक्त वातावरण असलेला ग्रह.
**पृथ्वी (Earth):** सौरमालेतील एकमेव जीवनधारणक्षम ग्रह, ज्यावर पाणी आणि योग्य तापमान आहे.
**मंगळ (Mars):** लाल ग्रह म्हणून ओळखला जाणारा, कारण त्याच्या मृत्तिकेतील लोखंडामुळे त्याला लाल रंग दिसतो.
**बृहस्पति (Jupiter):** सर्वात मोठा ग्रह, ज्याचे मोठे वादळ आणि मोठे लाल डाग प्रसिद्ध आहेत.
**शनी (Saturn):** सुंदर वलयांनी वेढलेला ग्रह.
**अरुण (Uranus):** वायूच्या घटकांमुळे निळा-हिरवट दिसणारा ग्रह, जो त्याच्या ध्रुवांवर झुकलेला आहे.
**वरुण (Neptune):** सौरमालेतील सर्वात बाहेरील आणि अत्यंत थंड ग्रह, ज्याचे वातावरण मोठ्या वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे.




**6) सूर्याभोवती सर्व ग्रहांच्या प्रदक्षिणा काळ विशद करा?**

सूर्याभोवती सर्व ग्रहांना प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ (किंवा प्रदक्षिणा काळ) प्रत्येक ग्रहासाठी भिन्न असतो. हा काळ ग्रहाच्या सूर्यापासूनच्या अंतरावर अवलंबून असतो. ग्रहांचा प्रदक्षिणा काळ खालीलप्रमाणे आहे:

**बुध (Mercury): सुमारे 88 पृथ्वी दिवस**
**शुक्र (Venus): सुमारे 225 पृथ्वी दिवस**
**पृथ्वी (Earth): सुमारे 365.25 दिवस (1 वर्ष)**
**मंगळ (Mars): सुमारे 687 पृथ्वी दिवस**
**बृहस्पति (Jupiter): सुमारे 11.86 पृथ्वी वर्षे**
**शनी (Saturn): सुमारे 29.45 पृथ्वी वर्षे**
**अरुण (Uranus): सुमारे 84.02 पृथ्वी वर्षे**
**वरुण (Neptune): सुमारे 164.79 पृथ्वी वर्षे**

## ६ ग्रह, राशी, वास्तव्य, तक्ता

| ग्रह | कालावधी | फल |
|---|---|---|
| रवि | १ महिना | पहिल्या पाच दिवसात फल |
| चंद्र | सव्वादोन दिवस | शेवटची तीन घटिका फल |
| मंगळ | दीड महिना | शेवटच्या आठ दिवसात फल |
| बुध | १ महिना | सर्व महिनाभर फल |
| गुरु | १३ महिने | मध्यावधी 2 महिने फल |
| शुक्र | १ महिना | मधल्या सात दिवसांत फल |
| शनि | 30 महिने | शेवटचे ६ महिने फल |
| राहू, केतु | १८ महिने | शेवटच्या २ महिन्यात फल |
| हर्षल | साडे सात वर्ष | अनिश्चित फल |
| नेप्यून | १४ वर्ष | अनिश्चित फल |

**7) अक्षांश रेखांश म्हणजे काय?**

**अक्षांश:**

उत्तर ध्रुवापासून ते दक्षिण ध्रुवापर्यंत विषववृत्ताला समांतर दर एका अंशावर काढलेल्या काल्पनिक वर्तुळाकार रेषा वृत्तांना अक्षांश म्हणतात विषुववृत्ताच्या उत्तरेकडे ९० अक्षांश आणि दक्षिणेकडे ९० अक्षांश. पृथ्वीच्या दोन ध्रुव बिंदूमध्ये १८०° अंतर आहे. ध्रुव बिंदुपासून ९०° अंतरावर पृथ्वीच्या पृष्टभागावरून जाणारे वर्तुळ तयार केले असता त्या वर्तुळास विषववृत्त असे म्हणतात. या वर्तुळावर जी वर्तुळे येतात त्यास अक्षवृत्त असे म्हणतात. दोन अक्षवृत्तावरील अंतरास अक्षांश असे म्हणतात.




**रेखांश :** पृथ्वीच्या एका धृवबिंदुपासून निघून अक्षांश वृत्तांना व विषववृत्ताला छेदून दुसऱ्या धृवबिंदुला जाऊन जी अर्धवर्तुळे येतात त्यास रेखावृत्त असे म्हणतात. भूपृष्टावरील पूर्व पश्चिम अंतर याच्याच सहायाने मोजतात. ईंग्लंड मधील ग्रीनीज शहरावरून जाणारे रेखावृत्त दर्शक समजतात. अशी एकूण ३६० रेखावृत्ते आहेत.

**8) विषुववृत्त कर्कवृत्त आणि मकरवृत्त यांची थोडक्यात माहिती सांगा? (आकृतीसह सांगितल्यास उत्तम )**



विषुववृत्त, कर्कवृत्त, आणि मकरवृत्त हे पृथ्वीवरील काही प्रमुख अक्षांशीय रेषा आहेत. यांचा उपयोग पृथ्वीवरील स्थान, हवामान, आणि सूर्याच्या स्थितीशी संबंधित माहिती मिळवण्यासाठी होतो.




**विषुववृत्त (Equator):**वर्णन: विषुववृत्त ही पृथ्वीच्या मध्यभागातून जाणारी अक्षांशीय रेषा आहे, जी पृथ्वीला उत्तर आणि दक्षिण गोलार्धात विभाजित करते. अक्षांश: 0° अक्षांश.विशेषता: विषुववृत्तावर सूर्य वर्षातून दोनदा, मार्च आणि ऎंबरमध्ये विषुव (Equinox) होतो, ज्यावेळी दिवस आणि रात्र समसमान असतात.

**कर्कवृत्त (Tropic of Cancer):**वर्णन: कर्कवृत्त ही उत्तर गोलार्धातील एक अक्षांशीय रेषा आहे.अक्षांश: अंदाजे 23.5° उत्तर अक्षांश.विशेषता: कर्कवृत्तावर सूर्य 21 जूनच्या आसपास सरळ डोक्यावर (Zenith) असतो, ज्याला "गृष्म क्रांति" (Summer Solstice) म्हणतात. यावेळी उत्तर गोलार्धात सर्वात मोठा दिवस आणि सर्वात लहान रात्र असते.

**मकरवृत्त (Tropic of Capricorn):**वर्णन: मकरवृत्त ही दक्षिण गोलार्धातील एक अक्षांशीय रेषा आहे.अक्षांश: अंदाजे 23.5° दक्षिण अक्षांश.विशेषता: मकरवृत्तावर सूर्य 21 डिसेंबरच्या आसपास सरळ डोक्यावर असतो, ज्याला "शीत संक्रांति" (Winter Solstice) म्हणतात. यावेळी दक्षिण गोलार्धात सर्वात मोठा दिवस आणि सर्वात लहान रात्र असते. ही रेषा पृथ्वीच्या परिभ्रमण आणि अक्षाच्या झुकावामुळे निर्माण होतात. विषुववृत्त, कर्कवृत्त, आणि मकरवृत्त यांच्या आधारावर पृथ्वीच्या हवामान प्रदेशांचे वर्गीकरण करण्यात येते, जसे की उष्णकटिबंधीय, उपोष्णकटिबंधीय, आणि शीतकटिबंधीय प्रदेश.

२१ जूनपासून २२ डिसेंबरपर्यंत सूर्य दररोज आदल्या वा आधीच्या  दिवसापेक्षा अधिकाधिक दक्षिणेला गेलेला दिसतो. तसेच २२ डिसेंबरपासून २१ जूनपर्यंत तो आदल्या दिवसापेक्षा अधिकाधिक उत्तरेस गेलेला दिसतो. सूर्याच्या या भासमान दक्षिणोत्तर जाण्याला (अयनाला) व २१ जून ते २२ डिसेंबर आणि २२ डिसेंबर ते २१ जून या कालावधींना अनुक्रमे ‘दक्षिणायन’ व ‘उत्तरायण’ म्हणतात. २१ जून रोजी सूर्याचे लंबरूप किरण कर्कवृत्तावर पडतात; म्हणजेच तेथे त्या दिवशी मध्यान्हीचा सूर्य खस्वस्तिकी (बरोबर डोक्यावर) आलेला दिसतो आणि या दिवशी सूर्याचे उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. तसेच २२ डिसेंबरला सूर्याचे लंबरूप किरण मकरवृत्तावर पडतात; म्हणजे तेथे सूर्य डोक्यावर येतो आणि सूर्याचे दक्षिणायन संपून उत्तरायण सुरू होते. म्हणून कर्कवृत्त व मकरवृत्त यांस ‘अयनवृत्ते’ आणि २१ जून व २२ डिसेंबर या दिवसांना ‘अयनदिन’ म्हणतात. या दोन अयनवृत्तांच्या दरम्यानच्या प्रदेशाला ‘उष्ण कटिबंध’ म्हणतात. या प्रदेशातील

प्रत्येक ठिकाणी वर्षातून फक्त दोनच दिवशी सूर्य खस्वस्तिकी येतो; मात्र कर्कवृत्ताच्या उत्तर ध्रुवाकडील बाजूच्या प्रदेशात आणि मकरवृत्ताच्या दक्षिण ध्रुवाकडील बाजूच्या प्रदेशात सूर्य कधीही खस्वस्तिकी येत नाही.

**9) क्रांती वृत आणि क्रांती प्रदेश म्हणजे काय?**

**क्रांतीवृत्त**-सूर्याचा आकाशातील भासमान मार्ग म्हणजे क्रांतीवृत्त होय.

**क्रांती प्रदेश**-क्रांतीवत्तापासून ७°३०' उत्तर व ७°३०' दक्षिणेकडील भाग मिळून क्रांती प्रदेश बनत असतो.

**10) वसंत संपात बिंदू म्हणजे काय?**




खगोलावरील क्रांतिवृत्त व विषुववृत्त एकमेकांस ज्या दोन बिंदूंत छेदतात त्यांना अयनबिंदू , संपात अथवा संपातबिंदू म्हणतात. दोन संपातांपैकी ज्या बिंदूशी क्रांतिवृत्त (आयनिक वृत्त) विषुववृत्ताच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे जाते त्या बिंदूस त संपात असे म्हणतात.



**वसंत संपात (Vernal Equinox) :** आयनिक वृत्तावरील सूर्याचे एक भ्रमण म्हणजे एक वर्ष. पृथ्वीचा अक्ष सुमारे २३.५ अंशांनी कलता असल्याने आयनिकवृत्ताचे प्रतल आकाशातील वैषुविकवृत्ताच्या प्रतलाला सुमारे २३.५ अंशाच्या कोनात तिरपे असते. त्यामुळे ते एकमेकांना दोन बिंदूत छेदते. एका बांगडीत दुसरी बांगडी तिरकी बसवावी तसेच हे आहे. आयनिकवृत्त (ecliptic) वैषुविकवृत्ताला (celestial equator) ज्या दोन बिंदूत छेदते, त्या दोन बिंदूंना 'संपात बिंदू' म्हणतात. (संपात = एका ठिकाणी पडणे. अर्थात येथे दोन महत्तम वर्तुळांचे एकत्र येणे, म्हणजे एकमेकांना छेदणे) यापैकी एका बिंदूला 'वसंत संपात बिंदू' म्हणतात.

**11) कालमापनात चार प्रकारचे वर्ष कोणते आहेत?**

**सावन वर्ष सौर वर्ष चांद्र वर्ष नाक्षत्र वर्ष**

**सौर वर्ष (Solar Year):**

वर्णन: सूर्याच्या एका कक्षेतील प्रदक्षिणेच्या आधारावर मोजले जाते. यामध्ये पृथ्वी सूर्याभोवती एक पूर्ण प्रदक्षिणा घेतल्याचा कालावधी मोजला जातो. कालावधी: सुमारे 365.24 दिवस.
उदाहरण: ग्रेगोरीयन कॅलेंडरमध्ये वापरले जाते.

**तार्किक वर्ष (Tropical Year):**

वर्णन: विषुववृत्ताच्या पुन्हा एकदा मापनाच्या आधारावर मोजले जाते. वसंत विषुवाच्या दोन क्रमशः आलेल्या बिंदूंच्या दरम्यानचा कालावधी. कालावधी: सुमारे 365.2422 दिवस.
उदाहरण: वसंत आणि शरद विषुव यांचा वापर करणारे कॅलेंडर.

**सौर कक्षीय वर्ष (Sidereal Year):**

वर्णन: सूर्याच्या विशिष्ट तारकाविरुद्धच्या स्थितीपर्यंत मापन केले जाते, म्हणजेच सूर्य एका विशिष्ट तारकाच्या संदर्भात किती काळामध्ये परत येतो. कालावधी: सुमारे 365.25636 दिवस.
उदाहरण: ज्योतिषशास्त्रात वापरले जाते.

**चंद्रवर्ष (Lunar Year):**

वर्णन: चंद्राच्या पूर्ण चक्राच्या आधारावर मोजले जाते, म्हणजेच एक चंद्र महिन्याच्या पूर्ण झाल्यावर एक वर्ष.
कालावधी: सुमारे 354.36 दिवस (12 चंद्र महिन्यांचे एकत्रित). उदाहरण: इस्लामी कॅलेंडर (हिजरी कॅलेंडर).
हे चार प्रकारची वर्षे पृथ्वीच्या कक्षेतील विविध कालमापन प्रणालींमध्ये वापरली जातात, ज्यामुळे विविध प्रकारच्या गणनांचे व्यवस्थापन करता येते.

**12) अधिक मास म्हणजे काय?**

पृथ्वीवरून पाहत असताना सूर्य दररोज सरासरी १° पुढे सरकल्यासारखा वाटतो. म्हणजेच दर ३० दिवसांनी तो ३०° ची एक रास पुढे सरकतो. सूर्याच्या या रास बदलण्याला 'सूर्यसंक्रांत' अथवा 'सूर्य संक्रमण'असे म्हणतात. हा कालावधी किमान २९ दिवस १० तास ४८ मिनिटे ते कमाल ३१ दिवस १० तास ४८ मिनिटे एवढा असू शकतो. चांद्रमास हा शुद्ध प्रतिपदेला सुरू होऊन अमावास्येला संपतो. चांद्रमास किमान २९ दिवस ५ तास ४४ मिनिटे ते कमाल २९ दिवस १९ तास ३६ मिनिटे असतो. या कालावधीत एक तरी सूर्यसंक्रांत होते. तसेच चांद्रमास हा सूर्यमासापेक्षा नेहमी लहान असतो. याचा परिणाम म्हणून कधीतरी अशी स्थिती येते की एखाद्या चांद्रमासात एकही सूर्यसंक्रांत होत नाही. या चांद्रमासालाच 'अधिक मास'म्हटले जाते.

**अधिकमास:** (अधिमास, मलमास, पुरुषोत्तममास, धोंडा महिना). भारतीय पंचांगात चांद्रमान व सौरमान यांत सांगड घालण्यासाठी योजण्यात येणारा महिना. सूर्याचा राशिप्रवेश म्हणजे सौरसंक्रांत होय. चैत्रादी प्रत्येक चांद्रमासात एकेक सौरसंक्रांत असते. चैत्रात मेषसंक्रांत, वैशाखात वृषभसंक्रांत वगैरे. परंतु चंद्राच्या कमीअधिक गतीमुळे एखादा चांद्र महिना असा येतो की त्यात संक्रांत नसते. म्हणजे संपूर्ण चांद्रमास लागोपाठ येणाऱ्या दोन संक्रांतींच्या दरम्यान येतो. याला 'अधिकमास' म्हणतात. उदा., चैत्रात मेषसंक्रांत अमावास्येला झाली व पुढच्या अमावास्येनंतर प्रतिपदेला वृषमसंक्रांत आली, तर हा पुढे येणारा महिना निजवैशाख (खरा वैशाख) व संक्रांत नसलेला मधला अधिक वैशाख होय. अधिक महिन्याला पुढे येणाऱ्या महिन्याचे नाव असते. असा अधिक महिना सु. तीन वर्षांनी येतो. कमीत कमी २७ तर जास्तीत जास्त ३५ महिन्यांनी हा येतो.

पृथ्वीची सूर्यप्रदक्षिणा ३६५·२५ दिवसांत होते, तर चंद्राच्या पृथ्वीभोवती १२ प्रदक्षिणा ३५४ दिवसांत होतात· म्हणजे सौर महिना ३० दि. २६ घ. १८प. (३०·४३०८ दिवसांचा) तर चांद्र महिना २९ दि. ३१ घ. ५० प. (२९·५३०५९ दिवसांचा)

असतो. या दोन्ही गणना मध्यममानाने आहेत. वरील सव्वा अकरा दिवसांचा पडणारा वार्षिक फरक काढून टाकून, चांद्रमान व सौरमान यांची सांगड घालण्यासाठी अधिकमासाची योजना असते. चैत्र ते कार्तिक या आठ महिन्यांपैकीच कोणता तरी एक महिना अधिक असतो. मार्गशीर्ष, पौष व माघ हे कधीच अधिक नसतात, क्वचित फाल्गुन अधिक असतो. चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे १२ वर्षांनी, तर आषाढ १८, भाद्रपद २४, आश्विन १४१ व कार्तिक ७०० वर्षांनी अधिक येतात

**13) मुखाप्रमाणे नक्षत्राची विभागणी करा?**

**1) उर्ध्व मुख नक्षत्र:** ४ रोहिणी, ६ आर्द्र ,८ पुष्य,१२ उत्तरा फाल्गुनी, २१ उत्तरा षाढा, २२ श्रवण, २३ धनिष्ठा, २४ शतभिषा, २६ उत्तरा भाद्रपद ! नक्षत्रांचा चेहरा वरच्या दिशेने दिसतो. घर, मंदिर, मोठी/छोटी बाग बांधण्याच्या कामाची सुरुवात; बाउंड्री वॉल बांधणे (बागेची), उंच वास्तू/इमारतींशी संबंधित बांधकामे, ध्वज फडकावणे, राज्याभिषेक, हत्तीवरून प्रवास, गावातील मंदिर, किल्ला, विवाह मांगलिक कामे सुरू केल्यास, ऊर्ध्वमुखी नक्षत्रांमध्ये अपेक्षित परिणाम देतात.

**2) अधोमुख नक्षत्र:** २ भरणी,३ कृतिका,९ आश्लेषा, १० मघा, ११ पूर्वा फाल्गुनी, १६ विशाखा, १९ मूल,२० पूर्वा षाढा, २५ पूर्वा भाद्रपद ! (क्रूर/उग्र) यांचा चेहरा खालच्या दिशेने दिसतो. विहीर खोदणे, टाकी, खाण, गाडलेली संपत्ती गाडणे व बाहेर काढणे, ट्यूब रेल्वे, गुहेत प्रवेश करणे, ज्योतिष आणि गणिताचा अभ्यास, शिल्पकला, कला, लेखन, आत्म्याचे विज्ञान आणि भूत नियंत्रण, लाकूड गोळा करणे, यंत्र मंत्र , गहाण ठेवलेल्या वस्तू परत करणे, या नक्षत्रांमध्ये उपयुक्त आहेत.

**3) तिर्यकमुख मुख नक्षत्र :** १ अश्वनी, ५ म्रग्शिरा, ७ पुनर्वसु, १३ हस्त, १४ चित्र, १५ स्वाति, १७ अनुराधा, १८ ज्येष्ठा, २७ रेवती ! यांचे त्रिक्य तोंड/तोंड (बाजूचे तोंड/समोरचे तोंड/जवळचे तोंड) आहे. चतुष्पाद (घोडा, हत्ती, उंट, बैल इ.) खरेदी आणि प्रशिक्षण, जल-जमीन-हवा प्रवास, वाहतूक, वाहन चालवणे, बैलगाडी, पालखी (पालखी), रथ, नांगरणी, गाणे आणि या नक्षत्रांमध्ये वाद्ये वाजवणे, रस्ता, बांध, वाद्यवृद्धी करणे शुभ मानले जाते.

**14) स्थिर करण कोणती आहेत?**

**स्थिर करण ४ आहेत- किस्तुघ्न, चतुष्पद, शकुनि तथा नाग**
शकुनीकरण:- याची देवता काली आहे- वृक्षारोपण औषधे तयार करणे कुठल्याही तऱ्हेचे औषधांची संलग्न काम करणे, मंत्र साधना सुरू करणे हे शकुनीकरण असताना केले जाते.
चतुष्पाद करण:- याची देवता रुद्र आहे- सरकारी कामे ब्राह्मण गाय यांचा संबंध असणारी पवित्र कामे, पूर्वज पितर व देवता यांच्याशी रिलेटेड कामे चतुषपात करण असताना करतात.
नाग करण :- याची देवता नाग आहे- या करणावर एखाद्याला बंधन करणे, लुबाडणे, एखाद्याची वस्तू हिसकावून घेणे, शत्रुत्वाशी संलग्न सगळे कामे करतात.
किंस्तुघ्न करण :- याची देवता मरुत आहे- सर्व धार्मिक कार्ये, ज्या कार्यांचा विस्तार करायचा आहे त्याची सुरुवात, जास्त सिद्धी मिळवायचे आहे अशी कामे किस्तुघ्न करण असताना सुरू करतात.

**15) मेघ गर्भ दिवस व गर्भ नक्षत्र म्हणजे काय?**

**मेघ गर्भ दिवस**
मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदेपासून चंद्र ज्या दिवशी पूर्वाषाढा नक्षत्रात जाईल त्या दिवसाला मेघ गर्भाचा दिवस असे म्हणतात.
**गर्भ नक्षत्र**
मेघ गर्भ लक्षणे ज्या दिवशी दिसतात त्या दिवशीचे चंद्र नक्षत्र म्हणजे गर्भ नक्षत्र होय.

**16) पंच महाभूतानुसार राशीचे विभागणी करा?**
अग्नि, पृथ्वी, वायु, जल आणि आकाश ही पंचमहाभूते आहेत.

**अग्नितत्व राशी-** मेष, सिंह, धनु
**पृथ्वीतत्व राशी-**वृषभ, कन्या, मकर

**वायु तत्व राशी**- मिथुन, तूळ ,कुंभ
**जलतत्त्व राशी**- कर्क, वृश्चिक ,मीन
**आकाश तत्व राशी -** वरील सर्व तत्वे आकाश तत्वात विलीन होत असून
**गुरु ग्रहाला-** आकाश तत्वाचा कारक मानले आहे.

**17) विषम राशि व विषम पाद आणि सम राशी आणि सम पाद राशीची विभागणी करा.**

**विषम राशी**-मेष, मिथुन, सिंह, तुला, धनु कुंभ
**विषम पाद राशी**-मेष, वृषभ, मिथुन, तुला वृश्चिक, धनु
**सम राशी**-वृषभ, कन्या, कर्क ,वृश्चिक, मकर, मीन
**सम पाद राशी**-कर्क, सिंह ,कन्या ,मकर, कुंभ, मीन

**18) पुरुष राशी स्त्री राशी यांची विभागणी करा?**

**पुरुष राशी**- मेष, मिथुन, सिंह, तुला, धनु कुंभ
**स्त्री राशी** -वृषभ, कन्या, कर्क ,वृश्चिक, मकर, मीन

**19) राशी उदयानुसार त्यांचे वर्गीकरण करा?**

**शीर्षोदय राशी - मिथुन, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक आणि कुंभ**
या राशीत ग्रह असल्यास लवकर शीघ्र फळ मिळतात. शुभ ग्रह असल्यास अत्यंत शुभ फळ देतात आणि पापग्रह असल्यास मध्यम फळ देतात. ग्रह आपल्या दशा काळात प्रथम काळात फळ देतात प्रश्न कुंडली मध्ये लग्न असल्यास लवकर कार्य होते

**पृष्ठोदय राशी - मेष, वृषभ, कर्क,धनु आणि मकर**
या राशीत कोणतीही ग्रह नसल्यास अत्यंत अशुभ फळ मिळते. शुभ ग्रह मध्यम फळ देतात तर पापग्रह अत्यंत अशुभ फळ देतात , ग्रह आपल्या दशा काळात अंतिम भागात फळ देतो .प्रश्न कुंडलीत लग्न असल्यास विलंबाने कार्‌य होते

**उभयोदयी राशी- मीन,**
सर्व ग्रह मध्यम फळ देता.आपल्या दशा काळात मधल्या काळात फळ देतात. प्रश्न कुंडलीत लग्न असल्यास मध्य काळात फळ मिळते

**20) राशीच्या दिशा विशद करा?**

**ग्रह दिशा**
**रवि - पूर्व दिशा**
**शुक्र - आग्नेय दिशा**
**चंद्र- वायव्य दिशा**
**मंगळ - दक्षिण दिशा**
**बुध - उत्तर दिशा**
**गुरू- ईशान्य दिशा**
**शनि - पश्चिम दिशा**

| नं | रास | तत्व । संज्ञा | स्वभाव | अवयव | दिशा | लिंग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेष | अग्नी / धर्म / चर | क्रूर | शीर (डोके) | पूर्व | पुरुष |
| २ | वृषभ | पृथ्वी / अर्थ / स्थिर | सौम्य | मुख (तोंड) | दक्षिण | स्त्री |
| ३ | मिथुन | वायु / काम/ द्विस्वभाव | क्रूर | छाती | पश्चिम | पुरुष |
| ४ | कर्क | जल / मोक्ष / चर | सौम्य | हृदय | उत्तर | स्त्री |
| ५ | सिंह | अग्नी / धर्म / स्थिर | क्रूर | बरगड्या, उदर | पूर्व | पुरुष |
| ६ | कन्या | पृथ्वी / अर्थ / द्विस्वभाव | सौम्य | कंबर | दक्षिण | स्त्री |
| ७ | तुळ | वायु / काम /चर | क्रूर | ओटीपोट | पश्चिम | पुरुष |
| ८ | वृश्चिक | जल । मोक्ष / स्थिर | सौम्य | गुहेंद्रीय | उत्तर | स्त्री |
| ९ | धनु | अग्नी / धर्म / द्विस्वभाव | क्रूर | मांड्या | पूर्व | पुरुष |
| १० | मकर | पृथ्वी / अर्थ / चर | सौम्य | गुडघे | दक्षिण | स्त्री |
| ११ | कुंभ | वायु / काम / स्थिर | क्रूर | पोटऱ्या | पश्चिम | पुरुष |
| १२ | मीन | जल / मोक्ष / द्विस्वभाव | सौम्य | पाय | उत्तर | स्त्री |

संदर्भ - मराठी विश्वकोश मराठी विश्वकोश आंतरजाल

**मार्गदर्शन –श्री.ज्यो.अजय पाठक नांदेड 9111021709**

**संकलन -राजस सुकुमार**

## लेख क्र. ४३ : स्वत:ची आणि वास्तुची उर्जा कशी वाढवावी

## लेखक : श्री. प्रशांत सुधाकर चौधरी (९८५०२८१९१७)

श्री राम समर्थ !!

आपण ऐकतो ज्योतिष वास्तुशास्त्र पूजा शांती हे सर्व थोतांड अंधश्रद्धा आहे. हा यांचा पैसा कमविण्याचा मार्ग आहे. काही काही दोष दाखवून हे यंत्र लावा ते यंत्र लावा हा जप तो जप करा म्हणजे सूखी व्हाल असे सांगणारे व म्हणणार खुप आहेत, पण यामध्ये एक विज्ञान आहे मंत्र जाप याला एक ठोस आधार आहे.

मी प्रशांत सुधाकर चौधरी वास्तुज्योतिष व अंकशास्त्र अभ्यासक तुम्हाला तसच काही सांगणार आहे पण अगदी विनामूूल्य व घरातील वस्तूचा उपयोग करून तुमची व घराची ऊर्जा कशी वाढवावी त्याबद्दल ही सर्व प्रक्रिया तुम्ही स्वतः करा एक पाच दिवस अनुभव घ्या फरक जाणवला तर मग मला संपर्क करा तेही तुमची इच्छा असेल तर पण आधि खालील उपाय करा तर खरं.

1. रोज संध्याकाळी 6:45 ते 7:15 या कातर वेळेस मंत्र जाप यंत्र मुख्य दरवाज्या जवळ लावा. तुम्हाला जो मंत्र आवडतो तो मंत्र जरुर लावा कारण यावेळी लक्ष्मी व अलक्ष्मी सकारात्मक उर्जेबरोबर नकारात्मक उर्जा ही वास्तुत येवु शकते. ती नकारात्मक उर्जा अडविण्यासाठी मंत्र जाप प्रभावी उपाय आहे. किमान पाच मिनीटे ध्यान व अनुलोम विलोम करा.

2. घरातील वास्तु पुरुष नेहमी तथास्तु तथास्तु असे म्हणत असतो म्हणून घरात नेहमी चांगले व पॉझीटीव्ह बोला. अपशब्द चुकुन सुध्दा बोलु नका, नामस्मरण नेहमी चालु ठेवा त्यामुळे तुमच्याकडे येणारे संकट तुम्हाला त्रास न देता बाजूने निधन जाईल. देवाचे नामस्मरण सतत चालु ठेवल्याने तुमच्या खात्यात पुण्य जमा होत राहील. त्यामुळे तुमची कार्यशक्ती वाढेल. हि टिकवून ठेवण्याठी कोणाचेही वाईट चिंतू नका.

3. घरात नेहमी संध्याकाळी कापुर होम करावा होम करण्याआधी कापुराच्या वड्या 1.3.5 च्या संख्येत घेवून त्यावर मंत्र जाप करावा. व मग तो पेटवून सर्व घरात फिरवावा. व शेवट घरातील (मध्यभाग) ब्रम्हस्थानावर ठेवुन तो संपेपर्यंत मंत्रजाप करीत रहा त्यामुळे घरात नविन उर्जा (होरा) निर्माण झाल्याची जाणीव तुम्हाला होईल.

4. परातील देव्हारा ईशान्येला स्थापीत करा. आणि बघा काय चमत्कार होऊ शकतो. जर ईशान्य दिशा मिळत नसेल तर आपला देव्हारा पूर्व किंवा उत्तर दिशेच्या भिंतीवर ठेवा. देव्हाऱ्याला खालून लाकडी आधार दयावा. अधांतरी ठेवू नये.

5. या उपायांनी घरात तुम्हाला जर प्रसन्न वाटले तर अधिक प्रभावी व जास्त उर्जेसाठी सुख, शाता व सकारात्मक उपायांसाठी एकदा अवश्य संपर्क करा.

श्री. प्रशांत सुधाकर चौधरी (९८५०२८१९१७)

**लेख क्र. ४४ : वैधव्ययोग / विधुरयोग "मेड फॉर इच अदर"**

**लेखिका : ज्यो. वीणा महेश लवाटे (८४११०१००९१)**

कागदावर जुळलेली पत्रिका आणि काळजावर जुळलेली पत्रिका यात अंतर राहतं.

लाखो मनांच्या समुद्रातून योगायोगाने २ मनं अगदी एकमेकांसारखी समोर ठाकणं जवळ-जवळ अशक्य आहे, हे मानूनच हा डाव मांडायचा असतो.

वेगळ्या वातावरणात, संपूर्ण निराळे संस्कार लाभलेले २ जीव, एकमेकांसारखे असतीलच कसे?

सुख-दुःख, प्रेम, भांडणाचे काळे पांढरे चौकोन ओलांडण्याचा खेळ खेळवणं हीच तर नियतीची जुनी हौस आहे.

सरळ सोपं आयुष्य नियतीने देवालाही दिलेले नाही. या न देण्याचंच 'देणं' स्वीकारून संसारात पाऊल टाकायचं असतं.

निसर्गात एक पान दुसऱ्या पानासारखं नाही, तर तुला मिळणारा 'जीवन साथीदार' अगदी तुला हवा तसा असणार कसा?. त्याचे-आपले, काही गुण जुळणारे नसणारच. त्या वेगळ्या आपल्याला न पटणाऱ्या गुणांतच, त्याचं माणूस म्हणून वेगळेपण आहे, हे मान्य करणार असाल तरच संसारात पाऊल टाकावं.

- अशा आशयाचं समुपदेशन ही आज काळाची गरज आहे.

कागदावरच्या कितीही कुंडल्या बघा. बघण्याच्या समारंभात गच्चीवर गप्पा मारताना छंद, महत्त्वाकांक्षा, श्रद्धा-अंधश्रद्धा असे तेलकट प्रश्न विचारा. या प्रश्नांची उत्तरही सौंदर्य-स्पर्धेतील मेकअप केलेल्या सुंदर मुलींच्या भंपक उत्तरांसारखीच.

लग्नानंतर मग खरं काय ते एकमेकांना कळत जातं.

तेव्हा म्हणाली होती, 'वाचनाचा छंद आहे' पण नंतर साधं वर्तमानपत्र एकदाही उघडलं नाही बयेनं...

जाब विचारू शकतो आपण?

किंवा तो म्हणाला होता - 'प्रवासाची आवड आहे; जगप्रवास करावा, हिमालयात ट्रेकिंग करावं – असं स्वप्न आहे !'

पण प्रत्यक्षात कळतं; कामावरून आला की जो सोफ्यावर लोळतो की गव्हाचं पोतं जसं. जेवायला वाढलंय.. हे ही चारदा सांगावं लागतं. प्रवासाची आवड कसली?- कामावर दादरला जाऊन घरी परत येतो ते नशीब... वर्षभर सांगतेय, माथेरानला जाऊ तर उत्तर म्हणून फक्त जांभया देतो.

कसले मेले ३२ गुण जुळले देव जाणे. उरलेले न जुळलेले ४ कुठले ते कळले असते तर...

मनापासून सांगतो,

त्या न जुळलेल्या गुणांशीच खरंतर लग्न होत असतं आपलं.

तिथं जमवून घेणं ज्या व्यक्तीला जमलं, तीच व्यक्ती टिकली... नाही जमलं की विस्कटली.

अन्याय-शोषण, सहन न करणं, हा पहिला भाग झाला... पण न जुळलेल्या गुणांमध्ये एकमेकांच्या वेगळया क्षमतांचा शोध घेऊन नातं जुळतंय का हे पाहण्याची सहनशीलता दोघांमध्ये हवी.

पण आज हे लग्नाळू मुला-मुलींना सांगितलंच जात नाहीये;

नाही जुळलं - मोडा; व्हा विभक्त.आणि मग करा काय??

आपल्याला 'हवी तशी' व्यक्ती मिळणं हे एक परीकथेतील स्वप्न असेल; पण वेगळया रंगाच्या धाग्याने टाके घालीत आयुष्य जोडतं ठेवावं लागतं हेच खरं वास्तव आहे.

धुमसत राहणाऱ्या राखेत कसली फुलं फुलणार ?..

एकमेकांचे काही गुण जुळणारच नाहीत, ते मी पण स्वीकारणार आहे का ?-

या प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर स्वत:शी देऊन मगच संसार मांडायला हवा.

आपल्या पेक्षा कोणत्याही वेगळया व्यक्तीचं वेगळेपण सहज स्विकारणं हे या वाटेवरच पाहिलं पाऊल...

ते पाऊल योग्य विश्वासाने पडलं की इतर सहा पावलं सहज पडत जातात..

आणि मग ती "सप्तपदी" - "तप्तपदी" होत नाही.. हेच संसाराचं खरं मर्म आहे.

"मेड फॉर इच अदर" आपोआप होत नाहीत. तर ते होत जातात.

घर पहावे बांधून लग्न पहावे करून

"दुखाशिवाय सुख नाही,

"निराशे शिवाय आशा नाही.. "

"अपयशा शिवाय यश नाही "

"आणि पराजया शिवाय जय नाही.."

"आणि तुमच्या सारख्या गोड व्यक्तीं शिवाय "

"हे आयुष्य आयुष्यच नाही....""

अश्या विविध वाक्यं आपण नवनवीन अर्थाने ऐकत असतो.

म्हणूनच विवाह योगाची आणि वैध्यव योगाची कारणे आपण बघणार आहोत.

विवाहसाठी आपण सातवे घर / सप्तम भाव  यांचा प्रामुख्याने विचार करतो, मग कुटुंब स्थान .

सप्तम स्थानाची नांवे सप्तम, जाया, काम, दयून, मद, गमन, अस्त, मार्ग, लोक, कलम, संपत, सप्तम हे विवाह स्थान व आयुष्यातील भागिदारीचे स्थान आहे. व्दितीय स्थान व सप्तम स्थान यात फरक आहे, व्दितीय स्थानावरून विवाहाच्या जोडीदारा खेरीज आई, बाबा, बायको, मुले व अवलंबून असले तरी इतर मंडळी येतात तर सप्तमात स्त्री अगर पुरुष एवढेच येतात. विवाह मुखी पुरुषामध्ये कायमचा मैत्रिचा संबंध, प्रजा उत्पादन व सुखाकरता येतो. हिंदु पध्दतीत विवाह हा एक पवित्र संस्कार आहे. सोळा संस्कारापैकी हा एक महत्वाचा भाग आहे. इतर धर्माप्रमाणे विवाह हा कॉन्ट्रॅक्ट स्वरुपाचा नाही. वित जीवनात सुखासक्तपणावर (Pleasured) लाभस्थानचा अंमल आहे. म्हणून विवाहा करता सप्तम, द्वितीय व लाभ स्थान तपासावे, व्यय स्थानाचा शय्या सुखाशी संबंध आहे. शय्या सुख स्थान जर दुषित असेल तर विवाहास उशीर होतो. २-७-११-१२ ही स्थाने शुभ संबंधीत असता विवाहात येणारा भागीदार चांगल्या कुळातला असेल असे गृहीत धरण्यास हरकत नाही. त्यामुळे वैवाहिक जीवनात शांतता, सुख, समृद्धि लाभते. सप्तम स्थानावरून व्यवहारामधला अगर भागीदारी मधला जोडीदारही समजतो. व्यापार उद्योग व धंदा यातील यश अपयश याच स्थानावरुन पहातात. हे स्थान दशमाचे दशम आहे. दशमेशाला येथे बल प्राप्त होते.  सप्तमस्य दुषित ग्रहाच्या दर्शत या लोकांनी काळजी घेतली पाहिजे, मनुष्य समाजात सर्वसाधारणपणे मिसळेल किंवा नाही हे ठरविण्याचे हे स्थानआहे. दंड, घटस्फोट, कायदेशीर बंधने याच स्थानावरुन पहातात. माणसाचा परराष्ट्रातील दरारा, कीर्ति, मान, सन्मान ही सप्तमस्थ ग्रहावर अवलंबून आहे. लग्न स्थान है आयुष्य मर्यादा दाखविते. सप्तम स्थान त्याला विरोध करते. कारण ते मारक स्थान आहे. म्हणून आयुष्यास धोका दाखविते. हे स्थान आयुष्य स्थानाचे बारावे स्थान आहे. अष्टमावरुन आयुष्य कळते. त्याचा नाश म्हणजे सप्तम मारकस्थान आहे. लांबच्या प्रवासाचे हे स्थान आहे. तृतीय स्थान हे जवळचा प्रवास दाखविते. लग्न म्हणजे नेहमीचे वास्तव्य सप्तम व तृतीय हे जागा बदलणे, स्मृती जाणे, चोरी, पुरुषामधील पवित्रता समागम व समागमनापासूनची सुखे, सद्वर्तनापासून परावृत्त होणेवगैरे दाखवितात. मेदनिय ज्योतिषी सप्तमावरुन परराष्ट्र व्यवहार, परराष्ट्रसंबंध, लढाया, मध्यस्थी, परराष्ट्र व्यापार पाहतात. पाश्चिमात्य लोक विवाहासंबंधी कायदे याच स्थानावरुन पाहतात तसेच उघड लढाई, शत्रुत्व, तह, दोस्ती वगैरे पहातात.

सप्तम भाव तपासतांना खालील गोष्टींचे विश्लेषण करावयास पाहिजे.

१) सप्तमभाव,

२) सप्तमेश,

३) कारक शुक्र, याशिवाय

४) सप्तममातील ग्रह,

५) सप्तमेशाबरोबर असलेले ग्रह,

६) सप्तम, सप्तमेश व कारक यांना पहाणारे ग्रह याचा विचार करावयास पाहिजे.

७) चंद्रापासूनही योग पहावेत.

सप्तमातील ग्रह -

१) रवि :- स्त्री कुंडलीत सप्तमातील रवि हा पती सुखाला अगर भागिदारीला अनुकुल असतो, पती अनुरुप व दिलदार मिळतो. पुरुष कुंडलीत रविला इतके महत्व नसते. स्त्री मानी स्वभावाची चांगल्या कुळातील असते. व पतीला तिच्या बद्दल आदर असतो. रविची राशी व रविवर होणारे दृष्टी योग याप्रमाणे फलामध्ये फेरबदल होतो. अशुभ परिस्थितीत रवि असता मित्र थोडे असतात. जनसमुहात ही मंडळी फारशी मिसळत नाहीत. विवाह विलंबाने होतो. सरकार दरबारी फारसा मान नसणे, मानहानी होणे वगैरे गोष्टी घडतात. येथे रवी-शनी, रवी-राहू, रवी-केतू, रवी-नेप, या युत्या वैवाहिक जीवनास वाईट समजाव्यात.

२) चंद्र :- सप्तम स्थानी चंद्र असणे वैवाहिक सुखास चांगले असते. येथे चंद्र वृषभ, तूळ, कर्क, सिंह, मीन या राशीत असता स्त्री रुपाने चांगली असून ती मनमिळाऊ असते. विवाह लवकर होतो. येथे चंद्र-रवि, चंद्र-बुध, चंद्र-शुक्र या युत्या वैवाहिक जीवनास चांगल्या असतात. एकमेकात विश्वास व श्रध्दा असते. स्त्री कुंडलीत सप्तमात वा अष्टमात चंद्र-मंगळ युती ही आर्तवासंबंधी दोष उत्पन्न करते. जातक कामी व उत्साही असतो. आणि त्यास समाजप्रियता असते. क्षीण चंद्र असता भांडकुदळपणा येतो.

३) मंगळ :- वैवाहिक जीवनाच्या सुखाला घातक समजावा. दांपत्यामधील एकवाक्यता कमी दिसते. विषयासक्त असल्यामुळे स्त्री आधीन मनुष्य होतो अशुभ स्थितीतल्या मंगळामुळे भांडण तंटे होतात व घरात असमाधान दिसते. द्विभार्यायोग होतो. अगर तुटकपणा येतो व विभक्त रहाण्याचा प्रसंग येतो. येथे शनि-मंगळ, मंगळ हर्षल, मंगळ राहू असता स्त्री अगर पती आर्दडय स्वभावाचाअसतो. हाणामारीचे प्रसंग येतात. स्त्री कुंडलीत वैधव्य योग व पुरुष कुंडलीत स्त्री निधन योग येतो. मंगळास बुध शुक्राच्या राशी येथे चांगल्या नाहीत. त्यामुळे बुद्धि वाईट मार्गाकडे जाते व विषयवासना जास्त असते. जातक चिडखोर व हटवादी असतो व अपयशी असतो. स्त्री कुंडलीत येथे अशुभ स्थितीतला मंगळ पवित्र्यास चांगला नाही.

(४) बुध :- विवाह लवकर होतो. जोडीदार बुध्दिवान, सावळया रंगाचा, मध्यम बांध्याचा व वयात फार अंतर नसलेला मिळतो. तो बोलका असतो व बोलणे कसे असेल हे राशीवरून ठरवावे. वायु राशीचा बुध असता स्त्री अगर पती संसारदक्ष व बुध्दिवान असतात. शनि बुधाची युती संसार सुखाला चांगली नाही, शनि बुधाच्या अशुभ राशीकडे लक्ष द्यावे. शनि बुध असून दुसऱ्या एखाद्या पापग्रहाचा योग असता व्याभिचार प्रवर्तक समजावा, बुध हर्षल हा वाईट योग, घटस्फोटास कारणीभूत होतो. शनि बुध हे नपुंसक ग्रह असल्याने विषय वासना कमी. जोडीदाराची याबाबतीत फसगत होते. जातक

व्यापारात कुशल असतो. त्याची लेखन कला चांगली असते. गणित, फलज्योतिष वगैरे बाबतीत चांगली बुध्दि असते. तो राजकारणी असतो. दुषित बुध मात्र कावेबाजपणा व दुसर्याला फसविण्याची बुध्दी देतो.

५) गुरु :- राजकारणी व दयाळू असतो. त्याला स्त्री सद्‌गुणी व सुंदर मिळते. सप्तम हे चतुर्थाचे चतुर्थ त्यामुळे शिक्षण चांगले असते. विवाहाने फायदा होतो. दुसऱ्याच्या भावनेबद्दल आदर असतो. दुसऱ्या ठिकाणी यात्रेनिमित्त प्रवास होतो. मुले चांगली असतात. वैवाहिक जीवनात सुख व भागीदारीस चांगलाअसतो. येथे निर्बल गुरु चांगले करु शकत नाही. विवाह विलंबाने होतो व दोघात अंतर फार असते. स्त्री कुंडलीत गुरु-शुक्र, गुरु रवि, गुरु-चंद्र, या युत्या उत्तम समजाव्यात. माहेरच्या कुळापेक्षा पतीचा दर्जा मोठा असतो. गुरुचा शनि, मंगळ, राहू व केतूशी संबंध चांगला नाही. गुरु-शनि, गुरु-मंगळ व गुरु केतू योग वैधव्य अगर विधुर अवस्था देणाऱ्या आहेत. सप्तम स्थानी दुषित गुरु, कन्या, वृश्चिक, मकर राशीत असता व्दिमार्यायोग होतो.

६) शुक्र :- सप्तमातील शुक्र स्त्री सुखात चांगला असतो. स्त्री देखणी व गृह सौख्य देणारी असते. वृषभ, मीन, तूळ राशीतला शुक्र फारच चांगला असतो. शुकास अग्नि राशी मेष, सिंह, धनु मध्यम असतात. कर्क, वृश्चिक या राशी शुक्राला चांगल्या नाहीत. या राशी व्ययात पापग्रहाने दूषित असून शुक्र तेथे असता विभायोग होतो. मकर रास ही शुक्राच्या मित्राची रास आहे. पण ह्या राशीत शुक्र पडल्यास अनीतिकारक गोष्टी दिसून येतात. शुक्र भाग्येश असून सप्तमात असता विवाहानंतर भाग्योदय होतो. कारक ग्रह कारकस्थानात असू नये, याची प्रचिती येत नाही, उद्योग धंद्याला व भागिदारीला शुक्र चांगला असतो. सप्तमात शुक्राबरोबर चंद्र, गुरु, बुध असता शुक्राचे गुण वृध्दिंगत होतात. शुक्र मंगळ युतीचे: परिणाम शुभ नसतात. शुक्र-हर्षल, शुक्र-राहू, शुक्र-केतू युती स्त्री पुरुष यांच्या कुंडलीत अतिशय वाईट समजावी. वैधव्य व विधुरता येते. अशुभ राशीचा अशुभ भावाचा स्वामी (शनि) हा शुक्र युक्त सप्तमात असता गुप्तरीतीने व्याभिचार करण्याचा योग आहे. येथील दोन तीन पापग्रहांनी दुषित झालेला शुक्र व्यभिचार योगाने, गुप्तरोग देतो. एड्सरोग होतो.

७) शनि :- शनि येथे असता स्त्री अगर पुरुष थंड प्रकृतीचा निरुत्साही, आतल्यागाठीचा, कर्तव्यदक्ष, काटकसरी, प्रणयाचा अभाव असलेला असेल, वक्री शनिमुळे खिन्न असेल. व्दिस्वभावराशीत असता जोडीदाराचा मृत्यु होतो. दोन अगर तीन विवाह होतात. बलवान शनि येथे विवाहापासून पैसा देतो. स्त्री कुंडलीत असता विवाह हा बिजवराशी होतो पुरुष कुंडलीत विधवेशी होतो. बलवान वक्री शनि कुंभेत सप्तमात असून कारक शुक्र कर्केत सप्तमेशाच्या षडाष्टकात असता दोन तीन विवाह होतात. (सिंहलग्न) व शेवटी एकटेच रहावे लागते. नैतिक आचारणास अशुभ शनि चांगला नाही. सुखी वैवाहिक जीवनाची फारशी आशा करु नये. भागिदारी कोर्टाची कामे यात अपयश येते. शुभ शनि परदेश वास्तव्य व राजकारणात यशस्वी करतो. सिंह, धनु राशीत शनि असता स्त्री, पुरुष प्रवृत्तीची असते, वक्री शनि सप्तमात विवाहास विलंब करतो. व वैवाहिक जीवनात विचित्र गोष्टीचा अनुभव देतो.

८) राहू केतू येथे स्त्री कुंडलीत दुषित राहू असता कुळाला डाग बसण्याचा योग येतो. अशुभ स्थितीतला पुरुष कुंडलीतील राहू हा मंगळाने युक्त असता अनितीमार्गाचे अवलंबन होते, प्रेमाचा आभाव असतो, गुप्तपापी, हलके लोकांशी संबंध येतो, .धन योगाला येथील राहु शुभ नाही. विचार पापी असतात. पुरुष कुंडलीत राहू-शुक्र युती असता वीर्य दोष असू शकतो. येथे केतू

जास्त अनिष्ट फले निर्माण करील. राहू केतूच्या राशीकडे जास्त लक्ष द्यावयास पाहिजे. हे अप्रकाशित ग्रह ज्या राशीत असतात त्या राशी स्वामी प्रमाणे फले देतात.

९. सप्तमात अशुभ स्थितीतला अतिशय वाईट फळ निर्माण करतो वैवाहिक जीवन अयशस्वी होते. दु:खी होते व घटस्फोट घेण्याचे प्रसंग येतात. स्त्री किंवा पुरुष निर्दयी, जबरदस्त व्यभिचारी असतो. जीवनात याच्या पेक्षा वाईट परिस्थिती असू शकत नाही. कोर्ट कामास भागिदारीस भांडणस वाईट समजावा माणसाने या गोष्टी कटाक्षाने वाईट गोष्टीचा अनुभव येण्यास वाईट राशीत अशुभ युती व अशुभ दृष्टीयोगात पाहिजे. येथील हर्षल उद्योग धंदा, व्यापार यास अनिष्ट असतो. जातकाचे सर्व व्यवहार अयशस्वी होतात वागणूक विधासारखी असते.

१०) नेपच्यून :- विवाहात भानगडी होतात. द्विभार्या योग व कुटुंब नेहमी आजारी असते, मानसिक रोगाने पछाडलेले असतात. अशुभ स्थितीत नेपच्यून असता पति-पत्नी मध्ये नैसर्गिक व्यंग असते. अगर काही तरी दोष असतो. नेपच्यून फारच बिघडला असल्यास नैतिक आचरण चांगले नसते. आत्महत्येची प्रवृत्तीही असते.

सप्तमेश बारा भावात

१) लग्नी :- असता ओळखीच्या इसमाशी विवाह होतो, स्त्री किंवा पुरुष हा स्थिर, समजुतदार, बुध्दिमान व सर्व बाजुने विचार करणारा असतो. सप्तमेश व शुक्र दोन्ही बिघडले असल्यास विषयासक्त असतो. (सप्तमेश आपल्या स्थानापासून सप्तमात भावातभाव) स्त्री पुरुषाच्या कुंडली मधील ज्यांचा असा योग असेल तो दुसऱ्या बाजूकडे जास्त आकर्षिला जातो व त्याची काळजीही घेतो. लग्नी सप्तमेश, लग्नेश युक्त असता परदेश गमन होते. उत्तम स्त्री चा योग व तिची मदत मिळते.

२) सप्तमेश व्दितीयात :- जातकास स्त्री पासून अगर विवाहामुळे स्त्री कडून फायदा होतो व धन योग होतो. मेष व तूळ ह्या लग्नास सप्तमेश व व्दितीयेश (शुक्र व मंगळ हा एकच ग्रह असतो. तो व्दितीयात अगर सप्तमात असता स्त्रीकडून धन योग संभवतो. पण दुषित असता वाईट मार्गाने संपत्ती मिळवितो. व्दितीय स्थान हे सप्तमाचे अष्टम स्थान आहे, ते पहिल्या स्त्रीचे मृत्यू स्थान आहे. स्त्री वियोगाचा योग होतो. व्दितीय स्थानात व्दि स्वभाव राशी असता एकापेक्षा जास्त विवाह होतात. मारक दशा असता मृत्युही संभवतो. सप्तमेश, व्दितीयेश युक्त, व्दितीयात असता विवाहामुळे पैसा मिळेल किंवा स्त्री नोकरी करणारी असेल किंवा परदेशात भागिदारीत पैसा मिळविल सप्तमेश येथे व्दितीयेशा सह दुषित असता स्वतःचा अगर स्त्री चा मृत्यु संभवतो पण आयुष्य मर्यादा चांगली असल्यास पतीबरोबर घटस्फोट होतो.

(३) सप्तमेश तृतीयात असता बंधु भाग्यवान असतात व ते परदेशात असतात. तृतीयेशांनी युक्त सप्तमेश असता स्त्री चांगल्या पायातलीअसते, तृतीय हे सप्तमाचे भाग्य स्थान आहे. सासरा भाग्यवान असेल. हा योग दुषित असता व्यभिचार योग (भावाच्या स्त्री शी अगर स्त्री असता दिरा बरोबर संबंध असतो.)

४) सप्तमेश चतुर्थात स्त्री सदगुणी व उत्तम संसार करणारी स्थावर इस्टेटीचा लाभ होतो. सप्तमेश शुभ स्थितीत असता शिक्षण चांगले असते, दुषित असता शिक्षणात अडथळे येतात. सप्तमेश चतुर्थात चतुर्थेशा बरोबर असता सप्तमेशाच्या दशेत पुष्कळ प्रवास होतो. घरात सुखी वातावरण असते व घरात शुभकार्ये घडतात. दुषित असता जातकाच्या आईचा मृत्यु संभवतो

५) सप्तमेश पंचमात :- पंचमेशयुक्त बलवान असता स्त्री व संतती सुखी असते. सप्तमेश पंचमात असता लवकर विवाह होता, व जोडीदार चांगल्या घराण्यातला असतो. सप्तमेश निर्बली असल्यास संततीचा अभाव असतो. सप्तमेश फारच दुषित असता जोडीदारास व्यभिचाराने संतती होते. साप्तमेशवर शुभ व पाप योग असता स्त्री संतती असते. सप्तमेश पंचमेशयुक्त पंचमात दुषित असता संततीचा मृत्यु वैवाहिक जीवन वाईट असते. स्त्री चा मृत्यु होतो. अगर ती विभक्त होते. नवमांशा मध्ये सप्तमेश, षष्ठ, अष्टम व व्ययात असता ही फले निश्चित मिळतील. असे असता राशी व नवमांश कुंडलीत सप्तमेश दुषित होतो. नवमांशात सप्तमेश पष्ठातच असता मुले आजारी होऊन दवाखान्यात ठेवावी लागतील.

६) सप्तमेश षष्ठात : दोन विवाह होतात. येथे सप्तमेश व कारक शुक्र हे दोन्ही दुषित झाले असतील तर नपुंसकत्व अगर रोग होण्याचा योग होतो. पण नुसता शुक्र दुर्बल असता पण दुषित नसता स्त्री चा मृत्यु होतो. सप्तमेश दुषित पण शुक्र चांगला मुळव्याध होण्याचा योग होतो. सप्तमेश पष्ठांत शष्ठेश युक्त असता स्त्री ची अपकीर्ती अथवा दीर्घ आजार होतो.

७) सप्तमेश सप्तमात :- शुभ ग्रह युक्त असता सप्तमेशाची दशा चांगली जाते. विवाह लवकर होतो. या दशेत आनंदी वातावरण असून शुभकार्य होतात. पण सप्तमेश पाप संबंधीत असता तीव्र आजार होतो, अगर जातक सर्व बाबतीत गांजलेला असतो. या दशेत मानहानी होते. लोकाकडून उपद्रव होतो. धमक्या मिळतात.

भागिदारीत पैसा मिळविल सप्तमेश येथे व्दितीयेशा सह दुषित असता स्वतःचा अगर स्त्री चा मृत्यु संभवतो पण आयुष्य मर्यादा चांगली असल्यास पतीबरोबर घटस्फोट होतो.

८) सप्तमेश अश्टमात :- वाईट गोष्टी घडतात. जातकाच्या स्त्रीचा मृत्यु व स्वतःच्या प्रकृती संबंधी काळजी उत्पन्न होते. अपघात होतात. सप्तमेश अष्टमात, आजारी स्त्रीचा योग अथवा रागीट स्त्रीचा योग येतो व नवरा सोडून जातो किंवा विभक्त होतो. अष्टमाच्या दशेत पुष्कळ अडचणी येतील व नवीन नवीन अडचणींना तोंड द्यावे लागेल.

९) सप्तमेश नवमात : बलवान असता वडिलांची परिस्थिती चांगली असते व ते परदेशात नशीब काढतील, सप्तमेश भाग्यात बिघडला असल्यास पित्याचा मृत्यु लवकर होतो. वैवाहिक जोडीदार धार्मिक गोष्टी करण्यापासून परावृत्त करील सप्तमेश भाग्येशयुक्त नवम्यांत असता यात्रा घडतील व जातक धार्मिक गोष्टीत व दान धर्मात खर्च करील. कीर्ती चांगली असते. नवमांशात सप्तमेश ६-८-१२ त असता वाईट परिणाम जास्त तीव्र होतील.

१०) सप्तमेश दशमात जातकाचा धंदा चांगला चालेल. स्त्री अगर पती विश्वासू व सद्गुणी असेल. पती-पत्नी उद्योगात एकमेकास मदत करतील. दुषित असता स्त्री जास्त महत्वाकांक्षी व मत्सरी असेल. पण स्वतःची कर्तबगारी विशेष नसते. त्यामुळे जातकास त्याचे परिणाम भोगावे लागतात. सप्तमेश दशमात दशमेशयुक्त अगर सप्तमेश दशमेश परिवर्तन उद्योग धंदा चांगला असतो. कीर्ती, पत व जनमत चांगले असते, या दशेत चांगली उर्जितावस्था राहिल. येथे दुषित झाला असता त्याच्या विरुद्ध फले मिळतात.

११) सप्तमेश लाभात :- असता, एकापेक्षा जास्त विवाह होतात. व येथे सुस्थितीत असता स्त्री श्रीमंत घराण्यातील असेल व पैसा आणील. येथे जास्त दुषित असता एकापेक्षा जास्त विवाह होतीलच पण एक स्त्री जातकाच्या पश्चात राहील. सप्तमेश लाभेश युक्त लाभात भागिदारी व उद्योग धंदा चांगला चालेल, परदेशात सुध्दा धंदा चालण्याचा योग येईल, वडिल बंधुची परिस्थिती चांगली असेल. येथे दुषित असता वडिल भावाची परिस्थिती चांगली नसते. शुभ पाप योग असता परिस्थिती मध्यम असते.

१२) सप्तमेश व्ययात एकापेक्षा जास्त विवाह होतात. येथे फार बिघडला असल्यास स्त्री अगर पुरुष लग्नानंतर निराळे राहतील. अगर त्यांना मृत्यु येईल पण द्वितीय विवाह होणार नाही. कारक व सप्तमेश दुर्बल असता वैवाहिक जीवन चांगले नसते. स्त्री अगर पतीचा विरह पावते. सप्तमेश लाभेशासह व्ययात व्यायेश युक्त जातक व त्याची स्त्री या वरील ग्रहाच्या महादशेत परदेशी रहातील. हाच योग पापग्रहांनी फार दुषित असता जातक व त्याची स्त्री अनितीकारक आयुष्य घालवितात. या योगावर शुभग्रह संबंध असल्यास जातक आध्यात्मिकामध्ये आपले आयुष्य घालविल

सप्तम भावासंबंधी काही विशिष्ट शुभ-अशुभ योग

शुभ

१) कामयोग :- सप्तम भावात काही शुभ ग्रह अगर सप्तम भाव शुभग्रहांनी दृष्ट असता व सप्तमेश उच, स्वगृही, वर्गोत्तम शुभग्रह युक्त अगर दृष्ट असता 'कामयोग' होतो. जातक नैतीक आचरणाने चांगला व पर स्त्री कडे पापवासनेने पाहणार नाही. तो संपत्ती, व सुखयुक्तअसतो.

२) लग्न किंवा चंद्रापासून सप्तम भाव हा भाग्येशाने युक्त :- अगर दृष्ट असता, अगर सप्तमेश आपल्या स्थानाला पहात असता, अगर बलवान शुभ ग्रह सप्तमात असता, अगर सप्तमाला पहात असता वैवाहिक जीवन सुखी असते व स्त्री भाग्यवान व प्रेमळ असते. कारक शुक्रापासून ही असाच योग पहावा.

३) कुटुंबेश, सप्तमेश, व्ययेश हे केंद्रात किंवा कोणात गुरुने दृष्ट असता – वैवाहिक जीवन सुख समृध्दीने युक्त असते.

४) शुभ ग्रह व्दितीयात (कुटुंबस्थानात), सप्तमात (वैवाहिक सुखाच्या स्थानात), लाभात (सप्तमाचे पंचम स्थानात) असता वैवाहिक जीवन संतती युक्त असते तसेच हा योग सप्तमेशाच्या व्दितीयात सप्तम व लाभ स्थानापासून ही पहावा.

५) मकर लग्न असून शनि मंगळ सप्तमात (कर्केत) असता स्त्री पतीव्रता, सुंदर व भाग्यवान असते. या योगात लग्नेश शनि सप्तमात येवून स्वगृहाला पहातो व कर्क राशीत मंगळ नीच पण शनिमुळे त्याचा नीच भंग होतो. व फले चांगली मिळतात.

६) जाया कारक शुक्र व सप्तमेश हे स्थिर राशीत सप्तम भावात असता, वैवाहिक जीवनाला स्थिरत्व येते. पण या योगात पंचम व सप्तम भावाचे स्वामी अस्तंगत नसावेत, अस्तंगत्व हा मोठा दोष आहे त्यामुळे योगाला बाधकतव येते.

7) सप्तमात बलवान गुरु, उच्च शुक्र सातव्या भावात दशमात बलवान असल्यास (बुरुज, सिंहासन, मंदिर इ.) स्त्री सुंदर असते. जातक स्त्रि भक्त असतो.

८) सप्तम भाव शुभ ग्रहाच्या राशीत किंवा मेश (मेष, वृश्चिक) असून शुक्र असता पती पत्नी एकनिश्ठ असतात

६) गजकेसरी योग, वर्षभरात तुम्ही पापमुक्त असता, स्वधायोग दिला असता. योगयोग (मालवण चंद्राचा समभाव, ऐहिक जीवन सुखी झाले असते.

अशुभयोग

१) दुष्कृती योगा ग्रह अगर पाप ग्रह व सप्तमेश, व्दादश भावात पाप संबंधीत असता पत्नीचा वियोग पर स्त्री चा अभिलाषी व गुप्तरोगांनी पिडीत असतो.

२) सप्तमेश पंचमात जर पुत्र नसेल तर पंचमेश सप्तमात स्त्रीचा वियोग असते.

३) पंचमेश अष्टमेश सप्तमात स्त्री अगर पतीचा मृत्यु होतो.

४) पुरुष कुंडलीत व्दितीय सप्तमात पापग्रह अगर ते पाप दृष्ट असल्यास, तसेच स्त्री कुंडलीत सप्तम अष्टमात पाप ग्रह जर ही स्थाने पापग्रहाने दृष्ट असता पत्नीचा अगर पतीचा मृत्यु होतो. स्त्री च्या कुंडलीत अष्टम स्थान हे सौभाग्यस्थानआहे. (Longivity of Married Life)

५) पापग्रह लग्नी, सप्तमात व्ययात व पंचमात क्षीण चंद असता विवाह होत नाही. व जातक संततीहीन असतो. लग्न सप्तमातले पापग्रह सप्तम भावाला दुषित करतात व व्ययातील पापग्रहामुळे शय्यासुखाचा अभाव असतो. क्षीण चंद्र पंचमात असता संततीस अनिष्ट असतो.

६) चंद्र व शुक्र यांच्या समोर मंगळ, शनि हे पापग्रह असता विवाह होत नाही.

चंद्र शुक्र हे स्त्री ग्रह आहेत व विवाहाचे कारक आहेत पापविद्ध असता विवाह होऊ शकत नाही.

७) स्त्री कुंडलीत चंद्र, शनि सप्तमात पुनर्विवाहाचा योग समजावा व पुरुष कुंडलीत ह्या युतीमुळे विवाह होत नाही अगर कठीण जातो.

८) लग्नापासून व्दितीयात, सप्तमात अष्टमात पापग्रह असता, विवाहाच्या भागिदाराचा

मृत्यु होतो. रवि राहू सप्तमात असता स्त्री मुळे संपत्तीचा नाश होतो.

(९) षष्ठ अष्टम व व्यय स्थानाचे स्वामी सप्तमात असता पती अगर पत्नीचा वियोग होतो. उदाहरणार्थ:- १) वृषभ राशीत षष्ठी स्वामी शुक्र सप्तमात वृश्चिक शत्रु गृही. 2) वृश्चिक लग्न अष्टमेश बुध वृषभेत सप्तमात. 3) कर्क लग्न षश्ठेश गुरू सप्तमात मकरेत नीच आणि 4) कन्या लग्नाला षश्ठेश शनी आणि अष्टमेश मंगळ मीनेत सप्तमात असणे.

१०) सप्तम भाव किंवा सप्तमेश हे पाप ग्रह मध्य अगर पापकर्तरीत, नीच अगर शत्रुगृही व अस्तंगत असता स्त्री चा मृत्यु होतो. कारक शुक्र पापग्रह युक्त पंचमात, सप्तमात, भाग्यात असता स्त्री निधन किंवा स्त्री मध्ये व्यंग असते.

११) व्यभिचार योग :- वैवाहिक जीवनाचा कारक ग्रह शुक्र हा मंगळाच्या (मेष, वृश्चिक) राशीत असून शनिने दृष्ट अगर शनि राशीत (मकर, कुंभेत) असून मंगळाने दृष्ट असता पर स्त्री शी संबंध असतो. हा योग नवमांशात ही पहावा.

(१२) सातव्या घरात नपुंसक ग्रह (बुध, शनि, केतू) आणि दोन ग्रह लाभात आहेत. व्दिभार्या योग होतो.

१३) सप्तमेश आणि कारक शुक्र अस्वभाविक राशीत आहेत, जर कुंडली नवमांश असेल तर असता, व्दिभार्या योग होतो.

(१४) निर्बल व दुषित असलेला शुक्र सप्तमात असता स्त्री अगर पुरुष वांझोटी अगर नपुंसक असतो.

१५) जलराशीत शनि षष्ठ वा व्ययात असता व तो शुभ ग्रह दृष्टी रहित असता जातक नपुंसक असतो.

१६) स्वगृहीचे पापग्रह सप्तमात असता विवाह सुखाला चांगले. पण शुभग्रह ६- ८-१२ चे स्वामी असून सप्तमात असता चांगली फले देत नाहीत.

१७) व्दितीय, सप्तम भावात पापग्रह अगर हे भाव पापग्रहाने दृष्ट असता स्त्री चा मृत्यु संभवतो. स्त्री कुंडलीत अशी परिस्थिती असता वैधव्य योग समजावा. पण व्दितीयात, सप्तमात शुभग्रह असता अगर ही स्थाने शुभग्रहांनी दृष्ट असता वैवाहिक जीवन चांगले असते.

इतर ग्रह योग

१) शुक्र वक्री असून पापसंबंधीत अाजद शकत नाही.

२) शुक्र नवमांशात उच्च असता स्त्री भारदस्त असते. सुशिक्षित संस्कारयुक्त स्त्री असते

३) सप्तमेशाचा नवमांश स्वामी जर शुभग्रह असेल तर स्त्री शुभ सात्विक उत्तम सुखी वैवाहिक जीवनअसते.

४) सप्तम भाव हा तणाव निर्माण करणारा, किंवा वैवाहिक जीवनात समृध्दी देणारा आहे. हे ठरवितांना सप्तमेशाचे संबंध तपासायला पाहिजे, लग्नेश व सप्तमेश हा पाप संबंधीत आहे किंवा शुभ संबंधीत आहेत? ह्यावर ते अवलंबून आहे,

५) ह्या दोघांचे (कारक शुक्र व सप्तमेश) १२ अगर ६ /८ परिस्थितीत असता,

संसाराची होळी करण्याची प्रवृत्ती असते व एकमेकाबद्दल आदर नसून एकमेकांचे वितुष्ट संबंध असतात, त्यांच्यामध्ये गैरसमजूती फार असतात. शुक्र व सप्तमेश ह्यांच्या मध्ये त्रिकोण योग असता एकमेकांस सांभाळून घेतात. राशी व स्थान महात्म्याप्रमाणे फले बदलत जातील,

६) १/७ परिवर्तन, समसप्तक योग शुभ समजावेत. ३ ११ संबंध अगर ४ १०

संबंध ही शुभ समजावेत, ते शुभ ग्रह संबंधीत असता, दुधात साखर पडली,

असे समजावे, पापग्रहाचे संबंध असता परिस्थिती चांगली रहात नाही.

७) सप्तमेशाचे कुंडलीतील स्थान वैवाहिक जीवनात तणाव करते. सुखी जीवन होण्याकरता सप्तमेश हा केंद्रात असावा, निदान त्रिकोणात असावा. सातमेश आपल्या स्थानापासून अष्टमात म्हणजे सप्तमाच्या द्वितीयात वैवाहिक जीवनात तणाव निर्माण करणारा ठरतो, त्यात एकवाक्यता नसते, विसंगती असते, सप्तमेश लग्नाच्या पष्ठात असता वैवाहिक जीवनाच्या आनंदात अडथळा समजावा. येथे सप्तमेश पापग्रह युक्त असता तसेच शत्रुगृही अगर नीच स्थितीत असता उणेपणाची स्पष्ट कल्पना येते. सप्तमेशाची व्ययस्थानी उपस्थिती (लग्नाच्या व्ययात) वरील प्रमाणेच फले देईल.

८) लग्नी पापग्रह शनि राहू, विवाहीत जीवनांत अडचणी निर्माण करतो.

९) सप्तमेश वक्री असून दुषित असता वैवाहिक जीवन धोक्याचे सभवते.

१०) सप्तमेश वक्री, अस्तंगत, शुभग्रह दृष्टीरहित असता वैवाहिक जीवनात ओढाताण दिसून येते.

ह्या करता सप्तम भाव, सप्तमेश व शुक्र ह्याचे ६ ८ १२ च्या स्वामीशी असलेले संबंध तपासावेत. कारण ती स्थाने व त्यांचे स्वामी हे संसारातील विरुद्ध भागिदाराला अनिष्ट असतात.

विधुरयोग ज्योतिष शास्त्रीय कारणे

कुंडलीतील विधवा/विधुर योग कसे जाणून घ्याल?? हा योग टाळण्याचा काही उपाय आहे का? हे उपाय केव्हा करावे, वरील प्रभाव पूर्णपणे नष्ट होऊ शकतो?

कुंडलीतील वैधव्य योग हा स्त्री साठी एक प्रकारे सर्वात मोठा शाप समजला जात असे, स्त्रीच्या आयुष्यात या पेक्षा वाईट योग असूच शकत नाही आणि स्त्रीला आयुष्यात अशा दु:खद प्रसंगांना सामोरे जावे लागू नये, अशी देवाकडे प्रार्थना करीत. पण कालपरत्वे समाज रचनेत बदल झाला आहे, प्रगत काळात विधात्याच्या व प्रारब्धाच्या नियतीनुसार विधवा योग जरी नशिबी आला तरीही बदललेल्या संस्कृती मुळे जीवन सुसह्य झाले आहे. स्त्री शिकलेले व स्वतः कर्तृत्ववान असल्यास जीवन प्रवास स्वतःच्या हिमतीवर पार करू शकते. तसेच बदलेल्या समाजरचनेनुसार दुसरा विवाह देखील करणे सहज शक्य आहे.

वैधव्य योग पुरुषांच्या पत्रिकेत असेल त्यास विधुर योग असे म्हटले जाते. पूर्वीच्या काळी पत्नीचे निधन झाल्यास पुरुषांना दुसरे लग्न करण्याची अनुमती होती. तसेच साधारणपणे पुरुष हे घरातील कर्ते व कमवते असल्यामुळे त्यांच्यावर तितकीशी बंधने नव्हती, त्यामुळे पुरुषांच्या पत्रिकेतील वैधवे योग तितकासा त्रासदायक मानला गेला नव्हता. परंतु मानसिक व शारीरिक पातळीवर विचार करता वैधव्य योगाचे होणारे परिणाम व त्याचा मानसिक त्रास, आपल्या जोडीदाराच्या वियोगामुळे होणारे दुःख, हे मात्र सारखेच मानायला हवे.

स्त्री व पुरुष जातक यांच्या कुंडलीमध्ये विवाह सौख्य,  विवाहाचे जोडीदार, कुटुंब, सुख, संतती यांची स्थाने व त्याविषयीचे नियम सारखेच असल्याने स्त्री व पुरुष यांच्यासाठी वैद्यव्य योगाचे नियम देखील सारखेच मानायला हवे असे माझे मत आहे. स्त्री व पुरुष जातकांचा विचार करता विवाहाच्या किंवा पती व पत्नी यांच्या कारक ग्रहांच्या बाबतीत मात्र भेद केला आहे त्याचा विचार स्त्री व पुरुष पत्रिकेत वेगवेगळया करणे आवश्यक आहे.

स्त्रीच्या पत्रिके तर रवीला पतीकारक मानण्यात आलेले आहे.  तर पुरुष जातकात शुक्राला पत्नी कारक मानण्यात आलेले आहे त्यामुळे ह्या ग्रहांची परिस्थिती विशेष करून अभ्यासणे गरजेचे आहे.  तसेच कुटुंब स्थानाचा विचार करता पुरुषांच्या पत्रिकेत विशेष करून द्वितीय स्थान तर स्त्रियांच्या पत्रिकेसाठी सप्तमाचे द्वितीय म्हणजेच अष्टम स्थान याचा विचार अधिक करावा असा निकष लावण्यास हरकत नाही.

विधुर म्हणजे ज्या व्यक्तीची पत्नी मरण पावली आणि तिला एकटे राहावे लागते, विधुरांची परिस्थिती विधवां सारखी जाचक नसते, परंतु ते नक्कीच एकाकी होतात आणि हे आयुष्य एकटे घालवणे हे एका मोठ्या शापापेक्षा कमी नाही. चला पाहू या अशा कोणत्या ग्रहस्थिती आहेत ज्यांमुळे व्यक्ती एकाकी पडते आणि आपल्या जीवनसाथीच्या मृत्यूचा फटका सहन करावा लागतो.

काही ज्योतिषीय कारणे व नियम

* बृहस्पति दुर्बल राशीत सातव्या भावात असेल तर पत्नीचा मृत्यू होतो.

* सातव्या भावात वृषभ राशीत बुध असेल तर विधुर योग तयार होतो.

*. सातव्या भावात वृश्चिक राशीत शुक्र असेल तर पत्नीचा मृत्यू होतो.

* सातव्या भावात मीन राशीमध्ये शनी किंवा मंगळ असेल तर पत्नीचा मृत्यू होतो.

* शुक्र कोणत्याही घरात अशुभ ग्रह असेल तर पत्नीच्या जिवाला धोका असतो.

* मंगळ, राहू आणि शनी अनुक्रमे सहाव्या, सातव्या आणि आठव्या भावात असतील तर पत्नी जास्त काळ जगत नाही.

* जर सप्तम स्वामी दुर्बल असेल आणि सहाव्या, आठव्या किंवा बाराव्या घरात गेला असेल किंवा सप्तम स्वामी दुर्बल राशीत असेल तर पत्नीचा मृत्यू लवकर होतो.

* जर सप्तम भावात किंवा सप्तम स्वामीला अशुभ ग्रह दिसत असेल किंवा सप्तम स्वामी त्याच्या अशक्त राशीत असेल किंवा प्रतिगामी असेल तर त्या रहिवाशाच्या पत्नीचा मृत्यू होतो.

* शुक्र सातव्या, पाचव्या किंवा नवव्या घरात अशुभ ग्रह असेल तर पत्नीचा मृत्यू होतो.

* जर सप्तम स्वामी दुर्बल राशीत असेल किंवा शत्रूच्या राशीत असेल किंवा अशुभ ग्रहाच्या दृष्टीनंअसेल आणि सप्तम भावातही अशुभ ग्रह असेल किंवा अशुभ राशीत असेल तर राशीच्या पत्नीचा मृत्यू होतो.

महत्वाचे : या योगांना / संयोगांना अंतिम परिणाम मानणे चुकीचे ठरलं कारण विधुर योगाचा पूर्ण परिणाम होण्यासाठी पत्नीच्या कुंडलीत अल्पायुयोग असणे देखील आवश्यक आहे आणि जर तिच्या कुंडलीत पूर्णायुयोग असेल तर मात्र विधुर किंवा विधवा योग सुद्धा कुचकामी ठरतात. पण अशा कुडंल्यात जोडीदारांना सांसारिक संकटांना सामोरे जावे लागते. वैवाहिक सौख्य कमी असते.

निष्कर्ष : विधवा किंवा विधुर योगाचा विचार करता स्त्री – पुरुष जातक यांच्या पत्रिकांचा एकत्रित विचार करणे महत्वाचे आहे.

माझा विचार – फक्त पुरुषाच्या कुंडली वरून विचार करता सप्तम स्थान जोडीदाराचे मानून आणि ते लग्न स्थान धरून त्याच्या आयुर्दायचा विचार करावा असे ज्योतिष तर्कदृष्ट्या पडताळून पाहण्यास हरकत नाही.

वर्ग कुंडली विचार :

नवांशकुंडली - कालत्रसौख्य

त्रिशांश कुंडली – प्रायः स्त्रीचे चरित्र, स्वभाव ओळखने यासाठी उपयोग करतात. पाराशर मुनिच्या अनुसार अरिष्ट म्हणजे रोग, घोर संकट यासाठी त्रिशांश कुंडली विचार द्वारे चांगल्या प्रकारे होवू शकते. त्रिशांश कुंडलीतील सप्तमेश, शुक्र यांची स्थिती याचा विचार करावा.

कुंडलीची भाषा व कुंडली तंत्र मंत्र या पुस्तकातली लेखनाअनुवाद

ज्यो. वीणा महेश लवाटे (८४११०१००९१)

## लेख क्र. ४५ : विवाह : कुंडली दोष (काय तपासावे)

**लेखक : श्री. दीपक नाईक (८३९००७९७९९)**

* ग्रह, राशी आणि दिशा..

कुंडलीमधे प्रत्येक ग्रहाची आणि राशीची दिशा आहे. मनुष्याच्या जीवनात त्याच्या प्रत्येक कार्यात दिशेचे अनन्य साधारण महत्व आहे.

प्रत्येक जातकाला प्रश्न पडलेला असतो.

1) भाग्योदय कोणत्या दिशेला होईल??

2) वैवाहिक जोडीदाराचा शोध कोणत्या दिशेला घेऊ??

3) लाभ कोणत्या दिशेला होईल???

4) व्यवसाय कोणत्या दिशेला सुरु कुरु???

असे अनेक प्रश्न जातकाचे असतात. प्रत्येक ग्रहाची दिशा पुढील प्रमाणे.

* सूर्य-पूर्व दिशा, चंद्र-वायव्य दिशा, मंगळ दक्षिण दिशा, बुध उत्तर दिशा, गुरु - ईशान्य दिशा, शुक्र-आग्नेय दिशा, शनी-पश्चिम दिशा, राहू-केतू नैऋत्य दिशा.

* 12 राशींच्या दिशा

मेष-पूर्व दिशा, वृषभ दक्षिण दिशा, मिथुन -पश्चिम दिशा, कर्क-उत्तर दिशा, सिंह - पूर्व दिशा, कन्या-दक्षिण दिशा, तूळ-पश्चिम दिशा, वृश्चिक -उत्तर दिशा, धनु-पूर्व दिशा, मकर-दक्षिण दिशा, कुंभ -पश्चिम दिशा, मीन -उत्तर दिशा.

* उदा. वैवाहिक जोडीदार कोणत्या दिशेचा असेल?

सप्तम स्थानी वृषभ राशी असून राशी स्वामी शुक्र मीन राशी मधे स्तिथ असेल तर जोडीदार उत्तर दिशेचा असेल.

* लाभ कोणत्या दिशेला होईल???

लाभेश ज्या राशीत बसला असेल त्या राशीच्या दिशेला विशेश लाभ होतो. एकादश (लाभ) भवात जर कोणता ग्रह (एका पेक्षा अधिक) असेल तर त्या ग्रहाच्या दशा अंतरदशेत विशेष लाभ मिळतो.

* माणसाने कुंडलीनुसार लाभदायी दिशेला आपले कार्य केल्यास ती दिशा जातकाला साकारात्मक परिणाम देते. व माणसाच्या मेहनतीला योग्य फळ मिळते. कारण मनुष्याच्या जीवनाला योग्य दिशा सापडणे फार महत्वाचे असते.

* विवाहयोग विलंब व विवेचन

विवाह कधी होईल ?

किंवा विवाह जमत नाही

असे अनेक जातक विचारत असतात.

* विवाह कधी होईल ?

किंवा विवाह जमत नाही असा प्रश्न विचारला नाही असा एक दिवस जात नाही.

* शुक्र हा विवाहाचा कारक ग्रह आहे. शुक्र शुभ स्थानात असेल, सप्तमात शुभ ग्रह (शुक्र, चंद्र, बुध) असेल तर विवाह लवकर होतो.

कुंडलीतील अनेक बाजूंचा विचार करावा लागतो फक्त एकांगी विचार न करता सर्वअंगीन विचार जास्त उपयुक्त ठरतो असा माझा अनुभव आहे व गेली 25 वर्षे सतत अभ्यास करून मी माझे मत तयार केले आहे

*2, 7, 11 स्थानातील ग्रहांच्या दशा, अंर्तदशेत विवाह होतो किंवा सप्तमाशी संबंधित ग्रहांच्या दशा अंर्तदशेत विवाह होतो. मुल्यांच्या बाबतीत शुक्र आणि मुलीच्या बाबतीत गुरू ग्रहांच्या दशा अंर्तदशेत विवाह होतो.

* विवाहाला विलंब करणारे ग्रह

शनि-शुक्त युति, चंद्र-शनि युति, पंचमात शनि, सप्तमात पापग्रह ( मंगळ, शनि, हर्षल). गुरु किंवा शुक्र कमजोर,

* विवाह बाधक योग

१. सप्तमेश अशुभ स्थानात,

२. सप्तमेश 6, 8, 12 स्थानात अस्त

३. चंद्र शुक्र युति.

४. सप्तमात मंगळ, शनि.

५. सप्तमात शुक्र मंगळ

६. शुक्र मंगळ पंचगात किंवा नवमात,

७. शुक्र पापग्रहाबरोबर पंचम किंवा नवम स्थानात,

८. शुक्र, बुध, शनि तिनही नीच. ज्यांच्या कुंडलीत विवाह बाधक योग असतो त्यांचा विवाह होत नाही किंवा विवाहास खूप अडचणी येतात.

* विवाह जुळण्यास विलंब होणे या संदर्भात शनीचे स्थान आणि हष्टीयोम पहावे शनी हा विलंबाचा कारक असला तरीही फक्त एकच ग्रह विवाह संदर्रभात प्रतिकूल असतो असे नाही. सप्तम स्थान, सप्तमेश आणि शुक्र कुंडलीत महत्वाचे असतातच ।

* मुख्यत्वे शुक्रवारील आणि सप्तमेशावरील कुयोग, त्रिक स्थान स्वामी, शत्रू ग्रह, पापग्रह यांच्याशी शुक्राची युती, सप्तमातील, हर्शल, नेपच्यून हे ब्रह तसेच शनी-मंगळ, शनी-राहू, शनी-केतू आदी युतीयोग पडताळून पाहावेत. या अनुषंगाने शुक्र आणि सप्तमेशाला लाभलेले स्थान महत्वाचे असते त्रिक स्थानी कुयोग असले तर तीव्रता अधिक वाढू शकते..

स्थळ पाहिले असता अनेक ठिकाणी कुंडली जुळते परंतु वारंवार नकार येणे, विवाह जुळता जुळता किंवा विवाह जुळून तुटणे, हाता तोंडाशी आलेला घास जावा तसे शेवटच्या क्षणी सारे फिस्कटणे, 'पाहुणे पाहून मेले' असले तरी निर्णय कळविला न जाणे अशा अनेक घटना या ग्रहयोमाशी निगडीत असतात

* सातत्याने विवाह संदर्भात अडचणी-अडथळे येत असतील तर विवाहाचा गुरुबलाशी संबंध असल्यामुळे गुरुवारी दत्तगुरूंचे दर्शन आणि दत्तगुरू आणि औदुम्बर सेवा, नवनाथ अध्याय २८ वाचणे, उपवर कन्येसाठी कात्यायनी देवीचा मंत्र आणि उपवधू मुलांसाठी देवीमाहात्म्य मधील 'पत्नी मनोरमा' हा मंत्र हे उपाय प्रख्यात आहेत हे मंत्र आणि संकल्प उच्चारासह जवळपास राहणार्या गुरुर्जींकडून शिकून घ्यावेत.

* काही वर्षापूर्वी रुक्मिणी स्वयंवर पोथीचे वाचन मुली करीत असत सध्या हा उपाय पण क्वचित सुचविला केला जातो असे निदर्शनास आले आहे. रुक्मिणी स्वयंवर पोथी संदर्भातील आपले अनुभव महिलांनी कथन केले तर उत्तम !

* श्री मंगल चंडिका स्तोत्र देखील विवाह जुळण्यासाठी प्रभावी आहे. उपाय- उपासना मनापासून केल्या असता त्या निश्चित फळतात. कारक ग्रहांच्या दशांतर्गत आणि गोचर गुरुच्या कारक स्थान-ग्रह यावरील दृष्टीयोमात विवाह जुळून येतो. या उपायामुळे वारंवार येणार्या अडचणी दूर होण्यास मदत मिळते.

* विवाहास उशीर कारण आणि ज्योतिष प्रत्येक आई वडिलांचे स्वप्न असते कि आपल्या मुलांचे लग्न वेळेवर व्हावे. परंतु कधी कधी जातकाच्या पत्रिकेत असे योग असतात कि विवाहास उशीर होतो. या योगामुळे सुयोग्य मुलं मुलींच्या विवाहास बाधा निर्माण होते.

खूप प्रयत्न करून सुद्धा विवाह होत नाही. विवाहास उशीर करणारे काही योग १. कुंडलीच्या सप्तम भावात बुध व शुक्र दोन्ही असतील तर विवाहाची चर्चा होते, खूप उशिरा विवाह होतो

२. चतुर्थ किंवा लग्न भावात मंगळ असेल आणि शनी सप्तमात असेल तर व्यक्तीला विवाहात रस नसतो.

३. सप्तमात शनि आणि गुरु असेल तर विवाहास उशीर होतो.

४. चंद्रापासून गुरु सप्तमात असेल तर विवाह उशिरा होतो.

५. चंद्राच्या कर्क राशीपासून गुरु सप्तमेश असेल तर विवाह उशिरा होतो.

६. सप्तमात त्रिक भावाचा स्वामी असेल तर कोणताही शुभ ग्रह योगकारक होत नाही व विवाहास उशीर होतो.

७. सूर्य, मंगळ किंवा बुध लग्न किंवा लग्नाचा स्वामी वर दृष्टी टाकत असेल तर आणि गुरु बाराव्या भावात असेल तर अध्यात्मिक झाल्यामुळे विवाहास उशीर होतो.

८. लग्न, सप्तम आणि बाराव्या भावात गुरु सारखा शुभ ग्रह योगकारक न झाल्यामुळे आणि चंद्र कमजोर असल्याने विवाहास उशीर होतो.

९. मुलीच्या पत्रिकेत सप्तमेश किंवा सप्तम भाव शनिने पीडित असेल तर विवाहास उशीर होतो.

> गुरु + राहू चांडाळ योग......

कुडंली मधे गुरु राहू किंवा गुरु केतू एकाच भावात युतीमये असतात तेंव्हा कुंडली मधे या दूयर्योगाची निर्मिती होते. कुडंलीमथे गुरु हा नैसर्गिक शुभ ग्रह आहे. शिवाय गुरु म्हणजे ज्ञान, परीमार्जीत ज्ञान, मानसम्मान तर राहू केतू हे छाया ग्रह आहेत. शिवाय पाप ग्रह आहेत. राहू म्हणजे भ्रम, माया. तर केतू म्हणजे कल्पना विलास. राहू कोणतेही कार्य सरळ मार्गी पूर्ण न होऊ देणारा मायावी ग्रह आहे. परंतु गुरु राहू युती पूर्णतः त्रासदायक होते का??

या युती मधे एक सूत्र लागू होते. गुरु राहू युती मधे कोणत्या ग्रहाचे अंशात्मक अधिक आहे त्यावर या योगाचे परिणाम अवलंबून असतात.

उदा. गुरु धनु राशीत असून 15 अंशांवरती असून राहू 7 अंशावरती आहे तर गुरु स्वराशीत मूळ त्रिकोण राशीत असल्याने बलवान आहे. शिवाय राहू पेक्षा गुरुचे बळ अधिक आहे.

याचा अर्थ असा हातो का कि चांडाळ योगाचा परिणाम होणार नाही.? परिणाम होणार परंतु त्याची तीव्रता कमी असेल. जसे कि स्वच्छ कपड्यावरती एखादा लहानसा डाग लागला तर तो पटकन लक्षात येणार नाही पण मोठा असेल तर तो स्वच्छ कपड्यावरती उठून दिसेल.

तसेच गुरु बळ जास्त असेल तर समस्या येतील परंतु त्याची तीव्रता कमी होईल. परंतु जर गुरु राहू युती मथे जर राहू बलवान असेल तर खूपदा त्याचे परिणाम तीव्र जाणवतात.

मानसन्मान, कार्यात विघ्न, होणारी कामे न होणं, वैवाहिक जीवनात समस्या, शैक्षणिक समस्या, श्रमक स्थिती, रोग, ऋण, भाम्यात कमतरता, कार्यक्षेत्रात त्रास, मेहनतीचा मोबदला न मिळणे प्रगती मधे अडथळे, खर्च जास्त, या सारखे परिणाम जास्त दिसून येतात.

गुरु राहू युती खूपदा आध्यात्मिक प्रमती सुद्धा देते. कारण गुरु म्हणजे ज्ञान आहे. आणि राहू हा छाया ग्रह असल्याने त्याच्या कडे स्वतःचा प्रभाव नाही. तो ज्या ग्रहासोबत किंवा ज्या राशीत असतो त्यानुसार तो स्वतःचा प्रभाव देतो. गुरु सारख्या सात्विक ग्रहाच्या सानिध्यात आल्याने राहू मधे ही गुरुचे गुणधर्म येतात परंतु इथे गुरु बलवान असणे आवश्यक असते.

उदा. शनीच्या कुंभ राशीत गुरु राहू युती होत असेल तर अशी व्यक्ती सन्यस्थ होते. किंवा उच्च कोटीची आध्यात्मिक असते.

गुरु राहू चांडाल योग हा गुरु आणि राहू यांच्या अंशात्मक बळा वरती सकारात्मक किंवा नकारात्मक प्रभाव जातकाच्या जीवनावरती पाहावयास मिळतो.

उदा. गुरु राहू युती व्यक्तीच्या लग्न भावात होत असेल. लग्न वृषभ असेल तर शुक्र आणि गुरु शत्रू आहेत तसेच शुक्राचा शनी मित्र आहे आणि शनीची छाया म्हणजे राहू आहे. तर या योगात जातकाला मान सन्मान योग मिळू देत नाही. त्याच्या व्यक्तित्वाची छाप जनमानसात पडत नाही. मग अशी व्यक्ती कर्तृत्वान जरी असली तरी त्याच्या कामाचं श्रेय त्याला हा योम मिळू देत नाही.

तसेच जर हा योग धनु लग्नात होत असेल तर गुरु हंस नामक पंचमहापुरुष योगाची निर्मिती करतातं तसेच स्व उच्च राशीत असल्याने बलवान आहेत आणि राहू सोबत असेल तर याचं योगाची तीव्रता इथे कमी प्रमाणात दिसून येते. इथे ही मान सन्मान यात हानी होईल परंतु फार अल्प प्रमाणात.

आपल्या कुंडलीत जर असा योग असेल तर या योगात गुरु राहू पैकी कोण बलवान आहे ते पाहूनच या योगाचे प्रभाव पहा.

- कुंडली वरून पूर्वजन्म योनी वा विचार

1) जातकाच्या कुंडलीत 4 किंवा त्या पेक्षा अधिक ग्रह उच्च किंवा स्व राशीत असता जातक उत्तम योनी भोगून इथे जन्म घेतला असे समजावे

2) जातकाच्या लग्न स्थानी उच्च राशीचा चंद्र असता जातक पूर्वजन्मी सत्य आणि विवेकी होता असे समजावे

3) लग्नी गुरू असता जातक पूर्वजन्मी वेदपाठी ब्राम्हण, सगुणी, साधू, तपस्वी, धर्मात्मा होता असे समजावे

4) जातकाच्या जन्म कुंडलीत 6/8/१२ व्या स्थानी रवी असता पूर्वजन्मी पापी किंवा भ्रष्ट जीवन व्यतीत केलेला असे समजावे

5) लग्न अथवा सप्तम स्थानी शुक्र असता जातक पूर्वजन्मी प्रसिद्ध व्यापारी शेठ, भोमी जीवन व्यतीत केलेला असतो

6) लग्न किंवा सप्तम स्थानी राहू असता जातकाच्या पूर्वजन्मी चा मृत्यू स्वाभाविक रुपात झालेला नसतो

7) 1/4/7/11 व्या स्थानी शनी असता जातक पूर्वजन्मी पाप पूर्ण कार्यात स्त असे समजावे

8) 4 किंवा अधिक ग्रह नीच राशी मध्ये असता जातकाचा पूर्वजन्मी चा मृत्यू आत्महत्येचा झालेला असतो

9) लग्नी बुध असता जातक पूर्वजन्मी विविध त्रासाने त्रस्त होता असे समजावे

10) 6/7/10 स्थानी मंगळ असता जातक पूर्वजन्मी क्रोधी असतो तसेच त्याने अनेक लोकांना पीडा दिलेली असे समजावे

> विषय : कुंडलीतील एकादश स्थान आणि उत्पन्नाची साधने

- एकादश स्थान पासून आपण खालील विचार करू शकतो :-

एकादश स्थान अथवा लाभ स्थान व्यक्तीला मिळणारे लाभ याचा सूचक असतो, या स्थानात ज्या स्थानाचा स्वामी येऊन बसतो त्या स्थाना पासून प्राप्त होणारी वस्तुची प्राप्ती व्यक्तीला होत असते

१] जर या स्थानी रवी असता जातकाला नोकरी व्यवसायात मानसन्मान मिळतो

२] जर या स्थानी चंद्र असता जातकाला तरळ पदार्थ, समुद्र, मोती, कृषि, जल, या गोष्टी पासून लाभ होतो

३] जर या स्थानी मंगळ असता जातकाला निडरता, यंत्र, भूमी अग्नि या संबंधी कार्या पासून लाभ मिळतो

४] जर या स्थानी बुध असता जातकाला शिक्षण लेखन व वाणी, वाचा या द्वारे लाभ होतो

५] जर या स्थानी गुरु असता जातकाला ज्ञान साहित्य, धार्मिक कार्य या सारख्या गोष्टी पासून लाभ होतो

६] जर या स्थानी शुक्र असता जातकाला नाटक, नृत्य, अभिनय, कला, सिनेमा, आभूषण या पासून लाभ मिळतो

७] जर या स्थानी शनि असता जातकाला श्रम, कारखाने, कृषि, पॉलिटिक्स, संन्यास व गूढ विद्या यातून लाभ मिळतो

८] जर या स्थानी राहू-केतू असता जातकाला सट्टा, लॉटरी, शेअर मार्केट, तंत्र मंत्र, गूढ ज्ञान या पासून लाभ मिळतो

* कुंडली वरून पूर्वजन्म योनी चा विचार

1) जातकाच्या कुंडलीत 4 किंवा त्या पेक्षा अधिक ग्रह उच्च किंवा स्व राशीत असता जातक उत्तम योनी भोगून इथे जन्म घेतला असे समजावे

2) जातकाच्या लग्न स्थानी उच्च राशीचा चंद्र असता जातक पूर्वजन्मी सत्य आणि विवेकी होता असे समजावे

3) लग्नी गुरू असता जातक पूर्वजन्मी वेठपाठी ब्राम्हण, सगुणी, साधू, तपस्वी, धर्मात्मा होता असे समजावे

4) जातकाच्या जन्म कुंडलीत 6/8/१२ व्या स्थानी रवी असता पूर्वजन्मी पापी किंवा भ्रष्ट जीवन व्यतीत केलेला असे समजावे

5) लग्न अथवा सप्तम स्थानी शुक्र असता जातक पूर्वजन्मी प्रसिद्ध व्यापारी शेठ, भोगी जीवन व्यतीत केलेला असतो

6) लग्न किंवा सप्तम स्थानी राहू असता जातकाच्या पूर्वजन्मी चा मृत्यू स्वाभाविक रुपात झालेला नसतो

7) 1/4/7/11 व्या स्थानी शनी असता जातक पूर्वजन्मी पाप पूर्ण कार्यात रत असे समजावे

8) 4 किंवा अधिक ग्रह नीच राशी मध्ये असता जातकाचा पूर्वजन्मी चा मृत्यू आत्महत्येचा झालेला असतो

9) लग्नी बुध असता जातक पूर्वजन्मी विविध त्रासाने त्रस्त होता असे समजावे

10) 6/7/10 स्थानी मंगळ असता जातक पूर्वजन्मी क्रोधी असतो तसेच त्याने अनेक लोकांना पीडा दिलेली असे समजावे

* विवाह व ज्योतिष: केव्हा, कोठे, कसा व कोणाशी होईल आपला विवाह के जाणून घ्या !

विवाहास विलंब किंवा विवाह न ठरण्याचा होतोय का त्रास, कारणे जाणून त्यांचे निराकरण करून घ्या

माझा विवाह कधी होईल, जोडीदार कसा असेल, विवाहास विलंब तर होणार नाही ना व होणार असल्यास काय? तसेच विवाहासाठी काय उपाय आहेत? विवाहेच्छुकांच्या मनात असे अनेक प्रश्न निर्माण होत असतात, परंतु योग्य माहितीच्या अभावामुळे ह्याचे उत्तर मिळत नाही. भारतीय संस्कृतीत १६ संस्कार सांगितले आहेत, ज्यात विवाह संस्कारही समाविष्ट आहे. अनेकदा विवाह होत नाही व अनेकदा विवाह झाल्यावर विवाह विच्छेद होतो. हे सर्व ग्रहांच्या प्रभावामुळे घडत असते. कुंडलीतील सप्तमस्थान हे दर्शविते कि आपला विवाह केव्हा होईल. विवाहासाठी कोणती दिशा उपयुक्त राहील कि जेथे प्रयत्न केल्याने लवकर विवाह ठरू शकेल. एकंदरीत जेव्हा एकाहून अधिक अशुभ ग्रहांचा प्रभाव सप्तमावर असता विवाहास विलंब होतो.

ग्रहांमुळे विवाहात अडचण निर्माण होते वैदिक ज्योतिष शास्त्रानुसार कुंडलीतील सप्तमेशाची दशा किंवा अंतर्दशा, सप्तमातील स्थित ग्रहांची दशा किंवा अंतर्दशा किंवा सप्तमावर दृष्टी टाकणाऱ्या ग्रहांची दशा किंवा अंतर्दशा असता किंवा षष्ठाशी संबंधित ग्रहाची दशा किंवा अंतर्दशा असता विवाहास विलंब किंवा विघ्न येत असतात. काहीवेळा तर विवाहास विलंब होऊन सुद्धा योग्य असा जोडीदार मिळत नसतो. येथे आपण विवाहास होणाऱ्या विलंबाची कारणे व त्यांचे निराकरण करण्यासाठी करावयाचे उपाय ह्यांच्या विषयी जाणून घेऊ.

आपण आमच्या ज्योतिषांकडून आपल्या कुंडलीच्या विश्लेषणाच्या आधारे आपल्या विवाहा संबंधी संपूर्ण माहिती मिळवू शकता.

विवाहास बाधक परिस्थिती

* जर दशा किंवा अंतर्दशा विवाहास उपयुक्त असेल तर गोचर ग्रहांची माहिती सुद्धा आवश्यक असते, ज्यात गुरु व शनी ह्यांच्या पाठबळाची सुद्धा आवश्यकता आहे. जेव्हा गुरु व शनीचा गोचरीने सप्तमाशी दृष्टीने किंवा स्थितीने संबंध येतो तेव्हा कुंडलीत विवाहाचा योग निर्माण होतो. ज्या स्थानातून ग्रहांचे गोचर भ्रमण असते त्या स्थानाशी संबंधित अष्टकवर्गाच्या रेखा सुद्धा असल्या पाहिजेत, अन्यथा गोचर ग्रहांची अनुकूलता असताना सुद्धा विवाह होऊ शकत नाही. तसेच चंद्र व मंगळाचा संबंध पंचम व नवम स्थानाशी असायला पाहिजे. शुभ व सुखी वैवाहिक जीवनासाठी लाभ व व्यय स्थान द्वि सुद्धा शुभ असणे गरजेचे आहे. षष्ठ व दशम स्थान सुद्धा विवाहात विघ्न उत्पन्न करू शकतात.

* कुंडलीतील सप्तम स्थानावरून हे समजते कि आपला विवाह कोणत्या वयास व विवाहासाठी कोणती दिशा उपयुक्त आहे.

* शुक्र, बुध, गुरु व चंद्र हे शुभ ग्रह आहेत. ह्या पैकी कोणताही एक ग्रह सप्तमात असता विवाहात येणारी विघ्ने टळतात.

* जर ह्या ब्रहांसह इतर कोणता ग्रह असला तर विवाहात अडचणी येतात. राहू, मंगळ, शनी, रवी इत्यादी अशुभ ब्रग्रह आहेत. ह्या पैकी कोणत्याही ग्रहाचा सप्तमाशी कोणत्याही प्रकारे संबंध असता विवाह किंवा वैवाहिक जीवनासाठी तो अशुभच ठरतो.

* सप्तमात जर बुध असला तर विवाह लवकर होण्याची शक्यता असते. जर बुधावर इतर कोणत्याही ग्रहाचा प्रभाव नसला तर २० ते २५ वयाच्या दरम्यान विवाहाचा योग होतो.

* जर आपल्या कुंडलीत सप्तमात शुक्र, गुरु किंवा चंद्र असता २४- २५ वयाच्या दरम्यान विवाह होण्याची शक्यता असते.

* गुरु सप्तमात असता विवाह २५ व्या वयी होतो. गुरुवर रवी किंवा मंगळाचा प्रभाव असता एखाद वर्षाचा विलंब होऊ शकतो आणी जर राहू किंवा शनीचा प्रभाव असेल तर २ वर्षांपर्यंत विलंब होऊ शकतो.

* शुक्र सप्तगात असून त्यावर रवी किंवा मंगळाचा प्रभाव असला तर विवाहास २ वर्षांचा विलंब होतो. अशाच प्रकारे जर शुक्रावर शनीचा प्रभाव असला तर एक वर्ष व राहूचा प्रभाव असला तर विवाहास दोन वर्ष विलंब होतो.

* चंद्र सप्तमात असून त्यावर मंगळ किंवा रवी ह्यापैकी कोणा एकाचा प्रभाव असला तर विवाह २६ व्या वयी होण्याची शक्यता असते. ह्या प्रमाणेच शनीचा प्रभाव मंगळावर असला तर विवाहास तीन वर्षे विलंब व राहूचा प्रभाव असला तर २७ व्या वयी विवाह होत असतो, मात्र त्यातही अनेक विघ्ने येत असतात.

* रवी जर सप्तमात असला व त्यावर कोणत्याही अशुभ ग्रहांचा प्रभाव होत नसला तर २७ व्या वयी विवाहाचा योग येतो.

* मंगळ, राहू व केतू ह्यापैकी कोणताही एक ग्रह सप्तगात असला तर विवाहास भरपूर विलंब होतो. येथे राहू असता विवाह सहजपणे होत नाही. इतकेच नव्हे तर बोलणी होऊन सुद्धा विवाह मोडू शकतो. ह्याच प्रमाणे केतू जर सप्तमात असला तर विवाहाच्या दरम्यान अडचणी येतात.

* शनी सप्तमात असला तर जोडीदार हा समजूतदार व विश्वासू असतो. सप्तमात शनी असता तो योगकारक होऊन सुद्धा विवाहास विलंब होतो. तसेच असा शनी सप्तमात असला तर ३० व्या वर्षा नंतर विवाह होतो.

* शनी मंगळ, शनी राहू, शनी रवी, मंगळ राहू, मंगळ रवी किंवा स्वी - राहू असे एकत्रितपणे सप्तमात किंवा अष्टमात असता विवाहास भरपूर विलंब होण्याची शक्यता असते.

* विवाह योग असूनही काही कारणाने विवाह स्थगित झाला तरी सुद्धा विवाहास विलंब होतो.

* विवाहास विलंब होण्याचे आणखी एक कारण म्हणजे मंगळ दोष असणे हा सुद्धा आहे. सर्व साधारणपणे मंगळ दोष असणाऱ्यांचा विवाह २७, २९, ३१, ३३, ३५ व ३७ व्या वयी होतो.

* विवाहाचे कारक सप्तमावर शुभ ग्रह किंवा गुरु, शुक्र इत्यादींची दृष्टी असणे.

सप्तमेश लग्नी किंवा लग्नेश सप्तमात असणे.

सप्तमेश केंद्र किंवा त्रिकोणात असणे.

सप्तमेश लाभस्थानी असणे. सप्तमाचा कारक ग्रह शुक्रावर कोणत्याही अशुभ ग्रहाची दृष्टी नसणे किंवा त्यांच्याशी युती नसणे. तसेच शुक्र केंद्रात किंवा त्रिकोणात स्थित असणे.

सप्तमेश उच्चीचा असून लग्नेशाच्या युतीत असणे.

भाग्येश सप्तमात किंवा सप्तमेश भाग्यात असता विवाह होतो.

* जोडीदाराची आर्थिक स्थिती

१. जर चतुर्थेश इतर केंद्रस्थानाच्या अधिपतीच्या युतीत किंवा दृष्टीत असला तर जोडीदार व्यवसाय करणारा असतो.

२. अशाच प्रकारे जर सप्तमेश द्वितीयात, पंचमात, भाग्यात, दशमात किंवा लाभात असून चंद्र, बुध किंवा शुक्र ह्या पैकी कोणी सप्तमेश असेल तर जोडीदार व्यापारी असतो.

३. जर आपल्या कुंडलीतील चतुर्थेश द्वितीयात किंवा व्ययात असेल तर जोडीदार नोकरी करणारा असतो.

४. जर सप्तमेश व चतुर्थेश नवमांश कुंडलीत उच्च किंवा स्वराशीस असून एकमेकांच्या युतीत किंवा दृष्टीत असले तर जोडीदार नोकरीत उच्चाधिकारी असतो.

५. जर शनीचा संबंध चतुर्थाशी होत असला तर जोडीदार नोकरी करणारा असतो.

६. जर कुंडलीत सप्तमात सहू किंवा केतू असून सप्तमेश सप्तमात, अष्टमात किंवा व्ययात असला व नवमांश कुंडलीत बलहीन असला तर जोडीदार सामान्य नोकरी करणारा असतो.

* जोडीदार कसा असेल

१. जन्म कुंडलीतील सप्तमेश जर चतुर्थ, पंचम, भाग्य किंवा दशमात स्थित असला तर जोडीदार हा चांगल्या कुटुंबातील असतो.

२. जर सप्तमेश उच्चीचा असून केंद्रात किंवा त्रिकोणात स्थित असला तर जोडीदार शिक्षित, धनवान व गान सन्मान युक्त असतो.

* विवाह लवकर होण्यासाठी उपाय

१. भगवान शंकरासह माता पार्वतीचे सुद्धा पूजन करावे. माता पार्वतीचे पूजन हे विशेषतः मुलींनी करावे. पूजेत माता पार्वतीस सौभाग्य लेणे दिल्याने विघ्ने दूर होतील.

२. दररोज विघ्नहर्ता गणेश व रिद्धी सिद्धीचे पूजन करावे.

३. विशेषतः गुरुवारी भगवान श्रीविष्णू व लक्ष्मीदेवीचे एकत्रितपणे पूजन करावे.

४. विवाहात विघ्न उत्पन्न करणारे ग्रह गुरु, शनी व मंगळ ह्यांचे उपाय करावेत.

५. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातुन लग्नासाठी सेवा घेणे.

६. वास्तु दोष पितृदोष कुलदेवी कोप पिशाच्च बाधा इ. दोष तपासुन घेणे.

श्री. दीपक नाईक (८३९००७९७९९)

## लेख क्र. ४६ : संतती योग आणि पंचमस्थान

## लेखक : श्री. शैलेश दत्तात्रय पुरोहित (९९७०१८३९८३)

|| श्री सिद्धिविनायक प्रसन्न ||

|| एकदंतं शुर्पकर्णं गजवक्त्रं चतुर्भुजं पाशांकुशधरं देवं ध्यायेत सिद्धिविनायकम् ॥

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मानवी आयुष्यात संतती हा एक महत्त्वाचा भाग आहे. राजा द्रुपदाने सुद्धा संततीच्या प्राप्तीसाठी यज्ञ केला. पार्वती मातेने गणपती आपला पुत्र असावा अशी मनिषा घेऊन तप केले. तदनुसार प्रत्येक वैवाहिक दांपत्याला अपत्य सुखाची अनिवार ओढ असते आणि ही प्राप्ती व्हावी ही एक नैसर्गिक इच्छा सुद्धा असते.

ज्योतिष शास्त्रातही संतती योग हा एक महत्त्वाचा योग मानला जातो प्रत्येकाला आपल्याला मिळणारे संतती सुख कसे आहे हे सुद्धा ज्योतिषांना हटकून विचारावेसे वाटते.

संततीस्थान म्हणजे कुंडलीतील पाचवे स्थान या स्थानावरून शिक्षण, प्रेम या गोष्टी जशा पाहिल्या जातात अशाच प्रकारे संततीच्या प्राप्तीसाठी पंचम स्थान हे महत्त्वाचे स्थान ठरत असते.

पंचमस्थान पत्रिकेत किती बलवान आहे?

त्या स्थानामध्ये कोणते ग्रह पडले आहेत?

पंचम स्थानाचा अधिपती कुठे पडला आहे? पंचम स्थानामध्ये कोणती राशी आणि नक्षत्रे पडली आहे?

पंचमेशाची राशी कोणती?

त्याचे नक्षत्र कोणते?

संतती सुख पहाताना

हे सर्व विचारात घ्यावेच लागते.

याचप्रमाणे पंचम स्थानावर, पंचमेशावर आणि संतती कारक ग्रहावर कोणत्या कोणत्या ग्रहांची दृष्टी आहे? पंचमस्थान, पंचमेश आणि कारकग्रह शुभ ग्रहांच्या अथवा पापग्रहांच्या योगात आहे का? अथवा शुभकर्तरी किंवा पापकर्तरी योगामध्ये आहे का? हे सर्व नीट पाहिल्यावर संतती योग दिसून येतो.

संतती योगासाठी पंचम स्थानातील राशींचा विचार अतिशय महत्त्वाचा ठरतो. या राशींची प्रसवशक्ती किती ते सुद्धा फार महत्त्वाचे असते. या प्रकारे पाहताना राशींचे गट असे पडतात.

बहुप्रसव राशी कर्क, वृश्चिक, मीन. विपुल संतती तसेच फार विलंबाविना

मध्यम प्रसव राशी तूळ, मकर, कुंभ. साधारणपणे दोन संतती आणि थोडी वाट पाहून किंवा थोड्या विलंबाने

वंध्या अथवा अल्प प्रसव राशी मेष, सिंह, धनु, मिथुन, अल्प संतती शक्यतो एक आणि बऱ्याच काळानंतर

जुळया राशी मिथुन, धनु आणि मीन जुळी बालके

पुरुष राशी मेष, मिथुन, सिंह, तुळ, धनु, कुंभ. पुत्र संतती

स्त्री राशी वृषभ, कर्क, सिंह, वृश्चिक, मकर, मीन, कन्या संतती

पुरुष नक्षत्रे अश्विनी, कृतिका, रोहिणी, पुनर्वसु, पुष्य, हस्त, अनुराधा, पुर्वा भाद्रपदा, उत्तरा भाद्रपदा, रेवती. पुत्र संतती

स्त्री नक्षत्रे - भरणी, आर्द्रा, आश्लेषा, मघा. पुर्वा, उत्तरा, चित्रा, स्वाती, विशाखा, ज्येष्ठा, पुर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा. कन्या संतती

नपुंसक नक्षत्रे - मृग, शततारका, मूळ. अल्प आणि विलंबाने संतती.

कुर तीक्ष्ण दारूण नक्षत्रे आणि त्यातील ग्रह संततीच्या स्थानात फारशी अनुकूल फले देत नाहीत.

याचप्रमाणे ग्रह मंडळाचा विचार करता

पुरुष ग्रह - रवी मंगळ गुरु

स्त्री ग्रह - चंद्र शुक्र

नपुंसक - बुध शनि

यामध्ये गुरु, शुक्र शुभ.

बुध साहचर्याने शुभ.

चंद्र शुक्ल पक्षातील पंचमी ते कृष्ण पक्षातील पंचमी पर्यंत शुभ.

मंगळ, शनि, राहू, केतू हे पापग्रह तर रवी सौम्य पाप ग्रह.

भावात भावम् नियमाप्रमाणे पंचमाचे पंचमस्थान म्हणजे नवमस्थान महत्त्वाचे ठरते. पंचमस्थानाच्या अनुषंगाने फले पाहायची असल्याने पंचमस्थान हेच लग्नस्थान समजून संतती सुख पहाणे पंचमास्थानापासून पंचमस्थान म्हणजे नवमस्थान, नातवंडे

पंचमाचे सहावे म्हणजे दशमस्थान. संततीच्या रोगासंबंधी महत्वाचे.

पंचमाचे आठवे म्हणजे व्ययस्थान. संततीच्या जीवावर येणाऱ्या गोष्टी अथवा तिच्या आयुष्यातल्या अडचणी, संघर्ष दाखविणारे स्थान.

पंचमाचे बारावे म्हणजे चतुर्थ स्थान. संतती संबंधी खर्च काळजी दर्शविणारे स्थान.

या सगळया पंचमाच्या सहा आठ आणि बाराव्या ठिकाणी असणारे शुभ अथवा अशुभ ग्रहयोग हे सुद्धा पंचमाच्या म्हणजे संततीच्या बाबतीतील महत्त्वाची फले निर्देशित करीत असतात.

संतती कारक गुरु महाराज

संततीचा प्रमुख कारक ग्रह म्हणून गुरू महाराज यांचे पत्रिकेतील स्थान अत्यंत महत्त्वाचे. पांडित्य, बुद्धी, ज्ञान, विवाह याच जोडीने संतती प्राप्ती साठी गुरुची पत्रिकेतील स्थिती ही बऱ्याचदा निर्णायक करताना आढळते.

स्थान हानि करोति जीवः

ज्या स्थानी गुरू असतो त्या स्थानाशी संबंधित फलात हानी करताना गुरू महाराज आढळून येत असले तरी मित्र ग्रहांच्या लग्न राशी असताना गुरु जास्त शुभ फलदायी ठरतो. तर बुध, शुक्र आणि शनी यांच्या राशी लग्न राशी असताना मात्र तसे आढळून येत नाही.

परंतु गुरु महाराजांची अमृत दृष्टी ज्या ठिकाणी पडते तिथे शुभफलात होणारी वाढ दिसून येते. "गुरोः पंचमतः पुत्र तथा विद्या" या सूत्रानुसार गुरु महाराजांच्या पत्रिकेतील स्थानापासूनच्या पाचव्या स्थानावरून सुद्धा संतती संबंधी विचार केला जातो.

संतती योगासंबंधी, संतती सुखासंबंधी अनेक सूत्रे आहेत. ग्रह, राशी, नक्षत्रे यांचे संतती योगाशी निगडित अशी मार्गदर्शक तत्त्वे आपण पाहिली. या सगळयांच्या अनुषंगाने विविध ग्रहस्थिती निर्माण होतात, आणि म्हणूनच विस्तार भयास्तव या ठिकाणी ही सूत्रे न देता, साधारण प्रमाणे फले कशी पहावी हे देत आहे.

पंचमस्थान, पंचमेश आणि कारकग्रह गुरु हे शुभ संबंधित असताना शुभ फले मिळतात.

शुभयोग संबंधित ग्रहमान म्हणजे प्रामुख्याने पंचमस्थानामध्ये, चंद्र, शुक्र, बुध, गुरु, रवी, मंगळ हे शुभ राशीत शुभ नक्षत्रात. पंचमेश गुरु सुद्धा शुभ राशी नक्षत्रात. पंचमेश गुरुचे पंचमेश आणि शुभ ग्रहांशी प्रथम दर्जाचे योग. लग्नेश, सप्तमेश, भाग्येश दशमेश यांच्यासह पंचमेश प्रथम दर्जाच्या शुभ योगात. पंचमेश शुभ स्थानी अनुकूल रास नक्षत्रे नवमांशामध्ये आणि गुरु बलवान.

पंचमस्थान, पंचमेश आणि कारकग्रह गुरु हे अशुभ संबंधित असताना अशुभ फले मिळतात.

अशुभ संबंधित पहात असताना पंचम स्थानात शनि. बुध. क्षीणचंद्र, हर्षल, मंगळ, राहू, प्लुटो, वक्री नेपच्यून, केतू इत्यादी ग्रह. पंचम स्थानात पापग्रह आणि पंचमेश सुद्धा पापग्रहांच्या योगामध्ये. शुभग्रह पंचमात असला तरी पापग्रहांच्या योगात, पापकर्तरीत तसेच पंचमस्थानात सहा आठ बाराच्या स्थानांचे अधिपती. अथवा पंचमेश सहा आठ आणि बाराच्या अधिपतींनी युक्त.

पंचमेश आणि कारक ग्रह गुरु यांचे पाप ग्रहांशी केंद्र प्रतियुती, युती, षडाष्टक योग पंचमस्थाना पासून चतुर्थ, षष्ठ अष्टम आणि व्यय स्थानावर पाप ग्रहांच्या जोड्या, अथवा युती किंवा तीव्र अशुभ योग, पंचमेश आणि पंचम स्थानाचा कारकग्रह तीक्ष्ण, कुर, उग्र नक्षत्रांमध्ये सहा आठ बाराव्या स्थानात. अश्या ग्रहस्थितीत संतती संबंधाने अशुभ फले आढळून येतात.

पापमध्यगते जीवे पुत्रेशे बलवर्जित ।

सौम्यदृग्योग्यरहिते वक्तव्यम् त्वनपत्कता ||

जातक पारिजात

पापमध्यातील गुरू आणि बलहीन पंचमेश ज्यावर शुभग्रहांची दृष्टी नाही तेव्हा जातक संतती हीन असतो. संतती संबंधित हानि दिसून येते.

वरीलप्रमाणे संतती संबंधी विचार करताना कारकग्रह गुरु महाराजांच्या संबंधात विशिष्ट योगात असे आढळले की गुरु महाराजांच्या संतती या कारकत्वामध्ये जर गुरू महाराजांबरोबर म्हणजे गुरू आहे त्या स्थानात, अथवा गुरुच्या मागच्या म्हणजे बाराव्या स्थानात किंवा पुढच्या म्हणजे द्वितीय स्थानामध्ये शनी राहू केतू सारखे पापग्रह असतील. त्याच वेळी पंचमेश पंचमस्थान दूषित असेल तर संततीच्या बाबतीतील फलामधे वैगुण्य अथवा विपरीत फल आढळून येते.

पंचमस्थान आणि पंचमेश जर कुयोगांमध्ये अथवा अशुभ संबंधित असेल आणि त्याच वेळेला संततीचा कारक ग्रह म्हणून गुरु पाप ग्रहांनी वेढलेला असेल तर संतती बाबत विपरीत फले मिळताना आढळून आली.

गुरुच्या मागील स्थानी, गुरु आहे त्या स्थानी आणि गुरु आहे त्याच्या पुढील स्थानी पापग्रह असल्यामुळे गुरुच्या कारकत्वामध्ये वैगुण्य निर्माण होते आणि त्यासंबंधी दिसणारी विपरीत फले जातकाच्या आयुष्यामध्ये आढळून आली.

या संबंधाने पाहताना उशिरा संतती होणे गर्भपात होणे संतती बाबत विपरीत घटना घडणे संतती न होणे किंवा अजून अशुभघटना संततीबाबत घडत असताना गुरु महाराज पापग्रहांनी वेढलेले आढळून आले.

1) 09-08-1980, 05:30, PUNE




पंचमस्थानात वृश्चिक ही बहुप्रसव रास त्यामुळे दोन संतती योग. परंतु पंचमात वृश्चिक रास ज्येष्ठा नक्षत्रातील नेपच्यून वक्री. पंचमेश मंगळ तृतीयात प्लुटोच्या युतीमध्ये, तृतीयस्थानात अष्टमाचा अधिपती शनि सुद्धा आहे. संततीचा कारकग्रह गुरु द्वितीयस्थानात सिंह राशीत, लग्नातील राहू व तृतीयातील शनि मंगळाच्या पापकर्तरी योगात. गुरुच्या मागे अथवा पुढे शनि हा गुरुच्या कारकत्वातील गोष्टीत वैगुण्य दाखवितो. तसेच हा सिंह राशीतील गुरु नवमांशात बुधाच्या नवमांशामध्ये आहे. तर पंचमेश मंगल बुधाच्या राशीत प्लुटोच्या युतीमध्ये. प्रथम संततीच्या मध्ये शारीरिक व्यंग.

2) 04-11-1983, 11:30, Mumbai.




पंचम स्थानावर शनीची आणि बुधाची पुर्ण दृष्टी पंचमेश मंगळ राहू केतूच्या केंद्रयोगात. संततीकारक गुरु हर्षल बरोबर युतीमध्ये व्ययस्थानात. राशी कुंडलीत मंगळाची दृष्टी पंचमस्थानावर. गुरुच्या मागे अथवा पुढे शनि गुरुच्या कारकत्वातील गोष्टीत वैगुण्य दाखवितो. संततीच्या मध्ये शारीरिक व्यंग.

3) 12-06-1979, 22:12, Mumbai.

मंगलिक **लग्न कुंडली** अर्ध काल-सर्प योग




पंचम स्थानात वृषभ राशीत शुक्र रवी. सप्तमास्थानात कर्क राशीत गुरु. अष्टमात सिंह राशीत शनी राहू. वक्री नेपच्यून शनि यांच्या दृष्टीमध्ये पंचम स्थानात पंचमेश शुक्र. संततीकारक गुरुच्या पुढे अष्टमात शनि. गुरुच्या बरोबर, मागे अथवा पुढे शनि असता गुरुच्या कारकत्वातील गोष्टीत वैगुण्य दाखवितो. चंद्रराशी कुंडली मध्ये पंचमेश मंगळ पंचमात राहू आणि हर्षलच्या दृष्टीत प्रथम संतती स्वमग्नता आजाराने ग्रस्त.

4) 17-02-1981, 01:30, Vita Sangli.

मंगलिक **लग्न कुंडली**




पंचमेश गुरु आणि शनी लाभस्थानामध्ये पूर्ण युतीमध्ये शनीची दृष्टी पंचम स्थानावर. गुरु मंगळ षडाष्टक योग. शनि मंगळ षडाष्टक योग. शनि आणि गुरु दोन्ही लाभात वक्री. पंचमेश गुरू बुधाच्या कन्या राशीत स्वतः च्या राशीपासून सातव्या राशीत निर्बली. शनि जवळ गुरूच्या कारकत्वात वैगुण्य.

राशी कुंडली कडून लग्नामध्ये चंद्र, राहू. तृतीयात शनी गुरु. पंचमात हर्षल. अष्टमात रवी, बुध, मंगळ. राशी कुंडली कडून सुद्धा पंचम स्थानात हर्षल आणि पंचमेश मंगळ अष्टमात अष्टमेश शनीच्या षडाष्टक योगात. संततीला स्वमग्नतेचा आजार.

5) 19-03-1942, 09:15, Dhule.

**लग्न कुंडली**




पंचमस्थानात राहू, पंचमेश रवी व्ययस्थानात. पंचमस्थानाचा कारक संततीकारक गुरु मंगळ, शनी, हर्षल बरोबर. मंगळाची चौथी दृष्टी पंचमस्थानावर. संतती कारक गुरु शनि बरोबर. शनि जवळ गुरूच्या कारकत्वात वैगुण्य. गुरुचा राहू आणि केतू दोघांबरोबर केंद्रयोग. पंचमस्थान, पंचमेश आणि कारकग्रह गुरु यांच्यात होणाऱ्या योगामुळे या व्यक्तीची संतती असाधारण म्हणजे मतिमंद आहे.

6) 03-0-1948, 09:30, Pachora.




पंचमेश शुक्र शनी प्लुटोच्या पुर्ण दृष्टीत संततीकारक गुरु राहू षडाष्टक योग. संततीच्या स्थानापासून म्हणजे पंचमापासून पंचमाच्या चतुर्थात मंगळ, षष्ठात केतू, अष्टमात रवी, तर व्ययात राहू. सर्व पापग्रह. पंचमेश शुक्र शनीच्या राशीत बुधाच्या नवमांशात. चंद्र राशी कुंडली कडून पंचम स्थानात मकरेचा शुक्र लाभातील शनि आणि प्लुटो यांच्या दृष्टीमध्ये संततीकारक गुरु, रवी आणि केतूच्या पापकर्तरीमध्ये. पंचमापासून चतुर्थात राहू, षष्ठात हर्षल, अष्टमात मंगळ, व्ययात रवी, सर्व पापग्रह. आणि संततीकारक गुरुच्या मागे केतू, वरील सर्व ग्रहयोगांच्या कारणामुळे संतती मतिमंद आहे.

श्री. शैलेश दत्तात्रय पुरोहित (९९७०१८३९८३)

**लेख क्र. ४७ : केसाचे आरोग्य आणि ज्योतिष शास्त्र**

**लेखक : श्री. अजिंक्य नालोले गुरुशरण (९३०७९७४०७०)**

केस हे सौंदर्याचे प्रतिकं आहे आणि आपले केस चांगले असावेत अशी इच्छा प्रत्येकाची असते अणि प्रत्येक जण त्यासाठी प्रयत्न ही करत असतो.

ज्योतिष च्या माध्यमातून आपण समजून घेऊ की कुठले ग्रह केसा साठी कारणीभूत असतात आणि काही उपाय यावर आपण प्रकाश टकणार आहोत.

शास्त्रीय कारणे

1) चिंता, ताण तणाव

2) पित, वात दोषाचा प्रकोप झाला की केस शुष्क होतात किवा गळलात

3) विटामीन ची कमी

4) मधुमेह हार्मोन्स चे असंतुलन

4) मसालेदार, फास्टफूड बेकरी प्रोड्क्टस अतिप्रमाणात खाणे

5) दीर्घ अजार टायफॉइड, कावीळ ई.

6) त्वचा विकार

ज्योतिष शास्त्रीय कारण

1) सूर्य मंगल पापग्रह युक्त किवा दृष्ट असणे

2) गुरु बाधित असेल तर केस कमी वाढतात.

3) सूर्य नीच राशीत असता केस गलणे टक्कल पडने प्रकार होतात.

4) सूर्य ६ किवा ८ भावात असता ही हे होते.

5) सूर्य शनि किवा सूर्य राहु युती असता केस गळतात.

6) शनि त्रिक स्थानात असता केस कमजोर होतात. केसा वरुन हात फिरवला

तरी केस गळतात.

7) मेष, तूळ, सिंह, वृश्चिक, धनु कुंभ लग्न असता टक्कल पडू शकते.

8) वक्री बुध, बुध मंगल युती ने केस गळतात.

9) बुध मंगल युती असेल तर एड्रीनलीन ग्लैंड वर परिणाम होउन केसाचे आरोग्य बिघडू शकतो.

10) सूर्य मेष राषित राहु ने ग्रसित असेल तर तापाने केस गळतात. सूर्य महादशेत किवा अंतरदशेत हे पाहायला मिळते.

11) द्वितीय केतु असेल तर गळतात.

12) शनी राहु युती लग्न स्थानी आसता किवा दृष्टि असता टक्कल पड़ते.

13) चंद्र राहु युतीत ही पहावयास मिळते.

14) बृहद जातक च्या मते मेष धनु वृश्चिक राषित पापग्रह असता केसावर परिणाम होतो.

रवी, मंगल केतु सारखे अग्नि तत्व ग्रह अग्नि तत्व राषित असता टककल पडू शकतो.

पत्रिकेतील प्रथम स्थान हे केसांसाठी विचारात घेतात.

बुध आणि शुक्र हे ग्रह केसाच्या आरोग्य आणि सौंदर्य या साठी विचारात घेतात.

पत्रिकेत जर बुध आणि शुक्र चांगले किंवा सुस्थित असतील तर केस चांगले राहू शकतात.

पत्रिकेत प्रथम स्थानातील ग्रह प्रमाणे केसाची ठेवण.

लग्नी जर रवी असेत तर लवकर टक्कल पडू शकते.

चंद्र असेल तर केस कुरळे पण आकर्षक असतात अर्थात या चंद्रावर पाप ग्रहाची

दृष्टी नको.

मंगल प्रथम स्थानी असेल तर केस तुटक किंवा विरळ असू शकतात.

बुध लग्नी असता केस निरोगी असतात.

गुरु लग्नी असता टक्कल पडू शकते.

शुक्र लग्नी असता केस आकर्षक असतात.

शनी असता केस भुरे, कोरडे असतात आणि विरळ होत जातात.

राहू केतू लग्नी असेल तर व्यक्ती स्वतः च्या हातानी केसाचे नुकसान करतो

किंवा अजारपणा मुळे केस जातात. यात व्यक्ती निस्तेज दिसते. बुध, चंद्र, शुक्र जर पाप ग्रहानी पीडित असतील तर केसाचे विकार होऊ शकतात.

केसाच्या समस्या..

केस पिकणे-

केस काळे राखणाऱ्या पेशी जेव्हा परिपक्व होण्याची क्षमता गमावतात तेव्हा केस पिकू लागतात. काही वेळा आजारपण, हार्मोन्स याने ही हा परिणाम होऊ शकतो. चंद्र, बुध शुक्र हे तीन ग्रह अनुक्रमे त्वचा आणि हार्मोन्स चे संतुलन करण्याचे कार्य करतात. हे ग्रह जर पापग्रह पीडित असतील तर ही समस्या होऊ शकते. तसेच लग्नेश पापग्रहाच्या दृष्टी किंवा युतीत असेल तरी ही समस्या होऊ शकते कारण सतत तब्येतीच्या तक्रारी असू शकतात.

केस गळणे..

लग्नी पाप ग्रह असतील लग्नेश निर्बल असेल तर केस गळणे होऊ शकते. लग्नेश त्रिक भावात किंवा पापग्रह दृष्टी मधे असतील तरी केस गळतात.

चाई पडणे..

चाई म्हणजे केसाच्या मध्येच एक गोल चट्टा पडतो.

हा एक त्वचा विकार आहे मुख्यत्वे शुक्र किंवा बुध पापग्रहाच्या युतीत गोचिरीने असेल आणि पापग्रह ची दशा असेल तर ही समस्या होते.

कोंडा ही समस्या साध्या सर्वत्र पहावयास मिळते.

लग्न स्थानात किवा पत्रिकेत कुठे ही चंद्र, राहु, शुक्र, बुध बिघडले असते.

तसेच बुध त्रिक स्थानी किवा पापग्रह युक्त असता कॉंडा होतो.

अनुपम खेर

जन्म ७ मार्च १९५५ दुपारी १२.५० वा. सिमला




एक खालनायक, संवेदनशील पिता, समजूतदार सासरा आशा अनेक भूमिका मधून आपल्या अभिनयाची छाप पाडणारा कलाकार, निर्भिड वक्ता अशी ओळख असणारे व्यक्तिमत्व.

१) लग्नी गुरु केतु आणि राहु ची द्रष्टि लग्नी.

२) लग्नेश बुध अष्टमात शनीच्या राशीत, व्ययेश शुक्र, युतीत शक्र अष्टमात.

३) शनी च्या राशीत रवी.

४) चंद्रवर शनी ची नजर.

या अभिनेत्याचे केस तरुणपणी पिकले आणि टक्कल पडले.

अमरीष पूरी जन्म २२ जून १९३२ दु १२.२०वा

खलनायक मोगाम्बो, दयालू पिता अशी अजरामर भूमिका सकरणारे अभिनेते.

अपघात होऊ शकतात. या घटकांवरील हानिकारक प्रभाव वाहने इत्यादींकडून चिंता दर्शवितो. अपघात योग असताना प्रवासात धोकादायक वर्तन टाळावे किंवा सार्वजनिक वाहतूक वापरा. चंद्राशी असलेल्या संबंधामुळे हा वर्ग व्यक्तीची मानसिक सहनशीलता ही या कुंडलीवरून पाहतो. षोडशांश कुंडलीतील राज योग आणि धनयोग अपार सुख आणि ऐश्वर्य देतात. बलवान शुक्र (सांसारिक सुखांचा कारक) सर्व सांसारिक सुखसोयी (वस्त्र, वाहन, स्त्री सुख इ.) देतो परंतु अशुभ राशीत असल्यामुळे चोरी, वाहन अपघात इत्यादी काही नुकसान होऊ शकते. बलवान / शुभ गुरु मानसिक समाधान देतात, ज्यामुळे आपोआप आनंदाची भावना सुरू होते. विलास, आनंद आणि मालमत्तेद्वारे आनंद, जातकाची आंतरिक शक्ती याविषयी सूचित करतो. यासाठी संवाहकासाठी कारक, शुक्र पाहावा लागेल. चतुर्थ स्वामी आणि चौथ्या घरातील दुःख शुक्राच्या दुःखासोबत पहावे लागेल.

१०) विशांश किंवा राशीचा एक विसावा (१ अंश ३० कला) (डी-२०): प्रत्येक रासी १ अंश ३० कलांच्या २० समान भागांमध्ये विभागली आहे. हा दर ६ मिनिटांनी बदलतो. विशांश कुंडली धार्मिक प्रवृत्ती किंवा त्यांच्याशी संबंधित क्रियामधून मिळणारा आनंद पाहण्यासाठी केला जातो. अध्यात्मवाद, आध्यात्मिक क्रियाकलाप, आध्यात्मिक पद्धतींमध्ये प्रगती आणि उपासनेचे , देवतेची पूजा, विशिष्ट पंथाकडे झुकणे याबद्दल परिणाम यासाठी वापरले जाते. ही कुंडली जातकाच्या उपासना आणि जातकाच्या पसंतीच्या देवतेच्या संदर्भात एक संकेत देतो असेही म्हटले जाते. जन्मलग्न कुंडलीमधील धर्म त्रिकोन - १, ५ आणि ९ घरांच्या मालकांचे स्थान तपासा आणि आध्यात्मिक वाढीसाठी ते विशांश कुंडलीमध्ये कोठे आहेत ते पहा. जातकाची आध्यात्मिक प्रगती समजून घेण्यासाठी विशांश कुंडली पाहिली जाते. प्रत्येक सजीवामध्ये ईश्वराचा अंश असतो, परंतु त्याचे प्रमाण भिन्न असू शकते. मोक्ष प्राप्तीच्या मार्गावर सतत अध्यात्मिक आणि धार्मिक प्रगती करणे आवश्यक आहे. ५ व्या आणि ९ व्या घरात असलेले ग्रह येथे महत्त्वाचे आहेत. जितका शुभ योग तितकी अध्यात्म आणि धार्मिकतेची प्रगती जास्त. सूर्य आणि शनि बलवान असणे हे शुभ लक्षण आहे. शुक्र बलवान असल्यास लैंगिक जीवनावर नियंत्रण असते, जे प्रगतीसाठी आवश्यक असते. ग्रहांची एकंदर उच्च किंवा दुर्बल ही मूळ राशीची आध्यात्मिक वाढ समजून घेण्याचा एक संकेत आहे.

११) चतुर्विशांश किंवा राशीचा चोवीसवा भाग (१ अंश १५ कला) (डी-२४): प्रत्येक राशी १ अंश १५ कलांच्या २४ समान भागांमध्ये विभागली आहे. हा दर ५ मिनिटांनी बदलतो. ही कुंडली जातकाच्या औपचारिक शिक्षणासाठी, शैक्षणिक प्राप्ती आणि ज्ञानाशी संबंधित परिणामासाठी (यश, अपयश, अडथळे इ.) केला जातो व त्या संदर्भात एक सूक्ष्मता देते व उच्च शिक्षणाचे प्रतिनिधित्व करतो. बलवान ग्रह ही शिक्षणाची दिशा दर्शवतो. जन्म आणि वर्ग

कुंडलीमध्ये शिक्षण, बुध आणि गुरू या घटकांचे देखील मूल्यांकन केले पाहिजे. शिक्षण, शिकणे, शिक्षण पद्धतींमध्ये यश आणि स्पर्धेतील यश इत्यादींची कल्पना मिळवण्यासाठी पाहिला जातो. जन्मलग्न कुंडलीमधील पंचम स्थान गृहीत धरले आहे. जन्मपत्रिकेतील ५ व्या स्वामीच्या अवस्थेसह पाचव्या घरावरील प्रभाव पाहावा लागेल. ६, ८, १२ स्वामीशी ५ व्या स्वामीचा संबंध जातकासाठी त्रास आणि शैक्षणिक बदल घडवून आणेल असे मानले जाते. जर असे ग्रह लाभदायक प्रभावाखाली असतील तर शिक्षणातील बदल स्थानिकांच्या भल्यासाठी होईल. एखादी व्यक्ती इंजिनियरिंग करते आणि नंतर मॅनेजमेंट करते. हे ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने तांत्रिकदृष्ट्या बदल घडवून आणते परंतु फायदेशीर सहवासामुळे जातकाच्या सामान्य समृद्धीसाठी हा बदल चांगला होतो. वरील चतुर्थांश कुंडली प्राथमिक शिक्षण आहे. चतुर्विंशांश ही बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक कामगिरी देखील आहे. विद्यार्थ्याला कोणता व्यावसायिक अभ्यासक्रम निवडायचा आहे याचे समुपदेशन करण्यासाठी, तुम्ही चतुर्विंशांश आणि दशमांश कुंडलीचे विश्लेषण केले पाहिजे. अध्यात्मिक शक्ती किंवा 'सिद्धी' देखील या चतुर्विंशांश कुंडलीवरून दिसू शकतात. सिद्धी प्राप्त होईल की नाही यासाठी जन्मलग्न कुंडलीमधील मोक्ष त्रिकोन देखील पहा.

१२) सप्तविंशांश किंवा राशीचा सत्ताविसावा (१ अंश ०६ कला ४० विकला) (डी-२७): प्रत्येक राशी १ अंश ०६ कला ४० विकलांच्या २७ समान भागांमध्ये विभागली आहे. हा प्रत्येक ४ मिनिटांनी बदलतो. या वर्ग कुंडलीचा अभ्यास व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक शक्ती पाहण्यासाठी केला जातो. शारीरिक ताकद म्हणजे प्रतिकारशक्ती आणि मानसिक ताकद म्हणजे मानसिक ताकद किंवा सहनशक्ती. सप्तविंशांश कुंडली जातकाच्या व्यक्तिमत्वातील सर्व सामर्थ्य आणि कमकुवतपणाची बेरीज दर्शवतो. सर्वसाधारण शारीरिक आणि आंतरिक शक्ती आणि दुर्बलता दर्शवतो. प्रगतीच्या संधी आणि जीवनात तुम्हाला दुर्दैवाचा सामना करण्याची शक्यता देखील सूचित करू शकते. सप्तविंशांश कुंडली शारीरिक शक्ती, ताकद आणि तग धरण्यासाठी वापरले जाते. हा तक्ता स्थानिक लोकांची सामान्य ताकद आणि कमकुवतपणा समजून घेण्यासाठी पाहिला जातो. कधीकधी एखाद्या व्यक्तीची तग धरण्याची क्षमता, सहनशक्ती आणि शारीरिक शक्ती शोधण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो. भौतिक जगाचा अनुभव घेत असलेल्या सर्व गोष्टी (तर्कशुद्धपणे आणि अंतर्ज्ञानाने) आपण कसे अनुभवता हे खूप खोलवर आहे. चिंतन, अभ्यास, आपले स्वतःचे तत्वज्ञान विकसित करून, तटस्थता प्राप्त करून आणि आपल्या विचार पद्धती व्यवस्थापित करून आपण नेहमी बदलू शकता. तुम्ही हे कसे करू शकता हे देखील सप्तविंशांश कुंडली सूचित करते.

१३) त्रिशांश किंवा राशीचा एक तीसवा हिस्सा (१ अंश ०० कला) (डी-३०): प्रत्येक राशी १ अंशच्या ३० समान भागांमध्ये विभागली आहे. हा प्रत्येक ४ मिनिटांनी बदलतो. त्रिशांश कुंडली जीवनातील अपघात, अडथळे, अपयश, दुर्दैव इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी केला जातो. व्यक्तीचे नैतिक आचरण पाहण्यासाठी ही या वर्गाचा अभ्यास केला जातो. सामान्यतः एखाद्या विशिष्ट जातकाच्या जीवनातील दुर्दैव, कर्ज, अडचणी, वेदना, त्रास, अपघात आणि रोगांची पडताळणी, दास्यत्व, शत्रू, नैतिक आचरण पाहण्यासाठी आणि सामान्य समस्यांबद्दल सांगते. त्रिशांश कुंडली ही त्रिगुण - स्वातीक, राजस आणि तामस यांच्यावर आधारित नैसर्गिक वैशिष्ट्यांचा कल दर्शवितो. स्त्रियांच्या जन्मकुंडलीतील ही कुंडली मूळचा वर्ण दर्शवतो असेही म्हटले जाते. असे म्हटले जाते की स्त्रियांच्या बाबतीत जर मंगळाचा त्रिशांश उदय होत असेल तर ती शंकास्पद वर्णाची आहे. तथापि, मूळ पुरुषाच्या बाबतीत वर्ण सत्यापित करण्यासाठी त्रिशांश कुंडली देखील वाचला जाऊ शकतो. त्रिशांश कुंडली हा जन्मलग्न कुंडलीच्या ६ व्या घराचा विस्तार आहे. या वर्ग कुंडलीमध्ये सूर्य आणि चंद्राचे विश्लेषण केलेले नाही. उर्वरित ग्रह त्यांच्या भाव स्थिती आणि घटकांनुसार अडथळे (पीडित असताना) सूचित करतात. **मंगळ: क्रोध, राग, आक्रमकता. बुधः मत्सर, गुरूः अहंकार, शुक्रः वासना, शनिः मादक पदार्थ, व्यसन, राहूः लोभ, केतूः चुकीची विचारसरणी इ.** जेव्हा चतुर्थ घर पीडित असते तेव्हा नैतिक चारित्र्य कमी होते. स्वतःच्या त्रिशंशामध्ये स्थित ग्रह आपले कारकत्व वाढवतात. तुम्हाला तुमच्या समस्यांसाठी काही उपाय असल्यास येथून पहातात.

१४) खवेदांश किंवा चिन्हाचा चाळीसावा भाग (० अंश ४५ कला) (डी-४०): प्रत्येक राशी ० अंश ४५ कला प्रत्येकी ४० समान भागांमध्ये विभागली आहे. हा प्रत्येक ३ मिनिटांनी बदलतो. खवेदांश चार्ट साधारणपणे कुंडलीचे अशुभ फळांचे प्रमाण शोधण्यासाठी शुभ आणि अशुभ परिणाम दर्शवतो. मातृवंशीय वारसा देखील या तत्त्यावरून दिसतो. खवेदांश जीवनातील शुभ परिणामांसाठी वापरला जातो. शुभ परिणाम कुंडलीच्या शुभ आणि अशुभ परिणामांचा अभ्यास करण्यासाठी हे सामान्यतः पाहिले जाते. परंतु, हे लक्षात घ्यावे लागेल की अंदाजानुसार **ही कुंडली जास्त वापरली जाऊ शकत नाही कारण काही सेकंदांचा फरक देखील लग्न बदलू शकते.** याचा उपयोग फक्त पूर्णपणे अचूक असलेल्या कुंडलीवरच केला पाहिजे. खवेदांश कुंडलीमध्ये जेव्हा लग्नेश व लग्न बलवान असतो तेव्हा शुभ घटना अधिक असतात. **जर त्रिकोणाचा स्वामी देखील चांगल्या स्थितीत असेल आणि शुभ प्रभावाखाली असेल तर त्याचे शुभ परिणाम अधिक मिळतात.** शुभ परिणामांसाठी सूर्य आणि चंद्राची स्थिती चांगली असणे आवश्यक आहे.

१५) अक्षवेदांश किंवा राशीचा चाळीसावा भाग (० अंश ४० कला) (डी-४५): प्रत्येक राशी प्रत्येकी ० अंश ४० कलांच्या ४५ समान भागांमध्ये विभागली आहे. अक्षवेदांश कुंडलीचा वापर व्यक्तीचे व्यक्तिमत्व, नशीब, वर्तन, धार्मिक कार्य आणि सामान्य शुभ प्रभाव, सामान्य कल्याण, सामान्य चारित्र्य आणि सचोटीची गुणवत्ता आणि आचरणासाठी वापरला जातो. येथे, वरील प्रकरणा प्रमाणे, ही कुंडली खूप वेळा संवेदनशील बनते, ज्यामुळे अंदाज देताना ते लक्षात घेणे कठीण होते. या कुंडलीवरून वडील, त्याचे पूर्वजांकडून मिळालेल्या सर्व अशुभ आणि शुभ लक्षणे तसेच पितृ वारसाही दिसतो. सूर्य आत्म्याचे प्रतिनिधित्व करतो. शुभ राशी आणि शुभ प्रभाव असलेला सूर्य सात्विक आत्मा आणि त्याच्या विरुद्ध अशुभ सूर्याचे गुण दर्शवेल. चंद्र, मनाचा कारक असल्याने, मानसिक नैतिकता किंवा अनैतिकता दर्शविते. शुभ चिन्हात आरोह, त्रितेश, षष्ठ आणि नवमेश यांची उपस्थिती व्यक्तीच्या विचारात शुद्धता आणि पवित्रता दर्शवते.

१६) षष्ट्यंश किंवा राशीचा एक साठवा (० अंश ३० कला) (डी-६०): प्रत्येक राशी प्रत्येकी ० अंश ३० कलांच्या ६० समान भागांमध्ये विभागली आहे.षष्ठ्यांश कुंडली सुमारे ३० सेकंदांच्या फरकाने बदलते. १ मिनिटाची त्रुटी षष्ट्यंश कुंडली बदलेल. कधी कधी मला प्रश्न पडतो की "अचूक जन्म वेळ" कोणती असावी? डोके बाहेर येण्याची वेळ, किंवा संपूर्ण शरीर, किंवा पहिला श्वास, किंवा प्रथम रडणे? नाभी संबधीचा दोर कापण्याची ही अचूक वेळ आहे. हे मुलाला आईपासून वेगळे करते, आता तो किंवा ती एक स्वतंत्र व्यक्ती आहे. असो, हस्तरेखा शास्त्र वापरून अचूक जन्मवेळ मोजण्याचा एक मार्ग आहे. हाताचा ठसा न मिळाल्यास जन्म वेळ दुरुस्त करण्याचे इतर गणिती मार्ग आहेत. त्यामुळे **"षष्ट्यंश कुंडलीमध्ये डोकावण्यापूर्वी कृपया जन्माच्या वेळेची खात्री करा."** या जीवनात तुम्हाला ज्या कर्माचा सामना करावा लागेल, गंभीर कर्माचे नुकसान आणि पडझड आणि नफा आणि सत्तेतील नेत्रदीपक उदय, तुमचे गुप्त जीवन, षष्ट्यंश कुंडली भूतकाळातील कर्म, भूतकाळातील कर्मांची परतफेड दर्शविते. जन्मलग्न कुंडली आणि षष्ट्यंश कुंडली एकमेकांना पूरक आहेत. जन्मलग्न कुंडली घटना कधी घडले हे सूचित करते आणि षष्ट्यंश स्थानिकांच्या जीवनात घटना का घडतात हे सांगते.

जन्मलग्न कुंडलीत उच्चीचे ग्रह आहेत पण तरीही अयशस्वी असे ही आहेत जे प्रचंड शक्ती आणि प्रतिष्ठा मिळवतात पण नंतर काही वर्षांनी रस्त्यावर भीक मागताना आढळतात. बडे राजकारणी आणि उद्योगपती हे शेवटी भ्रष्ट असल्याचे उघड झाले आहे, हे षष्ट्यंशाचे अचूकपणे निर्धारित फलित आहे. **वक्री ग्रह हे कुंडल्यांमध्ये नेहमी गोंधळाचे कारण असतात.** या ग्रहांची उर्जा वेगळ्या पद्धतीने निर्देशित केली जाते त्यामुळे अपेक्षित परिणाम उशीरा किंवा नाकारले जाऊ शकतात. **"षष्ट्यंश कुंडली ही वक्री ग्रहांच्या परिणामांवर अंतिम उत्तर आहे."** षष्ट्यंश कुंडली आणि घरामध्ये ग्रह चांगल्या स्थानावर असल्यास तो त्याचे चांगले परिणाम

देईल, विलंब किंवा परिणामांना नाकारणार नाही. षष्ट्यंश कुंडलीच्या पहिल्या घरात असलेले ग्रह विधिलिखित अंतिम मत देतात. जर लाभदायक ग्रह किंवा लग्नेश येथे असतील तर ते एक उत्कृष्ट व्यक्तिमत्व दर्शवेल. षष्ट्यंश कुंडलीमध्ये सर्व ग्रह महत्त्वाचे आहेत आणि त्यांचे योग्य विश्लेषण केले पाहिजे. जन्मलग्न कुंडलीप्रमाणेच उच्च, दुर्बलता, दृष्टिकोन इत्यादि तत्त्वांसह कुंडलीचे विश्लेषण केले जाते.

षष्ट्यंश कुंडलीच्या श्रेणींपैकी, २० श्रेणी पूर्णपणे हानिकारक आहेत आणि या श्रेणींमध्ये येणारा ग्रह शेवटी हानिकारक सारखाच कार्य करेल. जरी तो उच्च दर्जाचा किंवा कार्यात्मक फायद्याचा किंवा जन्म;गण कुंडलीमध्ये काहीही चांगला असला तरीही, तरीही त्याच्याकडे श्रीमंती ते भिकारीमध्ये बदलण्याची क्षमता आहे. १० श्रेण्या अर्ध-विघातक आहेत जेथे स्थीत ग्रह मिश्रित परिणाम देतात परंतु अधिक हानिकारक असतात. २० श्रेणी पूर्णपणे फायदेशीर आहेत, या भागांना नियुक्त केलेला ग्रह फायदेशीर असेल आणि जन्मलग्न कुंडलीत अभिव्यक्त झालेल्या वास्तविकतेवर सकारात्मक प्रभाव टाकेल. प्रत्येक अर्थाने एक वास्तविक फायदेशीर. १० श्रेणी अर्ध-लाभदायक आहेत जेथे ग्रह मिश्रित परिणाम देऊ शकतात परंतु हानिकारक पेक्षा अधिक फायदेशीर आहेत. फलदीपिकामध्ये हानिकारक/लाभदायक पेक्षा अधिक तपशीलवार अर्थ आहेत आपण अधिक माहितीसाठी पाहू शकता.

**“ज्योतिषाचे प्राचीन द्रष्टे षष्ट्यंश कुंडलीला व्याख्या मानतात.”** याचे कारण सूर्य-सिद्धांत या संस्कृत ग्रंथातून आले आहे ज्यावर सर्व खगोलशास्त्र आधारित आहे. ज्योतिषशास्त्र खगोलशास्त्रीय गणणेवर आधारित आहे. खगोलशास्त्रीय गणणेचा अभ्यास मागील सहस्राब्दी दरम्यान केलेल्या निरीक्षणांच्या खगोलशास्त्रीय गणणेचा अभ्यास केला जातो आणि त्याचे रूपांतर खगोल-सूत्रांमध्ये केले जाते. या खगोल-सूत्रांनी ६५ टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये त्यांना वैद्यकीय विज्ञानाच्या सूत्रांच्या सुद्धा बरोबरीने ठेवले आहे. षोडशवर्ग कुंडल्या सुद्धा आधुनिक मानक, दर्जा, आदर्श या नुसार ही अत्यंत अचूक आहेत.

महर्षि पराशरांनी या षोडशवर्ग कुंडल्यांना खूप महत्त्व दिले आहे आणि प्रत्येक भविष्यवाणीसाठी या षोडशवर्ग कुंडल्यांचा सल्ला घ्यावा असा सल्ला दिला आहे. षष्ट्यंश कुंडली जीवनाच्या सर्व पैलूंचा न्याय करण्यासाठी वापरला जातो. ही कुंडली सामान्य संकेतांसाठी देखील वापरली जाते परंतु प्रत्येक ग्रहांच्या स्थानासाठी अद्वितीय वर्णनात्मक अनुप्रयोग आहेत. **“महर्षि पराशरांनी या वर्ग कुंडलीला जन्म कुंडली आणि नवमांश कुंडली पेक्षा जास्त महत्व दिले आहे,”** परंतु त्याचा वापर फारसा लोकप्रिय नाही कारण यासाठी जन्माची अचूक वेळ आवश्यक आहे. सर्व पैलूंचा विचार करण्यासाठी कुंडलीप्रमाणे अभ्यास केला जाऊ शकतो.

**१०) षोडशवर्ग कुंडल्यां व्यतिरिक्त, इतर काही वर्ग कुंडल्या.**

महर्षि पराशरांनी या षोडशवर्ग कुंडल्यांना खूप महत्त्व दिले आहे वर नमूद केलेल्या षोडशवर्ग कुंडल्यां व्यतिरिक्त, इतर काही वर्ग कुंडल्या आहेत ज्यांना महर्षि पराशरी षोडशवर्ग कुंडल्या व्यतिरिक्त म्हणून ओळखल्या जातात त्या खालीलप्रमाणे आहेत:

पंचमांश (६ अंश) (D-5)- भूतकाळातील गुण, आध्यात्मिक प्रवृत्ती आणि मंत्रसिद्धीसाठी.

षष्ठमांश (५ अंश) (D-6)- कर्ज, वाद आणि आजारांना बळी पडण्यासाठी.

अष्टमांश (३ अंश ४५ कला) (D-8)- वारसा, दीर्घायुष्य आणि अपघातासाठी.

लाभांश (२ अंश ४३ कला ३८ विकला) (D-11)- अनर्जित उत्पन्न, बेहिशेबी पैसा आणि सट्टा.

जसे तुम्ही बघू शकता की अनेक षोडशवर्ग कुंडल्या आहेत आणि तुमच्या मनात एक प्रश्न उद्भवू शकतो की त्यापैकी कोणत्या कुंडल्या सर्वात महत्वाच्या आहेत आणि ग्रहांची ताकद तपासताना कोणत्या षोडशवर्ग कुंडल्या सर्वात महत्वाच्या आहेत. या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे आणि प्रत्येक षोडशवर्ग कुंडलीला दिलेले विमशोपक बल (Vimsopaka Bala) पाहणे आवश्यक आहे. **विमशोपक बल (Vimsopaka Bala) म्हणजे ग्रहांच्या उत्कृष्टतेचे "रिपोर्ट कार्ड"** षोडशवर्ग कुंडल्याला विमशोपक बलाचे गुण प्रतिनिधित्व करतात.

महर्षि पराशर ऋषींनी प्रमुख षोडशवर्ग कुंडल्या परिभाषित केलेल्या आहेत ज्या एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील प्रमुख क्षेत्रांवर परिणाम करतात. इतकेच नव्हे तर, **वेगवेगळ्या कुंडल्यांमध्ये प्रत्येक ग्रहाच्या गुणांना वस्तुनिष्ठ (objectify) सक्षम होण्यासाठी महर्षि पराशरांनी कुंडलीच्या परिमाणात्मक विश्लेषणामध्ये विभागीय विश्लेषण करताना षोडशवर्ग कुंडल्यांचे श्रेय देण्याची एक वास्तव दर्शन पद्धती देखील दिली.** ग्रहांची स्थिती विविध वर्गांमध्ये (षोडशवर्ग कुंडल्या) नोंदवली जाते आणि वर्गांची संख्या ज्यामध्ये ग्रह श्रेष्ठ आहे, मूलत्रिकोण किंवा स्वतःचे घर मोजले जाते. या गणनेचा उपयोग विशिष्ट ग्रह ज्या राजयोगांमध्ये आहे त्या राजयोगांच्या सामर्थ्याचे विश्लेषण करण्यासाठी केला जातो. जितके जास्त गुण असतील तितकी "गुणवत्ता" किंवा ग्रह राजयोग वितरीत करण्याची शक्ती/क्षमता जास्त असेल. एखादा ग्रह त्याच्या दशा-अंतर दशेमध्ये उच्च प्रभाव देतो, ते चांगले परिणाम तो विशिष्ट ग्रह जीवनाच्या विविध पैलूंचे उच्च प्रभाव व परिणाम साध्य करण्यासाठी योग्यरित्या षोडशवर्ग कुंडल्यांमध्ये स्थित आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे.

**११) १६ षोडशवर्ग कुंडल्याचे महत्त्व व गुण वर्गीकरण.**

प्रथम महर्षि पराशर ऋषींनी दिलेली पद्धती समजून घेऊ. त्यांनी खालीलप्रमाणे १६ विभागीय तक्त्याला महत्त्व देण्याचे सुचवले आहे.

**मूळत्रिकोण राशी > स्वतःचे घर > अधि मित्र > मित्र > सम > शत्रू > अधि शत्रू**

**महर्षि पराशर ऋषींनी षोडशवर्ग कुंडल्यांचे पुढील प्रमाणे गुण वर्गीकरण केलेले आहे.**

राशी किंवा लग्न (३० अंश) (डी-१) - ३.५ गुण.

होरा किंवा अर्ध राशी  (१५ अंश) (डी-२) - १ गुण.

द्रेष्काण किंवा राशीचा एक तृतीयांश (१० अंश) (डी-३) - १ गुण.

चतुर्थांश किंवा राशीचा एक चतुर्थांश (७ अंश ३० कला) (डी-४) - ०.५ गुण.

सप्तमांश किंवा राशीचा सातवा भाग (४ अंश १७ कला ८.५७ विकला) (डी-७) - ०.५ गुण.

नवमांश किंवा राशीचा नववा भाग (३ अंश २० कला) (डी-९) - ३ गुण.

दशमांश किंवा राशीचा एक दशांश भाग (३ अंश) (डी-१०) - ०.५ गुण.

द्वादशांश किंवा राशीचा बारावा भाग (२ अंश ३० कला)(डी-१२) - ०.५ गुण.

षोडशांश किंवा राशीचा एक सोळावा भाग (१ अंश ५२ कला ३० विकला) (डी-१६) - २ गुण.

विशांश किंवा राशीचा एक विसावा भाग (१ अंश ३० कला) (डी-२०) - ०.५ गुण.

चतुर्विशांश किंवा राशीचा चोवीसवा भाग (१ अंश १५ कला) (डी-२४) - ०.५ गुण.

सप्तविंशांश किंवा राशीचा सत्ताविसावा (१ अंश ०६ कला ४० विकला) (डी-२७) - ०.५ गुण.

त्रिशांश किंवा राशीचा एक तीसवा भाग (१ अंश ०० कला) (डी-३०) – १ गुण.

खवेदांश किंवा राशीचा चाळीसावा भाग (० अंश ४५ कला) (डी-४०) - ०.५ गुण.

अक्षवेदांश किंवा राशीचा चाळीसावा भाग (० अंश ४० कला) (डी-४५) - ०.५ गुण.

षष्ट्यंश किंवा राशीचा एक साठवा भाग (० अंश ३० कला) (डी-६०) – ४ गुण.

कोणत्याही ग्रहासाठी एकूण २० संभाव्य गुणांसाठी आहे, याचे गुण प्रदान कसे करावेत याचे सुसंगत संदर्भ सध्यातरी उपलब्ध नाही. काही ज्योतिषयाच्या संगणीकिय प्राणलींमध्ये उपलब्ध आहे त्यांचा आधार घेतला जाऊ शकतो.

वरील षोडशवर्ग कुंडल्यांचे गुण विभाजन पाहिले तर एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते की जन्मलग्न कुंडली ३.५ गुण, नवमांश कुंडली ३ गुण, षोडशांश कुंडली २ गुण, षष्ट्यंश कुंडली ४ गुण दिलेले आहेत. इतर षोडशवर्ग कुंडल्यांपेक्षा विमशोपक बल जास्त आहे. केवळ षोडशवर्ग कुंडल्यातच नाही, तर दशवर्ग कुंडल्यात ही षष्ट्यंश कुंडलीला ४ गुण वाटप केले जातात, हे सर्व सिद्ध करते की या ४ षोडशवर्ग कुंडल्यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

**षोडशवर्ग कुंडल्यांमध्ये ग्रहांना राशी कशा प्राप्त होतात हे दर्शविणारा नमूना तक्ता.**

1 षोडशवर्ग

| डी | 01 | 02 | 03 | 4 | 07 | 09 | 10 | 12 | 16 | 20 | 24 | 27 | 30 | 40 | 45 | 60 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ल | वृशि | सि | र्क | वृ | तु | म | कुं | र्क | र्क | कुं | ध | सि | म | मी | वृ | र्क |
| सू | वृ | र्क | कं | सि | म | मे | मे | कं | कुं | र्क | मे | वृ | कं | म | ध | मी |
| चं | ध | सि | ध | ध | ध | मे | ध | ध | ध | सि | कं | वृ | मे | वृ | कुं | कुं |
| मं | मे | सि | मे | र्क | वृ | मि | मि | र्क | सि | कं | कुं | वृशि | कुं | कुं | मे | सि |
| बु | मि | सि | मि | मि | मि | वृशि | र्क | र्क | कुं | तु | वृशि | म | मे | कं | वृ | म |
| गु | तु | सि | कुं | म | म | म | कुं | मी | तु | ध | मि | कं | ध | कं | वृशि | वृशि |
| शु | मि | सि | तु | कं | सि | म | तु | वृशि | मि | मे | मि | कं | ध | कं | र्क | र्क |
| श | कुं | र्क | मि | सि | मि | मी | र्क | कं | वृ | वृशि | तु | कुं | ध | मी | तु | म |
| रा | वृशि | र्क | वृशि | वृशि | वृ | र्क | र्क | वृशि | सि | ध | र्क | म | वृ | तु | सि | वृशि |
| के | वृ | र्क | वृ | वृ | वृशि | म | म | वृ | सि | ध | र्क | र्क | वृ | तु | सि | वृ |

महर्षि पराशर ऋषींनी असेही नमूद केले की वैशेषिकंशाची गणना करताना, “स्वरुधा” मधील एक ग्रह एक चांगले स्थान आहे, ज्याला १ गुण दिला जाईल किंवा उच्च किंवा स्वतःचे घर असेल. स्वरुधाचा अर्थ काय? हे दुर्दैवाने जुन्या श्लोकांच्या भाषांतरात हरवले आहे.

ता.क.: विमशोपक बल यांची आणखी एक संबंधित परंतु स्वतंत्र विश्लेषण पद्धती आहे ज्याला वैशेषिकंशा पद्धती म्हणतात. ती संबंधित आहे परंतु स्वतंत्र गणना आहे. कृपया अभ्यासकांनी गोंधळात पडू नये.

**१२) षोडशवर्ग कुंडल्या वापरून ग्रहांच्या सामर्थ्याचे मोजमाप.**

षोडशवर्ग कुंडल्या हे ग्रहांच्या बळाच्या गणनेचा आधार आहेत ज्याला शडबल म्हणतात. षोडशवर्ग कुंडल्यामध्ये ग्रहाला खालील प्रकारे राशीमध्ये स्तीथी देता येते

त्याच्या उच्च राशीमध्ये. त्याच्या स्वतःच्या राशीमध्ये.

त्याच्या मित्र राशीमध्ये. त्याच्या शत्रू राशीमध्ये. त्याच्या दुर्बलतेच्या राशीमध्ये.

येथे अनेक षोडशवर्ग कुंडल्यांवर काम करत असल्याने आणि अनेक षोडशवर्ग कुंडल्यांमध्ये एका ग्रहाची एकत्रित ताकद तपासू इच्छितो. त्यासाठी, आपल्याला अशी पद्धत हवी आहे जिथे **आपण षोडशवर्ग कुंडल्यांवरून ग्रहांची ताकद सहजपणे मोजू शकतो गोष्टी सुलभ करण्यासाठी महर्षि पराशर ऋषींनी एक सुंदर आणि सोपी पद्धत सांगितली आहे जिथे ग्रह उच्च आहेत किंवा षोडशवर्ग कुंडल्यांमध्ये स्वतःच्या राशीमध्ये हितकारक मानले जाते. या पद्धतीमध्ये, ग्रहांसाठी एक विशेष नामकरण वापरले जाते जे चांगले परिणाम देण्यासाठी त्यांची शक्ती दर्शवते.** हे विशेष नामकरण पुढील प्रमाणे आहेत.

येथे षोडशवर्ग कुंडल्यांऐवजी वर्गाचा वापर केला आहे. (स्थान याचा अर्थ उच्च किंवा स्वराशी)

जर एखाद्या ग्रहाचे दोन वर्गामध्ये स्थान लाभले असेल तर त्याला **"भेडका"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे तीन वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"कुसुम"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे चार वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"नागपुष्प"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे पंच वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"कंदुक"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे सहा वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"केरल"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे सात वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"कल्पवृक्ष"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाची अष्ट वर्गात स्थान असेल तर त्याला **"चंदन वन"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे नऊ वर्गामध्ये स्थान लाभले असेल तर त्याला **"पूर्ण चंद्र"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे दहा वर्गामध्ये स्थान लाभले असेल तर त्याला **"उच्छेश्वर"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाची अकरा वर्गामध्ये स्थान लाभले असेल तर त्याला **"धन्वंतरी"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे बारा वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"सूर्यकांत"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाची तेरा वर्गामध्ये स्थान लाभले असेल तर त्याला **"विदुर्म"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाची चौदा वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"इंद्र आसन"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे पंधरा वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"गण लोक"** म्हणतात.

जर एखाद्या ग्रहाचे सोळा वर्गात स्थान लाभले असेल तर त्याला **"श्री वल्लभ"** म्हणतात.

या पद्धतीचा अवलंब केल्याने ग्रहाची ताकद मोजण्यात सहज मदत होईल आणि दशाच्या परिणामांचा अधिक प्रभावीपणे अंदाज लावू शकतो.

आतापर्यंत विविध प्रकारच्या षोडशवर्ग कुंडल्या, त्याचे महत्त्व, गणनेच्या पद्धती आणि त्यांचे उपयोग समाविष्ट केले आहेत. आता सर्वात महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणे आवश्यक आहे ते म्हणजे **षोडशवर्ग कुंडल्या तपासण्याचे नियम किंवा सोप्या शब्दात आपल्याला काही मार्गदर्शक तत्त्वे हवी आहेत जी षोडशवर्ग कुंडल्यांचे वाचण्यास मदत करू शकतात.** प्रत्येक षोडशवर्ग कुंडल्यांसाठी वेगवेगळे नियम असले तरी काही निश्चित नियम आहेत जे सर्व षोडशवर्ग कुंडल्यांसाठी सर्वत्र लागू आहेत.

मला असे म्हणण्याची गरज नाही की प्रत्येक विद्वान व्यक्तीला स्वतःचा दृष्टिकोन आणि धारणा असण्याचा अधिकार आहे. मी त्यांना त्यांच्या प्रयत्नांना यश मिळो अशी शुभेच्छा देतो.

डॉ. अमित भालिंगे (८८७९५५६६८८)

**लेख क्र. ५० : लाल किताब नुसार ग्रहांचे उपाय**

**लेखक : श्री. संतोष अंबावले (९९६७३०३९८५)**

लालकिताबनुसार ग्रहांचे उपाय :

मातृदेवो भव = चंद्र म्हणजे शिव, तांदूळ, चांदी, वडाचे झाड.

पितृदेवो भव = रवि म्हणजे विष्णू, गहू, तांबे, औदुंबर वृक्ष.

आचार्य देवो भव = गुरू म्हणजे ब्रम्हा, चणाडाळ, सोने, पिंपळ.

अतिथी देवो भव = बुध म्हणजे दुर्गा, हिरवे मुग, कांसे

पर स्त्री = राहू ला माता म्हणजे चंद्र किंवा भगिनी म्हणजे बुध मानावे.

पर पुरूष = मंगळ बद ला पिता म्हणजे रवि किंवा बंधू म्हणजे मंगळ नेक

सदर तत्वानुसार श्रेयस असा आजचा मनुष्य वागू शकला तर काळात्याचे गुण ज्यास आपण अवगुण म्हणतो ते मानवाच्या मनाची भिती बाळगून दूर राहतील. लालकिताबचे उपाय जातक व संकट यामध्ये एक भली मोठी भिंत उभी करतात. जातकाची कुंडली किंवा तळहात किंवा चेहरा परिक्षण करून जातकाच्या प्रश्नानुसार तीन स्तरावर उपाय देता येतात. अशुभ ग्रहाचा तोडगा ग्रहदेवतेची पुजा, साधना तसेच काही परहेज म्हणजे मांसाहार वर्ज्य करणे,, मद्यपान वर्ज्य करणे वगैरे.

लालकिताबनुसार काही आवश्यक व्याख्या :

१. बनावटी ग्रह :
मंगळ नेक = रवि + बुध ( केतू स्वभाव )
मंगळ बद = रवि + शनि ( राहू स्वभाव )
शुक्र = राहू + केतू
गुरू = रवि + शुक्र
रवि = बुध + शुक्र
चंद्र = रवि + गुरू

बुध = गुरू + राहू

शनी = गुरू + शुक्र ( केतू स्वभाव )

शनी = मंगळ + बुध ( राहू स्वभाव )

राहू = मंगळ + शनी ( उच्चावस्था )

राहू = रवि+ शनी ( नीचावस्था )

केतू = शुक्र + शनी ( उच्चावस्था )

केतू = चंद्र + शनी ( नीचावस्था )

पाप ग्रह = राहू व केतू

पापी ग्रह = शनी, राहू व केतू

२. राशीफळाचा ग्रह : जेव्हा कोणताही ग्रह उच्चीचा नसेल नीचीचा नसेल तसेच राशीपती नसेल तसेच पक्क्या घरातही नसेल 1. कोणत्याही अन्य राशीत स्थित असेल 2. कोणत्याही ग्रहाबरोबर असेल 3. इतर कोणत्याही ग्रहाबरोबर सोबत करत असेल तर असा ग्रह शक्की असतो. अशा ग्रहाचा उपाय शक्य आहे.

३. ग्रहफळाचा ग्रह : जेव्हा कोणताही ग्रह ना स्वगृही ना मित्रगृही ना शत्रूगृही ना वर्गोत्तमी असेल तर असा ग्रह ग्रहफळाचा असतो. अशा ग्रहाचा उपाय करता येत नाही. अशा ग्रहाचा प्रभाव बदलणे मानवाच्या हातात नाही. मानवी शरीरात ग्रहास आत्मा व राशीस शरीर मानले तर आत्म्याच्या प्रभावास बदलण्याचे सामर्थ्य ज्योतिषात नाही.

उपायांचे सिद्धांत :

१. राहूच्या अशुभ परिणामास केतूचा उपाय ठिक करेल.
२. केतूच्या अशुभ प्रभावास राहूचा उपाय ठिक करेल.
३. संक्षिप्त रूपात ग्रहांचे उपाय म्हणजे ग्रहासंबंधीत वस्तू स्वतःजवळ अथवा घरात ठेवणे किंवा ग्रहांसंबंधित व्यक्तींचा आशिर्वाद घेणे किंवा क्षमा याचना करणे होय.

४. शुक्र अशुभ झाल्यास गाय पाळणे किंवा गायीस घास देणे हितकर ठरेल.

५. हातावर काकरेषा असणे म्हणजे शनी अशुभ मग धन हानी होत असेल तर कावळयास घास देणे.
संततीसुखासाठी कुत्र्यास गोड चपाती देणे.

६. प्रत्येक ग्रह बनावटी हालत मध्ये दोन ग्रहांचा आहे. त्यापैकी एका ग्रहास तेथुन बाजुस केल्यानंतर शुभ फळ मिळेल. किंवा असा नविन ग्रह कायम करावा जो अशुभ परिणाम देत असलेल्या ग्रहास शांत करेल.
जसे शनी अशुभ असताना बनावटी शनी म्हणजे शुक्र + गुरू पैकी गुरूला बाजूला करण्यासाठी पाचू वापरून बुधास कायम केल्यास गुरू बाजुला होईल आणि शनी व शुक्र मित्र आहेत तसेच बुध सुद्धा शनीचा मित्र आहे. शुक्रासह बुध आल्याने शनी शुभ फळ देईल.

७. शुक्र अशुभ होत असल्यास बनावटी शुक्र म्हणजे राहू + केतू पैकी राहूला बाजूला केल्यास केतू शिल्लक राहील. शुक्राला शुभ करण्यासाठी राहूला शुभ करावे. राहूला केतूचा उपाय शुभ करतो.

८. बुध व गुरूला एकत्र ठेवून शुभ परिणाम मिळविण्यासाठी बुधाची हिरव्या रंगाची वस्तू गुरू सह ठेवल्यास मदत मिळेल. जसे सोने हिरव्या कागदात लपेटुन ठेवणे.

९. बुध शुक्र व शनीचे प्रतीक आहेत कुत्रा गाय व कावळा. स्वतःच्या भोजनातुन यांना भाग दिल्यास धन सम्मान व संतती यांची वाढ होत राहील.

१०. अशुभ ग्रहाचा परिणाम नष्ट करण्यासाठी अशुभ फळ देणारी वस्तू दूर करावी. मंगळ बदच्या अशुभ प्रभावापासून मृगशाल वापरावी कारण मंगळ बद म्हणजे रवि + शनी व शनीचा विषारी साप मृगशालेवर

चढत नाही. मंगळ बद चा मित्र शनी आहे. मंगळ मकर राशीत उच्चीचा असतो.

११. केतूच्या अशुभ प्रभावापासून वाचण्यासाठी चंद्राचा उपाय करावा. कुंडलीत ज्या घरात चंद्र असेल तोच उपाय करावा. चंद्र आयुष्याचा कारक आहे. उपायाने सर्वांवर कृपा करेल.

१२. मंगळ बद प्रत्येकासाठी मृत्यूचा सापळा घेवून फिरत असतो. जेथे चंद्र असेल तेथे मंगळ बद नसेल व चंद्र व मंगळ दुधात मधाप्रमाणे असतात. जेव्हा मंगळ बद असतो तेव्हा चंद्र नसतो.

१३. मंगळ बदचा उपाय चंद्राच्या पुजेने किंवा मदतीने करावा. गुळाची चपाती मातीच्या तव्यावर भाजून दान करावी. हा सर्वात चांगला उपाय आहे.

१४. राहूच्या अशुभ प्रभावापासून वाचण्यासाठी जव धान्य एकांत जागी दाबावे.
किंवा जव दुधाने धुवून वाहत्या पाण्यात सोडावे.
लालकिताबात वाहत्या पाण्यातून पऱ्याचा डबा भरून चांदीचा तुकडा टाकून कल्हईचा टीका लावून त्या डब्यास काळोख्या खोलीत दाबावे. हा देखिल राहूचा उपाय आहे.

१५. जर ताप किंवा दिर्घ ताप जातकास असेल तर जव गायीच्या मूत्रात धुवून लाल कपडयात बांधून ठेवावे. तसेच गोमुत्राने दात साफ करावेत. हा राहूचा उपाय आहे.

१६. कुंडलीत जो ग्रह उच्चीचा त्या ग्रहाच्या वस्तुची मदत घेतल्यास अशुभ ग्रहाचा परिणाम नष्ट होईल.

१७. हातावर मच्छरेषा व कागरेषा ज्या ग्रहाच्या राशी किंवा पक्के घर किंवा उंचवटयावर असेल त्या ग्रहाच्या पुजेने शुभ फल मिळेल. मच्छरेषा जर बुधाच्या मस्तक रेषेवर असेल तर शनी बुध म्हणजे काळया कावळयास

अन्नातील घास दयावा. जर मच्छरेषा शुक्र उंचवटयावर असेल तर काळया गायीस पाळणे किंवा पुजा करणे फायदयाचे ठरेल.

१८. धोक्याच्या ग्रहाचा प्रभाव लपलेला असतो. जर वडीलांसाठी मुलगा व मुलगी दोन्ही अशुभ फळ देणारे असतील तर रवि मुलगा व बुध मुलगी व मुलीच्या गळयात तांब्याचे लॉकेट धारण केल्याने शुभ फळ मिळेल. बुध त्यामूळे दाबला जाईल.

१९. पापी ग्रह एकटे नसून कोणतेही दोन ग्रह एकत्र असतील तर मंगळास कायम केल्याने शुभ फळ मिळेल. अट आहे की जन्मकुंडलीत मंगळ राशीफळाचा असला पाहीजे. जर मंगळ १ ३ किंवा ८ मध्ये असेल तर उपाय शक्य नाही. अशावेळेस बुधाचा उपाय करावा.

२०. स्त्री ग्रह चंद्र व शुक्र एकत्र असताना बुधाची शक्ती कामी येईल. पण अट आहे की बुध ३ ६ व ७ या घरांत असता कामा नये. असे झाल्यास मंगळाचा उपाय सहाय्यक ठरेल. थोडक्यात ज्या ग्रहाचा उपाय करायचा आहे तो ग्रहफळाचा असता कामा नये.

२१. घर क्र. ९ चा उपाय घरातील जमीनीच्या रंगावरून करावा. जो ग्रह ९ व्या घरात अशुभ होत असेल शुक्र बुध किंवा मंगळ बद इ. तर त्यांच्या मित्र ग्रहांचे उपाय करावेत अशा मित्र ग्रहांचे रंग जेथे पाय लागतील अशा ठिकाणी लावू नये.

विशेष उपाय :

जेव्हा एखादया उपायाचे फळ मिळत नसेल तर लवकरात लवकर फळ मिळण्यासाठी खालील उपाय करावेत.

१. मंगळ बद : कवडया समुद्रात सोडाव्यात.

२. गुरू : केशर नाभी जीभेवर व कपाळावर लावावे.

३. रवि : गुळ वाहत्या पाण्यात सोडावा.
४. चंद्र : दुधाचे भांडे किंवा पाण्याचे भांडे रात्री झोपताना डोक्याजवळ ठेवून सकाळी कडुनिंबाच्या मुळाशी टाकावे.
५. शनी : तेलात स्वतःची प्रतिमा बघून ते पात्र दान करावे.
६. शुक्र : गाय दान करणे किंवा ज्वारी हे धान्य दान करणे.
७. मंगळ : लाडू किंवा मिठाई किंवा गोड जेवण दान करणे.
८. बुध : तांब्याचा पैसा छिद्र करून समुद्रात सोडणे.
९. राहू : मूळा दान करणे किंवा कोळसे समुद्रात सोडणे.
१०. केतू : कुत्र्यास चपाती टाकणे.

ग्रहांच्या उपायांसंबंधी सावधानी :

१. उपायाचा ग्रह राशी फळाचा असावा ग्रह फळाचा असता कामा नये.
२. उपायाची वेळ सूर्योदय ते सूर्यास्त अशी असावी रात्रीचा स्वामी शनी असल्याने उपायाचा परिणाम भयानक असू शकतो.
३. उपायासाठी वाराचा प्रतिबंध नाही. प्रत्येक उपाय कमीत कमी ४० दिवस व जास्तीत जास्त ४३ दिवस करावा. उपाय मधेच थांबविल्यास मागील दिवस निष्फळ होतात. मग पुन्हा मोजणी करून ४३ दिवस किंवा आठवडे पूर्ण झाल्यावर फळ मिळते.
४. रक्तसंबंधाने कोणतीही व्यक्ती जातकासाठी उपाय करू शकते.

५. मृत्यूच्या वेळी जर एखादी व्यक्ती कोणत्याही ग्रहाची वस्तू आशिर्वादरूपाने देते ती शुभ दायक असते.

६. जर ग्रह नष्ट होत असेल म्हणजेच पितृऋणाचा किंवा संततीबाधक असल्यास जो ग्रह नीचीचे फळ देत असेल तर दान करावे.

| ग्रह | लिंग | रंग | देवता | उपाय | दानाची वस्तू |
|---|---|---|---|---|---|
| गुरू | पु. | पिवळा | ब्रम्हा | हरीपूजन | चणाडाळ व सोने |
| रवि | पु. | केशरी | विष्णू | हरिवंश पुराण | गहू लाल फूल व तांबे |
| चंद्र | स्त्री | पांढरा दुधासारखा | शिव | शक्तीपूजन | दुध तांदूळ व चांदी |
| शुक्र | स्त्री | पांढरा दहयासारखा | लक्ष्मी | गौपालन | तूप दही मोती व कापूर |
| मंगळ | पु. | लाल | हनुमान | गायत्रीपाठ | मसूर डाळ व लाल रत्न |
| बुध | न. | हिरवा | दुर्गा | दुर्गापाठ | मुग व पाचू |
| शनी | न. | काळा | काळभैरव | भैरव पुजा | लोखंड |
| राहू | न. | निळा | सरस्वती | कन्यादान | राईचे तेल व नीलम |
| केतू | न. | चित्त्यासारखा | गणेश | कपिला गाय दान | तिळ |

श्री. संतोष अंबावले (९९६७३०३९८५)

## लेख क्र. ५१ : ज्योतिष आणि अरोमाथेरपी यांचे सहजीवन : एक नवा दृष्टिकोन

**लेखिका : ज्यो. सोनल पंडित (८०१०१७६५२६)**

ज्योतिष शास्त्र आणि अरोमा थेरपी या बघायला गेल्या तर दोन वेगळया पद्धती आहेत ज्यांना विविध कारणांमुळे विविध संस्कृतीं मध्ये लोकप्रियता मिळाली आहे. ज्योतिष शास्त्र ही एक जुनी विश्वास प्रणाली आहे जी खगोलीय पिंड, त्यांच्या हालचाली, ग्रह, तारे व त्यांचा मानवी व्यक्तिमत्त्वावर आणि पृथ्वीवरील घडामोडींवर होणार प्रभाव यांच्या भोवती फिरते. ज्योतिषशास्त्राचे असे म्हणणे आहे की एखाद्या व्यक्तीच्या जन्माच्या वेळी ग्रह आणि ताऱ्यांची स्थिती त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, जीवनावर, तसेच जीवनातील मुख्य घटनांवर प्रकाश टाकू शकते. ज्योतिषशास्त्र हे एक मार्गदर्शक म्हणून किंवा विज्ञान म्हणून असंख्य व्यक्तींसाठी आकर्षण आणि आत्मनिरीक्षणाचे स्रोत आहे. तर दुसरीकडे ज्योतिष शास्त्राच्या अगदी विरुद्ध, अरोमा थेरपी ही विविध वनस्पतींच्या स्त्रोतांमधून प्राप्त केलेल्या essential oils च्या उपचारात्मक गुणधर्मांवर आधारित आहे. अरोमा थेरपी ही एक समग्र उपचार पद्धती आहे जी शारीरिक, मानसिक तसेच भावनिक कल्याणासाठी Essential oils आणि aromatic compounds वापरते. फुले, पाने, मुळे आणि बियांमधून काढलेली ही शक्तिशाली essential oils, हि एक स्वतंत्र आणि नैसर्गिक उपचार प्रणाली आहे असे मानले जाते. हे तेल शारीरिक, भावनिक आणि मानसिक आरोग्यास चालना देण्यासाठी वापरले जातात. अरोमा थेरपिस्ट हे essential oils अनेक प्रकारे वापरतात. श्वासावाटे आत घ्यायला लावणे , मसाज देणे, किंवा दिवसभर विशिष्ठ सुगंध जवळ बाळगणे. उदा. सुगंधी हार, ब्रेसलेट, सुगंधी मेणबत्ती, अगरबत्ती, धूप, किचेन वैगरे . या मध्ये शोषक पदार्थांनी बनवलेले इसेंशिअल ऑइल असते. आणि ते दिवसभर सुंगधाच्या स्वरूपात आपल्या शरीरात प्रवेश करते. त्यामुळे आपल्याला तणाव आणि चिंतापासून, वेदनेपासून, त्वचेच्या समस्या पासून ते अगदी झोपेच्या विकारांपर्यंत कोणत्याही परिस्थितीचे निराकरण करण्यात मदत होते. त्यामुळे वरकरणी या दोन्ही वेगळ्या पद्धती दिसत असल्या तरी एक समान धागा यात आहे. तो म्हणजे या दोन्ही पद्धती मन, शरीर आणि आत्मा यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन त्यावरील समस्याचे निराकरण करण्याचे कार्य करतात. या लेखात आपण ज्योतिषशास्त्र आणि अरोमा थेरपी यांचा एक सुरेख संगम पाहणार आहोत. तसेच या दोन्ही शाखा शारीरिक, भावनिक आणि आध्यात्मिक स्तरांवर उपचार प्रदान करण्यासाठी एकमेकांना कसे पूरक आहेत, त्यांना एकत्र केले तर काय चमत्कार होऊ शकतो याचा आपण या लेखातून अभ्यास करणार आहोत.

### ज्योतिष शास्त्रात अरोमा थेरपीचे महत्व

- काही विशिष्ट सुगंध आणि essential oils त्यांच्या ज्योतिषीय चिन्हांशी किंवा त्या चिन्हांशी संबंधित ग्रह आणि घटकांशी जोडलेले असतात. ते या सुगंधांचा वापर त्यांच्या चिन्हांच्या उर्जा आणि वैशिष्ट्यांना एकत्रित करण्यासाठी करतात. उदाहरणार्थ, मेष ह्या अग्नी तत्वाच्या राशीखाली जन्मलेली व्यक्ती त्यांच्या ज्वलंत आणि उत्साही स्वभावाला वाढवण्यासाठी लोबान, दालचिनी, पेपरमिंट सारखे उत्साह वर्धक सुगंध वापरून स्वतःचा विकास साधते.
- अरोमाथेरपीचा उपयोग ज्योतिष शास्त्रातील भावनिक आणि मानसिक पैलूंवर लक्ष देण्यासाठी केला जाऊ शकतो.

- वेगवेगळ्या सुगंधांमध्ये मूड आणि भावनांवर प्रभाव टाकण्याची शक्ती असते. उदाहरणार्थ, जस्मिन सारखा शांत सुगंध अत्यंत भावनिक कर्क राशीच्या व्यक्तीला भावनिक आधार देण्यास मदत करते.
- अरोमाथेरपीचा उपयोग ध्यान आणि अध्यात्मिक पद्धतीं दरम्यान त्यांच्या ज्योतिष शास्त्रीय चिन्हाशी, ग्रहांच्या प्रभावांशी किंवा आध्यात्मिक विश्वासांशी संबंध वाढवण्यासाठी केला जातो.
- काही व्यक्ती त्यांच्या ज्योतिषीय विधी किंवा समारंभांमध्ये अरोमा थेरपीचा समावेश करतात. उदाहरणार्थ, पौर्णिमा किंवा संक्रांत यां सारख्या महत्त्वाच्या ज्योतिषीय घटनांना चिन्हांकित करण्यासाठी आणि या क्षणांशी संबंधित ऊर्जा वापरण्याचा मार्ग म्हणून ते विशिष्ट सुगंध वापरतात.
- विशिष्ट सुगंध एखाद्याच्या ज्योतिष शास्त्रीय चिन्हाशी संवेदनात्मक कनेक्शन निर्माण करते ज्यामुळे एखाद्याला स्वतःबद्दल अधिक सखोल आकलन होण्यास मदत होते
-

**अरोमा थेरापिमध्ये अगरबत्तीचे महत्व**

- अगरबत्ती किंवा धूप (शंकू किंवा घन धूप) त्यांच्या सुगंधी आणि उपचारात्मक गुणधर्मांसाठी शतकानुशतके विविध संस्कृतींमध्ये वापरले जात आहेत.
- अरोमा थेरापि मध्ये ही अगरबत्ती आणि धुपाचा खूप चांगल्या प्रकारे वापर केला जातो.
- अगरबत्ती किंवा धूप हे जरी अरोमा थेरपीमध्ये प्रमुख घटक म्हणून काम करत नसले तरी ते अनेक प्रकारे या उपचार पद्धतीमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावतात.
- essential oils हा अरोमा थेरापिचा महत्वाचा घटक आहे. त्यामुळेच विशिष्ट सुगंधी घटक, essential oil आणि उच्च प्रतीचे रेझीन या पासून बनलेल्या मसाला अगरबत्ती आणि धूप ह्या उपचार पद्धतीमध्ये महत्वपूर्ण घटक म्हणून एक स्वतंत्र ओळख निर्माण करतात.
- दैनंदिन वापरातील ह्या अगरबत्ती आणि धूपाला म्हणूनच सर्व धर्मात आदराचे स्थान आहे. त्यामुळे ह्याला एक अध्यात्मिक महत्वहि प्राप्त झालेले आहे.
- ही धूप उत्पादने जाळल्याने essential oil आणि वनस्पतींचे रेजिन हवेत सोडले जातात, ज्यामुळे एक आनंददायी आणि उपचारात्मक वातावरण तयार होते.
- वेगवेगळ्या धूप प्रकारांमध्ये विशिष्ट सुगंध आणि गुणधर्म असतात जे मूड आणि भावनांवर परिणाम करतात.
- उदबत्त्यांचा सुखदायक सुगंध तणाव कमी करण्यास आणि शांत वातावरण निर्माण करण्यास मदत करतो.
- धूप हे ध्यान आणि सजगतेसाठी एक मौल्यवान साधन आहे.
- विशिष्ट सुगंध विशिष्ट व्यक्तींना त्यांचे लक्ष केंद्रित करण्यात आणि सखोल चिंतनासाठी अनुकूल वातावरण तयार करण्यास मदत करतात.
- धूप सामान्यतः अध्यात्मिक आणि धार्मिक समारंभांमध्ये पवित्र आणि धार्मिक वातावरण तयार करण्यासाठी वापरला जातो. अनेकांना हा सुगंध सुंदर अनुभूती देतो. आणि त्यांना त्यांच्या आध्यात्मिक विश्वासांशी जोडतो.
- काही धूपामध्ये विशेषतः लोबान मध्ये शुद्धीकरण गुणधर्म आहेत आणि ते नकारात्मक ऊर्जा किंवा अशुद्धते पासून हवा शुद्ध करण्यात मदत करू शकतात. काही आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पद्धतीं मध्ये हे विशेषतः महत्वाचे आहे.

आता आपण बघू या प्रत्येक राशीवर विशिष्ट सुगंध कसे काम करतात

**मेष रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात लोबान अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- लोबान हे आध्यात्मिक जागरूकता, ध्यान आणि दैवीशी जोडण्याशी संबंधित आहे. त्यामुळे मेष राशीच्या व्यक्तींना त्यांच्या उत्साही आणि साहसी स्वभावाला आणि मनाला शांत करण्यासाठी, आंतरिक चिंतनासाठी आणि आध्यात्मिक वाढीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी लोबान उपयुक्त ठरते.
- ह्या व्यक्ती आत्मविश्वासू आणि ठाम असतात. त्यामुळे लोबान मधील grounding and centering properties ह्या व्यक्तींना अधिक आत्मविश्वास आणि लक्ष केंद्रित करण्यास मदत करतात.
- ह्या राशीच्या व्यक्तींकडे अनेकदा उत्साही आणि कृती-केंद्रित म्हणून पाहिले जाते, परंतु त्यांचा हाच अति उत्साह त्यांना तणाव आणि टेन्शन मध्ये ठेवतो. लोबान मध्ये शांतता आणि तणाव कमी करणारे गुणधर्म असतात जे मेष राशीच्या व्यक्तींना त्यांच्या तणावाची पातळी योग्य राख्यान्यात आणि विचारांचे संतुलन राखण्यास मदत करते.
- लोबानचा वापर अनेकदा जागा स्वच्छ करण्यासाठी आणि शुद्ध करण्यासाठी केला जातो. त्यामुळे मेष राशीच्या व्यक्तींना हा सुगंध नकारात्मक ऊर्जा काढून टाकण्यासाठी, सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांची नव्याने सुरुवात करण्यासाठी उपयुक्त ठरतो.
-

**वृषभ रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात रोज ( गुलाब )अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- वृषभ राशीच्या व्यक्ती ह्या कामुक आणि रोमँटिक असतात. तसेच ते त्यांच्या नाते संबंधात अधिक उत्कट आणि प्रेमळ असतात. गुलाबाचा गोड सुगंध त्यांच्यातील रोमँटिक अनुभव वाढवण्यासाठी मदत करतो.
- वृषभ राशीच्या लोकांचा भौतिक जग आणि इंद्रियांशी मजबूत संबंध असतो . तर गुलाबाचा सुगंध दृष्टी आणि वासाच्या संवेदनांना गुंतवून ठेवतो.
- वृषभ राशी मध्ये स्थिरता, चिकाटी आणि सहनशीलता हे गुण आहेत. त्यामुळेच ह्या लोकांना मार्गावर राहण्यासाठी आणि त्यांच्या प्रयत्नांमध्ये स्थिर राहण्यासाठी गुलाबाचा सुगंध Reminder म्हणून काम करतो.
- वृषभ राशीच्या व्यक्तींना तणावाच्या काळात किंवा जेव्हा त्यांना आराम करण्याची आवश्यकता असते तेंव्हा गुलाबाच्या सुगंधाचा, आणि त्याच्या शांत व आरामदायी प्रभावाचा फायदा होऊ शकतो.

**मिथुन रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात लव्हेंडर अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- मिथुन राशीच्या व्यक्ती जलद विचारांच्या , अस्वस्थ स्वभावाच्या अश्या असतात. त्यांचा वक्तृत्वाकडे आणि स्वतःला व्यक्त करण्याकडे जास्त कल असतो. अनेकदा त्यांच्या सक्रिय मनाला शांत करण्याची, तणाव कमी करण्याची आवश्यकता असते. लॅव्हेंडरचा शांत करणारा प्रभाव मिथुन लोकांना शांतता राखण्यास मदत करतो. विशेषत: अशा परिस्थितीत जेंव्हा त्यांना संभाषण कौशल्याची जास्त आवश्यकता असते.
- मिथुन राशीचे लोक बहुधा सर्जनशील आणि जिज्ञासू असतात. लॅव्हेंडरचे शांत आणि ग्राउंडिंग गुणधर्म मन स्वच्छ करण्यात आणि अधिक स्वछ, सर्जनशील विचार प्रक्रियेस प्रोत्साहन देण्यास मदत करतात.
- लॅव्हेंडरचा सुगंध समतोल आणि सुसंवाद वाढवतो. त्यामुळे ह्या लोकांना त्यांच्या द्विस्वभावाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि त्यांच्या अनेक आवडी आणि व्यवसायांमध्ये संतुलन राखण्यासाठी मदत होते.

**कर्क रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात जस्मिन (चमेली) अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- कर्क रास  हि भावनिक संवेदनशील आणि अंतर्ज्ञानी आहे. जास्मिन मध्ये असे गुणधर्म आहेत जे भावनांना शांत आणि उत्साही करतात. ज्यांना भावनिक आधार आणि सांत्वनाची आवश्यकता आहे अशा व्यक्तींसाठी हा सुगंध उत्कृष्ट आहे.
- जास्मीन आध्यात्मिक जागरूकता आणि अंतर्ज्ञान वाढवते. कर्क राशीच्या व्यक्तींसाठी, जे नैसर्गिकरित्या अंतर्ज्ञानी आणि सहानुभूतीशील आहेत, त्यांना चमेली त्यांच्या अंतर्गत मार्गदर्शनावर विश्वास ठेवण्यास आणि त्यांच्यात अंतर्ज्ञानाची क्षमता वाढविण्यात मदत करते.
- कर्क राशीच्या व्यक्तींना जेंव्हा तणावमुक्त करण्याची किंवा त्यांच्या व्यस्त जीवनात शांतता शोधण्याची आवश्यकता असते तेंव्हा चमेलीचा आरामदायी गुणधर्म या राशीच्या लोकांसाठी फायदेशीर ठरतो. २००२ मध्ये USA मधील The Wheeling Jesuit विद्यापीठाने संशोधित केलेल्या एका अहवालात असे सिद्ध झाले आहे कि जस्मिनचा सुगंध हे एक  Powerful Relaxant आहे. ज्याने निद्रानाशाचा सामना करण्यास मदत होते.
- कर्क राशीतील लोक हे रोमँटिक असतात आणि त्यांच्या प्रियजनांशी मनापासून संलग्न असतात. चमेलीचा गोड आणि मोहक सुगंध रोमँटिक वातावरण वाढवू शकतो आणि त्यांच्या नातेसंबंधात घनिष्ठतेची भावना निर्माण करू शकतो. हे एक उत्कृष्ट Aphrodisiac (कामोत्तेजक) आहे जे शांतता आणि निर्मळतेची भावना निर्माण करते. तसेच हे sexual hang-ups release करायला मदत करतात. ज्यामुळे sexual energies या naturally released होतात.
- चंद्र हा कर्केचा राशि स्वामी आहे आणि चमेली बहुतेकदा चंद्राच्या उर्जेशी संबंधित असते. चंद्राशी असलेला हा संबंध कर्क राशीच्या व्यक्तींशी दृढपणे संबंधित असलेल्या भावनिक आणि अंतर्ज्ञानी गुणांना बळकट करतो.

**सिंह रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात बखुर अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- एनर्जेटिक आणि रीगल ऑरा: सिंह रास त्यांच्या शाही आणि आत्मविश्वास पूर्ण व्यक्तिमत्त्वासाठी ओळखली जाते. बखूरचे समृद्ध आणि जटिल सुगंध या राशीशी संबंधित असलेले वैभव आणि करिष्मा या भावना वाढविण्यात मदत करते.
- स्टेज गाजवणे : सिंहेच्या लोकांना उत्सव साजरा करणे आणि लक्ष केंद्रीत करणे खूप आवडते. बखूर  जाळल्याने भव्य मेळावया प्रमाणे किंवा एखाद्या विशेष कार्यक्रमांप्रमाणे लक्झरी आणि उत्सवाचे वातावरण तयार होते.  जे ह्या लोकांना अत्यंत भावते.
- सर्जनशीलता वाढवणे: हे लोक सर्जनशील असतात आणि त्यांचा स्वभाव अगदी नाट्यमय असतो. बखूरचे उत्तेजक सुगंध सर्जनशील मनाला उत्तेजित करण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे सर्जनशील व्यवसायांचा आनंद घेणाऱ्या सिंहेसाठी हा योग्य पर्याय आहे.
- आत्मविश्वास आणि सकारात्मकता: बखूरचा मूड-लिफ्टिंग गुणधर्म सिंह राशीच्या व्यक्तींना त्यांचा नैसर्गिक आशावाद, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन राखण्यासाठी उपयुक्त ठरतो.
- विश्रांती आणि तणाव मुक्ती: सिंह राशीचा आत्मविश्वास आणि बाहेर जाण्याकडे कल असला तरी त्यांना तणाव किंवा थकवा जाणवू शकतो. बखूरचे शांत आणि ग्राउंडिंग गुण सिंह राशीच्या व्यक्तींना आराम करण्यास मदत करतात.

- अध्यात्मिक पद्धतींचा संबंध : बखूरचा वापर अनेकदा विविध आध्यात्मिक आणि धार्मिक समारंभांमध्ये केला जातो. सिंहेच्या ज्या व्यक्ती , सहसा heart (हृदय)आणि soul (आत्म्याच्या) गोष्टींकडे आकर्षित होतात, ते बखूर आणि आध्यात्मिक प्रथा यांच्यातील संबंधाची प्रशंसा करताना आढळतात.

**कन्या रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात रुद्राक्ष अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- कन्या रास हि सखोल अभ्यासक रास आहे. त्यामुळे ह्या लोकांना जेंव्हा तणाव किंवा अस्वस्थता जाणवते तेंव्हा रुद्राक्षाचा सुगंध त्याच्या शांत आणि मूलभूत गुणधर्मांसह, ह्या व्यक्तींना आराम आणि शांती मिळवण्यास मदत करतो.
- कन्या रास बहुतेक वेळा आंतरिक परिपूर्णता आणि आत्म-सुधारणेसाठी प्रयत्नशील असते. यामुळे रुद्राक्षाचा सुगंध त्यांच्या आध्यात्मिक वाढीसाठी आणि त्यांच्या बौद्धिक वाढीसाठी आवश्यक आहे.
- कन्या रास हि अभ्यासू रास असली तरी तिच्या अति चिकित्सेमुळे कधी कधी त्यांचे अभ्यासावर किंवा कामावर लक्ष केंद्रित होत नाही. मनात सतत काही ना काही विचार चालू असतात. रुद्राक्षाचा सुगंध ह्या लोकांना त्यांची एकाग्रता वाढवण्यासाठी, मनःशांती साठी आणि त्यांच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी अतिशय उपयोगी ठरतो.

**तूळ रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात ब्लॅक फॉरेस्ट अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- तुळ राशीच्या व्यक्ती अनेकदा समतोल आणि सुसंवाद शोधत असतात. ब्लॅक फॉरेस्टला **" Leader of Balance "** असे म्हणतात.
- तूळ राशीच्या व्यक्तींना विशेषत: सौंदर्य आणि सौंदर्य शास्त्राची अती प्रशंसा असते. ब्लॅक फॉरेस्ट मधील आनंददायी सुगंध दृश्यमान आणि सुगंधित वातावरणाच्या निर्मितीमध्ये महत्वाचे योगदान देतात.
- या राशीचे लोक सहसा मित्र आणि प्रियजनांसह मेळाव्यांमध्ये , वेगवेगळया मेजवानीमध्ये उपस्थित राहण्याचा आनंद घेतात. अशा सामाजिक कार्यक्रमांदरम्यान याच्या आनंददायी सुगंधाचा वापर केल्याने छान प्रसन्न वातावरण तयार होते.
- तूळ राशीच्या लोकांना शांत आणि प्रसन्न वातावरण कायमच आवडते. ब्लॅक फॉरेस्टचा सुमधुर आणि शांत सुगंध या लोकांमध्ये शांतता आणि विश्रांतीची भावना वाढीस नेतो.

**वृश्चिक रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात कस्तुरी अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- वृश्चिक राशीच्या व्यक्ती तीव्र कामुकता आणि उत्कट स्वभावाच्या असतात. कस्तुरी हि सुद्धा त्याच्या तीव्र कामुक आणि मोहक सुगंधासाठी ओळखली जाते, त्यामुळे इच्छा आणि आकर्षणाच्या शक्तीची प्रशंसा करणाऱ्या वृश्चिक राशीच्या लोकांसाठी हि योग्य ठरते.
- वृश्चिक हे विंचूचे प्रतीक आहे जे परिवर्तन आणि पुनर्जन्म दर्शवते. कस्तुरी तिच्या समृद्ध आणि परिवर्तनीय सुगंधाने, वृश्चिकेच्या लोकांची वैयक्तिक वाढ आणि त्यांच्या नूतनीकरणाच्या इच्छेशी जुळवून घेते.

- वृश्चिक त्यांच्या खोल आणि गुंतागुंतीच्या भावनांसाठी ओळखले जातात. कस्तुरीचा सखोल आणि बहुस्तरीय सुगंध या लोकांच्या भावना आणि आंतरिक मानसिकतेच्या खोलवर जाण्याच्या क्षमतेशी जुळवून घेतो.
- कस्तुरीच्या सुगंधामध्ये सकारात्मक ऊर्जा आकर्षित करण्याची आणि चांगले नशीब आणण्याची क्षमता असते. त्यामुळे या लोकांना कस्तुरीची ही गुणवत्ता त्यांच्या वैयक्तिक वाढिसाठी आणि परिवर्तनासाठी अगदी योग्य आहे.
- वृश्चिक लोक खोल, अर्थपूर्ण संबंधांना महत्त्व देतात. कस्तुरीमुळे वैयक्तिक संवादामध्ये एक जिव्हाळयाचे आणि आमंत्रित वातावरण तयार करण्यास मदत होते, मग ते रोमँटिक किंवा इतर कोणत्याही संदर्भांमध्ये असो.

**धनु रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात चंपा अगरत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा**

- धनु रास हि साहसी आणि मुक्त-उत्साही स्वभावाशी संबंधित आहे. चंपेचा सुगंध एक्झॉटिक आणि दूरच्या ठिकाणांची भावना जागृत करतो. त्यामुळे धनु राशीच्या शोध आणि नवीन अनुभवां बद्दलच्या प्रेमाचा हा अनुनाद आहे.
- चंपेचा सुगंध सामान्यतः विविध आध्यात्मिक आणि ध्यान पद्धतींमध्ये वापरला जातो. त्यामुळेच धनु राशीच्या व्यक्ती, ज्यांचा अनेकदा तात्विक आणि आध्यात्मिक कल असतो, त्यांच्या आत्म निरीक्षणासाठी आणि आध्यात्मिक शोधासाठी हा सुगंध अनुकूल असतो.
- चंपेचा सुगंध विशेषत: उत्साह आणि सकारात्मक म्हणून वर्णन केला जातो. म्हणूनच धनु राशीच्या आशावादी आणि उत्साही स्वभावाला अनुकूल ठरते.
- धनु राशीच्या व्यक्ती कायमच सर्जनशीलते साठी आणि ज्ञानाच्या शोधासाठी भटकत असतात. त्यामुळेच कलात्मक किंवा बौद्धिक व्यवसायात गुंतलेल्या अश्या लोकांना चंपेचा सुगंध प्रेरणादायी आणि सर्जनशील वातावरण देऊ शकतो.
- चंपेचा सुगंध धनु राशीच्या विस्तृत आणि मुक्त मनाच्या स्वभावा सारखा आहे, हा सुगंध त्यांना त्यांचे क्षितिज विस्तृत करणे आणि नवीन दृष्टीकोन शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो

**मकर रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात कंबोडियन उदाची अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- मकर राशीच्या लोकांमध्ये तीव्र महत्वाकांक्षा आणि यशाचा पाठपुरावा करण्याची जिद्द असते. तर ह्या उदामुळे ह्या व्यक्तींमध्ये उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्याची भावना वाढीस लागते.
- मकर राशीतील लोकांना बऱ्याचदा विवेकी आणि शुद्ध गोष्टींविषयी आसक्ती असते. त्यामुळे हा उद त्याच्या जटिल आणि अत्याधुनिक सुगंधाने, जीवनातील बारीक सारीक गोष्टीं साठी त्यांच्या मनात जिद्द आणि समाधान निर्माण करतो. तसेच ह्या राशींसाठी महत्त्वपूर्ण असलेला समतोल आणि स्थिरता राखण्यात मदत करतो.
- ह्या उदाचा दीर्घ काळ टिकणारा विलासी आणि मोहक सुगंध मकर राशीच्या शुद्ध आणि अभिजात जीवन शैलीच्या इच्छेला अनुनाद करतो. तसेच त्यांच्यात चिकाटी आणि सहनशीलता निर्माण करतो.

**कुंभ रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात रेड चंदन अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- कुंभेची स्वतंत्र आणि अपारंपरिक अशी विचारासरणी आहे.  रेड चंदन, त्याच्या विशिष्ट आणि अनोख्या सुगंधासह, पारंपारिक नियमांपासून मुक्त होण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण कल्पना स्वीकारण्या साठी कुंभ राशीच्या लोकांना मदत करतो.
- रेड चंदनाचा समृद्ध आणि सुगंधी सुवास ह्या राशीच्या लोकांना प्रेरणादायी ठरतो आणि सर्जनशील विचारांना उत्तेजित करून, कल्पक आणि पुढे नेणाऱ्या विचारांना प्राधान्य देण्यात मदत करतो.
- कुंभ राशीच्या व्यक्ती त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि दूरदर्शी विचारांसाठी ओळखल्या जातात, त्यामुळे त्यांना अस्वस्थता आणि मानसिक अति क्रियाशीलता देखील येऊ शकते. लाल चंदनाचे शांत करणारे गुणधर्म या प्रवृत्तींना संतुलित ठेवण्यास आणि आंतरिक शांतीची भावना निर्माण करण्यास मदत करतात.
- कुंभ रास हि स्वतःच्या व्यक्तिमत्वाला आणि अभिव्यक्तीला महत्त्व देते. लाल चंदनाचा अनोखा सुगंध या गुणांचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे या राशीतील लोकांना त्यांचे अस्सल स्वभाव व्यक्त करण्यास प्रोत्साहन मिळते.

**मीन रास : या राशीच्या लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात चंदन अगरबत्तीचा अथवा धुपाचा वापर करावा.**

- मीन रास त्याच्या तीव्र भावना आणि संवेदनशीलते साठी ओळखली जाते. चंदनाचा शांत आणि ग्राउंडिंग सुगंध मीन राशीच्या व्यक्तींना त्यांच्या जटिल भावनांमध्ये नेव्हिगेट करताना समाधान आणि संतुलन शोधण्यात मदत करतो.
- चंदनाचा सुगंध सौम्य आणि टिकाऊ असतो. जो मीन राशीच्या लवचिकता आणि करुणेच्या क्षमतेसं रेखित करतो आणि अगदी जीवनातील आव्हानांना तोंड द्यायला समर्थ करतो.
- मीन राशीच्या व्यक्तींना तणाव आणि भावनिक अशांतता येऊ शकते. चंदनाचे शांत करणारे आणि तणाव कमी करणारे गुणधर्म आव्हानात्मक काळात आराम देतात.
- मीन हि जलतत्वाची रास आहे आणि चंदनाचे शांत करणारे गुणधर्म मीन राशीचे पाण्याच्या घटकाशी संबंध मजबूत करण्यास मदत करतात, त्यांच्यात तीव्र भावना आणि अंतर्ज्ञान वाढवतात.

थोडक्यात काय तर, अरोमा थेरपी मध्ये अगरबत्तीचा वापर आपल्याला साध्या, नैसर्गिक आणि सजग पद्धतींद्वारे शांतता आणि संतुलन शोधण्याचे नैतिक मूल्य शिकवते. हे सांस्कृतिक आदर, पर्यावरणाचे संतुलन आणि सर्वांगीण कल्याणासाठी स्वत:ची काळजी यावर भर देते. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे ह्या अगरबत्ती अथवा धूपाची निर्मिती हे विशिष्ठ सुगंधी घटक, essential oil आणि उच्च प्रतीचे रेझीन या पासून बनणे गरजेचे आहे.

आद्य एक्सिमच्या सर्व मसाला अगरबत्ती ह्या माझ्या अभ्यासातून आणि संशोधनातून बनवल्या गेल्या आहेत. अनेक लोकांनी या अगरबत्तीचा वापर करून त्यांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि शांतता अनुभवली आहे. मग वाट कसली बघताय. आजच आपली पत्रिका आहाला पाठवा आणि या दिवाळी अंकाच्या वाचकांना मोफत मार्गर्शनासह खास सवलतीच्या दरात तुम्हाला योग्य अशी अगरबत्ती मिळवा. आणि ती ही घरपोच.

वरील लेख हा माझ्या स्वयं संशोधनातून, अभ्यासातून लिहिला गेला आहे. तसेच वर सांगितलेल्या अगरबत्ती आणि धूप हे केवळ रास लक्षात न घेता त्या राशीचा राशि स्वामी, नक्षत्र स्वामी , चरण स्वामी यांच्या एकत्रीकरणातून

सुचवल्यास अधिक फायदा होऊ शकतो. यावर लवकरच एक शॉर्ट कोर्स आपण चालू करणार आहोत. इच्छुकांनी यासाठी नक्की संपर्क करावा.

ज्यो. सोनल पंडित (८०१०१७६५२६)

## लेख क्र. ५२ : कलियुगातील राहू आणि केतूचा प्रभाव

**लेखक : श्री. श्रीधर कुलकर्णी (७८८७८६६५४७)**

कलियुगात राहू आणि केतूचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे राहूच्या प्रभावामुळे लोक अनेक प्रकारच्या अडचणीत जात आहेत एकंदरीत राहू हा एक भ्रमित करणारा एक फसवा ग्रह आहे ज्यामध्ये दररोज एक नवीन व्यक्ती फसत आहे आता इथे प्रश्नांचा पडतो की दररोज एक व्यक्ती राहूच्या प्रभावात कसं काय येतो हे खूप मोठी गोष्ट आहे मित्रांनो वारंवार बदलत जाणारे तंत्रज्ञान आणि लोकांमध्ये वाढणारे इच्छा राहूला बलवान बनवत आहेत. राहूचे मुख्य कार्यकत्व हे आकर्षण आहे जिथे आकर्षण असेल तिथे राहू चा प्रभाव असेल हे नक्कीच आहे. मग फक्त आकर्षित करणाऱ्या गोष्टीच नाहीत तर आकर्षणासाठी कारणीभूत ठरणाऱ्या सर्व गोष्टी राहूच्या प्रभावाखाली येतात जसे की मांसाहार जसे की कामवासना या गोष्टी राहू ग्रहाला बलवान बनवत आहेत गेल्या दहा वर्षांपासून तंत्रज्ञानात खूप मोठमोठे बदल घडत गेले परंतु याच्यात राहू चा प्रभाव खूप जास्त वाढत गेला गेल्या दहा वर्षात लोक रात्री नऊ वाजता झोपत असायचे आता सध्याच्या काळात लोकांची झोप कमी होत गेली आणि राहूच्या प्रभाव वाढत गेला भले लोक रात्री जागून प्रगती करत आहेत कुठेतरी सेल्फ स्टडी वाढवत आहेत कुठेतरी स्वतःच्या कार्यामध्ये मग न राहण्याचा प्रयत्न करत आहेत स्वतःमध्ये नवीन बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत पण राहू चा एक वाईट परिणाम सुद्धा आपल्या जीवनावर पडत आहे ते म्हणजे वाढते आकर्षण एखाद्या गोष्टीविषयी वाढणाऱ्या भावना गेल्या दोन-तीन वर्षांपासून आपण पाहत आहोत माणसाची झोप फक्त पाच ते सहा तासाची झालेली आहे हा बदलणारा राहू चा प्रभाव माणसाला झोपूच देत नाही. राहूच्या प्रभावाखाली कोण कोणते गोष्टी येतात हे प्रथम पाहूया राहूच्या प्रभावाखाली लॅपटॉप मोबाईल ड्रग्स सर्व प्रकारची व्यसने त्याचबरोबर अनिद्राच्या त्रास असणारी लोक डिप्रेशन मध्ये जाणारी लोक आत्महत्या करणारी लोक त्याचबरोबर राहूच्या प्रभावाखाली बदलते तंत्रज्ञान सुद्धा येत आहे ज्या तंत्रज्ञानाचा वापर टाईमपास साठी जास्त होत आहे ते तंत्रज्ञान बदलत्या काळात राहूच्या प्रभाव वाढल्यामुळे माणूस फसवा होत गेलेला आहे फसवणुकीचे प्रकार वाढलेले आहेत आणि जसं जसं राहू आणि केतूचा प्रभाव वाढत आहे तसे तसे जग बदलत आहे आता तुम्ही म्हणत असाल की आतापर्यंत मी राहू याच ग्रहाचा उच्चार केला मग केतूचा इथे मध्ये संबंध कुठून आला मित्रांनो राहू हा एखादी घटना घडवतो परंतु केतू हा त्या घटनेचे कारण निर्माण करतो जसे की 2019 मध्ये आलेला कोरोना हा कोरोना 2019 मध्येच का आला याविषयी तुम्हाला काही माहिती आहे का तर हा 2019 मध्येच येण्याचे कारण असे होते की त्या काळात केतू हा वृश्चिक राशीमध्ये उपस्थित होता आणि राहू हा वृषभ राशि मध्ये वृषभ राशि ही शुक्राची आहे याच्यात केमिकल चा वापर याच्यात घशासंबंधी त्रास पाहिले जाऊ शकतात कोरोनामध्ये मुख्य कारण म्हणजेच ताप सर्दी खोकला या गोष्टी होत्या शुक्र हा कफाचा सुद्धा कारक आहे याला कारण केतुनी बनवले केतू हा वृश्चिक राशीमध्ये उपस्थित होता वृश्चिक राशी ही मंगळाची आहे आणि मंगळ हा शरीरामध्ये रोगप्रतिकारक क्षमता बनवतो ज्यावेळेस व्यक्ती रोगप्रतिकारक क्षमतेने बलहीन झालेला असेल त्याच वेळेस हे सर्व आजार त्याला पसरू शकतात अनुच्छिक राशी ही जलतत्त्वाची आहे त्याच्यामुळे कोरोना काळातमाणसाच्या अंगातील जलतत्त्वावर परिणाम होऊन ते जलतत्व कमी झाले आणि त्याच्यात अनेक लोकांचा मृत्यू सुद्धा झाला या गोष्टीला कारण हे दोन्ही ग्रह आहेत आपण वारंवार या ग्रहांची ताकद वाढवत आहोत आणि सूर्य चंद्र सारख्या ग्रहांची ताकद कमी करत आहोत. आपल्याला ग्रंथांमध्ये तीन लोक सांगितलेले आहेत स्वर्ग मृत्यूलोक आणि पातळ लोक हे सर्व मी तुम्हाला काही शब्दात सांगण्याचा प्रयत्न करतो जिथे दैवी तत्व दैवी गुण जास्त वाढलेले आहेत जिथे लोक कोणत्याही प्रकारचे अनिष्ट कार्य करत नाहीत जिथे लोक चुकून सुद्धा एखाद्याला दुखवत नाहीत जिथे लोक चुकून सुद्धा आकर्षणात जात नाहीत त्यालाच स्वर्गलोक म्हणता येईल जिथे सर्व काही माहीत असून सुद्धा चुका केल्या जातात त्याला मृत्यूलोक म्हटले जाईल आणि जिथे चुकीची गोष्ट आहे हे माहीत असून सुद्धा वारंवार त्याच गोष्टी केल्या जात असतील वारंवार त्याच गोष्टीला जास्त महत्व दिले जात असेल त्याला पाताळ लोक म्हणता येईल आणि पृथ्वी लोकांचे रूपांतर त्याच पातळ लवकरात होत असताना दिसत आहे कारण आपण राहू आणि केतू या ग्रहांचा प्रभाव वाढवत आहोत पातळ लोकात सुद्धा हीच गोष्ट झाली असेल. जसं की आपण रात्री जास्त जागरण केल्याने चंद्राचा प्रभाव कमी होतो आणि दिवसा झोप घेतल्याने सूर्याचा प्रभाव कमी होतो सर्व लोकांनी आंदोलन करून सरकारवर बहिष्कार टाकला तर

सरकार सुद्धा पडते मग सर्व लोकांनी राहू घेतोच प्रभाव वाढवल्यावर चंद्र आणि सूर्याचं तिथं राहणार काय ? शेवटी जनमत महत्त्वाचा आहे आपण काय फॉलो करतो हे महत्त्वाचं आहे आणि गेल्या काही दिवसांपासून आपण त्या घटना पाहत सुद्धा होत की माणूस हा राक्षसापेक्ष बेकार झालेला आहे माणूस हा एका असुरा पेक्षा जास्त क्रूर होत चाललेला आहे रावणाने सीता उचलून नेली परंतु त्या सीतेबरोबर कोणतेही अनिष्ट कृत्य केले नाही तो तर जगात सर्वात श्रीमंत होता आज माणसाकडे लाख रुपये असले तरी देखील माणूस गुन्हेगारीच्या वृत्तीत जात आहे आणि काही लोक तर खिशात रुपया नसताना सुद्धा स्त्रियांवर अत्याचार करण्याचे स्वप्न पाहतात खरं तर आपण राहूच्या आणि केतूच्या प्रभावात खूप खोलपर्यंत गेलेलो आहोत या प्रभावातून लवकरात लवकर बाहेर निघणे खूप गरजेचे आहे या सर्व प्रभावात गुंतून न राहता या सौंदर्याला न भरता या आकर्षणाकडे धावपळ न करता राहू केतूच्या प्रभावातून बाहेर पडणे गरजेचे आहे कारण सध्या राहू मीन राशीत आहे आणि केतू कन्या राशीत आहे मीन राशि ही गुरुची राशी आहे आणि गुरु हा धर्माचा कारक आहे काही बुद्धिवान लोगो काही राजकीय लोक तुम्हाला तुमच्या धर्माच्या नावाखाली फसवून विनाकारण आक्रमक करतील या काळात आपण आपल्या धर्माकडे आकर्षित होतो असे आपल्याला वाटेल पण यात मुख्य प्रभाव हा राहू आणी केतुच देत आहेत. सध्या आपल्याला वेगवेगळ्या धर्माकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे की या धर्माचे लोक असे आहेत त्या धर्माची लोक तशी आहेत आणि धर्माधर्मात वाद पेटवून दिले जात आहेत काही दिवसातच कुंभ राशीमध्ये राहू जाईल तिथून पुढील परिस्थिती कशी असेल याविषयीची कल्पना लावणे सुद्धा कठीण आहे कारण केतू त्यावेळेस सिंह राशीत राहील. केतूच्या सिंह राशीत जाण्याने राजकीय लोक पिसाळल्यासारखे वागतील आणि जनतेवर याचा खूप वाईट परिणाम पडेल क्रूर घटना वाढतील जर आपण राहू चा प्रभाव वाढवत राहिलो तर.. शेवटी पालन कशाची करायची आहे हे आपल्या हातात आहे या छोटेशा लेखांमधून मी तुम्हाला माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

धन्यवाद

**श्री. श्रीधर कुलकर्णी (७८८७८६६५४७)**

**लेख क्र. ५३ : शुक्र**

**लेखक : श्री. मनीष गोसावी (९९२१७५९४१५)**

आज आपण शुक्र बाबत वैशिष्ठ पूर्ण चर्चा करू ऋषि शुक्राचार्य हेच शुक्र ग्रह चे मूळ नाव आहे. गुरु आणि शुक्र म्हणजेच आचार्य बृहस्पति/गुरू आणि आचार्य शुक्राचार्य हे दोघेही चुलत भाऊच. अंगिरस ऋषि आणि भृगु ऋषि हे ब्रह्मा चे पुत्र अंगिरस ऋषींचा पुत्र म्हणजे गुरू/ ब्रूहस्पति आणि भृगु ऋषींचा पुत्र म्हणजे शुक्राचार्य होते.

ह्या संसारात आपण नेहमी पाहतो की चुलत भावांमध्ये वैर पहावयास मिळते , असेच काही ह्या या दोन्ही चुलत भावांमध्ये होते. या दोघांनी अंगिरस ऋषि कडेच विद्या प्राप्त करीत होते, पण शुक्राचार्य शिक्षणात खूप स्मार्ट होते. आणि ही गोष्ट अंगिरस ऋषींना आवडत नव्हती कारण गुरू हा त्यांचा मुलगा आणि त्याच्या बद्दल त्यांना जास्त प्रेम होते. अंगिरस ऋषींनी गुरू/ बृहस्पती ला देवतांचे भावी आचार्य म्हणून घोषित करून दिले. शुक्राचार्यांना हे अपमानस्पद वाटले आणि ते गौतम ऋषि कडे बाकीची शिक्षा घेण्यास गेले.

शिक्षा तर पूर्ण झाली, पण समाधान त्यांना मिळत नव्हते कारण गुरूंना मानसन्मान मिळत होता म्हणून शुक्राचार्य यांनी तपस्या करण्याचा निर्णय घेतला. आता विष्णु ने शुक्राचार्य यांच्या आईचा वध केला होता, कारण त्यांनी राक्षसांना आशय दिला म्हणून, म्हणून शुक्राचार्य ने शंकराची कठोर तपस्या केली आणि त्यांना 'मृत संजीवनी विद्या ' चे वरदान मिळाले. आता शुक्राचार्य कोणालाही जिवंत करू शकत होते. ते आता असुर आणि दानव यांचे आचार्य बनले आणि त्या नंतर कोणत्याही युद्धात असुर मरत तेंव्हा शुक्राचार्य आपल्या संजीवनी विद्या ने परत जिवंत करत होते, आणि विष्णू देव त्यांचे शत्रू झालेले होते.

(इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, असुर म्हणजे काय तर जे देव नाही ते, असा आहे आणि जे वेद आणि हिंदू धर्माला न मानणारे ते म्हणजे असुर आणि त्यांचा नेता/लीडर म्हणजे राहू. असुर/दानव एक कुळ आहे. त्याचा अर्थ राक्षस नाही)

म्हणून शंकराने शुक्राचार्याना विष्णू पासून वाचण्या करिता शिवलिंगाची पूजा आयवर्त पासून दूर च्या प्रदेशात जाऊन करावयास सांगितली. तिथे विष्णू कोणतीही बाधा टाकणार नाही. म्हणून शुक्राचार्य यांनी south west दिशेला जो राहु चा प्रदेश आहे तो arbasthan त जाऊन शिवलिंग ची स्थापना केली (जो प्रदेश नंतर साउदी अरेबिया म्हणून संबोधतात )

राहु च्या या प्रदेशात शुक्राचार्याना भरपूर सम्मान मिळाला आणि दानव/असुर यांनी पण और शुक्राचार्य यांना आपले आचार्य म्हणून स्वीकार केलेले होते. म्हणून असुर/दानव येथे येऊन वसायला लागले आणि त्यांचा नेता/ लीडर म्हणजे राहू शुक्राचार्य परम मित्र बनला. राहु मायावी दानव होता. त्याने माया चा मोहिनी प्रभाव शुक्राचार्य यांच्या वर केला. (आज पण स्त्रियात सौंदर्य ची मोहिनी आपली जादू दाखवतेच. दुनियेत प्रत्येक स्त्रीचे सौंदर्य हे चंद्र आणि शुक्राचे वैभव आहे आणि प्रत्येक पुरुषाचे पुरुषत्व हे रवी आणि मंगळाचे आहे)

आता येथून पुढे शुक्राची रसाळ कथेस सुरवात होते. हजारो वर्षा नंतर शुक्राचा आणि राहुचा प्रभावी विस्तार सौदी अरेबियात मोहम्मद पैगंम्बरने मक्कात जन्म घेतला आणि इस्लाम धर्माचा विस्तार केला आज पण इस्लाम धर्मात शुक्रवारचे फार महत्व आहे जुम्मा म्हणजे शुक्रवार या दिवशी अल्लाह ला एकत्र येऊन प्रार्थना करतात, स्मरण करतात. याला फार पवित्र मानले गेले आहे, इस्लामी धर्म बांधव शुक्रवार एखाद्या सणा सारखा साजरा करतात. त्या काळातही कल्चरल प्रोग्रॅम शुक्रवारीच सादर केले जायचे. ती परंपरा आजही चालू आहे, तर फिल्म सिटीनेही शुक्रवार याच दिवशी नवीन फिल्म रिलीज करतात.

शुक्राला सेंट, परफ्यूम, अत्तर खूप पसंत आहे. तर मुस्लिम कम्युनिटी चे लोक शुक्रवारला च सेंट, अत्तर आणि परफ्यूम लावणे अधिक पसंत करतात. शुक्र चे फूल गुलाब आहे आणि आज पण दरगाहों वर गुलाबाच्या फुलाची चादर चढवली जाते. शुक्र love आणि romanse चा ग्रह आहे. तर या प्रेमाचे रूप व्यक्त करण्यासाठी गुलाबाचे फुलच दिले जाते.

निसर्ग राशि कुंडलीत शुक्र चे स्थान दूसरे (कुटुंब) आणि सप्तम (विवाह) भाव दिले गेले आहे. तर इस्लाम धर्मात आज पण आपल्या च कुटुंबातील मुली बरोबर लग्न करण्याचा रिवाज आहे. शुक्रात विनय , विवेक, अदब आहे. तर आभार मानताना देखील शुक्रिया शब्दाला प्राधान्य दिले आहे.

गीत, संगीत, अभीनय सारख्या कला शुक्राचे वरदान आहे. हे गंधर्व लोकांपासून ती विद्या मुस्लिम लोकांच्या रक्तात उतरली, भारताचा इतिहास पहिला, तर फिल्म इंडस्ट्रीचे किती गीतकार, शायर, संगीतकार आणि कलाकार मुस्लिम कम्युनिटीत जन्मलेले आणि काही आज पण आहे राग-रागिनी शुक्राने मुस्लिमाना विरासत मध्ये दिली. शुक्र चा संबंध काव्य कलाशी आहे. ती काव्यकला यातूनच कव्वाली शब्द आला.

आज पण बिस्मिल्ला खान, नौशाद, खय्याम, शकील बदायुनी, साहिर लुधियानवी, हसरत जयपुरी, कैफ़ी आज़मी, सलीम जावेद, के आसिफ, कमाल अमरोही, मेहबूबखान, दिलीप कुमार, मधुबाला, मीनाकुमारी, सुरय्या, वहीदा रेहमान, मेहमूद, जगदीप, अजित, जयंत, तलत मेहमूद, मोहम्मद रफी, नूरजहाँ, शमशाद बेगम, शाहरुख खान, आमिर खान, सलमान खान वैगरे वैगरे शुक्राचाच वैभव विस्तार आहे आणि पूर्ण फिल्म इंडस्ट्री शुक्राची empire आहे जेथे लक्ष्मी ची काही कमी नाही.

साउदी अरबियात आज पण पैश्याची काही कमी नाही. कारण ती शुक्र आणि राहु ची भूमि आहे. शनि हा शुक्र चा परम मित्र आहे तेंव्हा तेथे भूगर्भात क्रूड ऑयल ची काही कमी नाही शनि क्रूड ऑयल, पेट्रोल चा अधिपति आहे.

एक आणखी गोष्ट वर नमूद करण्याची राहिली. गुरू/ बृहस्पति ची पत्नी ताराला चंद्र पळवून घेऊन गेला होता. गुरू/बृहस्पति चा शत्रु शुक्राचार्य ला चंद्राचे हे कार्य पसंत आले आणि तेंव्हा पासून शुक्राचा मित्र बनला आणि शंकराला पण चंद्र पसंत होते. कुंडलीत जर दोन्ही युतीत असता एक वेगळी मोहिनी/आकर्षण आणि दोघांच्या प्रभावाने माणसाचा जन्म होतो आणि अश्या लोकांच्या जीवनात एक्स्ट्रा मेरेजिल अफेयर होतात. असे लोक समाजाची देखील परवा करत नाही शुक्र नेहमी चंद्राची वासना भडकवतो तर शुक्र चन्द्र संबंध मुळे नादान वयातच हृदयात रोमांस द्रवतात.

शुक्राचार्य यांना चंद्र प्रिय होता. आजही मुस्लिम कम्युनिटी चंद्र ने प्रभावित आहे. चंद्राला मुसलम्मा पण म्हणतात आणि या नावानेच मुसलमान शब्द प्रचलित झाला. अमावस्या नंतर जेंव्हा द्वितीया चा चंद्राचा उदय आणि दर्शन होते. त्या दिवसा पासून मुस्लिम समाज आपला महीना सुरू करतात.

राहुला म्लेंच्छ (मलेच्छ) ग्रह म्हटलें जाते म्लेंच्छ (मलेच्छ) म्हणजे non vedic किंवा सनातन हिंदू धर्म न मानणारा.

आशा आहे आपल्या सर्वाना माझी पोस्ट पसंत येईल आणि शुक्र राहू चे अरब कनेक्शन कसे आहे हे समजले असेल.

श्री. मनीष गोसावी (९९२१७५९४१५)

## वार्षिक राशी भविष्य २०२५

**लेखक : श्री. संजय कुलकर्णी (७५८८०२१६६६)**

।। श्री गणेशाय नमः ।।

# वार्षिक भविष्य
# सन २०२५


**श्री. संजय कुलकर्णी**
''दुर्गाप्रसाद'', सुरभी कॉलनी,
काशिविश्वेश्वर मंदिराजवळ,
भुतकरवाडी, सावेडी रोड,
अहमदनगर, ४१४००३
भ्रमणध्वनी - ७५८८०२१६६

# प्रस्तावना

आपणासर्वांना ही दीपावली तसेच नवीन वर्ष २०२५ हे सुखसमृद्धी, भरभराटीचे, ऐश्वर्य संपन्न व आपल्या मनातील सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण करणारे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

तसेच आपण सर्वांनी मला मागीलवर्षीचे वार्षिक-भविष्य आवडल्याचे तंतांतंत लागू पडल्याचे प्रत्यक्ष भेटून व्हॉटसअॅपच्या माध्यमातून, मॅसेजवरून आवडल्याचे कळविले. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. याही वर्षी आपण असाच प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा सर्व वाचकांकडून करतो.

## धनयोग....!

माझ्याकडे येणाऱ्या जातकापैकी ८०% जातक प्रश्न विचारतात की, माझ्या पत्रिकेत धनयोग आहेत का? मधेच माझी नोकरी बदलेल का? नोकरी बदलली तर दुसरी नोकरी लगेच लागेल का? व्यवसाय व्यवस्थित चालेल का? असे एक ना अनेक प्रश्न विचारतात. अर्थात त्याबद्दल कुणालाही दोष देता येणार नाही. एखादी धनवान व्यक्ती कितीही संपत्ती असली तरी तिचा मोह काही सुटत नाही. प्रत्येक गरीब व्यक्तीला श्रीमंतीकडे प्रवास करावा वाटतो व त्यात गैरही काही नाही. वास्तविक गरीबी हे माणसाच्या नकारात्मक भूमिकेचे फळ आहे. जगात असा कोणताच प्रश्न नाही की, ज्यावर उपयाय नाही, उत्तर नाही, या दृष्टिने विचार केल्यास गरीबी हा रोग बरा करता येण्यासारखा आहे. मात्र यातून बाहेर पडण्याची दुर्धर इच्छा असली पाहिजे व याची जाणीव व्हायला हवी त्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

जन्मकुंडलीतील द्वितीय स्थान म्हणजे धनस्थान. पंचमस्थान म्हणजे सुतस्थान, अष्टमस्थान म्हणजे अचानक धनलाभाचे स्थान तर लाभस्थान म्हणजे लाभाचे स्थान. कुंडलीतील ही चार स्थाने विविध प्रकारच्या लाभाची आहेत. शुभग्रह असतील तर यथाचित धनयोग भरपूर होतो. बऱ्याच ठिकाणाहून अनपेक्षित धनलाभ होतो. या उलट वरीलपैकी स्थानात पापग्रह असतील तर आहे त्या धनाचा लाभ होऊ शकतो. परंतू काहीही असले तरी आजही ज्यांचा चांगला आर्थिक विकास झाला आहे, प्रगती झाली आहे त्या व्यक्तींनी यशासाठी कार्य केले आहे! या अभ्यास आपण करावा व त्याप्रमाणे कृती करावी. तसेच आवश्यक असेल तरच खर्च करावा. तीच गोष्ट शेअर बाजार व क्रेडिट कार्डाची आपला शेअर बाजाराचा अभ्यास असेल तर पैसे गुंतवावेत. नाहीतर गुंतवू नयेत. कारण कमी कष्टात आपण खूप पैसे कमविण्याचे स्वप्न पहातो. परंतू खूप काही कमविण्याच्या नादात आपण सर्व गमावून बसतो. मानवी जीवन जगत असताना धनवृद्धी वाढीसाठी आपल्या वेदामध्ये भरपूर मंत्र, स्तोत्र, सूक्त दिली आहेत. तेव्हा त्याचा प्रत्येकांनी फायदा घेऊन आपले जीवन सुखी करावे. पण हे स्तोत्र किंवा मंत्र म्हटल्याने आपला भाग्योदय होईल आणि आपली सर्व तंगी समाप्त होईल. या आशेवर जगत असाल तर आपला शेवट कधी होईल हे सांगता येणार नाही. तेव्हा पूर्ण नशिबावर अवलंबून न राहता प्रयत्नांवर अवलंबून रहावे. नाहीतर...

**गणपतवाणी बिडी पिताना,**
**चावायाचा नुसतीच काडी**
**मिचकावून अन् डोळे दोन म्हणायचा,**
**या जागेवर बांधीन माडी.**

तेव्हा कोणताही आळस न करता आपली बुद्धी वापरून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा हाच या नवीन वर्षाचा संदेश आहे.

**अतिसावधानतेचा इशारा :-** ज्या व्यक्तींची जन्मतारीख १६ मार्च ते १० एप्रिल आहे. तसेच ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा चरण - ३ व ४ आहे. त्यांनी पुढील बाबतीत सावधानता बाळगावी.

या कालावधीमध्ये आपणास एक प्रकारचे नैराश्य जाणवणार आहे. तेव्हा कन्या, मीन, मेष, कुंभ या राशींनी काळजी घ्यावी. आपण कोणत्याही प्रकारचा सात्विक संताप करून घेऊ नये. तसे केल्यास त्याचा त्रास आपल्यालाच होईल. कोणताही नियम अथवा कायदा मोडू नये. तसे केल्यास प्रचंड मानसिक त्रासातून आपल्याला जावे लागेल. आपला पाल्य इ. १० वी किंवा इ. १२ वीला असेल तर, त्याच्या वर्तणुकीवर पालकांनी लक्ष द्यावे. आपल्या पाल्याचे अभ्यासावरील लक्ष कमी होण्याची शक्यता तसेच असंगाशी संग होणार नाही. याची दक्षता घ्यावी. आपण पालक या नात्याने आपल्या पाल्यांना आधार द्यावा. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठापासून सावध रहावे. व्यावसायिकांनी अत्यंत काळजीपूर्वक निर्णय घ्यावेत. विवाह ठरविणे, प्रॉपर्टी खरेदी-विक्री यासाठी अत्यंत काळजीपूर्वक व्यवहार करावेत. जुने आजार पुन्हा डोके वर काढू शकतात किंवा अनपेक्षितपणे एखादा आजार पुन्हा डोके वर काढू शकतो किंवा अनपेक्षितपणे ऑपरेशनेच योग येवू शकतात. कोर्ट-कचेरी अचानक उद्भवू शकते. या कालखंडात कुणालाही जामीन राहू नये. हात उसने पैसे देऊ नयेत. पुन्हा मिळण्याची शक्यता कमी, गर्भवती महिलांनी काळजी घ्यावी. नवविवाहितांच्या जीवनात अडचणी येवू शकतात. त्यामुळे पती-पत्नीने एकमेकांना सांभाळून घ्यावे. परंतू लगेचच टोकाची भूमिका घेऊ नये. तसेच वाहन चालविताना अत्यंत सावकाश चालवावे. तेव्हा वरील कालावधीतील या राशीच्या व्यक्तींनी अत्यंत काळजीपूर्वक वागावे.

श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## १) मेष :- अध्यात्माकडे वाटचाल...!

आपली राशीचक्रामतील पहिली रास. आपल्याला कितीही अडचणी आल्या तरी जीवनाशी पुढे टक्कर देत आपण पुढे जात असता. मागील दोन वर्षे आपणाला चांगली गेली. पण, या वर्षात आपली अध्यात्माकडे वाटचाल होईल. त्यातच साडेसातीला सुरूवात होईल. परंतू तुर्त तरी त्याचा धसका न घेता अखंड सावधान रहावे. या वर्षात अविवाहितांचे विवाह ठरतील. मनाप्रमाणे जोडीदार मिळेल. तसेच पर्यटनाचे योग आहेत. धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग आहेत. आपला पाल्य यावर्षी इ. १० वी/इ. १२ वीला असेल तर त्याला अपेक्षित यश मिळेल. नोकरदारांना एकप्रकारे नैराश्य जाणवेल. व्यावसायिकांनी धीरोदत्तप्रमाणे आपली प्रगती साधावी. नवविवाहितांना चांगली बातमी ऐकावयास मिळेल. स्थावन-प्रॉपर्टीचे कामे धिम्यागतीने मार्गी लागतील. राजकारणी व्यक्तींनी सावधपणे आपली पाऊले टाकावीत. नाहीतर आपला आपटबार कधी कसा होईल? हे सांगता येणार नाही. कलाकारांना या वर्षात संमिश्र अनुभव येतील. कोर्ट-कचेरीच्या कामात विलंबाने यश मिळेल. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याची इच्छा असेल तर विद्यार्थ्याला यश मिळू शकेल. आपले शेजारी अथवा नातेवाईकांशी संबंध बिघडले असतील तर ते चांगले होतील.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ –** स्थावन इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. परंतू बोलताना अत्यंत संयम आवश्यक.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** वाहन चालवताना अत्यंत सावकाश चालवावे. अनपेक्षितपणे खर्च वाढेल. खर्चावर नियंत्रण राहणार नाही.

**मार्च/एप्रिल :-** या महिन्यात साडेसातीला सुरूवात होईल. त्यामुळे आपण सावध रहावे. तसेच अनपेक्षित खर्चावर नियंत्रण राहणार नाही.

**मे/जून -** उत्साहात दिवस जातील. अनेक ओळखी होतील व त्याचा उपयोग नोकरी, व्यवसायात होईल.

**जुलै/ऑगस्ट :-** संततीच्या संदर्भात निर्णय घेताना जपून घ्या. कारण निर्णय चुकण्याची शक्यता. मानसिक संतुलन बिघडणार नाही याची दक्षला घ्यावी. तसेच महत्वाची बातमी समेजल.

**सप्टेंबर/ऑक्टोबर :-** स्थावराची कामे मार्गी लागतील. आईचा संपर्क वाढेल. तसेच शेती, व्यवसासायाची कामे मार्गी लागतील.

**नोव्हेंबर/डिसेंबर :-** शेअर्समध्ये फायदा होईल किंवा अचानक धनलाभाचे योग आहेत. नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी हितशत्रू डोके वर काढण्याची शक्यता.

**उपासना :- श्रीगणेशाची उपासना करावी.**



श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## २) वृषभ :- कामात अडथळे...आर्थिक वृद्धी होईल.

मुळातच आपला स्वभाव चैनी, हौशी, मौज-मजा करणारा असा आहे. तरी सुद्धा आपल्याला बोधचिन्हाप्रमाणे काम करायला आवडते. त्यामुळे कष्टाच्या मानाने यश कमी मिळते व आपण मागे राहता. या वर्षात आर्थिक वृद्धी होईल. मागील येणी वसूल होतील. तसेच या सर्व गोष्टी करताना अडथळे येण्याची शक्यता. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. तसेच नोकरी-व्यवसायात नवीन कल्पना सुचतील व त्या अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा. अविवाहितांचे विवाह ठरतील. तसेच नवविवाहितांना सुद्धा हे दिवस चांगले आहेत. आपला पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल. तसेच संततीच्या संदर्भात घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक क्षेत्रात यश मिळेल. स्थावन-प्रॉपर्टीच्या संदर्भात एखादी चांगली घटना घडेल. नवीन खरेदी करण्याचे योग आहेत. राजकारणी व्यक्ती/कलाकारांना हा कालखंड अतिशय चांगला आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याचे योग आहेत. या वर्षात कोणत्याही परिस्थितीत निराशाजनक कालखंड असणार नाही. शेजारी व नातेवाईक यांच्याशी संबंध चांगले राहतील. आपल्या पाल्याला योग्य प्रोत्साहन द्यावे.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** या कालावधीत अनपेक्षित प्रवासाचे योग आहेत. असे असले तरी, केलेला प्रवास आपल्याला निश्चित फायदा करून देईल.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** अनपेक्षितपणे आपल्याला मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करावा लागेल. नोकरी/व्यवसायात प्रचंड ओळखी होतील.

**मार्च/एप्रिल -** लाभात थोडे अडथळे निर्माण होतील. परंतू प्रतिष्ठेला कोणतीही बाधा येणार नाही.

**मे/जून -** आर्थिक वृद्ध होईल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. बोलण्यातून गैरसमज होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**जुलै/ऑगस्ट -** कोणतेही कारण नसताना एखादा निर्णय चुकीचा होईल व त्याचा फटका बसण्याची शक्यता जास्त तसेच लेखक व प्रकाशकांना कालखंड अतिशय उत्तम राहील.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** जर आपण ५५ वर्षाच्या वयापेक्षा जास्त असाल तर ऑपरेशनचे योग आहेत. इतरांनी आपले आरोग्य सांभाळावे.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** अविवाहितांचे विवाह ठरतील. तसेच वाहन चालविताना या महिन्यात योग्य ती काळजी घ्यावी.तसेच कुणालाही अपमानास्पद बोलू नये.

**उपासना :- श्री दुर्गास्तोत्र वाचावे.**

## ३) मिथून :- सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक वृद्धी लाभेल...!

आपली रास प्रचंड बुद्धीमान. समय सूचकता, हास्यविनोद, वैचारिक परिवर्तन, पराकोटीची सहनशीलता या सर्व गुणांचा चांगला उपयोग या वर्षात आपल्यालाल होणार आहे. आत्तापर्यंत आपण बऱ्यापैकी हालअपेष्टा सोसल्या. आता त्या अजिबात राहणार नाहीत. त्यामुळे निश्चिंत रहा. आपल्या आर्थिक वृद्धीत तर भर पडणारच आहे. त्यामुळे निश्चिंत रहा. नोकरी/व्यवसायात नवनवीन कल्पना राबवा. सर्व कल्पना फलद्रुप होतील. अविवाहितांचे विवाह ठरतील. नवविवाहितांकडून चांगली बातमी मिळेल. स्थावन इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच एप्रिल २०२५ नंतर आपल्याला खुप जुन सहकारी अनपेक्षितपणे नोकरी/व्यवसायाच्या निमित्ताने भेटेल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यापासून लाभ होईल. आपण या संधचा पुरेपूर फायदा घ्यावा. नोकरीमध्ये प्रमोशन मिळेल. त्यामुळे आपल्या राजकारणी व्यक्तींची या कालखंडामध्ये चांगलीच चलती होईल तसेच कलाकारांना सुद्धा नवीन प्रकारची आव्हानात्मक कामे मिळतील व त्यात चांगले यश मिळेल. आपला पाल्य जर इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ –** अनपेक्षित खर्चाचे योग आहेत. त्यामुळे आत्ताच तरतूद करून ठेवा. पत्नीचा सल्ला मानावा लागेल.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ –** उत्साहवर्धक काळ असला तरी, आरोग्याच्या तक्रारी निर्माण होऊ शकतो. नोकरी/व्यवसायात नवीन ओळखी व कल्पना सुचतील.

**मार्च/एप्रिल –** अनपेक्षित खर्चात वाढ होईल. चैनी मित्रापासून सावध रहा.

**मे/जून –** कुटूंबासाठी खर्च केला जाईल व त्यावर कोणतेही नियंत्रण असणार नाही. प्रवासाचे योग आहेत.

**जुलै/ऑगस्ट –** स्थावन इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. तसेच वाहनापासून काळजी घ्या. थोडाफार धोका संभवत आसहे.

**सप्टेंबर/ऑक्टोबर –** नोकरीत थोडेफार आळशीपणा येण्याची शक्यता. मात्र त्याचवेळी आपल्याला नोकरीच्या ठिकाणी खूप जुना मित्र भेटेल. मातृसौख्य लाभेल.

**नोव्हेंबर/डिसेंबर –** उष्णतेचे विकार बळावतील. तसेच आपण आपल्या जोडीदाराबरोबर कोणत्याही प्रकारचे वाद होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बोलताना संयम अत्यंत आवश्यक आहे.

**उपासना :– श्रीव्यंकटेश स्तोत्र वाचावे.**

## ४) कर्क :- मनःशांती मिळेल, अध्यात्माकडे वाटचाल..!

स्वभाव अत्यंत संवेदशनाशील. परंतू एखादी व्यक्ती सहजन बोलली तरी आपल्याला समोरच्या व्यक्तीचे बोलणे लागते. वेदना होतात आणि न कळत दुखावले गेलयास आपल्या डोळ्यातून पाणी आल्याशिवाय रहात नाही. परंतू या वर्षात आपल्याला अशाप्रकारचे अनुभव कमी येतील मनःशांती मिळेल. कोरोना कालखंड आपलयाला खूपच खराब गेला. स्थावन-इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. त्यासाठी कर्ज घेण्याचे योग आहेत. तसेच अविवाहितांचे विवाह ठरतील व महत्वाचे म्हणजे मनासारखा जोडीदार मिळेल. नवविवाहितांना आनंदाची बातमी मिळेल. त्यामुळे पुढील सर्व मार्ग सुकर होतील. सुशिक्षित बरोजगारांना नोकरी मिळेल. नोकरीच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या संधी खुनावतील. तेव्हा या चांगल्या संधीचा फायदा जरूर या वर्षात घ्यावा. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. तसेच नवीन कल्पनांची आपल्याकडून अंमलबजावणी होईल. राजकारणी तसेच कलाकार मंडळींना हा कालखंड अविस्मरणीय असाच जाईल. मागील काही वर्षात आपले झालेले तोटे कुठेतरी भरून निघतील. धार्मिक स्थळी यात्रा होण्याचे योग आहेत. एकंदरीत या वर्षात आनंदी आनंद राहील. उत्तम जनसंपर्क तयार होत असल्यामुळे महत्वाचे कामे विनाविलंब होतील.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** अत्यंत उत्साहवर्धक कालखंड राहील. अविवाहितांचे विवाह ठरण्यासाठी व योग्य निर्णय घेण्यासाठी योग्य असा कालखंड. अनपेक्षितपणे प्रवायाचे योग.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** कोणताही निर्णय घेताना काळजीपूर्वक घ्या. अन्यथा महत्वाचे निर्णय चुकतील.

**मार्च/एप्रिल -** अत्यंत उत्साहवर्धक कालखंड राहील. नोकरी/व्यवसायात अनपेक्षितपणे राहिलेले कामे होतील. तसेच नवीन ओळखी होतील.

**मे/जून -** एकप्रकारची सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. तसेच स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील.

**जुलै/ऑगस्ट -** स्वभावचा कल चैन करण्याकडे राहील. तसेच जुनी येणी वसूल होतील. परदेशवारीचे किंवा प्रवासाचे योग आहेत.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** आपल्या सहकाऱ्यांशी वागताना सांभाळून वागावे. तसेच कोणत्याही प्रकारची भांडणे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. शेअर्समध्ये फायदा होण्याचे योग आहेत.

**उपासना :- श्री शंकराची उपासना करावी.**

## ५) सिंह :- दडपण कमी होईल... यशाची चढती कमाल राहील...!

मागील दोन वर्षापासून म्हणजेच २०२३ व २०२४ या वर्षात आपलयाला नको-नकोसे झाले होते. मुळतःच आपला स्वभाव अतयंत मनमोकळा, उदार प्रचंड आशावादी व ध्येयवादी असा आहे आणि या स्वभावालाच गेल्या दोन वर्षात अडथळा आला होता व नैराश्य आले होते. या वर्षात नैराश्य आपल्याला राहणार नाही व वरील सर्व गुणांचे उपयोग आपल्याला येथून पुढील कालखंडात करता येईल. अविवाहितांचे विवाह ठरतील. विचार ठरविताना कालखंड अतिशय उत्कृष्ट हाहे. त्यामुळे निर्णय चुकण्याची शक्यता कमीच आहे. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. कुठलीही अडचण येणार नाही. स्थावर इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच नवविवाहित असल्यास संतती प्राप्तीचे योग आहेत. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. एप्रिल २०२५ मध्ये न्यायाधिशांची बदली होईल व आपल्याला उर्वरित कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात प्रगती होईल. नवीन कल्पना सुचतील. नोकरीत वरिष्ठ आपल्या कामावर खुश राहतील. राजकारणी व कलाकार यांना यावर्षात खूपच चांगल्या कल्पना सुचतील. त्यांच्यावर कुठलेही मानसिक दडपण राहणार नाही. ज्यांचा पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल त्याला आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळेल. तसेच त्यांच्या बाबतीत घेतलेले निर्णय योग्य राहतील. महत्वाचे म्हणजे पालक म्हणून आपल्यावर दोष येणार नाही.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** गुप्त शत्रूकडून त्रास होईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण हवे. नाहीतर खूप त्रास होईल.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** या नवीन वर्षात स्थावर इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच संततीविषयक समस्या सुद्धा दूर होतील.

**मार्च/एप्रिल -** मनावरील दडपण कमी होईल व आपला आपल्याच एक वेगळ्याप्रकारचा फिल निर्माण होईल. तसेच महत्वाची बातमी समजेल.

**मे/जून -** नोकरीमध्ये वरिष्ठ आपल्यावनर खुश राहतील. तसेच त्यांच्याकडून आपण आपल्या मनासारखे काम करून घेऊ शकता.

**जुलै/ऑगस्ट -** आजारपणावर अनपेक्षित खर्च होईल तसेच बोलताना संयम आवश्यक नाहीतर, अनावश्यक भांडणे होतील व शत्रुत्व वाढेल.

सप्टेंबर/ऑक्टोबर - हे दोन महिने अत्यंत उत्साहवर्धक जातील. तसेच जुनी येणी वसूल होतील. तसेच एखादे महत्वाचे काम होईल.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** वास्तूविषयक/वाहनविषयक महत्वाचे कामे मार्गी लागतील. त्यासंदर्भात घेतलेले निर्णय अतिशय योग्य राहतील.

**उपासना :- श्री सूर्यकवच वाचावे.**



श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## ६) कन्या :- प्रतिष्ठा राहील... मात्र मनावर दडपण राहील..!

आपल्याकडे निसर्गदत्त गुणांची खाण आहे. उत्तम वक्तृत्व, हजरूजबाबीपणा, उत्कृष्ट निरीक्षण व परीक्षण, धूर्तपणा या सर्व गोष्टी आहेत. यावरच आपल्या यशाची कमान आत्तापर्यत आत्तापर्यंत होती आणि राहिल बोलण्यात कधी कधी मोकळेपणा नसतो या गुणांचा फायदा आपल्याला या कालखंडात होईल. आणि यावर्षात आपण प्रगतीपथावर रहात. परंतू, मनावर एकप्रकारचे दडपण राहील तसेच आपल्याला काही लाभ होताना विलंबाने होतील. अविवाहितांची विवाह ठरविताना विचार करुन निर्णय घ्यावा म्हणजे नंतर पश्चातापाची वेळ येणार नाही तसेच, नवविवाहितांनी कोणतेही कारण नसताना भांडण करु नये. अन्यथा एकमेकांचे (पती-पत्नीमध्ये) गैरसमज होतील व ती भांडणे दीर्घकाळ चालतील. आपला पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवावे. अन्यथा तो अभ्यासाच्या नावाखाली इतर गोष्टीकडे लक्ष  देऊ शकतो, कोर्ट-कचेरीच्या कामात तूर्तास यश येणार नाही किंवा त्या वाट्याला जाण्याचा प्रयत्न करु नये. नोकरी/व्यवसायात प्रगती म्हणजे अडथळ्याची शर्यत होय. नोकरीत आपल्या वरिष्ठांचे मत आपल्याबद्दल चांगले असणार नाही. त्यामुळे वरिष्ठापासून चार हात लांब रहावे. राजकारणी/ कलाकार या व्यक्तींना सुद्धा सामाजिक विरोधाला तोंड द्यावे लागेल.

**नोव्हेंबर/डिसेंबर-२०२४ -** व्यसनी मित्रापासून सावध रहावे. आपल्याला त्यांच्यापासून काही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच शेअर्समध्ये फार पैसे गुंतू नयेत. जानेवारी

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** या नवीन वर्षात आपले नवीन ओळखी होण्याचे योग आहेत. तसेच लांबच्या नात्यातील बहिण-भावांचा संबंध येईल.

**मार्च/एप्रिल -** महत्वाची नवीन बातमी समजेल. तसेच एखादी व्यक्ती योग्य सल्ला देणारी असेल. परदेशगमनासाठी प्रयत्न करीत असल्यास जरूर प्रयत्न करावे.

**मे/जून -** जुनी येणी वसूल होतील. तसेच अनपेक्षित प्रवासाचे योग आहेत व आपल्या लिखाणाला चांगली प्रसिद्ध मिळेल.

**जुलै/ऑगस्ट -** शनि-मंगळ प्रतियोग असल्यामुळे प्रतिकुलता जाणेवल. व्यवसायात अडथळे आहेत. तसेच काहींना अनपेक्षित ऑपरेशनचे योग आहेत.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** स्थावन इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. तसेच, या दोन महिन्यात आपण थोडे बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. तसेच, नोकरदारांची अचानक बदली होईल.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** वाहन चालविताना सावकाश चालवा. परदेशात जाण्यासाठी प्रयत्न करीत असाल तर अवश्य करावा. ताबडतोब काम होईल.

**उपासना :- श्री विष्णूसहस्त्रनाम वाचावे.**

श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## ७) तूळ :- पूर्वार्ध अपयशाचा... मात्र, उत्तरार्धात मनाप्रमाणे घटना..!

मागील मार्च २०२३ पासून आपला सात्विक संताप वाढला आहे. तसेच संततीच्या बाबतीत काय निर्णय घ्यावा? याचा अंदाज आपल्याला अजून झालेला नाही. वास्तविक आपण सर्वबाजूंनी समतोल विचार करता. कुठेही, कुणावरही अन्याय होऊ देत नाही. ही आपली खासियत पण आपल्या मूळ स्वभावाला योग्य न्याय मिळेल तो १ जून २०२५ नंतर तेव्हा अजिबात काळजी करू नका. या वर्षातील पहिले ६ महिने मात्र आपल्याला त्रास राहील. नंतरचे ६ महिने म्हणजेच काळावर राज्य येईल. या कालखंडात आपण आपल्या मुलामुलींचे कालखंडात चांगली बातमी मिळू शकेल. नवविवाहितांचे स्वप्नरंजन पूर्ण होईल. सुशिक्षित बेरोजगारांना चांगली नोकरी लागेल. स्वतःबरोबरच आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार होईल व एकप्रकारे वेगळाच आनंद मिळेल. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील आणि त्याची अंमलबजावणी होईल. नोकरीमध्ये वरीष्ठ आपल्यावर खुश राहतील. स्थावर प्रॉपर्टीचे कामे मार्गी लागतील. तसेच, राजकारणी लोकांना हा कालखंड चांगला राहील. कलाकार मंडळींना या कालखंडात नवीन कामे मिळेती. एकंदरीतच या वर्षीच्या पूर्वार्धात आपल्याला प्रयत्नावर भर द्यावा लागेल. मात्र जून २०२५ नंतर आपल्याला पुन्हा मागे वळून पहावे लागणार नाही.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** नोकरीच्या ठिकाणी आपल्याला शत्रूपीडा दर्शविते. तसेच अनपेक्षितपणे आपल्याला कुटुंबासाठी खर्च करावा लागेल

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** या नवीन वर्षात आपल्याला एखादी मार्गदर्शक व्यक्ती भेटेल व हाताखालील नोकरापासून काहीतरी महत्वाची बातमी समजेल.

**मार्च/एप्रिल -** नोकरदारांची बदली होण्याची शक्यता. मामा-मावशीकडून काहीतरी लाभ होण्याची शक्यता. तसेच, मनावरील ताण हलका होईल.

**मे/जून -** शनिपालट व गुरुपालट झाल्यामुळे आपल्यालाल हा कालखंड खूपच अविस्मरणीय जाईल. तसेच मनासारख्या घटना घडतील.

**जुलै/ऑगस्ट -** अनपेक्षित खर्चाचे योग. कुटूंबातील ज्येष्ठांच्या आजारपणावर खर्च होईल. समाजात नवीन ओळखी होतील. त्याचा उपयोग नोकरी/व्यवसायासाठी होईल.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** अत्यंत उत्साहवर्धक व कालखंड राहील. नोकरदारांना ऑक्टोबरमध्ये प्रमोशन मिळेल. तसेच चांगल्या ठिकाणी बदली होईल.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** प्रवासाचे योग आहेत. जुनी येणी वसूल होतील.

**उपासना :- श्री दुर्गास्तोत्र वाचावे.**

## ८) वृश्चिक :- कमी खुशी... कभी गम..!

आपला स्वभाव विचारी, मनांचा समतोलपणा राखणारा, कोणत्याही परिस्थितीत बदल झाल्यास शांतपणे सामोरे जाणारा व अत्यंत निश्चयी असा स्वभाव आहे. आपल्याकडून इतरांच्या अगदी न कळत भावना दुखावल्या जातात व आपल्याला अनेक शत्रू निर्माण होतात. आता या प्रकारचा अनुभव आपल्याला १ जून २०२५ नंतर येईल. प्रत्येक कामात अडथळे येतील. तसेच, शत्रूत्वामध्ये वाढ होईल. तेव्हा ३१ मे २०२५ पूर्वी महत्वाची कामे पूर्ण करून घ्यावीत. या कालखंडात, म्हणजेच ३१ मे पूर्वी, अविवाहितांचे विवाह ठरतील. त्यांना मनाप्रमाणे वधू/वर मिळू शकतो. नवविवाहितांना आनंदाची गोड बातमी समजेल. तसेच, सुशिक्षित बेरोजगारांना चांगली नोकरी लागेल व कमीत कमी एक वर्ष नोकरी टिकवून ठेवावी. अन्यथा नवीन नोकरी लवकर लागणार नाही. त्यामुळे वरिष्ठांशी अत्यंत काळजीपूर्वक वागावे. कोर्ट–कचेरीचे कामे लवकर करून घ्या. अन्यथा लांबणीवर पडतील व ती कामे लवकर मिळणार नाही. नोकरी/व्यवसायात पूर्वार्धात प्रगती आहे. मात्र उत्तरार्धात आपल्याला काम जास्त राहील व पैसे कमी मिळतील. परंतू प्रतिष्ठा मात्र शाबूत राहील. प्रतिष्ठेला कुठेही धक्का लागणार नाही. राजकारणी लोकांनासुद्धा वरीलप्रमाणेच कालखंड असेल. मात्र, कलाकारांकडून काही महत्वाची कामे निसटून जातील. या पूर्ण वर्षात पालयाच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवावे. म्हणजे पालक म्हणून आपल्यावर मनःस्तापाची वेळ येणार नाही. उत्तरार्धात निर्णय घेताना जपूनच घ्यावेत.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ –** महत्वाची कामे या दोन महिन्यात पूर्ण होतील. तसेच नवीन ओळखी होतील व व्यवसायात प्रगती होईल.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ –** वाहन चालविताना सावकाश व सावधानतेने चालवा. म्हणजे पुढील अनर्थ टळतील. जुनी येणी वसूल होतील.

**मार्च/एप्रिल –** धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग आहेत. तसेच शेअर्समध्ये फायदा होईल. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल.

**मे/जून –** नोकरदारांची अनपेक्षित बदली होईल व त्याठिकाणी कामाचा व्याप जास्त असेल. तसेच व्यावसायिकांना थोडे नमते घ्यावे लागेल.

**जुलै/ऑगस्ट –** जोडीदाराकडून फायदा होईल. तसेच आर्थिक लाभ होईल. आरोग्याची काळजी घ्यावी.

**सप्टेंबर/ऑक्टोबर –** हे दोन्ही महिने उत्साहवर्धक जातील. तसेच या महिन्यात राहिलेले सर्व कामे करून घ्यावीत. म्हणजे मनःस्तापाची वेळ येणार नाही.

**नोव्हेंबर/डिसेंबर –** आजारपणावर खर्च होईल. तसेच घरामध्ये पाहुण्यांची वर्दळ वाढेल. हितशत्रूपासून सावध रहावे. अन्यथा मोठा धोका संभवतो.

**उपासना :– श्री गणेशाची व श्री दत्तात्रयांची उपासना करावी.**

श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## ९) धनू :- इस्टेटीचे कामे मार्गी लागतील... अविवाहितांचे विवाह ठरतील.

आपल्या चेहऱ्यावर विदवत्ता व सात्विकतेचे तेज, तसेच निर्णय घ्यायला स्वतःला उशीर होत असला तरी इतरांना मात्र आपण उत्कृष्ट मार्गदर्शन करता तसेच सन्मार्गाने पुढे जाण्याची आपली प्रवृत्ती असा आपला स्वभाव आणि नेमक्या याच स्वभावाला अनुसरून आपल्याला हे वर्ष जाणार आहे. आपले या वर्षात सर्वात महत्वाचे म्हणजे स्थावर इस्टेटीचे काम मार्गी लागेल. किंवा स्थावर इस्टेटीमध्ये भर पडेल. न भूतो न भविष्यती असे आपले वास्तूविषयक स्वप्न पूर्ण होईल. अविवाहितांना स्वप्नातील राजकुमार/राजकुमारी भेटेल. त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. तसेच यावर्षात आपल्याला कोणत्याही प्रगतीच्या मर्यादा नाहीत. नोकरी/व्यवसायात आपली प्रगती जोरात राहील. नोकरीत वरिष्ठ आपल्या खुश राहतील. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्याची वेळ त्यांच्यावर येईल व त्यात यश मिळेल. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. जेवढी वैयक्तिक प्रकरणे आपणास मिटविता येतील. तेवढी मिटवा. म्हणजे पुढे भविष्यात त्रास होणार नाही.

राजकारणी/कलाकारांना हा कालखंड अतिशय चांगला जाईल. कुठेही मागे वळून पहाण्याची वेळ येणार नाही. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** वाहन चालविताना अत्यंत काळजी घ्यावी. अन्यथा धोका होईल. संततीच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवावे.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. तसेच जुनी येणी सुद्धा वसूल होतील. मात्र बोलण्यावर संयम आवश्यक.

**मार्च/एप्रिल -** या महिन्यापासून स्थावर इस्टेट घेण्याचे योग आहेत. तसेच संततीच्या संदर्भात एखादा महत्वाचा निर्णय होईल व तो योग्य राहील.

**मे/जून -** शेअर्समध्ये लाभ होईल. तसेच एखादी मार्गदर्शक व्यक्ती आपल्याला या महिन्यात भेटेल. अविवाहितांचे विवाह ठरण्याची शक्यता.

**जुलै/ऑगस्ट -** नोकरदारांची बदली होण्याची शक्यता. तसेच आपल्या एखाद्या जीर्ण आजारावर चांगले डॉक्टर मिळतील.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** हा महिना आपल्याला प्रचंड अविस्मरणीय जाईल. नोकरी/व्यवसायात प्रचंड आवक राहील. महत्वाच्या बातम्या समजतील. मनावरील दडपण दूर होईल. एकंदरीत हा कालखंड चांगला आहे.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** महत्वाचे निर्णय चुकण्याची शक्यता. त्यामुळे महत्वाचे निर्णय घेऊ नयेत. बोलताना संयम आवश्यक अन्यथा भांडणे झाली असे समजावे.

**उपासना :- श्री दत्तात्रयांची उपासना करावी.**


श्री. संजय कुलकर्णी, ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल. मो. ७५८८०२१६६६

## १०) मकर :- साडेसातीला संपणार... मात्र आरोग्य सांभाळा..!

आपल्याला कोरोनाच्या काळात म्हणजेच जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२१ या दरम्यान बराच त्रास झाला. मात्र आपण चिकाटीच्या जोरावर, प्रतिकूलतेवर मात करीत इथपर्यंत आलात. मात्र, आता अजिबात काळजी करू नका. २९ मार्च २०२५ नंतर साडेसाती संपेल व आपली राहिलेली सर्व कामे पूर्ण होतील. आपला एकंदरीतच शिस्तप्रिय स्वभाव आहे. शिस्त मोडली तर आपण वाईटपणा घेण्यास कचरत नाही. तसेच मार्मिक व कुत्सित बोलणे आपल्या स्वभावाचाच एक भाग. परंतू आता काळजी करू नका. घौडदौड अत्यंत जोरात चालू राहील. या वर्षात अविवाहितांचे विवाह ठरतील. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल. तसेच सुशिक्षित बेरोजगारांना अपेक्षेपेक्षा नोकरी चांगली लागेल. त्यामुळे त्यांनी या चांगल्या कालखंडाचा फायदा जरूर घ्यावा व आपली प्रगती साधावी. कोर्ट-कचेरीचे कामे आटोक्यात येतील. पर्यायी मार्ग सुचतील व त्यात आपल्याला यश येईल. नोकरी/व्यवसायात चांगले यश मिळेल. बऱ्याच दिवसापासूनचे राहिलेले अपूर्ण स्वप्न पूर्ण होईल. स्थावर इस्टेटीची कामे पूर्ण होतील. तसेच आपण परदेशगमन करण्याचा विचार करीत असाल तर त्यात यश मिळेल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण होईल व त्यात यश मिळेल. राजकारणी/कलाकार यांच्याही प्रगतीच्या वाटा मोकळ्या होती व आपल्या कार्यक्षेत्रात पुढे जाण्याची संधी मिळेल.

जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. मात्र हे मतभेद चहाच्या पेल्यातील असतील. जुनी येणी वसूल होतील. अचानक धनलाभ होईल.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. मात्र हे मतभेद चहाच्या पेल्यातील असतील. जुनी येणी वसूल होतील. अचानक धनलाभ होईल.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** स्थावर इस्टेटीच्या खरेदी विक्रीच्या संदर्भात सावधपणे व्यवहार करावेत. नाहीतर फसगत होण्याची शक्यता. प्रसिद्धी खूप मोठ्या प्रमाणावर मिळेल.

**मार्च/एप्रिल -** या महिन्यातून आपली साडेसातील संपेल व नवीन बातमी समजेल.

**मे/जून -** बोलताना अत्यंत संयम बाळगावा. नोकरदारांना अचानक नोकरीत बढतीची जागा तात्पुरत्या स्वरूपात मिळू शकते.

**जुलै/ऑगस्ट -** संततीविषयक सर्व समस्या मिटतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. शेअर्समध्ये चांगला फायदा होईल किंवा गुंतवणूक होईल.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** नोकरीच्या ठिकाणी आपण शांत रहावे. नाहीतर सहकाऱ्यासोबत टोकाची भांडणे होतील. अविवाहितांचे विवाह ठरतील.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** नवीन ओळखी होतील. तसेच, वाहन चालविताना सावकाश चालावा. एखादी गुप्त बातमी समजेल.

**उपासना :- श्री मारुतीची उपासना करावी.**

## ११) कुंभ :- यशदायी कालखंड... साडेसातीची तीव्रता कमी..!

आपण मागील जानेवारी २०२३ ते मार्च २०२५ या कालखंडात अतिशय साडेसातीचा त्रास सहन केला. मात्र आता, आपली संपली आहे. या भ्रमात राहू नका. शनी महाराजांना बेसावध राहिलेले अजिबात आवडत नाही. त्यामुळे सतत सावधान..! ज्यांची मागील वर्षापासून लग्न खोळंबली आहेत. निर्णय घेताना द्विधा मनस्थिती होते आहे अशा सर्वच लग्नाळू वधू/वरांचे विवाह ठरतील व ते यशस्वी होतील. या वर्षात नवविवाहितांचे विवाह ठरतील आणि नवविवाहितांना नवीन आनंदाची बातमी समजेल. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. या मिळोलेल्या संधीचा त्यांनी जरूर फायदा घ्यावा. कोर्ट-केचरीच्या कामात यश मिळेल. तसेच त्यामध्ये काही तडजोडी केल्या असल्यास त्या योग्य ठरतील. आपला पाल्य जर इ. १० वी किंवा इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल. त्यांच्या संदर्भात घेतलेले निर्णय सर्व योग्य राहतील. नोकरदारांना हा कालखंड अतिशय प्रगतीवर नेणारा जाईल. तसेच व्यावसायिकांना सुद्धा आपल्या व्यवसायामध्ये नवीन कल्पना सुचतील व आपला व्यवसाय जोरात राहील. राजकारणी/कलाकार यांना हा कालखंड अतिशय चांगला आहे. नवीन कामे मिळतील व त्याला प्रसिद्धी मिळेल. नोकरीत वरिष्ठ खुश राहतील. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यात यश आहे.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** नोकरीमध्ये अचानक बदली होण्याची शक्यता व वरिष्ठाकडून जबाबदारी अंगावर येईल. वाहन चालविताना सावकाश चालवावे.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** महत्वाचे निर्णय घेताना जपून घ्यावेत. अन्यथा चुकण्याची शक्यता. याचा परिणाम दीर्घकाळापर्यंत जाणवेल.

**मार्च/एप्रिल -** उष्णतेचे विकार बळकण्याची शक्यता. शेजाऱ्यांशी वागताना अतिशय सावधपणे वागावे. अन्यथा भांडणे होण्याची शक्यता जास्त.

**मे/जून -** या दोनही महिन्यात आपले संततीविषयक सर्व प्रश्न मार्गी लागतील. ते निर्णय योग्य ठरतील. शिक्षण/विवाह यासंदर्भात निर्णय योग्य राहील.

**जुलै/ऑगस्ट -** नोकरदारांची बदली होईल व त्याठिकाणी कामाचा ताण जाणवेल. तसेच अचानक धनलाभाचे योग आहेत.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** आपल्या झालेल्या जीर्ण आजारावर योग्य डॉक्टर भेटतील. तसेच नोकरीत प्रमोशन मिळेल. वरिष्ठ खुश राहतील.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** नवीन ओळखी होतील व त्याचा उपयोग नोकरी व्यवसायामध्ये होईल. शेअर्समध्ये फायदा होईल.

**उपासना :- श्री हनुमानचालीसा वाचणे**

## १२) मीन :- साडेसाती..अखंड सावधान..!

आपला स्वभाव मुळी सात्विकवृत्तीचा...पण या वर्षात मात्र आपल्याला एकंदरीतच सावधानतेचा इशारा आहे. याला कारण साडेसाती. नवीन नोकरी/व्यवसायात पाऊल टाकताना आपण अत्यंत सावधपणे टाकावे. जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही व नंतर मनःस्ताप नवीन लग्न ठरविताना नियोजित वधू-वरांनी स्वतःच्या मतानुसारच निर्णय घ्यावेत. आपल्या जवळच्या कोणत्याही नातेवाईकावर फार भरवसा ठेवू नये. सुशिक्षित बेरोजगारांनी प्रामाणिकपणे कष्ट करावेत. या कालखंडात आपल्याला पैसे कमी व मेहनत जास्त असे सूत्र ठेवले तरच आपला निभाव लागेल. तसेच, या कालखंडात घेतलेली मेहनत मोठी गुंतवणूकच आहे. हे सूत्र लक्षात ठेवा. तसेच नवविवाहितांनी बोलताना, वागताना मोठा संयम ठेवावा. संयम सुटण्याचे सारखे प्रसंग येतील. पण आपण संयम ठेवावा. कोर्ट-कचेरीच्या कामात विलंब होईल. तसेच, स्थावर व मालमत्तेच्या बाबतीत खरेदी/विक्री करताना अत्यंत सावधानता बाळगावी. नाहीतर, आपले व्यवहार लांबणीवर पडतील. तसेच पैसे अडकतील. राजकारणी व्यक्तींना विरोधाला तोंड द्यावे लागेल व जनमत विरूद्ध जाईल. तसेच कलाकारांना सद्धा हाता-तोंडाशी आलेला घास निघून जाईल. एकंदरीतच यावर्षात प्रत्येक पाऊलावर सावध रहावे.

**नोव्हेंबर/डिसेंबर २०२४ -** संततीविषयक समस्या मिटतील. तसेच अचानक धनलाभाचे योग आहेत.

**जानेवारी/फेब्रुवारी २०२५ -** स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. समाजात नवीन ओळखी होतील. अनपेक्षित प्रवासाचे योग आहेत.

**मार्च/एप्रिल -** बोलताना संयम आवश्यक. नाहीतर टोकाची भांडणे होण्याची शक्यता. महत्वाची गुप्त बातमी समजेल.

**मे/जून -** नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. तसेच, लेखक व प्रकाशकांना हा कालखंड अतिशय छान आहे. विवाहासंदर्भात महत्वाची बामी समजेल.

**जुलै/ऑगस्ट -** हे दोन महिने आपले अतिशय मानसिक कोंडी करणारे आहेत. या दोन महिन्यात अजिबात आपला तोल जाऊ देऊ नको.

**सप्टेंबर/ऑक्टोबर -** वाहन चालविताना अतिशय सावकाश चालवा. तसेच, या महिन्यात संततीविषयक बरेच प्रश्न मार्गी लागतील. परदेशी जाण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यामध्ये यश मिळेल.

**नोव्हेंबर/डिसेंबर -** नोकरदारांची बदली होण्याची शक्यता किंवा कामाचा अतिरिक्त ताण राहील. एखाद्या धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग आहेत..

**उपासना :- श्री दत्तात्रयांची तसेच श्री हनुमानाची उपासना करावी.**

## राहु-गुलिक-यमगंडकाल

| | राहु काल (अशुभ) | गुलिककाल (शुभ) | यमगंडकाल (अशुभ) |
|---|---|---|---|
| रविवार | दु. ०४.३० ते ०६.०० | दु. ०३.०० ते ०४.३० | दु. १२.०० ते ०१.३० |
| सोमवार | स. ०७.३० ते ०९.०० | दु. ०१.३० ते ०३.०० | स. १०.३० ते १२.०० |
| मंगळवार | दु. ०३.०० ते ०४.३० | दु. १२.०० ते ०१.३० | स. ०९.०० ते १०.३० |
| बुधवार | दु. १२.०० ते ०१.३० | स. १०.३० ते १२.०० | स. ०७.३० ते ०९.०० |
| गुरुवार | दु. ०१.३० ते ०३.०० | स. ०९.०० ते १०.३० | स. ०६.०० ते ०७.३० |
| शुक्रवार | स. १०.३० ते १२.०० | स. ०७.३० ते ०९.०० | दु. ०३.०० ते ०४.३० |
| शनिवार | स. ०९.०० ते १०.३० | स. ०६.०० ते ०७.३० | दु. ०१.३० ते ०३.०० |


विवाहयोग कधी आहे? कसा वधू किंवा वर मिळेल? त्यांची दिशा कोणती असेल? कोणत्या क्षेत्रातील मिळेल? वैवाहिक जीवन कसे जाईल? इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतर कोणती साईड घ्यावी? मुलांची कोणत्या क्षेत्रात प्रगती होईल? आपल्या पाल्याची बाहेर संगत कशी आहे? संगत चुकीचे आहे का बरोबर आहे? तसेच, नोकरी कधी लागेल? नोकरी बदलण्याचे योग कधी आहेत? प्रमोशन कधी मिळेल? आपल्या वरिष्ठ अधिकारी यांचं जाच कधी संपेल? कोर्ट कचेरी कधी संपेल? परदेशगमन, संतती, वास्तुयोग कधी आहे? नवीन वाहन खरेदी-विक्रीचे योग कधी आहेत? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपला भाग्योदय कधी होईल? यासाठी काय करावे लागेल? या सर्व प्रश्नांची उत्तरे ऑनलाईन दिली जातील.

संपर्क :- **संजय कुलकर्णी, मो. ९१७५८८०२१६६६**